सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ८ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २७९ | पाने १२+२० | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## संक्षिप्त वृत्त

### एसटी महामंडळ कृती समितीची मुख्यमंत्र्यांनी घेतली बैठक

**मुंबई :** राज्य परिवहन महामंडळातील कामगार संघटनांच्या कृती समितीने ९ ऑगस्टपासून पुकारलेल्या आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कृती समितीची बैठक झाली. समितीच्या मागण्यांच्या अनुषंगाने उच्चाधिकारी समितीने बैठक घेऊन त्याचा अहवाल आठवडाभरात सादर करण्याचा निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिला. महामंडळाच्या उत्पन्नवाढीसाठी राज्य शासन अजून दोन हजार नवीन बसेस घेण्याबाबत सकारात्मक असल्याचेही शिंदे यांनी यावेळी सांगितले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, कृती समितीचे संदीप शिंदे, हनुमंत ताटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत राज्य शासन सकारात्मक असल्याचे सांगत या मागण्यांमुळे होणारा वित्तीय भार आणि त्याची कशाप्रकारे सांगड घालायची यासंदर्भात उच्चाधिकार समितीसोबत बैठक घेण्याचा, तसेच बैठक तातडीने घेऊन त्याचा अहवाल आठवडाभरात शासनाला सादर करण्याचा निर्देशही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिला.

### वक्फ कायदा दुरुस्ती विधेयक आज लोकसभेत

**नवी दिल्ली :** केंद्र सरकार गुरुवारी लोकसभेत वक्फ कायदा संबंधित दोन विधेयके मांडणार आहे. जुना वक्फ कायदा १९२३ रद्द करणे आणि नवा सुधारित वक्फ कायदा, यासंबंधीचे हे दोन विधेयक मांडले जातील. नव्या वक्फ कायद्यात ४४ दुरुस्त्या होणार आहेत. सुधारित वक्फ कायद्याचे नाव बदलून एकात्मिक वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, दक्षता आणि विकास कायदा-१९९५ असे त्याचे नवीन नामकरण केले जाणार आहे.

### तर पानमसाला निर्मात्याला भरावा लागणार दंड

**नवी दिल्ली :** सरकारने पान मसाला उत्पादकांना त्यांच्या पॅकिंग यंत्राची जीसटी अधिकाऱ्याकडे नोंदणी न केल्यास १ ऑक्टोबर पासून दंडाची तरतूद लागू केली आहे. जीएसटी नेटवर्कने यापूर्वी मे आणि जुनमध्ये अशा निर्मात्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या यंत्रांची नोंदणी करण्यासाठी आणि कर अधिकाऱ्यासह प्राप्त केलेल्या इनपुट आणि आऊटपुटचा अहवाल देण्यासाठी जीएसटी एसआरएम-१ आणि २ असे दोन प्रकार अधिसूचित केले होते. जानेवारीमध्ये केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्काने (सीबीआयसी) १ ऑक्टोबर २०२४ रोजी जीएसटी अधिकाऱ्याकडे पॅकिंग नोंदणी न झाल्यास एक लाख रुपये दंड आकारला जाईल, अशी ताकीद दिली आहे.

# वाढलेल्या वजनामुळे विनेश फोगट अपात्र

**कोट्यवधी भारतीयांच्या 'सुवर्ण' स्वप्नांचा चुराडा**

**संसदेसह देशभरात उमटले पडसाद**

**१०० ग्रॅमने केला घात**





**विनेशची अपात्रता धक्कादायक**

विनेशची अपात्रता खूप धक्कादायक आहे. मी ऑलिम्पिक क्रीडाग्राममधील पॉलीक्लिनिक येथे विनेशला भेटली. भारतीय ऑलिम्पिक संघटना, भारत सरकार व संपूर्ण देश विनेशच्या पाठीशी आहे. आम्ही विनेशला सर्व वैद्यकीय सुविधा प्रदान करीत आहोत, असे भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी सांगितले.



**विनेश, तू चॅम्पियनच!**

विनेश तू चॅम्पियन आहे. तू देशाचा अभिमान आणि प्रत्येक देशवासीयांसाठी प्रेरणादायी आहेस. आजचा प्रकार हा अत्यंत दुःखद आहे. माझे शब्द माझ्या मनातील निराशा दाखवू शकणार नाहीत. पण, तू लढवय्यी आहेस. हार न मानणारी आहेस. आव्हानांचा स्वीकार करण्याचा तुझा स्वभाव आहे. तू पुन्हा अधिक ताकदीने पुढे ये. आम्ही सर्व तुझ्यासोबत आहोत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विनेश फोगटला धीर दिला.

**यूडब्ल्यूडब्ल्यूला पुनर्विचाराचे आवाहन**

भारतीय कुस्ती महासंघाने युनायटेड वर्ल्ड रेसलिंगला (यूडब्ल्यूडब्ल्यू) विनेशला अपात्र ठरविण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याचे आवाहन केले आहे.

◆ **पॅरिस, ७ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत बुधवारी महिलांच्या कुस्ती स्पर्धेला धक्कादायक वळण मिळाले. भारताची स्टार कुस्तीपटू विनेश फोगटला महिलांच्या ५० किलो वजन गटाच्या फ्रीस्टाईल कुस्तीच्या अंतिम लढतीपूर्वी तिचे वजन मर्यादेपेक्षा १०० ग्रॅम जास्त आढळल्याने अपात्र घोषित करण्यात आले. दमदारपणे अंतिम फेरीत दाखल झालेल्या विनेशसह कोट्यवधी भारतीयांच्या 'सुवर्ण' स्वप्नाचा यामुळे चुराडा झाला. विनेश अपात्र ठरल्याचे वृत्त येताच त्याचे पडसाद संसदेसह देशभरात उमटले. या निर्णयामुळे आता विनेशला पदकापासून वंचित राहावे लागणार आहे.

मंगळवारी रात्री महिलांच्या ५० किलो वजन गटाच्या फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू म्हणून विनेशने इतिहास घडवला होता. बुधवारी सुवर्णपदकासाठी विनेश अमेरिकन सारा हिलडेब्रॅण्डविरुद्ध निर्णायक लढत खेळणार होती, पण आता तिला पदक न घेता मायदेशी परतावे लागणार आहे. या सर्व प्रकारानंतर विनेशची प्रकृती बिघडल्याने तिला रुग्णालयात दाखल करावे लागले. महिला कुस्ती ५० किलो गटातून विनेशच्या अपात्रतेचा मुद्दा अतिशय खेदजनक आहे. टीमने रात्रभर केलेल्या प्रयत्नांनंतरही आज तिचे वजन ५० किलोपेक्षा काही ग्रॅम जास्तच होते, असे भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने म्हटले आहे.

विनेशला अपात्र ठरवण्यात आल्यावर लोकसभा आणि राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यावर अनेक राजकीय नेत्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. यामागे कटकारस्थान असल्याचा आरोपही करण्यात आला.

**विनेशने उपाशीपोटी मारल्या उड्या, केसही कापले**

आहारतज्ज्ञ डॉ. दीनशा पारडीवाला व चीफ डी मिशन गगन नारंग यांच्या नेतृत्वात विनेशच्या वैद्यकीय पथकाने विनेशचे वजन कमी करण्यासाठी प्रयत्न केले. तिने रात्री उपाशापोटी दोरीवर उड्या मारल्या व केसही कापले. तिचा पोषाख लहान करण्यात आला, यासह सर्व काही प्रयत्न करण्यात आले. मात्र ते निष्प्रभ ठरले.

**क्रीडा मंत्र्यांनी दिली सुविधांची माहिती**

सरकारने विनेशला मदत न दिल्याचा आरोप केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मंडाविया यांनी फेटाळला आणि लोकसभेत दिलेल्या उत्तरात सरकारने तिला दिलेल्या सुविधांची माहिती दिली. ऑलिम्पिकच्या तयारीसाठी विनेशला वैयक्तिक प्रशिक्षक देण्यात आला. हंगेरीचे तज्ज्ञ प्रशिक्षक व्होलर अकोस, फिजिओ अश्विनी पाटील, स्ट्रेंथ ॲण्ड कंडिशनिंग एक्सपर्टला नियुक्त केले. या सर्वांना सरकारने पैसे दिले. यासाठी केंद्र सरकारने ७०.४५ लाख रुपये खर्च केले, अशी माहिती मंडावियांनी लोकसभेत दिली. त्यामुळे विरोधकांची बोलती बंद झाली. (वृत्तसंस्था)

# १७ ऑगस्टला मिळणार बहिणींना रक्षाबंधनाची भेट

**वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता**

**मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय**

◆ **मुंबई, ७ ऑगस्ट**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या लाडकी बहीण योजनेच्या पहिल्या हप्त्याची तारीख जाहीर करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला असून, १७ ऑगस्ट रोजी भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी राज्यातील बहिणींना रक्षाबंधनाची भेट मिळणार आहे. तसेच, दुसऱ्या एका निर्णयात, शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातील शेतीला समृद्ध करणाऱ्या महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार आहे. रक्षाबंधन १९ ऑगस्टला आहे. त्यापूर्वीच सरकारने लाडक्या बहिणींना पहिला हप्ता देण्याचा निर्णय घेतला आहे.

बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय झाला असून, १७ ऑगस्टच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. १७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार आहे. राज्य सरकारच्या या योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. (तभा वृत्तसेवा)

**लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता**



### शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये सिंचन



शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातील शेतीला समृद्ध करणाऱ्या महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ८७ हजार ३४२ कोटी ८६ लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे पावणेचार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार असून विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागाला मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पामुळे गोदावरीच्या उपखोऱ्यातून वैनगंगेतील पाणी बुलढाणा जिल्ह्यातील वैनगंगा प्रकल्पात आणण्यात येईल. यासाठी एकूण ४२६.५२ किमी.चे जोड कालवे बांधण्यात येतील. विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांतील १५ तालुक्यांना सिंचन तसेच पिण्याचे पाणी आणि औद्योगिक कारणासाठी याचा उपयोग होईल. रबी हंगामात पाण्याचा वापर करता यावा म्हणून ३१ साठवण तलाव देखील बांधण्यात येणार आहेत.

# भडोच, ठाणे येथून ८३१ कोटींचे मेफेड्रोन जप्त

**एटीएसच्या कारवाईत चौघांना अटक**

◆ **अहमदाबाद, ७ ऑगस्ट**

गुजरात एटीएसने महाराष्ट्रातील ठाणे आणि भडोच येथील दोन औषध उत्पादक कंपन्यांवर कारवाई करून ८३१ कोटी रुपयांचे द्रव स्वरूपातील मादकपदार्थ जप्त केले. या प्रकरणी चार जणांना अटक केली. ठाण्यातील एका औषध निर्मिती कंपनीच्या कारखान्यावर एटीएसने छापा टाकून ८०० कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले.

याशिवाय भडोच येथील एका फार्मास्युटिकल कारखान्यावरही छापा टाकून ३१ कोटी रुपयांचे फायटर ड्रग ट्रामाडोल जप्त करण्यात आले. इसिसचे दहशतवादी ट्रामाडोलचा वापर उशिरापर्यंत जागे राहण्यासाठी करतात त्यामुळे ट्रामाडोलला फायटर ड्रग म्हटले जाते.

द्रव स्वरूपात असलेली दोन्ही औषधे एटीएसने जप्त केली. एटीएसचे पोलिस उपमहानिरीक्षक सुनील जोशी यांनी सांगितले की, ५ ऑगस्ट रोजी एटीएसच्या पथकाने महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील एका अपार्टमेंटवर छापा टाकला. येथून द्रव स्वरूपात ८०० किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आले. मोहम्मद युनूस शेख आणि त्याचा भाऊ आदिल शेखला पकडण्यात आले. आंतरराष्ट्रीय बाजारात या मादकपदार्थाची किंमत ८०० कोटी रुपये आहे. (वृत्तसंस्था)

### 'त्या' विद्यार्थ्यांच्या मृत्यूची चौकशी सीबीआयकडे

◆ **नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

पावसाचे पाणी दिल्लीतील एका कोचिंग सेंटरमध्ये घुसल्याने तीन प्रशासकीय सेवा उमेदवारांचा काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला. या घटनेचा तपास सीबीआयने आपल्या हाती घेतला आहे, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले.

२७ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे येथील जुन्या राजेंद्रनगर येथील राऊ आयएएस स्टडी सर्कलच्या तळघरात पाणी शिरल्याने श्रेया यादव, तान्या सोनी आणि नेविन डेल्विन यांचा मृत्यू झाला. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सीबीआयने हे प्रकरण आपल्या ताब्यात घेतले. (वृत्तसंस्था)

# ईओएस-८ चे १५ ऑगस्टला प्रक्षेपण

◆ **बंगळुरू, ७ ऑगस्ट**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) १५ ऑगस्ट रोजी पृथ्वी निरीक्षण उपग्रह-८ ईओएस-८ प्रक्षेपित करणार आहे. ईओएस-८ स्मॉल सॅटेलाईट लॉन्च व्हेईकल (एसएसएलव्ही) डी-३ आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केले जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

सूक्ष्म उपग्रहांची रचना करणे आणि पेलोड उपकरणे तयार करणे आणि भविष्यातील उपग्रहांसाठी आवश्यक नवीन तंत्रज्ञान समाविष्ट करणे आहे, ही ईओएस-८ मिशनची प्राथमिक उद्दिष्टे असल्याचे इस्रोने एका निवेदनात म्हटले आहे.

ईओएस-८ हे मायक्रो सॅटेलाईट आयएमएस-१ वर बांधले गेली आहे आणि तीन पेलोड वाहून नेली आहे. पहिला पेलोड इलेक्ट्रो ऑप्टिकल इन्फ्रारेड पेलोड आहे तर दुसरा पेलोड ग्लोबल गाईडन्स सॅटेलाइट सिस्टम-रिफ्लेक्टर आहे. तिसऱ्या पेलोडला एसआयसी यूव्ही डॉसीमीटर असे नाव देण्यात आले आहे.



आयओआयआर पेलोड प्रतिमा घेण्यासाठी डिझाईन केले आहे. हा पेलोड दिवसा आणि रात्रीच्या प्रतिमा घेऊ शकतो. याशिवाय, जीएनएसएस-आर पेलोड समुद्राच्या पृष्ठभागावरील हवेचे विश्लेषण, जमिनीतील आर्द्रतेचे मूल्यांकन आणि पूर शोधण्यासाठी कार्य करेल. एसआयसी यूव्ही डॉसीमीटर गगनयान मोहिमेतील अतिनील किरणोत्सर्गाचे निरीक्षण करेल. (वृत्तसंस्था)

### राज्यसभेच्या १२ जागांसाठी ३ सप्टेंबर रोजी निवडणूक

**नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या १२ रिक्त जागांच्या निवडणुकीची अधिसूचना जारी केली आहे. यासाठी ३ सप्टेंबर रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी सायंकाळी निकाल जाहीर होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २६ आणि २७ ऑगस्ट आहे. राज्यसभेच्या १२ रिक्त जागांमध्ये महाराष्ट्र, आसाम व बिहारमधील प्रत्येकी दोन तसेच हरयाणा, मध्यप्रदेश, राजस्थान, त्रिपुरा, तेलंगणा, ओडिशा येथील प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे.

छत्रपती उदयनराजे भोसले आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल लोकसभेवर निवडून गेले आहेत. ज्योतिरादित्य शिंदे, के. सी. वेणुगोपाल, सर्बानंद सोनोवाल यांच्यासह एकूण १० विद्यमान सदस्य लोकसभेवर निवडून गेल्याने दहा जागा रिक्त झाल्या आहेत. दोन सदस्यांनी राजीनामे दिल्याने त्यांच्या जागा रिक्त झाल्या होत्या. मध्यप्रदेशातील गुणा लोकसभा मतदारसंघात विजयी झालेले केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लव कुमार देव, आसाममधील खासदार कामाख्या प्रसाद तासा, सर्वानंद सोनोवाल हे देखील लोकसभेवर निवडून गेल्यामुळे त्यांच्या राज्यसभेच्या जागा रिक्त झाल्या आहेत.

राजस्थानमधील काँग्रेसचे राज्यसभा सदस्य के. सी. वेणुगोपाल केरळच्या अलप्पुझा मतदारसंघात विजयी झाले आहेत. बिहारच्या पाटलीपुत्र मतदारसंघातून राजदच्या तिकिटावर निवडून आलेल्या मीसा भारती राज्यसभा सदस्य आहेत. भाजपाचे राज्यसभा सदस्य विवेक ठाकूर बिहारच्या बांकीपूरमधून विजयी झाले आहेत. हरयाणाचे काँग्रेस नेते दीपेंद्रसिंह हुडा रोहतकमधून निवडून आले आहेत. त्यांचीही जागा रिक्त झाली आहे.



# एअर इंडिया, इंडिगोच्या विमानांनी ४०० भारतीय परतले

**नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

बांगलादेशातील अस्थिर परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर एअर इंडिया आणि इंडिगोच्या विशेष विमानांनी ४०० भारतीय मायदेशी परतले. एअर इंडियाच्या विशेष विमानाने बुधवारी सकाळी ६ अर्भकांसह २०५ लोकांना ढाका येथून नवी दिल्लीत आणले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

बांगलादेशातून भारतीय नागरिकांना परत आणण्यासाठी इंडिगोच्या विशेष विमानाने मंगळवारी ढाका ते कोलकातादरम्यान उड्डाण केले, असे एअरलाईनन्सने निवेदनात म्हटले आहे. मंगळवारी रात्री उशिरा बांगलादेशच्या राजधानीसाठी एअर इंडियाने विमान पाठवले होते. या विमानाने ढाका येथून सहा अर्भकांसह २०५ लोकांना परत आणले.

एअर इंडियाने तेथील विमानतळावरील पायाभूत सुविधांच्या आव्हानांना न जुमानता कोणत्याही प्रवाशांशिवाय राष्ट्रीय राजधानीतून अतिशय कमी वेळेत उड्डाण केले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. ढाका येथील विमानतळ तात्पुरत्या स्वरूपात बंद असल्याने इंडिगोने ढाका ते कोलकाता मार्गावर ६ ऑगस्ट रोजी विशेष विमान पाठवले. हे विमान बांगलादेशात अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यासाठी पाठवण्यात आले होते. या विमानात २०० पेक्षा जास्त प्रवासी होते, असे सूत्रांनी सांगितले.

# बांगलादेशातील मृतांचा आकडा ४०० वर

**शेख हसीना समर्थक २९ नेत्यांची जाळून हत्या**

**हिंसाचाराचा आगडोंब सुरूच**

**ढाका, ७ ऑगस्ट**

शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतरही बांगला देशामध्ये हिंसाचाराचा आगडोंब सुरूच आहे. या हिंसाचारात मोठी जीवितहानी झाली आहे. शेख हसीना नेतृत्व करत असलेल्या अवामी लीगच्या २९ नेत्यांचे आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे मृतदेह मंगळवारी हिंसाचारग्रस्त भागात आढळून आले. यामुळे बांगलादेश हिंसाचारातील मृतांचा आकडा ४०० वर गेला आहे.

शेख हसीना यांनी राजीनामा देऊन देश सोडून सोमवारी निघून गेल्यानंतर सातखीरा येथे झालेल्या हिंसाचारात किमान १० जण ठार झाले. अवामी लीग नेत्यांची घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड आणि लुटमार करण्यात आली आहे.

**खासदाराच्या घराला आग, ४ जणांचा होरपळून मृत्यू**

दरम्यान, मंगळवारी खासदार शफीकूल इस्लाम शिमूल यांच्या घराला जमावाने आग लावल्याने ४ जणांचा होरपळून मृत्यू झाला. त्यांचे मृतदेह घरातील खोल्या, बाल्कनी आणि छतावर आढळून आले.

**अवामी लीगच्या नेत्याच्या घरात सापडले ६ मृतदेह**

येथील वृत्तानुसार, अवामी लीगची युवा



शाखा जुबो लीगच्या दोन नेत्यांचे मृतदेह स्थानिकांना आढळून आले. त्यापैकी जुबा लीगचे नेते मुशफिकूर रहिम यांचा मृतदेह सोनागाझी उपजिल्हामधील एका पुलाखाली सापडला. बोग्रा येथे जमावाने जुबो लीगच्या दोन नेत्यांची हत्या केली.

सोमवारी लालमोनिरहाट येथे जमावाने पेटवून दिलेल्या अवामी लीगचे जिल्हा संयुक्त सरचिटणीस सुमन खान यांच्या घरातून स्थानिकांना मृतदेह आढळून आले.

### कुमिल्लामध्ये जमावाच्या हल्ल्यात ११ ठार

कुमिल्ला शहरात जमावाने केलेल्या हल्ल्यात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. माजी नगरसेवक मोहम्मद शाह आलम यांचे तीन मजली घर पेटवून दिल्याने ६ जणांचा होरपळून मृत्यू झाला. सोमवारी रात्री आणि मंगळवारी सकाळी घरात सापडलेल्या ११ मृतदेहांमध्ये ५ किशोरवयीन मुलांचा समावेश आहे. सोमवारी एका जमावाने शाह आलम यांच्या घरावर हल्ला केला होता. यादरम्यान काही लोक घराच्या तिसऱ्या मजल्यावर चढले, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. जमावाने घराच्या तळमजल्यावर आग लावली. त्यानंतर घराच्या तिसऱ्या मजल्यावर आश्रय घेतलेल्या लोकांचा धुरामुळे गुदमरून आणि होरपळून मृत्यू झाला. या हल्ल्यात १० जण जखमी झाले आहे.

### भारत-बांगलादेश व्यापार लवकरच सामान्य होण्याची शक्यता

बांग्लादेशमध्ये चालू असलेल्या राजकीय गोंधळानंतरही, पश्चिम बंगालमधील भू-बंदरांद्वारे भारत आणि शेजारील देश यांच्यातील व्यापार लवकरच पूर्वपदावर येण्याची अपेक्षा आहे. बुधवारी यापैकी एका सुविधेद्वारे काही वस्तूंची वाहतूक झाल्याची सूचना मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील दक्षिण आशियातील सर्वात मोठे भू-बंदर असलेल्या पेट्रोपोल येथे बुधवारी दोन्ही देशांच्या बंदर अधिकाऱ्यांनी वस्तूंच्या वाहतुकीबाबत चर्चा केली. यात बांगलादेशातील संकटाच्या पृष्ठभूमीवर आंतरराष्ट्रीय सीमेवरील वाहतुकीच्या संदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे.

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ८ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २७९ |
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सोलापुरात उसळला मराठ्यांचा जनसागर

**मनोज जरांगे पाटलांच्या रॅलीस प्रचंड प्रतिसाद**

**४ तासांपर्यंत मराठा बांधव थांबले पावसात**

**छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऐतिहासिक सभा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

मराठा समाज आरक्षणाचे लढवय्या नेते मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचे आज सोलापुरात आयोजन करण्यात आले होते. या रॅलीस मराठ्यांचा अक्षरश: जनसागर लोटला होता. सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत जरांगे पाटील यांना ऐकण्यासाठी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात लाखो मराठा बांधव अक्षरश: पाऊस असतानाही एकवटले होते. तर इतका वेळ थांबूनही जरांगे पाटलांनी आपले विचार दीर्घकाळ भाषणातून मांडावेत अशी अपेक्षाही उपस्थित मराठा बांधवांनी व्यक्त केली. दरम्यान, सोलापूरच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज चौकात पहिलीच जाहीर सभा जरांगे पाटील यांनी गाजविली.

जरांगे पाटील हे छत्रपती शिवाजी महाराज चौकात येताच सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांचे जेसीबीद्वारे पुष्पहार घालून जंगी स्वागत केले. यावेळी टाळ्यांच्या गजरात आणि घोषणाबाजी केल्याने अवघा परिसर दणाणून गेला होता. लाखो लोकांच्या उपस्थिती पाहून जरांगे पाटील यांनी तब्बल दीड तासांपर्यंत भाषण केले आणि राज्यातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील पुढाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला. तर आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज स्वतंत्रपणे लढाई लढणार असल्याचे सांगून येत्या २९ ऑगस्टच्या जाहीर सभेत आपण घोषणा करणार असल्याचे सांगितले. एकंदरीत, जरांगे पाटील यांनी विधानसभेचे रणशिंगच फुंकले असून, मराठा समाजाने या निवडणुकीत १०० टक्के एकगठ्ठा मतदान करण्याचेही त्यांनी आवाहन केले.

मराठवाड्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील शांतता रॅलीची सुरूवात सोलापूरहून जरांगे पाटील यांनी केली असून, नाशिक येथे या रॅलीची सांगता होणार आहे. तर २९ तारखेला आगामी निवडणुकांसाठी ध्येयधोरण ठरविण्यात येणार आहे. लाखो मराठा बांधव व भगिनींसाठी सकल मराठा समाज समन्वयकांनी नाष्टा पाकीट आणि पाण्याची उत्तम सोय केली होती आणि जाहीर सभेनंतर स्वयंसेवकांनी स्वच्छता करून स्वच्छतेचा मंत्रही दिला.

सविस्तर वृत्त पान ९ वर









## अग्रलेख...

# आता कुठे गेला कथित पुरोगाम्यांचा आक्रोश?

बांगलादेशात सत्तांतराची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी अल्पसंख्यक हिंदू समाजाला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. जमावाकडून हिंदूंवर हल्ले केले जात आहेत. अनेकांची घरे जाळण्यात आली असून दुकानांमध्ये लुटालूट केली जात आहे. देशात आरक्षणाच्या मुद्यावरून सुरू झालेला हिंसाचार टोकाला पोहोचला आहे. पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन भारतात आश्रय घेतल्यानंतरही आंदोलकांची आक्रमकता कमी झालेली नाही. आंदोलकांनी त्यांच्या निवासस्थानासह अवामी लीगचे नेते आणि त्यांच्या कार्यालयांवरही हल्ले केले आहेत. शेख हसीना यांच्या घरातील कपड्यांसह अनेक खाजगी वस्तू लांबवल्या गेल्या आहेत. त्यांच्या वाहनांची जाळपोळ झाली आहे. त्यांच्या दिवाणखान्यात आणि शयनकक्षात आंदोलकांनी धुडगूस घातला आहे. आता हिंदूंवर गोळ्या घालून त्यांना वेचून ठार केले जात आहे. मेहरपूर मंदिरातील जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा देवीच्या मूर्ती जाळण्यात आल्याने हिंदू भयभीत झाले आहेत. बांगलादेशात उद्‌भवलेल्या परिस्थितीबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि तत्सम संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. तेथील हिंदूंच्या सुरक्षिततेबाबत केंद्र सरकारने पावले उचलावी, अशी मागणी संघाचे वरिष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी केली आहे. बांगलादेशमधील हिंदूंना लक्ष्य केले जात आहे. तेथील हिंदूंच्या घरादारांना आगी लावून त्यांना हुसकावून लावल्या जात आहे, याकडे विहिंपने केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे. विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील आलोक कुमार यांच्या मते बांगलादेशात हिंदूंची घरे, दुकाने, कार्यालये, व्यावसायिक प्रतिष्ठाने, महिला, मुले तसेच मंदिरे, गुरुद्वारा आणि इतर श्रद्धा केंद्रेही सुरक्षित नाहीत. तिथल्या अत्याचारित अल्पसंख्यकांची स्थिती वाईटाहून वाईट होत चालली आहे. हिंसक जमावाच्या तावडीतून सुटका व्हावी, म्हणून महिला आणि मुले आक्रोश करीत असल्याचे व्हिडीओ लक्ष विचलित करून टाकत आहेत. महिलांवर बलात्कार झाले असून त्यांच्या लज्जारक्षणाचा कोणी वालीच उरलेला नाही. आंदोलकांना आपण कुणाला लक्ष्य करीत आहोत, याचेही भान राहिलेले नाही. अनेक संस्था-संघटनांसह सामाजिक व राजकीय नेते बांगलादेशातील हिंसाचाराची निंदा करीत असताना आपल्या देशातील कथित पुरोगामी कोणत्या रेतीत चोचा खुपसून बसले आहेत, हे कळायला मार्ग नाही. एरवी मुसलमानांची बाजू घेणारे असदुद्दीन ओवैसी यांची बांगलादेशबाबतची कुठलीही प्रतिक्रिया आलेली नाही. काँग्रेस पक्षाने सर्वपक्षीय बैठकीत बांगलादेशमध्ये विदेशी शक्तींचा हात दिसतो आहे का, असा थातूरमातूर प्रश्न उपस्थित करून वेळ मारून नेली आहे. लहान-मोठ्या प्रश्नांवर थयथयाट करणाऱ्या ममता बॅनर्जींनी असहाय्य हिंदूंबद्दल सहानुभूतीही व्यक्त केलेली नाही. डाव्या पक्षांना तर चेवच आलेला आहे. त्यांच्या समर्थकांना, शेख हसीना यांना जसे सत्ताच्युत केले तसेच मोदींनादेखील पायउतार करण्याची संधी मिळाल्याचा आनंद मिळाला आहे. देशातील अल्पसंख्यकांच्या साध्या अवैध मजारींवर बुलडोझर चालला तरी पोटदुखी सुरू होऊन, जे पोपटपंची करतात, त्यांचे ओठ आज शिवलेले दिसत आहेत. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या या मंडळींची खरे तर प्रतिगाम्यांनाही मागे टाकणारी मानसिकता यातून दिसून येत आहे.

या परिस्थितीचा फायदा घेत सीमेपलीकडून घुसखोरीचा मोठा प्रयत्न होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. अनेक विस्थापितांनी भारत-बांगला सीमेकडे धाव घेतली आहे. याबाबत भारत सरकारला सावधानी बाळगावी लागणार आहे. आपल्या सुरक्षा दलांना सीमेवर कडक नजर ठेवणे तसेच कोणत्याही प्रकारची घुसखोरी टाळण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. देशातील हिंसाचारात आतापर्यंत ४४० लोकांचा मृत्यू झाला आहे. अशांततेमुळे बांगलादेशात राहणारे हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांशिवाय अहमदियांसारखे अल्पसंख्यक दहशतीत आहेत. बांगलादेशच्या ६४ जिल्ह्यांपैकी ४४ जिल्ह्यांत हिंदू आणि बुद्धविहारांना लक्ष्य करण्यात आलेले आहे. बांगलादेश हिंदू-बौद्ध-ख्रिश्चन ऐक्य परिषदेचे सरचिटणीस राणा दासगुप्ता यांनी देशातील अल्पसंख्यक समाजाची परिस्थिती शब्दात मांडण्यासारखी नाही, असे मत व्यक्त केले आहे. पोलिस ठाण्यांमध्ये सुरक्षा नावालाही उरलेली नाही. लष्कराचे आपत्कालीन सेवेतील नंबर बंद पडलेले आहेत. ईशान्य सिराजगंज आणि रंगपूरमध्ये दोन हिंदू नेत्यांची हिंसक जमावाने हत्या केली. कारण काय तर हे दोघे शेख हसीना यांच्या अवामी लीगचे मोठे नेते होते. अनेक हिंदू परिवारांनी भीतीपोटी परिसरातील लहान गावांकडे आश्रयासाठी धाव घेतली असून या परिस्थितीत आणखी किती दिवस कंठावे लागतील, याची शाश्वती नाही. देशभरातील हिंसाचारात अनेक पोलिस अधिकारी मारले गेले आहेत. ढाक्यात आंदोलकांनी पोलिस मुख्यालयासह १३ पोलिस ठाण्यात तोडफोड करून तेथे आग लावली. पोलिसांची शस्त्रेसुद्धा लुटून नेण्यात आली. पोलिसांच्या हत्येच्या विरोधात कर्मचारी संघटना आणि बांगलादेश पोलिस संघाने संपाची घोषणा केली आहे. मात्र, त्याचा जिहादी आंदोलकांवर काही परिणाम होईल, याची शक्यता नाही. आंदोलकांच्या रागाचा पारा इतका चढलेला आहे की, त्यांनी बांगलादेशचे निर्माते शेख मुजिबूर रहमान यांच्या पुतळ्याचीही तोडफोड केली आहे. शेख हसीना सरकारचे ९ मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या घरांसह कमीत कमी २७ खासदारांवर हल्ला झाला असून त्यांची घरे जाळली गेली आहेत. राजधानीच्या संचारबंदीत आता थोडी ढील देण्यात आली असली, तरी देशातील वातावरण पूर्वस्थितीत येण्यास बराच कालावधी लागणार आहे. बांगलादेशातल्या तरुण आंदोलकांनी चारित्र्याच्या बाबतीत जी नीच पातळी गाठली आहे, तिचे लोण जगभर पसरणार नाही, याची खात्री कुणी देऊ शकेल का? राजकीय मतभेद, वैचारिक मतभेद अगदी अवश्य असू शकतात, पण ते महिलांच्या चारित्र्याची विटंबना करण्यापर्यंत यावेत, हा अध्याय गंभीर आहे. इस्लामवाद्यांनी देशातील हिंसाचाराचा फायदा उठवण्याचा निर्णय घेतला असून ते हिंदूंवर हल्ले करीत आहेत, हे स्पष्ट आहे. देशभरात ठिकठिकाणी इस्लामवादी जमाव हिंदूंच्या घरांवर हल्ले करीत असतानाचे, जाळपोळीचे, महिलांचे अपहरण करतानाच्या व्हिडीओंची दखल घेणारे बांगलादेशात कुणीही उरलेले नाही. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार गटांनी हिंसाचाराचा निषेध केला आहे आणि हिंदू अल्पसंख्यकांच्या संरक्षणासाठी त्वरित कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. बांगलादेशातील इस्लामिक कट्टरतावादी शक्तींनी ढाका येथील धनमंडी येथील प्रसिद्ध बांगलादेशी हिंदू गायक राहुल आनंद यांच्या १४० वर्षे जुन्या घरावर हल्ला केला, घराला आग लावली; ज्यात तीन हजारांहून अधिक वाद्ये जळून खाक झाली. आग लावण्यापूर्वी त्यांच्या घरातील साहित्य लुटण्यात आले. यावेळी राहुल आनंदच्या कुटुंबीयांनी अज्ञात स्थळी पळून कसा तरी जीव वाचवला. विशेष म्हणजे ज्या भाईचाऱ्याचा या गायकाला अभिमान होता, तो त्याच्या कुठल्याच कामात आला नाही. बांगलादेशातील बंडामागे आंतरराष्ट्रीय बँका, काही राजकीय घराणी, लेफ्ट लिबरल्स, जॉर्ज सोरोस यांची कटकारस्थाने आणि पाकिस्तानातील जमातेच्या जिहाद्यांचा हात असल्याची बाब दडून राहिलेली नाही. देशातील सत्तांतर विद्यार्थी आंदोलनाने झाले, असे जरी जगाला दाखविले जात असले, तरी त्यामागे दडलेल्या शक्ती कोण हे लपून राहिलेले नाही. इंग्लंड, फ्रान्स, इटलीमध्ये उत्पात माजवून अस्थिरता निर्माण करण्याचा अनुभव या शक्तींना येथे कामात आला आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तानप्रमाणेच आता बांगलादेशातही आपले कठपुतळी सरकार स्थापन करण्याची या शक्तींची मनीषा लवकरच पूर्ण झालेली दिसणार आहे. मात्र, या साऱ्या गोंधळाबाबत कथित पुरोगाम्यांनी मिठाची गुळणी करून साधलेली चुप्पी अनाकलनीयच म्हणावी लागेल. त्यांचा आक्रोश कुठे गेला, हा प्रश्न साऱ्यांना पडला आहे.

## इतस्ततः

# वक्फ बोर्ड... निरस्तीच योग्य...

**डॉ. विवेक राजे**

जागतिक मुस्लिम समाजाची जर (म्हणजे संपत्ती), जोरू (म्हणजे स्त्री, त्यातही पुनरुत्पादन क्षमता असलेली स्त्री) आणि जमीन (म्हणजे भूमी) यांची भूक वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या लक्षात येते. धर्म विस्ताराची तसेच नवीन जर, जोरू आणि जमीन मिळविण्याची प्रत्येक संधी साधण्यासाठी इस्लाम धर्मीय सतत प्रयत्नशील असतात. हा देश स्वतंत्र होणार हे १९४५-४६ मध्येच स्पष्ट झाले होते आणि स्वातंत्र्य म्हणजे लोकशाही व्यवस्था असणार, हे देखील जनतेला निश्चित माहिती होते. मुस्लिम समाजाला बहुसंख्य हिंदूंच्या लोकशाहीमध्ये राहायचे नव्हते. त्यातही मुस्लिम जमीनदार, जहागीरदार यांना हिंदू शासित भारतात राहायचे नव्हते. कारण एखाद्या मर्यादित का होईना, पण जमिनीवर आपण हुकूमत चालवत होतो, आपण जेते होतो ही त्यांची समजूत होती तसेच पाकिस्तानात आपली संख्या जास्त राहील, तो भाग मुस्लिमबहुल होईल, म्हणून तेथे वेगळी व्यवस्था अस्तित्वात येणार, याचीही जाणीव या समाजाला होतीच. हा समाज त्या दृष्टीने तजविजीला लागला होता. हिंदुस्थानातील आपल्या जमिनी व संपत्तीवरील अधिकार कायम कसा ठेवता येईल याचा. यावर दोन उपाय केले गेले. एक म्हणजे एकाच कुटुंबातील दोन भावांनी हिंदुस्थानात राहायचे तर दोघांनी पाकिस्तानात जाऊन राहायचे. तेथील मिळेल ती जमीन येनकेनप्रकारेन ताब्यात घ्यायची आणि अशारीतीने दोन्ही ठिकाणी दावेदारी ठोकायची. दुसरे म्हणजे संपूर्ण कुटुंबाने पाकिस्तानात जायचे, पण इथल्या आपल्या मालकीच्या असलेल्या नसलेल्या जमिनी धर्मदाय, म्हणजे वक्फ करून टाकायच्या. जेणेकरून या देशात राहणारे आपलेच मुसलमान भाईबंद या जमिनीचा ताबा ठेवू शकतील. मुस्लिम समाज त्या काळात अशा पद्धतीने तजवीज करून स्थलांतरित झाला. हिंदू समाजाने मात्र असे कोणतेही नियोजन केले नव्हते. शिवाय पाकिस्तानातील सरकार हिंदू किंवा अल्पसंख्यकधार्जिणेदेखील नव्हते. 'वक्फ' याचा शब्दशः अर्थ जरी 'धर्मदाय' असा असला, तरी इस्लामनुसार, वक्फ करणारी व्यक्ती ही मुसलमानच असणे आवश्यक आहे. तसेच या संपत्तीचा वापर फक्त मुस्लिम समाजासाठीच केला जावा, हेही इस्लामनुसार गरजेचे आहे. त्यामुळे येथून लाखो मुसलमानांनी स्थलांतरित होताना आपली मालमत्ता वक्फ केली. मुसलमानांच्या या धर्मदाय केलेल्या संपत्तीची नीटपणे व्यवस्था लावण्यासाठी नेहरूंच्या मुस्लिमधार्जिण्या सरकारने वक्फ बोर्डाची स्थापना केली. भारत सरकारने १९५४ मध्ये वक्फ ॲक्ट पारित करून या वक्फ केलेल्या संपत्तीचे आगणन आणि नियंत्रणाचे अधिकार वक्फ बोर्डाला दिले. याद्वारे वक्फ बोर्डाने लाखो एकर जमिनीवर मालकी हक्क मिळवला. यासाठी वापरली गेलेली विचित्र पद्धत अशी की, एखादी जमीन वा मालमत्ता आपल्या मालकीची आहे, असा वक्फ बोर्ड दावा करीत असते. मग त्या मालमत्तेची कागदपत्रं तपासणी करून वक्फ सर्वे कमिशन ती मालमत्ता वक्फची आहे, असे जाहीर करीत असते. जर कोणाला याविषयी काही आक्षेप असेल तर ते नोंदविण्यास सांगितले जाते. विशिष्ट मुदतीत आक्षेप नोंदविला गेला नाही तर ती मालमत्ता वक्फची संपत्ती होत असते. आक्षेप नोंदविला गेला तर वक्फ न्यायाधीकरणासमोर पुन्हा सर्व गोष्टींची पडताळणी केली जाते. त्या उपरांत वक्फ न्यायाधीकरण निर्णय देत असते, जो नेहमीच मुस्लिम पक्षाच्या वा वक्फ बोर्डाच्या बाजूने असतो. याला कारण वक्फ न्यायाधीकरणात वकील, न्यायाधीश सगळे मुसलमानच असतात. वक्फ न्यायाधीकरणाचा निर्णय मान्य नसल्यास पुढे उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढत चालत असते.

येथे एक लक्षात घेतले पाहिजे की, वक्फ बोर्डावर सगळ्या नेमणुका केंद्र सरकार करते, केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री या बोर्डाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. हे बोर्ड आपल्या 'वक्फ सर्वे कमिशन'वरील सर्व नेमणुका करते. वक्फ न्यायाधीकरणावरील नेमणुकादेखील वक्फ बोर्डच करीत असते. स्मृती इराणी यांचा अपवाद वगळता आतापर्यंत सर्व अल्पसंख्यक मंत्री हे मुस्लिमच होते. देशभरात अनेक ठिकाणी सरकारी जमिनीवर वा कोठेही, छोट्या-मोठ्या मजारी उभारल्या गेल्या. जमिनी हडप करण्याची इस्लामची प्रमाणित पद्धत वापरण्यात येऊन ९ लाख एकरपेक्षा जास्त जमिनीवर वक्फ बोर्डाने ताबा मिळविला आहे. कोणी विरोध केला तर झुंडीने त्याला नामोहरम केले जाते. कोणी कायदेशीर बडगा उगारला तर वक्फ न्यायाधीकरण मग उच्च व सर्वोच्च न्यायालय अशी वेळकाढू प्रक्रिया राबवत अशा लोकांना नामोहरम करण्यात आले आहे. मिळत असलेल्या माहितीनुसार भारतात सद्यस्थितीत सहा लाखांहून अधिक पंजीकृत मालमत्ता व नऊ लाख एकरपेक्षा जास्त जमीन वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे. तर, २०२० च्या राष्ट्रीय वक्फ प्रबंधन समितीच्या आकडेवारीनुसार वक्फ बोर्डाजवळ ६,१६,७३२ पंजीकृत मालमत्ता आहेत. हे सगळे आकडे थक्क करणारे आहेत. याचा अर्थ फाळणीच्या रूपाने जेवढी जमीन आम्ही मुसलमानांना (पाकिस्तान आणि बांगलादेश मिळून) दिली त्याच्या जवळपास ६० टक्के जमीन आजही भारतात वक्फ बोर्डाच्या म्हणजेच मुस्लिम समाजाच्या ताब्यात आहे तसेच ते विविध मार्गांनी अधिकाधिक जमीन बळकावत आहेत.

या सगळ्या परिस्थितीत एक दिलासा देणारी घटना २९ एप्रिल २०२२ ला घडली. सर्वोच्च न्यायालयाने वक्फ बोर्ड राजस्थान विरुद्ध जिंदाल सॉ लिमिटेड आणि इतर या (संदर्भ. सिव्हिल अपील नंबर २७८८/८९ ऑफ २०२२) खटल्याचा निकाल देताना वक्फ बोर्डाच्या मनमानीला लगाम लावला. हा खटला म्हणजे वक्फ बोर्डाच्या उद्दामपणाचा एक नमुना होय तर निकाल म्हणजे या उद्दामपणाला घातलेला लगाम होय. उपरोक्त खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने वक्फ बोर्डाला स्पष्टपणे खडसावले आणि निर्णय दिला की, तुम्हाला प्राप्त प्रत्येक मालमत्तेचा स्रोत सांगावाच लागेल. कोणी आक्षेप घेतला नाही म्हणून कोणतीही मालमत्ता तुमची होत नाही तसेच कोणत्याही ठिकाणी मजार बांधून ती जागा वक्फची मालमत्ता होत नाही. जमीन तुम्हाला कोणी दिली आणि ती जमीन त्या देणाऱ्या व्यक्तीच्या मालकीची होती, हे कागदोपत्री पुराव्याने तुम्हाला साबीत करावेच लागेल. पुन्हा एकदा वक्फ बोर्डाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या मागील पृष्ठभूमी अशी की, १९५४ मध्ये नेहरू सरकारने पारित केलेल्या वक्फ कायद्यात १९९५ साली नरसिंह राव यांच्या सरकारने तर २०१३ मध्ये मनमोहन सिंग यांच्या सरकारने काही हिंदू समाजविरोधी बदल केले. या बदलांमुळे वक्फ बोर्डाला हिंदू व लोकशाहीविरोधी अमर्याद अधिकार देण्यात आले आहेत. या अधिकारांचा प्रचंड गैरफायदा घेत वक्फ बोर्ड आपल्या संपत्तीत वाढ करीत भारतात छुपे गजवा-ए-हिंद करीत आहे. एक प्रकारे अवैध मार्गाने जमिनींची मालकी मिळवत हा देश दार-उल-इस्लाम करण्याचे हे षडयंत्र आहे. इस्लामच्या बाबतीत कोणतेही बदल आज संभवत नाहीत. मागील दोन हजार वर्षांपासून कालानुरूप असे कोणतेही बदल इस्लाममध्ये घडलेले नाहीत. आपल्याभोवती असलेल्या पाकिस्तान आणि बांगलादेश या मुस्लिमबहुल देशांमध्ये अल्पसंख्यक समाजासाठी या धर्तीवर कोणतेही प्रारूप अस्तित्वात नाही. या पृष्ठभूमीवर फक्त मुस्लिम स्मशानभूमीची वेगळी व्यवस्था निर्माण करीत एका झटक्यात वक्फ बोर्ड निरस्त करणे हेच देशहिताचे ठरणार आहे. आज बहुसंख्य हिंदूंची वक्फ बोर्ड निरस्त करण्याचीच मागणी आहे. या देशात सीएए आणि एनआरसीच्या बाबतीत झालेला विरोध, आंदोलनं आणि जनतेची हायवे अडवून केलेली अडवणूक या सगळ्या गोष्टी पाहता वक्फ बोर्ड निरस्त, हेच देशहिताचे पाऊल असेल हे निश्चित...

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# आता चोख उत्तर द्या!

'जाकी रही भावना जैसी, प्रभू मूरत देखी तिन तैसी...' कवी तुलसीदासांनी 'रामचरित मानस' या ग्रंथात या ओवी लिहिल्या आहेत. ईश्वराला ज्या रूपात तुम्ही पाहाल त्या रूपात ईश्वर दिसेल, असा अर्थ या ओवींचा होतो. अर्थात, पवित्र भावनेने ईश्वराला स्मरणे मात्र आवश्यक आहे. पण ईश्वराचे स्मरण तर दूरच; ईश्वराच्या, प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वाबाबत शंका घेणारे महाभाग आजही येथे आहेत. एकीकडे बौद्ध बहुसंख्य असलेल्या श्रीलंकेतही प्रभू श्रीराम, सीता तसेच रावणादींशी संबंधित स्थाने जतन करण्याचा, त्यांचे संवर्धन, विकास करण्याचा प्रयत्न होतो. तर, दुसरीकडे 'प्रभू श्रीरामांच्या अस्तित्वाचा पुरावा नाही,' असे तामिळनाडूतील द्रमुक अर्थात द्रवीड मुन्नेत्र कळघम् पक्षाचा मंत्री एस. एस. शिवशंकर बरळतो. हे अनवधानाने अज्ञानातून केलेले विधान नक्कीच नव्हे तर येथील धर्म, संस्कृतीच्या द्वेषातून केलेले हे विधान आहे. अर्थात ज्या इंडिया आघाडीशी द्रमुकचा संबंध आहे त्या इंडिया आघाडीतील घटक पक्षांचा हा द्वेष वारंवार यापूर्वीही समोर आला आहे.

तामिळनाडूसह देशात विविध ठिकाणी प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेली स्थाने आजही आहेत. लहान-थोर, श्रीमंत-गरीब, शिक्षित-अशिक्षित अशा सर्वच हिंदूंची ही श्रद्धास्थाने. विज्ञानाच्या कसोटीवर ज्यांना या बाबी तपासायच्या असतात त्यांच्याकरिता जगप्रसिद्ध अंतराळ संशोधन करणाऱ्या इस्रोनेदेखील रामसेतूचे अस्तित्व मान्य केले आहे. पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला उठविता येत नाही, हेच सत्य. भारतात श्रीरामाने वास्तव्य केलेल्या विविध ठिकाणांसह ज्या तामिळनाडूत हे मंत्री राहतात त्या तामिळनाडूतील रामेश्वरम् येथे स्वतः प्रभू श्रीरामाने स्थापन केलेले रामेश्वरम्‌चे शिवलिंग यासह श्रीलंकेत प्रभू श्रीराम, सीतामाई यांच्याशी संबंधित असलेली स्थाने हा श्रीरामाच्या अस्तित्वाचा पुरावा नव्हे तर काय? पण ज्यांना संभ्रमच निर्माण करायचा आहे. धर्म, संस्कृती नाकारायची आहे त्यांना अशा प्रकारच्या विधानांचा आधार घेतल्याशिवाय पर्याय तरी कोणता? ज्या द्रमुकच्या मंत्र्याने हे विधान केले त्या द्रमुकच्या अन्य नेत्यांनी या पूर्वीही प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांचे (कु) पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांनी तर 'हिंदू धर्म हा डेंग्यू, मलेरियासारखा असून तो संपविणे आवश्यक आहे.' असे चिड येणारे विधान केले होते. तर, ए. राजा नावाच्या नेत्याने हिंदू धर्माची तुलना एचआयव्ही आणि कुष्ठरोगाशी केली. हिंदू धर्म, संस्कृती ही मुळातच सहिष्णू आहे. त्यामुळेच धर्म, संस्कृतीविरोधात बरळणाऱ्यांचे फावते. ज्या देशात 'राम' प्रहरापासून दिवसाची सुरुवात होते. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत तर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत जिथे माणसांच्या नावात 'राम' आहे. एकमेकांना भेटल्यानंतर रामनामाचा घोष होतो आणि अनंताच्या प्रवासाला जातानाही 'रामनाम सत्य' असल्याचे जिथे स्मरण होते तिथे रामाच्या अस्तित्वाबाबत प्रश्न उपस्थित करणेच संतापजनक आहे. हिंदू सहिष्णू आहे, म्हणजे डरपोक आणि कमजोर असल्याचा समज या धर्मविरोधी नेत्यांचा झाला आहे. पण या राजकारण्यांचा जीव मतपेटीतील पोपटात असल्याची जाणीव आता हिंदूंनाही झाली असून योग्यवेळी या पोपटाची मान आवळण्यास हिंदू मागे-पुढे पाहणार नाहीत.

देशाच्या एका टोकावर असलेल्या तामिळनाडूतील घटनेबाबत संताप वाटत असतानाच मुंबईतील धारावी येथे घडलेल्या एका घटनेने मन प्रक्षुब्ध झाले. अरविंद वैश्य या २२ वर्षीय तरुणाची धर्मांधांनी निर्घृण हत्या केली. एक भांडण सोडविण्याचे निमित्त या हत्येला कारणीभूत असले, तरी तो संघाचा स्वयंसेवक, बजरंग दलाचा कार्यकर्ता आहे म्हणून ही हत्या झाल्याचे बोलले जाते. पोलिसांसमक्ष ही हत्या करण्यात आली. एवढेच नव्हे, तर दुसऱ्या दिवशी त्याच्या अन्त्ययात्रेवर धर्मांधांनी दगडफेक केली. पोलिसांनी यावेळी हस्तक्षेप केला. मोठा बंदोबस्त तेथे लावण्यात आला होता. पण मुळात कोवळ्या वयातील अरविंद यांनी तेथे अतिक्रमण, लव्ह जिहाद यासारख्या विषयांसाठी पुढाकार घेतल्याने त्यांना जीव गमवावा लागला. एकीकडे कोटी-कोटी हिंदूंचे आराध्य असलेल्या प्रभू श्रीरामांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह लावणारे कुटिल राजकारणी तर दुसरीकडे धर्माभिमान बाळगून चुकीच्या बाबी समाजात होऊ न देण्यासाठी लढणारे धारावीतील अरविंद वैश्य या दोनही घटना राष्ट्रभक्त नागरिकांच्या मनात चिंतेचे काहूर उठविणाऱ्या आहेत. हिंदूंचा सहिष्णू भाव हे बलस्थान असले, तरी हिंदुत्व टिकवून राहण्यासाठी योग्य व आवश्यक प्रसंगी संवैधानिक पद्धतीने संघटित शक्तीद्वारे चोख उत्तर देण्याची वेळ आता आली आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# महाराष्ट्राची निवडणूक भाजपासाठी महत्त्वाची

**श्यामकांत जहागीरदार**

येत्या दोन-तीन महिन्यांत हरयाणा आणि झारखंडसोबत महाराष्ट्र विधानसभेचीही निवडणूक होणार आहे. हरयाणा आणि झारखंड विधानसभेच्या जवळपास तिप्पट जागा महाराष्ट्र विधानसभेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीला वेगळे राजकीय महत्त्व आहे. हरयाणा आणि झारखंडमधील निवडणुकीच्या निकालाचा देशाच्या राजकारणावर जेवढा परिणाम होणार नाही, त्याच्या कितीतरी पट परिणाम महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीकडे सगळ्या देशाचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला अपेक्षित यश मिळू न शकल्याने यावेळची विधानसभा निवडणूक भाजपाने आपल्यासाठी प्रतिष्ठेची केली आहे. 'करो वा मरो' म्हणून भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. निवडणूक होणार असलेल्या प्रत्येक राज्यासाठी भाजपातर्फे निवडणूक प्रभारी नियुक्त केला जात असतो. त्याप्रमाणे भाजपाने हरयाणा, झारखंडसोबत महाराष्ट्रासाठीही निवडणूक प्रभारी आणि सहप्रभारी नियुक्त केले आहेत. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव महाराष्ट्राचे प्रभारी आहेत, तर दुसरे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव सहप्रभारी आहेत. मुळात भूपेंद्र यादव आपल्या संघटन कौशल्यासाठी ओळखले जातात. सनदी अधिकारी राहिल्यामुळे अश्विनी वैष्णव यांना संघटनेच्या कामाचा फारसा अनुभव नसला, तरी गेल्या काही वर्षांत भाजपाच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी संघटनशास्त्राचा चांगला अभ्यास केला. यादव आणि वैष्णव यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाचा बारीक अभ्यास केला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक प्रांताची आणि मतदारसंघाची माहिती या दोघांनी करून घेतली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आणि मतदारसंघात जाण्याचे नियोजन यादव आणि वैष्णव यांनी केले आहे. विशेष म्हणजे संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपताच भूपेंद्र यादव आणि अश्विनी वैष्णव पुढील तीन महिने महाराष्ट्रातच तळ ठोकणार आहे. महाराष्ट्रात महायुतीला सत्तारूढ करूनच दिल्लीत परतणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्रातील भाजपाच्या नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये एकप्रकारचे शैथिल्य आले आहे. हे शैथिल्य दूर करून कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा उत्साह निर्माण करून त्यांना जिद्दीने कामाला लावण्याचे मोठे आव्हान या दोघांसमोर आहे.



महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही वर्षांत आघाड्यांचे राजकारण झाले आहे. भाजपा, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे राज्यातील चार प्रमुख पक्ष आहेत. हे चार पक्ष दोन आघाड्यांत विभागले गेले आहेत. भाजपा आणि शिवसेना यांची हिंदुत्ववादी आघाडी तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची धर्मनिरपेक्ष आघाडी. गेल्या कित्येक वर्षांत या चार पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवली नाही. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अपवाद म्हणून असा प्रयोग काही प्रमाणात झाला होता. भाजपा आणि शिवसेना यांच्या युतीचा दोन्ही पक्षांना चांगला फायदा झाला. आतापर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेना मोठा भाऊ तर भाजपा लहान भाऊ होता. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. भाजपा मोठा भाऊ झाला तर शिवसेना लहान भाऊ. त्यातच लहान भावाच्या म्हणजे शिवसेनेच्या घरात भाऊबंदकी उफाळून आली. एका घराची दोन घरं झाली. शिवसेनेत एका घराची दोन घरं होण्याची ही पहिली घटना नाही तर याआधीही राज ठाकरे यांनी शिवसेना सोडत आपली वेगळी चूल मांडली होती. पण राज ठाकरेंची महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी चूल पेटू शकली नाही. त्यामुळे त्यांना सत्तेची पोळी वा भाकरी आपल्या चुलीवर शेकता आली नाही. भाऊबंदकीच्या लागणीतून धर्मनिरपेक्ष आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसही वाचू शकली झाली. शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमधून त्यांच्या पुतण्याने वेगळा मार्ग पत्करला. साऱ्या जगाला कात्रजचा घाट दाखवणाऱ्या आपल्या काकाला म्हणजे शरद पवारांना अजित पवार यांनी कात्रजचा घाट दाखवला. त्यामुळे यावेळची महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक दोन आघाड्यांमध्ये होणार असली तरी आघाड्यातील राजकीय पक्षांची संख्या चारवरून सहावर गेली आहे. हिंदुत्ववादी आघाडीत भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट विरुद्ध काँग्रेस, शिवसेना उबाठा गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यात होणार आहे. या दोन प्रमुख आघाड्यांशिवाय अन्य छोट्या-मोठ्या आघाड्याही विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात राहणार आहेत.

मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवली तरी त्याचा महायुतीवर फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही. कारण जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवली नाही तर त्यांची मतं महाविकास आघाडीकडे जाऊ शकतात आणि त्यांनी निवडणूक लढवली तर त्यांची मते महाविकास आघाडीकडे न जाता त्यांनी उभ्या केलेल्या उमेदवारांकडे जातील. म्हणजे जरांगे पाटील यांच्या निवडणूक लढवण्याच्या निर्णयाचा फटका महायुतीला नाही तर महाविकास आघाडीला बसणार आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत २८८ मतदारसंघांतही आपले उमेदवार उभे करायला हरकत नाही. उलट त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला तर त्यांचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला तसा पुन्हा एकदा महायुतीला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालामुळे महाविकास आघाडीचे मनोबल काही प्रमाणात उंचावले असले, तरी आता महायुतीही लोकसभा निवडणुकीच्या पराभवाच्या धक्क्यातून बऱ्यापैकी सावरली आहे. याचे श्रेय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना द्यावे लागेल. राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार हे दोन उपमुख्यमंत्री असले, तरी या तिघांमधील ऐक्य अफलातून आहे. या तिन्ही नेत्यांची तोंडं एकाच दिशेला आहे. याउलट महाविकास आघाडीत तिन्ही पक्षाच्या नेत्यांची तोंडं तीन दिशांना आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक भाजपाला कोणत्याही स्थितीत जिंकायची आहे. महाराष्ट्रातील निवडणुकीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह जातीने लक्ष ठेवून आहेत. हरयाणा, झारखंड आणि महाराष्ट्र येथील तिन्ही विधानसभा निवडणुका भाजपाला जिंकायच्या आहेत. किमान या तीनपैकी दोन राज्यं तरी भाजपाला जिंकावी लागणार आहेत. पण महाराष्ट्र वगळून हरयाणा आणि झारखंड जिंकून फार काही साध्य होणार नाही, भाजपासाठी महाराष्ट्र जिंकणे आवश्यक आहे. त्यासाठी युद्धपातळीवर भाजपा कामाला लागला आहे.

९८८१७१७८१७

### बीएसएनएल नेटवर्क इंटरनेट सुविधेमध्ये शासनाने गती द्यावी

मोठ्यांपासून तर लहानांपर्यंत सगळेच नेटवर्क इंटरनेट सुविधेचा वापर करीत असतात. इंटरनेटशिवाय आता कोणतेच काम शक्य नाही. शासकीय कामे आणि व्यावसायिक कामगार, मजूर, शेतकरी आणि विद्यार्थी वर्ग यांच्या दैनंदिन गरजेचे वापरात असलेली नेटवर्क इंटरनेट सुविधा आहे; परंतु नेटवर्क इंटरनेट सुविधेचा खाजगी कंपनीकडून वाढविण्यात आलेले दर आता सर्वसामान्य नागरिकांना झेपणारा नाही. त्यामुळे इतर खाजगी कंपनीचे नेटवर्क इंटरनेट वापर करणे अवघड झाले आहे. शासनाची नेटवर्क इंटरनेट सुविधा पुरवणारी बीएसएनएल नेटवर्क इंटरनेट आता पूर्वीसारखीच गावोगावी पोहोचविणारी सुविधा असली पाहिजे, असे सर्वसामान्य नागरिकांचे मत आहे. शासनाने आपला पुढाकार घेऊन बीएसएनएल नेटवर्क इंटरनेट सुविधेला गती देऊन पुन्हा जोमाने कनेक्टिव्हिटी वाढवून सामान्य नागरिकांना वाढत्या आर्थिक भुर्दंडापासून वाचवून देण्याची गरज आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### अबब... नदी की नाला!

नागपूरची ओळख असलेल्या नाग नदीचे हळूहळू नाल्यात रूपांतर होत आहे. खरं तर शहराच्या अगदी मध्यभागी असलेली नदी प्रेक्षणीय असायला हवी होती; मात्र नदी परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.



ये-जा करणाऱ्या नागरिकांना प्रचंड दुर्गंधीचा सामना करावा लागतो. दुरवस्था एवढी की, कुणीही अनोळखी प्रथमदर्शनी नदीला नालाच म्हणेल. या समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्षच दिसते. कारण नाग नदीचे सौंदर्यीकरण करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. २०१४ मध्ये १४७६ करोड रुपयांचा प्रकल्प आखला गेला. त्याला २०२१ मध्ये वेळेनुसार २११७ करोडची केंद्राकडून मंजुरी देण्यात आली. काम फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू होण्याची शक्यता होती; मात्र अजूनही काम थंडबस्त्यात आहे. खरं तर मेट्रो सिटी किंवा भारताचे मध्यस्थान असलेल्या नागपूर शहराची ओळख नाग नदीची अशी दुरवस्था निराशाजनक आहे.

**नेहा जीवतोडे**/८८३०२६९९५२

## वाचक पत्रे

### सेवानिवृत्तांना द्या वैद्यकीय भत्ता

केंद्र सरकारने सर्व सेवानिवृत्तांना दरमहा एक हजार रुपये वैद्यकीय भत्ता १ जुलै २०१७ पासून मंजूर करून दिला आहे. परंतु, महाराष्ट्र सरकारने सेवानिवृत्तांनी वेळोवेळी मागणी करूनही अद्याप हा भत्ता दिलेला नाही. वृद्धापकाळामुळे सेवानिवृत्तांना आरोग्यावर दरमहा मोठा खर्च करावा लागतो. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना काळातील १७ महिन्यांचा महागाई भत्ता दिला नाही तसेच त्यांनी ८० वर्षांवरील अतिज्येष्ठ सेवानिवृत्तांना केंद्र सरकारप्रमाणे अतिरिक्त वेतन दिले नाही. राज्याची अर्थव्यवस्था बिकट असल्याचे त्यांनी सांगितले होते. परंतु, विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सेवानिवृत्तांची मागणी गांभीर्याने लक्षात घेवून ८० वर्षांवरील सेवानिवृत्तांना अतिरिक्त वेतनवाढ २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के, ५० टक्के, १०० टक्के १ जानेवारी २०२४ पासून मंजूर करून दिली. त्याचप्रमाणे आता त्यांनी सर्व सेवानिवृत्तांना १ जानेवारी २०२४ पासून दरमहा केंद्राप्रमाणे एक हजार रुपये वैद्यकीय भत्ता मंजूर करून द्यावा व त्यांना न्याय द्यावा. सेवानिवृत्तांचे आर्थिक जीवनमान वाढविणे हाही एक राष्ट्रीय विकासाचा भाग आहे.

**बी. व्ही. देशमुख**/७२४८९८९९६६

### दर्जेदार नाटकांचा दुष्काळ

पुणे-मुंबईला नाटकांचं माहेरघर म्हटले जातं. तिथल्या प्रत्येक नाट्यगृहात दररोज कुठल्या ना कुठल्या नाटकाचा प्रयोग होतच असतो. आपल्या नागपुरात मात्र दर्जेदार नाटकं क्वचितच बघायला मिळतात. नाट्य रसिकांची कमतरता हे कारण मनाला पटत नाही. प्रेक्षकांची अरेरावी किंवा उद्दामपणा काही अंशी जबाबदार असू शकतो. पण प्रमुख कारण आहे सुयोग्य सभागृहांची कमतरता. शहरातील सभागृहांत कलाकार आणि प्रेक्षक या दोघांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. रेशीमबागेतील भव्य सभागृह महागडे आहे. रंगमंच जरा जास्तच मोठा आहे. नाटकातील संवाद दूरच्या प्रेक्षकांना नीट ऐकायला येत नाहीत. पार्किंगपासून सभागृहापर्यंत भरपूर चालावं लागतं. सिव्हिल लाईन्स भागातील सभागृह नूतनीकरणाच्या नावाखाली बरेचदा बंद असतं. ते सांस्कृतिक कार्यक्रमांपेक्षा सरकारी आणि राजकीय कार्यक्रमांसाठी जास्त वापरले जातं. शंकरनगरमधील सभागृहाचं पार्किंग गैरसोयीचं आहे. बसण्याची व्यवस्था सोयीची नाही. लक्ष्मीनगरच्या सभागृहात पार्किंग नाही. रस्त्याच्या बाजूला दुचाकी किंवा चारचाकी वाहन पार्क करणं जोखमीचं आहे. शहरातील इतर सभागृहे नाटकांसाठी दिली जात नाहीत किंवा सोयीची नाहीत. पुणे-मुंबईसारखी सर्व सुविधांनी परिपूर्ण सभागृहे नागपूरला मिळाल्यास दर्जेदार नाटकं नागपूरकर नाट्यरसिकांना बघायला मिळतील. प्रेक्षकांनी सभागृहात शिस्तीचं पालन करायला हवं. आपल्यामुळे इतर प्रेक्षकांचा किंवा नाट्य कलाकारांचा रसभंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची

# ९ ऑगस्टपासून शिवस्वराज्य यात्रा

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ७ ऑगस्ट :**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून ९ ऑगस्टपासून शिवस्वराज्य यात्रा काढण्यात येणार आहे. त्याची सुरवात शिवनेरी किल्ल्यावरून होणार असून यात्रेच्या माध्यमातून म हायुती सरकारच्या काळ्या कारनाम्यांचा जनतेपुढे पर्दाफाश केला जाईल , अशी माहिती प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी शिवस्वराज्य यात्रेचा टिझर व लोगोही प्रसिद्ध करण्यात आला.केला. यावेळी पाटील यांच्यासह पक्षाचे स्टार प्रचारक तथा खासदार अमोल कोल्हे, ज्येष्ठ नेते आ .अनिल देशमुख, आमदार राजेश टोपे व सुनील भुसारे व आमदार रोहित पवार आदी नेते उपस्थित होते.

याबाबत बोलताना पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात युतीचे सरकार आल्यापासून राज्य अधोगतीकडे गेलेले आहे. कायदा सुव्यवस्था बिघडली असून शेजारचे राज्य आपल्या तरुणांच्या हातचे काम हिसकावून घेत आहेत. हे सर्व सुरू असताना राज्यकर्ते हतबलपणे बसले आहेत. त्यामुळे आम्ही महायुती सरकारचे काळे कारनामे घेऊन जनतेच्या दरबारात जाणार आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याचे दर्शन घेऊन यात्रेची सुरूवात करणार अशी माहिती त्यांनी दिली. पहिल्या टप्प्यात दहा दिवसांत ही यात्रा महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांतून फिरणार असून लवकरच दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली जाणार. तसेच ९ ऑगस्ट हा दिवस निवडण्याचा उद्देश म्हणजे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चले जाओ चळवळीचा नारा या दिवशी ऑगस्ट क्रांती मैदानातून देण्यात आला होता. तसेच त्या दिवशी जागतिक आदिवासी दिवस असल्याचे देखील त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रामध्ये रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या पायवाटेनं आणि आदर्शाने महाराष्ट्र राज्य चालवण्यासाठी राज्यातील जनतेचा आशीर्वाद मागण्यासाठी आम्ही जनतेपर्यंत जाणार आहे ,असे पाटील यांनी सांगितले.

राज्यातील ४८ पैकी ३१ जागांवर महाविकास आघाडीचा विजय झाला. आता जनतेने महायुतीला सत्तेतून बाहेर खेचण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सरकार घाबरून, वेगवेगळ्या योजनांचा भडीमार करत आहे तसेच सरकारी तिजोरी म ोकळी करत आहे. सरकार ज्या घोषणा करत आहे ते जनतेलाही पटत नाही, असे ते म्हणाले.

हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा लढा असून शिवाजी महाराज हे आपले आराध्य दैवत आहेत, त्यांचा आदर्श जागृत करणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्रात गद्दारी आणि भ्रष्टाचार यांचे नांगर फिरत आहे. महाराजांनी दिल्लीत औरंगजेबाला महाराष्ट्राचा स्वाभिमान म्हणजे काय हे दाखवून दिले. आज मात्र दिल्लीच्या तख्तासमोर नतमस्तक होण्यासाठी आमच्या नेत्यांना वेश बदलून जावे लागते ,असा टोला अमोल कोल्हे यांनी लगावला . ते म्हणाले की, अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिल्लीच्या इशाऱ्यावर काम करणारे आपल्या राज्यातील राज्यकर्ते महाराष्ट्राला काहीही मिळवून देऊ शकले नाही. हा शेतकरी आणि तरुणांच्या स्वाभिमानाचा अपमान आहे. महाराष्ट्राच्या स्वाभिमान दिल्लीच्या अहंकाराविरुद्ध आदराने उभे राहण्याची गरज आहे,

## विदर्भ कोकण ग्रामीण बँक सोलापूरचा उद्या कर्ज सवलत मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

विदर्भ कोकण ग्रामीण बँक सोलापूर विभागीय कार्यालया मार्फत दि. ९ ऑगस्ट रोजी बँकेचे चेअरमन विजॉय वर्मा याच्या उपस्थितीत महासमझोता योजनेअंतर्गत कर्ज सवलत मेळाव्याचे आयोजन केल्याची माहिती विभागीय व्यवस्थापक रमेश खाडे यांनी सांगितले.

बँकेच्या ज्या अनुत्पादक ( NP ) कर्जदारानी कर्जाची रक्कम भरण्यास असमर्थ आहेत , अश्या कर्जदारांनी दि. ९ ऑगस्ट रोजी बँकेच्या सोलापूर येथील नेहरुनगर विभागीय कार्यालयात उपस्थित राहून , कर्ज परतफेडी मध्ये भरीव सवलत घेण्याकरिता उपस्थित राहून या संधीचा जास्ती जास्त फायदा करुन घेण्याचे आवाहन विभागीय व्यवस्थापक रमेश खाडे यांनी केले.



Shri Tulja Bhavani Temple Trust's
**Shri Tulja Bhavani College Of Engineering**
Tuljapur-413601 Dist. Dharashiv (Maharashtra)
(NAAC Accredited)



Email: stbcet@gmail.com College Website: www.stbcet.org.in Temple Website: https://shrituljabhavanitempletrust.org

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय
विद्यार्थ्यांना माफक फिस मध्ये शिक्षण देणारे महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय.

शैक्षणिक वर्ष 2024-2025 साठी प्रवेश प्रक्रिया सुरु

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानची हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क सवलत योजना

| | प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी Sum of Parcentiles of (Phy+Chem+Math) MHT-CET/JEE Score | थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी Diploma Marks% | प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये शैक्षणिक शुल्कामध्ये सूट |
|---|---|---|---|
| 1 | 175 पेक्षा जास्त | 85% पेक्षा जास्त गुण | 100% |
| 2 | 151 ते 175 पर्यंत | 80% पेक्षा जास्त गुण ते 85% पर्यंत | 75% |
| 3 | 126 ते 150 पर्यंत | 75% पेक्षा जास्त गुण ते 80% पर्यंत | 50% |
| 4 | 100 ते 125 पर्यंत | 70% ते 75% पर्यंत | 25% |

* वरील फी सवलत योजना सातत्याने विनारखंड प्रत्येक वर्षी 8 CGPA किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांत अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत चालू राहील
> प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थीनीसाठी 01 वर्षासाठी मोफत वसतिगृह सुविधा
> महाविद्यालयाची UG साठी वार्षिक फिस रु. 76,000/- राहील व PG साठी वार्षिक फिस रु. 70,000/- राहील

शासन निर्णयानुसार मुलींसाठी १००% शैक्षणिक शुल्क माफ.

सन 2023 - 24 मध्ये एकूण पात्र विद्यार्थ्यांपैकी 85% विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे Campus Placement मध्ये नोकरी देण्यात आली आहे

पदवी अभ्यासक्रम : 2024-2025

| अ.क्र. | B.Tech. | प्रवेश क्षमता | शाखा कोड |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 30 | 213119110 |
| 2 | Mech.Engineering | 30 | 213161210 |
| 3 | Electronics & Telecommunication Engg. | 60 | 213137210 |
| 4 | Computer Science & Engineering | 120 | 213124210 |

पदव्युत्तर अभ्यासक्रम : 2024-2025

| अ.क्र. | M.Tech. | प्रवेश क्षमता | शाखा कोड |
|---|---|---|---|
| 1 | M.Tech CIVIL (WRE) | 09 | 213119710 |
| 2 | M.Tech ( Mech.Engg.) | 09 | 213161210 |
| 3 | M.Tech (E & TC Engg.) | 09 | 213137210 |

प्रवेशासाठी संपर्क :- 8766799501, 9421956393, 7499067767

प्रा.आर.एच.आडेकर (प्र.प्राचार्य)
ME (Digital Systems) Ph.D (app)
Mo. 9860460302

मा.श्रीमती. माया माने
तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन)
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर

मा.डॉ.सचिन ओम्बासे (IAS)
जिल्हाधिकारी, धाराशिव
तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर

## माहेश्वरी, अग्रवाल, जैन समाजाचा विधवा-विधुर घटस्फोटीतांसाठी वधूवर मेळावा

**जालना, दि. ७ ऑगस्ट-**

समाजात विधवा-विधुर-घटस्फोटीतांची संख्या मोठ्या प्रम ाणावर आहे. त्यांचा पुनर्विवाह होत नसल्यामुळे ते कठिन परिस्थितिम ध्ये जीवन जगत आहेत. त्यांचा पुनर्विवाह होणे ही काळाची गरज आहे. त्यांची ही गरज ओळखून जालन्यातील माहेश्वरी, अग्रवाल, जैन समाजाने सकल राजस्थानी मारवाडी समाजाचा वधूवर म ेळावा आयोजित केला आहे. या मेळव्यामुळे समाजातील विशिष्ट लोकांना पुनर्विवाह करण्यासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. अपंग व तीस वर्षाहुन अधिक वय असणारे अविवाहित मुले-मुली ही या मेळाव्यामध्ये सहभाग घेऊ शकणार आहेत. सकल मारवाडी समाजाचा एकत्र मेळावा जालना येथे प्रथमच होत असून हा मेळावा दि.२५ ऑगस्ट रविवार रोजी जैन भवन सकलेचा नगर, भोकरदान रोड जालना येथे घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात नाव नोंदणी करण्यासाठी दि. १५ ऑगस्ट ही शेवटची तारीख आहे. मेळाव्यात भाग घेणाऱ्यांसाठी अल्पोउपहार व जेवनाची सोय राहणार आहे. मेळाव्यामध्ये एका उमेदद्वारासोबत एका पालकाला प्रवेश देण्यात येणार आहे. हा म ेळावा यशस्वी होण्यासाठी परिचय संम्मेलन समितीचे सदस्य पुरुषोत्तम जयपुरिया, नरेंद्र मोदी, सतीश पंच, ॲड. अभय सेठिया, विजयराज सुराणा, सुरेश उपाध्याय, सुनील बियानी, राजकुमार दायमा, संतोष करवा, ताराचन्द मालपानी, आकाश अग्रवाल, ॲड. अश्विनी धन्नावत, ॲड. अर्चना तोतला, विजया बोरा यांच्यासह अनेक समाज बांधव परिश्रम घेत आहेत. जास्तीत जास्त समाज बांधवानी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन हस्तीमल बंब, सुभाष देविदान व कांतीलाल राठी यांनी केले आहे.

## पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांचा आज सोलापूर दौरा

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

दि.१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त कार्यक्रम दुसरा भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यासाठी मतदार यादी निरिक्षक म्हणून पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते मतदार यादी निरीक्षक म्हणून दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

**नावात बदल**

माझे जुने नाव **परविन बाशा पटेल** असे होते. ते नाव बदलून **परविनबानु बाशा पटेल** असे झालेले आहे.
त्यांचा पत्ता :६१ सहार नगर , मजरेवाडी, सोलापूर
सिव्हिल नं - 8101124

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **KHALIDA ZAMEER AHMED SHAIKH** has been changed my new name **KHALIDA ZAMEER SHAIKH**
- Address -
56B Sahara Nagar, Bhag-1 Solapur
Date.- 07/08/2024
Affidavit No.- 3918

**नावात बदल**

माझे जुने नाव **तेहसीन इफ्तेकार सय्यद** असे होते. ते नाव बदलून **तहसीन बानो इफ्तेकार सय्यद** असे झालेले आहे. वरील दोन्ही पण नावाची व्यक्ती एकच असून त्यांचा पत्ता : ५ विनायक नगर, मजरेवाडी, सोलापूर
Date.- 07/08/2024
Affidavit No.- 1836

**CHANGE IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY NAME MENTIONED IN SSC MARKLIST AS CHAUDHARI DILIP MITAHLAL. WHEREAS ON PAN CARD & AADHAR CARD IS DILIPKUMAR MITHALAL CHOUDHARI. BOTH THE NAMES ARE ARE SAME RESIDING AT 988-MASARE GALLI, BALIVES, UTTAR KASABA, SOLAPUR-413007. KINDLY NOTE THE SAME. (AFFIDAVIT REGISTERED NO.16548 DATED 07/08/2024)

## निधन वार्ता

### अन्नपूर्णा मोकाशी



**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

गुरुभेट हाउसिंग सोसायटी सिव्हिल लाईन येथील व काडादी हायस्कूल येथील सेवानिवृत्त शिक्षक कै. सदाशिव मोकाशी यांच्या पत्नी अन्नपूर्णा सदाशिव मोकाशी (वय ८४) यांचे बुधवारी ७ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजता वार्धक्याने निधन झाले आहे. त्यांच्या पाश्चात तीन मुले, सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

### मंदाताई पोखरे



**श्रीपूर, दि. ७ ऑगस्ट-**

श्रीपूर येथील मंदाताई अरुण पोखरे (वय ७५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. श्रीपूर येथील बांधकाम व्यावसायिक अजित पोखरे यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### भिवा शिंदे



**पिलीव, दि. ७ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे ज्येष्ठ नागरिक भिवा कृष्णा शिंदे (वय ७५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयइन : : L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर,महाराष्ट्र – ४१३००१
दूरध्वनी +९१ २२ २२८७२४०१, वेबसाइट www.jamshri.in, ईमेल आयडी : jammill1907@gmail.com

**३० जून २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. लाख)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही 30.06.2024 (अलेखापरिक्षित) | संपलेली तिमाही 31.03.2024 (लेखापरिक्षित) | संपलेली तिमाही 30.06.2023 (अलेखापरिक्षित) | संपलेले वर्ष 31.03.2024 (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | परिचलनातून एकूण उत्पन्न | 167.27 | 159.58 | 105.51 | 539.02 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/ (तोटा) | 5.76 | (27.53) | (121.06) | (318.57) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्चात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | 5.76 | (27.53) | (121.06) | (318.57) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.81) | (4.99) | (6.04) | (21.57) |
| 5 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.81) | (4.99) | (6.04) | (21.57) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश) नफा/ (तोटा) करपश्चात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन्न (करपश्चात) | 0.95 | (43.00) | (127.10) | (350.63) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रू. 1000/- | 1000/- | 1000/- | 1000/- | 1000/- |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत अखंडित परिचलन | 8.25 | (39.40) | (143.74) | (455.98) |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत खंडित परिचलन | (6.89) | (7.14) | (10.01) | (30.88) |

टिप :
अ) उक्त अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरिक्षित समितीने आढावा घेतला आहे. संचालक मंडळाने त्यांच्या ऑगस्ट 7, 2024 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांना मंजुरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारित असल्याप्रमाणे आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचावयाच्या कंपन्या आधिनियम 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचित केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी ऐस) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 जून 2024 रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिताचा वित्तीय निष्कर्षाचा बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीख : 07.08.2024
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिनिटेड करिता
सही
राजेश दामाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Notice**

SRM E-Tender Notice Digitally signed online bids are invited for following tender through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL.
**E-Tender No. EE/EHV/PD-III/SLP/T-1/2024-25** (RFX No - 7000032524)
**Particulars:** Tender for the work of providing 3ph auxiliary supply at 132 kV Kurduwadi TSS
**Estimated Cost:** Rs. 16,95,722/-; E.M.D. (1% of est. cost); Tender cost in Rs. 500.00+ 5%;
**Sale period: 08/08/2024 to 15/08/2024** upto 23:59 Hrs;
**Date of opening (Tech. bid):** 16/08/2024 at 11:00Hrs.
**Contact person:** Addl. Ex. Engg. (Mo. 9421176848).
**Pre-bid meeting :** 12/08/2024 at EHV Projects Division-III, Solapur.
For further details please visit to https://srmetender.mahatransco.in/
Note: All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer, EHV Projects, Div-III, Solapur**

बदल अर्ज क्र. ११२०/२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

**सोलापूर येथील मे. धर्मादाय उप आयुक्त साहेब यांच्या न्यायालयात**

**रत्नाई कृषी विकास सेवा ट्रस्ट, आनंदनगर, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर रजि नं. ई १६८१ सोलापूर** ही न्यास बंद करण्यासाठीचा बदल अर्ज दाखल केला आहे. अर्जदार कु. स्वरुपाराणी जयसिंह मोहिते पाटील यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे दाखल केलेले आहे. सदर न्यास बंद करण्याबाबतच्या प्रकरणामध्ये कुणालाही कुठल्याही विश्वस्तांना किंवा सभासदांना जर हरकत घ्यायचे असेल त्यांनी सदरची जाहिर पब्लिकेशन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत सुदर अर्जास उत्तर देणे कामी मे. कार्यालयात हजर व्हावे अन्यथा सदरचे प्रकरणात मे. धर्मादाय उप आयुक्त साहेब हे वर नमुद संस्थेचे न्यास बंद करण्याचे प्रकरण एकतर्फी चालवून सदरचा अर्ज निकाली काढतील. त्यानंतर कोणतेही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहिर पब्लिकेशन केले ता. ०७/०८/२०२४

शिक्का

**सही/-**
**(एस.एस. कुमठेकर)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**

**जाहीर समन्स**

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** - **अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १५९४/२३-२४ | ९२,६१४/- | १ अ<br>१ ब | **काळे सोनाली अमर** रा. मु.पो. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**काळे अमर दिगंबर** रा. मु.पो. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| २ | १५९५/२३-२४ | १,०३,९६१/- | १ अ<br>१ ब | **सय्यद जसमीन करीम** रा. मु.पो. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**सय्यद करीम आलमीन** रा. मु.पो. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ३ | १५९६/२३-२४ | २५,०४१/- | १ अ<br>१ ब | **तांबोळी मुमजात राजू** रा. मु. पोस्ट काळेवाडी, बिटले, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**तांबोळी राजू उसमान** रा. मु. पोस्ट काळेवाडी, बिटले, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ४ | १५९७/२३-२४ | १,५४,७०४/- | १ अ<br>१ ब | **पठाण नसरीन जाकीर** रा. मु. पोस्ट गोटेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर.<br>**पठाण जाकीर महमद** रा. मु.पोस्ट गोटेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ५ | १६०१/२३-२४ | ६९,५३७/- | १ अ<br>१ ब | **कुचेकर स्वरांजली मर्याप्पा** रा. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**कुचेकर मर्याप्पा शिवाजी** रा. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ६ | १६३५/२३-२४ | १,४१,२५८/- | १ अ | **देवकते पंडित दिंगबर** रा.अंजनगाव (खे.) ता. माढा, जि.सोलापूर |
| ७ | १३३४/२३-२४ | १,४४,२४१/- | १ अ<br>१ ब | **अवताडे लक्ष्मी विजयकुमार** रा. तळे हिप्परगा, तुळजापूर रोड, सोलापूर<br>**अवताडे विजयकुमार विनयकुमार** रा. तळे हिप्परगा, तुळजापूर रोड, सोलापूर |
| ८ | १३४०/२३-२४ | ३८,७४६/- | १ अ<br>१ ब | **शिंदे पाटील अनिता विलास** रा. तळे हिप्परगा, शिववालय आश्रमा समोर, सोलापूर<br>**शिंदे पाटील विलास नागनाथ** रा. तळे हिप्परगा, शिववालय आश्रमासमोर, सोलापूर |
| ९ | १३४४/२३-२४ | १,०५,७९२/- | १ अ<br>१ ब | **संगशेट्टी मंगल निलोबा** रा.हगलूर, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर<br>**संगशेट्टी शशिकांत निलोबा** रा.हगलूर, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| १० | १/२४-२५ | १,३१,५६१/- | १<br>२<br>३ | **लक्ष्मी गारमेंटस प्रो.प्रा. गजानन कृष्णा टोणपे** रा.ई ४८, आकाशवाणी केंद्राजवळ, एम.आय.डी.सी. सोलापूर<br>**दिनेश आनंद दयावनपल्ली** रा.७१०/१अ,गोदुताई विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर<br>**लक्ष्मी कृष्णा टोणपे** रा.प्लॉट नं.७५/१अ, गोदुताई विडी घरकुल, कुंभारी |

या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - शुक्रवार दि. २३/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक ०६/०८/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः- डी व सब डी सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढमधील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १८४/३/अ यांसी नवीन सर्व्हे नं. १७५/३/अ पैकी विनायक नगर या नावाने ओळखले जाणारे वसाहतीतील प्लॉट नं. ४९७ यांसी मिळकत नं. ६८२६३२ यांचे क्षेत्र पूर्व पश्चिम २५ फूट दक्षिणोत्तर २० फूट असे एकूण ५०० चौ. फूट अथवा ४६.४६ चौ.मी. इतकी खुली असून यांसी चतुःसिमा : प्लॉट नं.४९८ दक्षिणेस प्लॉट नं. ४९९, पश्चिमेस रस्ता उत्तरेस प्लॉट नं.४९५. येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत व त्यातील तद्गभुत वस्तुवहीवाट सहची मिळकत. सदरची खुली जागा ही सविता नागेश मादगुंडी यांचे मालकी कब्जेवहीवाटीची असून सदरची जागा, ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री व हमी असल्याची आमचे अशिल सौ. लक्ष्मी देविदास कोपेल्ली यांना दिल्यामुळे सदर खरेदीखत करण्याच्या अनुशंगे इसारा पावती अन्वये आमच्या अशिलांनी रक्कम दिलेली आहे.

वर नमूद खुलीजागेबाबत कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध मालकी दावा बक्षीसपत्र, साठेखत, लीज, जप्ती, वारसाहक्क, दान, टाच, गहाण, वाटणी, बँकेचे कर्ज, सावकारी कर्ज, वगैरे अन्य प्रकारे करार व मदार असल्यास त्यांनीही सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील नमूद पत्त्यावर समक्ष येऊन लेखी हरकत कळवावी मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अथवा ज्यांचे हक्क व हितसंबंध आहे अशानी देखील मुदतीत हरकत न दिल्यास त्यांनी त्यांचा हक्क व हित संबंध कायमस्वरुपी सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर खुलीजागा ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचेही कसल्याही प्रकारचा हरकत तक्रार चालणार नाही व ते आमचे अशिलावर बंधन कारक राहणार नाही. कोणाचेही कसल्या प्रकारचे फसगत होऊ नये म्हणून सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख ०७/०८/२०२४

**सही/-**
**ॲड. अंबादास जी. कंदीकोंडा**
**बी.ए., जी.डी.सी. ॲन्ड ए.,**
**एल.एल.बी. (स्पे.) ॲडव्होकेट**
**ऑफिस :- ९०३, न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक,**
**श्री. चौडेश्वरी पतसंस्थेच्या बाजुस सोलापूर.**
**मो.नं. ९३७३९५५७३०**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

**नितीन रामचंद्र पाटील** - **अर्जदार**
रा. माढा, ता. माढा जि. सोलापूर
**विरुध्द**
**मुख्याधिकारी, नगरपंचायत माढा** - **सामनेवाला**
ता. माढा जि. सोलापूर

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे स्वतः नितीन रामचंद्र पाटील यांचा जन्म दिनांक २०/०८/१९६८ रोजी माढा ता. माढा येथे झालेला आहे परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. माढा येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा माढा येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे स्वतः नितीन रामचंद्र पाटील यांचे जन्म घटनेची नोंद धरणेकामी व दाखला देणेकामी कुणाची काही नवी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख १३/०९/२०२४ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत / तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांनी वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक २०/०८/१९६८ रोजीचे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक ०७/०८/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, माढा**

**जाहीर नोटीस**

सिव्हील किरकोळ अर्ज नंबर १२९/२०२४

**सोलापूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश-१ सो. यांचे कोर्टात**

**(१) कु. समर्थ काशिनाथ सोलनकर** - **अर्जदार**
वय : ९ वर्षे, धंदा : शिक्षण, (अ.पा.क. आई)
**(२) सुजाता काशिनाथ सोलनकर**
वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. नागोबा मंदिर खासबाग गल्ली,
अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन** - **सामनेवाला**

ज्या अर्थी यातील अर्जदार नं. २ यांनी अर्जदार नं. १ यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर, तालुका अक्कलकोट पैकी मौजे अक्कलकोट येथील गट नंबर ६३२/२/१/ब/२/३/४ यापैकी प्लॉट नं. २३९ यांसी क्षेत्र १.५१२९ आर. चौ.मी. यांसी चतुः सिमा पुर्वेस: प्लॉट नं. २४४, दक्षिणेस, प्लॉट नं. २३८, पश्चिमेस ९ मीटर रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. सव जर२४० ब्येणेप्रमाणें चतुः सिमेतील खुली प्लॉटजागा व त्यातील तदंगभुत वस्तुसह.:- कोर्ट येणेप्रमाणे वर नमूद केलेली मिळकत ही अर्जदार नं. २ यांनी अज्ञानाच्या हिताकरिता विक्री करण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी जर कोणांस वरील मिळकत विक्री करण्यास परवानगी देण्यांस कोणाचेही काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत किंवा नेमलेली ता. १०/०९/२०२४ रोजी मे. कोर्टात हजर रहावे, तसे न झाल्यास मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचेही हरकत व तक्रार चालणार नाही.

ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले ता. ०५/०८/२०२४

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरुन**
**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, सोलापूर**





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महत्त्वाचे

### गोल्फपटू दीक्षा डागरची दुसऱ्या स्थानावर झेप



**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या वैयक्तिक गोल्फ स्पर्धेच्या पहिल्या फेरीत उत्कृष्ट गोल्फ खेळणाऱ्या भारतीय गोल्फपटू अदिती अशोकने बर्डीसह आघाडी घेतली. दरम्यान, पहिल्या फेरीत दीक्षा डागर सातव्या क्रमांकावर होती त्यानंतर तिने उत्कृष्ट कामगिरी करत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. अशोकने आपल्या दिवसाची सुरुवात पहिला बोगी ३ आठव्या छिद्रांवर केली. नॉर्वेची सेलिना बोर्गे लीडरबोर्डच्या वर सात छिद्रांनंतर तीन अंडर-स्कोअर आहेत. अशोकला पुढील तीन फेऱ्यांमध्ये चांगले गुण मिळविण्याची संधी आहे, त्याकरिता तिला उत्तम खेळणे आवश्यक आहे.

### नीरज चोप्राच्या कामगिरीकडे लक्ष

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ॲथ्लेटिक्स स्पर्धेत गुरुवारी टोकियो



ऑलिम्पिकचे सुवर्णपदक विजेता भारतीय स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याच्या कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागलेले आहे. नीरजने पात्रता फेरीत पहिल्याच प्रयत्नांत ८९.३४ मीटरची कामगिरी करत अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली. गुरुवारी रात्री ११.५५ वाजता नीरजची अंतिम फेरी होणार आहे. पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस शर्यतीच्या हिट २ मध्ये महाराष्ट्राचा ॲथ्लिट अविनाश साबळे याने ८:१५.४३ वेळ नोंदवून पाचवे स्थान मिळविले व स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्रता सिद्ध केली. २०२३ आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता अविनाश आता ८ ऑगस्ट रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे १.१३ वाजता अंतिम फेरीत भाग घेईल.मी केवळ अंतिम फेरी गाठण्याचे लक्ष्य ठेवले होते, त्यामुळे जास्त ताकद लावली नाही, ती अंतिम फेरीसाठी राखून ठेवली आहे. अंतिम फेरीत चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करेन, असे तो म्हणाला.

### पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताचे सामने

**पॅरिस** : दुपारी १२.३० वा. गोल्फ- महिलांचा वैयक्तिक स्ट्रोक खेळ दुसरी फेरी (दीक्षा डागर), दुपारी २.४७ वा.- दुसरी फेरी (अदिती अशोक). दुपारी २.०५- ॲथ्लेटिक्स-महिलांच्या १०० मीटर अडथळ्यांची रिपेचेज फेरी- हीट १ (ज्योती याराजी). दुपारी ३.०० वा.- कुस्ती- महिलांच्या ५७ किलो फ्री स्टाईल उपांत्यपूर्व फेरी (अंशू मलिक वि. हेलन मारुलिस अमेरिका), पुरुषांची ५७ किलो फ्री स्टाईल उपांत्यपूर्व फेरी (अमन सेहरावत विरुद्ध व्लादिमीर एगोरोव्ह, मॅसेडोनिया). दुपारी ४.२० वा.- कुस्ती महिलांच्या ५७ किलो फ्री स्टाईल उपांत्य फेरी (जर पात्र असेल तर) अंशू विरुद्ध अलिना अकोबिया (युक्रेन) किंवा हश न्हेलिना लायसाक (पोलंड) दुपारी ४.२० वा.- कुस्ती पुरुषांची ५७ किलो फ्री स्टाईल उपांत्य फेरी (पात्र असल्यास) अमन सेहरावत वि डायमॅन्टिनो इना फाफे (बिसुआ-ग्विनिया) किंवा झेलिमखान अबाकरोव (अल्बानिया) सायंकाळी ५.३० वा.- हॉकी पुरुष संघाची कांस्यपदकासाठी लढत (भारत विरुद्ध स्पेन) ९.४५ वा.- पुरुषांची ५७ किलो फ्री स्टाईल उपांत्य फेरी (पात्र असल्यास) (अमन सेहरावत), रात्री १०.२५ वा.- कुस्ती महिलांची ५७ किलो फ्री स्टाईल उपांत्य फेरी (पात्र असल्यास) अंशु मलिक वि प्रतिस्पर्धी रात्री **११.५५ वाजता- ॲथ्लेटिक्स पुरुषांची भालाफेक स्पर्धा अंतिम फेरी (नीरज चोप्रा)**

### तेंडुलकर, गावस्करसह सिंधू, साक्षीचा विनेशला पाठिंबा

**नवी दिल्ली** : भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर यांच्यासह ऑलिम्पिकपदक विजेती कुस्तीपटू साक्षी मलिक, योगेश्वर दत्त, बजरंग पुनिया यांनी पॅरिस ऑलिम्पिकमधून बाहेर झालेल्या कुस्तीपटू विनेश फोगटला ठआपला पाठिंबा दिला आहे. तू सुवर्णपदकाच्या अंतिम फेरीतून बाहेर झाली असली तरी तू आमच्यासाठी विजेती आहे, असे पी. व्ही. सिंधूने टि?ट केले आहे. तू धैर्य आणि नैतिकतेचे सुवर्णपदक विजेती आहे. तू या भारतमातेची कन्या आहे आणि म्हणूनच हे पदक देखील मातीचे आहे.

# मनू भाकरचे उत्स्फूर्त स्वागत



दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर नेमबाज मनू भाकरचे उत्स्फूर्त स्वागत

◆ **नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

बुधवारी सकाळी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर हिचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. मनूवर गुलाब पुष्पांची उधळण करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात तिचे स्वागत करण्यात आले.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये २५ मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्यपदक जिंकणारी २२ वर्षीय मनू हिने सरबज्योत सिंगच्या साथीने एअर पिस्तूल मिश्र स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. मनू भाकर अन्य कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्निल कुसाळे व मुष्टियोद्धा लवलिना बोर्गोहेनसुद्धा सुद्धा मायदेशात परतला. यावेळी पॅरिसहून परतलेल्या खेळाडूंचे पुष्पहार घालून स्वागत केले.

मनूची आई सुमेध व वडील राम किशन भाकर यांनी विमानतळावर घरून तयार करून आणलेले पदार्थ भरवले. त्यामुळे मनूला खूप आनंद झाला.

**विनेशच्या बातमीमुळे सत्कार समारंभ पुढे ढकलला**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी पदकविजेतेसाठी नियोजित एक सत्कार समारंभ आयोजित केला होता, परंतु पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीच्या अंतिम फेरीतून विनेश फोगटला अपात्र ठरविल्याच्या धक्कादायक वृत्तामुळे हा समारंभ पुढे ढकलण्यात आला. तसेच मनूशी प्रसारमाध्यमांशी संवाद साधण्याचा कार्यक्रमसुद्धा रद्द करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक जिंकलेल्या खेळाडूंसाठी केंद्र सरकारकडून रोख पुरस्कार लवकरच जाहीर अपेक्षा आहे.

कोल्हापूरच्या स्वप्निल कुसाळेला कांस्यपदक जिंकल्याबद्दल महाराष्ट्र सरकारकडून एक कोटी रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले आहे.

पॅरिस ऑलिम्पिकच्या समारोप समारंभात ध्वज वाहकांपैकी एक म्हणून मनू भाकर लवकरच पॅरिसला परत उड्डाण करणार आहे. (वृत्तसंस्था)

# राणी, सर्वेश अंतिम फेरी गाठण्यात अपयशी

### ज्योती याराजीला सातवे स्थान

◆ **पॅरिस, ७ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ॲथ्लेटिक्स स्पर्धेत बुधवारी भारताची ॲथ्लिट अन्नू राणी महिलांच्या भालाफेक स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यात अपयशी ठरली. सर्वेश कुशारे पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत अंतिम फेरी गाठण्यात अपयशी ठरला. महिलांच्या १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत हीटमध्ये भारताच्या ज्योती याराजीने सातवे स्थान मिळविले. रिपेचेज नियमानुसार तिला अंतिम फेरी गाठण्याची आणखी एक संधी मिळत आहे.





अन्नू राणी

गट ब मधील सोळा खेळाडूंच्या भालाफेक स्पर्धेत अन्नू राणीने आपल्या तीन प्रयत्नांमध्ये ५५.८१ मी, ५३.२२ मीटर आणि ५३.५५ मीटर अंतर अशी नोंद केली आहे.तिने १५ वे स्थान मिळविले, मात्र ती अंतिम फेरीत प्रवेश करण्यात अपयशी ठरली. अन्नूने पहिल्या प्रयत्नात ५५.८१ मीटरची नोंद केली व दहावे स्थान मिळविले होते, परंतु नंतर तिची कामगिरी घसरत गेली. तिला अंतिम फेरीत प्रवेश करण्यासाठी ६२.०० मीटरची पात्रता निकष पूर्ण करायची होती किंवा अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी अव्वल १२ क्रमांकात स्थान मिळविणे आवश्यक होते.

**सर्वेश कुशारेने मारली २.१५ ची उंच उडी**

पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत पात्रता फेरीतभारताच्या सर्वेश कुशारे तिसऱ्या प्रयत्नात २.२० मीटर उंची उडी मारण्यात अपयशी ठरला. सर्वेशने पहिल्या प्रयत्नात २.१५ मीटरची पहिली उंच उडी मारली. मात्र तो २.२० मीटरवर दोनदा उडी मारण्यात अपयशी ठरला आहे.

**ज्योती याराजीला रिपेचेज फेरीची प्रतीक्षा**

भारतीय ॲथ्लिट ज्योती याराजीने महिलांच्या १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीतील हीटमध्ये १३.१६ सेकंदाची वेळ नोंदवित सातवे स्थान मिळविले. आता तिला रिपेचेज फेरीची प्रतीक्षा असून तिला अंतिम फेरी गाठण्याची आणखी एक संधी मिळणार आहे. (वृत्तसंस्था)

# विनेशला २५ लाखांचे बक्षीस जाहीर

### लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा पुढाकार

◆ **जालंधर, ७ ऑगस्ट**

पंजाबस्थित लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीने (एलपीयू) आपला विद्यार्थी व कुस्तीपटू विनेश फोगट हिला २५ लाख रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजन गटाच्या अंतिम सामन्यासाठी अयोग्य असल्याचे जाहीर केले असतानाच लव्हली विद्यापीठाने या रोख पुरस्काराची घोषणा केली. विनेशचे वजन १०० ग्रॅमने जास्त प्रमाणात आढल्यामुळे तिला अंतिम फेरीसाठी अपात्र ठरविण्यात आले. आमच्यासाठी विनेश अजूनही एक पदक विजेती आहे. तिच्या संपूर्ण प्रवासात तिचे समर्पण व कौशल्य पुनर्रचनेबद्दल आम्ही तिला २५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करतो, हे बक्षीस देण्याचा अभिमान आहे, असे एलपीयूचे अशोक कुमार मित्तल यांनी सांगितले. विनेश जालंधरमधील विद्यापीठात एम. ए. मानसशास्त्र शिकत आहे. (वृत्तसंस्था)

### सुवर्ण जिंकली असती तर विनेशला सरकारकडून मिळाले असते ७५ लाख रुपये

ऑलिम्पिकमध्ये जर एखादा भारतीय खेळाडू सुवर्णपदक जिंकला, तर भारत सरकारकडून त्या खेळाडू ७५ लाख रुपये रोख पुरस्कार देण्यात येतो. जर एखाद्या खेळाडूने रौप्य केले तर त्याला ५० लाखांचे बक्षीस मिळते. त्याच वेळी कांस्यपदक जिंकणाऱ्या खेळाडूला ३० लाख रुपये बक्षीस दिले जाते. या व्यतिरिक्त राज्य सरकार सुद्धा त्यांच्या खेळाडूंना बक्षीस जाहीर करतात. परंतु आता विनेशने एकही पदक न जिंकल्यामुळे या रोख पुरस्कारांना मुकणार आहे.

# सपोर्ट स्टाफ कर्तव्याला चुकले, चौकशी होणार : संजय सिंह

◆ **पॅरिस, ७ ऑगस्ट**

विनेश फोगट पॅरिस ऑलिम्पिकच्या बाहेर झाल्यानंतर भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह म्हणाले की, विनेशचे सुवर्णपदक निश्चित होते. अंतिम लढतीपूर्वी विनेशचे वजन १०० ग्रॅम वाढल्यामुळे तिला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरविण्यात आले. प्रशिक्षक, भिजिओ व आहारतज्ज्ञांनी आपले कर्तव्य योग्यरीत्या बजावले नाही व तिच्या अपात्रतेसाठी हेच लोक जबाबदार आहे. आम्ही सपोर्ट स्टाफची चौकशी करणार आहे.

आम्ही सध्या विनेशला पदक मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहो, त्याची ती हकदार आहे. आम्ही यूडब्ल्यूडब्ल्यूशी संवाद साधत आहो, असे ते म्हणाले.

सुवर्णपदक निश्चित होते. १४० कोटी भारतीयांचे दुर्भाग्य आहे की, इतिहास घडता घडता राहिला व त्याकरिता सपोर्ट स्टाफ जबाबदार आहे, असा आरोप त्यांनी केला.

**१०० ग्रॅम जास्त वजन आढळले : प्रशिक्षक**

बुधवारी सकाळी विनेशचे वजन १०० ग्रॅमने वाढले. नियमानुसार तिचे वजन निर्धारित ५० किलो ग्रॅम असायला हवे होते. मात्र, तिचे वजन करण्यात आले असता ते निर्धारित वजनापेक्षा १०० ग्रॅम जास्त असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे नियमानुसार तिला अंतिम फेरीत भाग घेता येणार नाही व तिला अपात्र ठरविण्यात आले आहे, अशी माहिती भारतीय प्रशिक्षकांनी दिली.

**विनेशची जागा लोपेझ घेणार**

उपांत्य फेरीच्या सामन्यात विनेशकडून पराभूत झालेली क्यूबाची कुस्तीपटू युस्नेलिस गुझमन लोपेझ आता विनेशच्या जागी अंतिम फेरीसाठी पात्र ठरली असून ती आता अंतिम सामन्यात अमेरिकेच्या सारा ॲन हिलडेब्रॅण्डविरुद्ध झुंजणार आहे.

**दुसऱ्या दिवशी वजन वाढले**

विनेशचे दुसऱ्या दिवशी वजन वाढले. आंतरराष्ट्रीय कुस्ती नियमांच्या कलम ११ नुसार, विनेशची जागा उपांत्य फेरीत तिच्याविरुद्ध हरलेल्या कुस्तीपटू घेणार आहे. अर्थात क्यूबाची युस्नेलिस गुझमन लोपेझ अंतिम सामन्यासाठी आता पात्र ठरली आहे, असे पॅरिस ऑलिम्पिक आयोजन समितीने एका निवेदनात म्हटले आहे. रिपेचेज लढतीत जपानची युई सुसाकी व युक्रेनची ओक्साना लिवाच कांस्यपदकासाठी झुंजणार आहेत.

**हा घातपात असू शकतो : विजेंदर सिंग**

कुस्तीपटू विनेश फोगटला ऑलिम्पिक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातून अपात्र ठरविणे हे एक षडयंत्र असण्याची शक्यता आहे, असा आरोप भारतीय मुष्टियोद्धा विजेंदर सिंग याने केला आहे. विजेंदर हा ऑलिम्पिक पदक जिंकणारा भारताचा पहिला व एकमेव पुरुष मुष्टियोद्धा आहे.

**वजन वाढल्यास सहसा खेळण्याची परवानगी दिली जाते : महावीर सिंग**

मला सांगायचे काही नाही. संपूर्ण देशाला विनेशकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती, जर कुस्तीपटूचे वजन ५०-१०० ग्रॅम जास्त असेल तर त्यांना सहसा खेळण्याची परवानगी दिली जाते, परंतु नियम आहेत. मी देशातील लोकांनी निराश होऊ असे मी म्हणेन एक दिवस विनेश निश्चितपणे ऑलिम्पिक पदक जिंकेन. मी तिला पुढच्या ऑलिम्पिकसाठी तयार करीन, असे महावीरसिंग फोगट म्हणाले. (वृत्तसंस्था)

### वजनाच्या समस्येमुळे आम्ही पदक गमावले : संजय सिंह

आमच्याकडे कमी वेळ आहे, परंतु आम्ही जे काही शक्य आहे ते करू. विनेशचे वजन कमी करण्यासाठी रात्रभर प्रशिक्षण घेत असल्यामुळे थोडेसे निर्जलीकरण आहे. आता ती तंदुरुस्त आहे व विश्रांती घेत आहे. क्रीडा ग्राम हे अत्यंत वाईट आहे. आम्ही जास्त वजनाच्या समस्येमुळे महिलांच्या कुस्तीमध्ये आमचे पहिले पदक गमावले आहे. आमचे ॲथ्लिट्स खूप चांगले तयार आहेत व ते सर्व चांगले खेळतील. कुस्तीत आम्हाला २-३ पदके मिळतील अशी आशा होती, असे भारतीय कुस्ती महासंघाचे (डब्ल्यूएफआय) सचिव संजय सिंह म्हणाले.

### विनेश उपचारासाठी रुग्णालयात



२०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५० किलो फ्री स्टाईल कुस्तीच्या अंतिम फेरीतून अपात्र ठरविल्यानंतर काही मिनिटांनंतर पॅरिसमध्ये विनेश फोगटला बुधवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. वजन मोजणीदरम्यान १०० ग्रॅम जास्त वजन असूनही अपात्र ठरविल्यानंतर निर्जलीकरणामुळे (डीहायड्रेशन) विनेश बेशुद्ध झाली.

मंगळवारी ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली महिला कुस्तीपटू होण्याचा इतिहास रचणाऱ्या विनेश फोगटच्या अंतिम फेरीने दुर्दैवी वळणाचा सामना केला. रुग्णालयातील उपचारानंतर तिला सुटी देण्यात आली आता ती क्रीडा ग्राममध्ये आपल्या निर्धारित स्थळी विश्रांती घेत असल्याची माहिती आहे.

# नेदरलॅण्ड सहाव्यांदा अंतिम फेरीत

### अर्जेंटिनावर ३-० ने मात

◆ **पॅरिस, ७ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या हॉकी स्पर्धेत बुधवारी उपांत्य सामन्यात विद्यमान विजेत्या नेदरलॅण्डने अर्जेंटिनाचा सरळ ३-० ने पराभव करून सहाव्यांदा अंतिम फेरीत स्थान मिळविले आहे.

२००० च्या सिडनी ऑलिम्पिकमध्ये हरल्यापासून नेदरलॅण्डने प्रत्येक अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यावेळी त्यांनी कांस्यपदकाची कमाई केली होती. हॉकीचे शक

तीकेंद्र असलेल्या नेदरलॅण्डच्या महिला आणि पुरुष संघांनी सुवर्णपदक जिंकले, तर हा त्यांच्या हॉकी संघाचा विक्रम असेल व या दोन्ही संघांना हा इतिहास घडवण्याची संधी मिळाली आहे.



तिसरा गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना नेदरलॅण्डची यिब्बी जॅन्सेन

बेल्जियम व चीन यांच्यादरम्यान होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजयी संघाविरुद्ध नेदरलॅण्डला अंतिम झुंज द्यावी लागणार आहे. (वृत्तसंस्था)

# महिला टेबल टेनिस संघाचे आव्हान संपुष्टात

◆ **पॅरिस, ७ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या कुस्तीमध्ये एकीकडे विनेश फोगटला अंतिम फेरीसाठी अपात्र ठरविण्यात आले असताना महिलांच्या ५३ किलो वजनी गटाच्या उप-उपांत्यपूर्व लढतीत भारताच्या अंतिम पांघळला पराभवाचा सामना करावा लागला. महिलांच्या सांघिक टेबल टेनिस स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत भारतीय महिला टेबल टेनिस संघाला जर्मनीकडून १-३ ने पराभव पत्करावा लागला. याबरोबरच पुरुषांसह महिला टेबल टेनिस संघांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.



अर्चना गिरीश कामथने जर्मनीच्या शिओना शानवर ११-१७, १-११, ११-५, ११-९ असा विजय मिळविला, मात्र मनिका बत्राला जर्मनीच्या ॲनिट कॉफमनकडून पराभव पत्करावा लागला. श्रीजा अकुलाही जर्मनीच्या कॉफमनसमोर टिकाव धरू शकली नाही. मनिकाने पहिला गेम जिंकला, परंतु त्यानंतर अनिटने जोरदार मुसंडी मारत ११-८, ५-११, ७-११ असा सामना जिंकला. श्रीजा व अर्चनाने दुहेरीच्या सामन्यात युआन वान व शिओना शानकडून ५-११, ११-८, १०-१२, ६-११ असा पराभव स्विकारला. (वृत्तसंस्था)

# श्रीलंकेने भारताविरुद्धची वन-डे मालिका जिंकली

◆ **कोलंबो, ७ ऑगस्ट**

आर. प्रेमदासा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या तिसऱ्या व अंतिम एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात यजमान श्रीलंकेने रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला ११० धावांनी पराभूत केले.

पहिला सामना नाट्यमयरीत्या टाय झाल्यानंतर श्रीलंकेने दुसरा वन-डे सामना ३२ धावांनी जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. आता तिसऱ्या सामन्यात श्रीलंकेने ११० धावांनी दणदणीत विजय नोंदवून भारताविरुद्धची तीन सामन्यांची वन-डे मालिका २-० अशी जिंकली.

१९९७ पासून श्रीलंकेने भारतावर प्रथम द्विपक्षीय एकदिवसीय मालिकेचा विजय मिळविला.

श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करत ५० षटकांत ७ बाद २४८ धावा उभारल्या आणि भारतासमोर विजयासाठी २४९ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण संघ २६.१ षटकांत १३८ धावांतच बाद झाला.

नवीन मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारताने श्रीलंकेविरुद्धची टी-२० मालिका जिंकली, परंतु वन-डे मालिका जिंकून देण्यात त्यांना अपयशआले. २७



वर्षांत श्रीलंकेकडून मालिका पराभव टाळण्यासाठी भारताला हा तिसरा सामना जिंकणे आवश्यक होते, परंतु भारतीय फलंदाज पुन्हा एकदा श्रीलंकेच्या फिरकी माऱ्यापुढे अपयशी ठरले.

श्रीलंकेचा अविष्का फर्नांडो सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला, तर दुनिथ वेलालगे मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. अविष्काने १०२ चेंडूंत ९६ धावांची खेळी केली, तर दुनिथने १०८ धावांत ७ बळी टिपलेत.

श्रीलंकेकडून सलामीवीर पाथुम निसंका (४५), अविष्का फर्नांडो (९७), कुशल मेंडिस (५९) यांनी दमदार फलंदाजी करत श्रीलंकेला मोठी धावसंख्या उभारून देण्यात मदत केली. भारताकडून रियान परागने ३ बळी, तर मोहम्मद सिराज, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर व कुलदीप यादवने प्रत्येकी एक बळी टिपला.

धावांचा पाठलाग करताना भारताकडून सलामीवीर व कर्णधार रोहित शर्माने ३५ धावांची खेळी केली. विराट कोहलीने २० धावांची, तर वॉशिंग्टन सुंदरने ३० धावांची भर घातली, मात्र इतर फलंदाज श्रीलंकेच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाहीत. डावखुरा फिरकीपटू दुनिथ वेलालगेने २७ धावांत ५ बळी टिपलेत. महेश थिक्षना व जेफरी वँडरर्सने प्रत्येकी २ बळी टिपलेत. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### चेंबर ऑफ कॉमर्स राबविणार हर घर तिरंगा, हर दुकान तिरंगा अभियान

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या वतीने ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान महाराष्ट्रात राबविण्याचा राज्यशासनाने मंत्रिमंडळात निर्णय घेतला आहे. त्या आवाहनानुसार हर घर तिरंगा व हर दुकान तिरंगा अभियान राबविण्यात येणार असल्याचे चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष राजू राठी यांनी सांगितले. केंद्र सरकारने घोषित करण्यात आलेल्या आवाहनानुसार महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात सुध्दा हर घर तिरंगा अभियान महाराष्ट्रात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे या उपक्रमास सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर सुद्धा या अभियानात सर्व संघटना, व्यावसायिक, कारखानदार, उद्योजक, नागरिक सहभागी होणार आहेत. त्याप्रमाणे सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्यावतीने ९ ते १५ ऑगस्ट.२०२४ हर घर तिरंगा व हर दुकान तिरंगा हा उप्रकम राबवावा, असे आवाहन अध्यक्ष राजू राठी व सचिव धवल शहा यांनी केले आहे.

### प्रधान चॅरीटेबल ट्रस्टद्वारे लॅसिक लेसरमोत तपासणी शिबीर १५ ऑगस्टला

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

येथील प्रधान नेत्र रुग्णालयाद्वारा चष्म्याचा नंबर घालवायच्या लॅसिक लेसरचा मोत तपासणी शिबीर १५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. हे शिबीर सकाळी ९ ते सायं. ६ या वेळेत प्रधान नेत्र रुग्णालय आणि लॅसिक सेंटर, रामलाल चौक, डॉ. एम.जी. प्रधान मार्ग, सोलापूर येथे होईल. १८ ते ४० वर्षे वयोगटातील व्यक्तिंना ही तपासणी करुन पुढे लॅसिक उपचाराविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. गेल्या १० वर्षांपासून स्विंड अमारिस या जर्मन एक्साईमर लेसर तंत्रज्ञानाने चष्म्याचा नंबर घालवण्यासाठी अत्शंत यशस्वी यशस्वी उपचार केले जातात, नुकतेच रुग्णालयात नवीन तंत्रज्ञान व सॉफ्टवेअर ने अधिक अचूक व सुरक्षित ट्रीटमेंट शक्य आहे. डॉ. उमा प्रधान गेली अनेक वर्षे सेवा देत आहे. नवीन तज्ञ पिढीच्या रुपाने डॉ. विराज प्रधान व डॉ. स्वाती प्रधान ह्या उभयंतांनी उच्च तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण बेलगाम, बंगलोर व ऑस्ट्रेलिया येथे झाले आहे.रुग्णालयाची संपूर्ण टीम दरवर्षीप्रमाणे समामजिक बंधलिकीतून १५ ऑगस्ट रोजी हा उपक्रम राबवित आहे. ज्याम ध्ये तपासणी मोत करण्यात येणार असून शिबीरात निवड झालेल्या व्यक्तिंची लॅसिकपूर्व तपासणी(टोपोग्राी) व उपचारावर २० टक्के पर्यंत सवलत जाहीर केली आहे. नांव नोंदणीसाठी ९८८१००४३०४ अथवा ७०५८६५९३४२ या मोबाईलवर संपर्क साधावा.

# दोन लाखांच्या लाचप्रकरणी मंडल अधिकारी, तलाठ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

बंद झालेला जागेचा उतारा सुरु करून घेण्यासाठी ६ लाख रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ४ लाख रुपये लाचेची मागणी करून पहिला हप्ता म्हणून २ लाख रूपये स्विकारण्यास संमती देणाऱ्या मंडल अधिकारी व तलाठ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उत्तर तहसिल कार्यालयातील मंडल अधिकारी संदीप भिमराव लटके आणि नेहरू नगर चे तलाठी पवनकुमार मोहनराव चव्हाण अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

यातील तक्रारदार हे कंपनीत सुपरवायझर म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या कंपनीच्या मालकीची शहरातील नेहरू नगर येथे ८६.६७ आर खुली जागा आहे. महसुल प्रशासनात झालेल्या संगणकीकरणामुळे त्या जागेचा ७/१२ उतारा बंद झाला होता. तो उतारा पुन्हा चालू करण्यासाठी तक्रारदाराने उत्तर तहसिल कार्यालय येथे अर्ज दिला होता. हा उतारा पुन्हा चालू करण्याच्या अनुषंगाने महसुल अधिनियम कलम १५५ नुसार तक्रारदारने उत्तर सोलापूर तहसिल कार्यालय येथे प्रस्ताव सादर करण्यासाठी मंडल अधिकारी संदीप लटके व तलाठी पवनकुमार चव्हाण यांनी तक्रारदाराकडे ६ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ४ लाख रुपये देण्याचे ठरले होते.

दरम्यान, तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली होती. तक्रारीची खातरजमा करून मंडल अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांनी लाचेच्या रकमेपैकी २ लाख रुपयांचा पहिला हप्ता स्विकारण्यास संमती दिली असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई उपअधिक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक उमाकांत महाडीक, हवालदार शिरीषकुमार सोनवणे, अतुल घाडगे, सलिम मुल्ला, स्वामीराव जाधव यांनी केली.

# शहरात रिपरिप पावसाची हजेरी

## बुधवारी रात्री ८.३० पर्यंत १५ मिलीमीटर पाऊसाची नोंद

**त.भा.वृत्तसेवा**
**सोलापूर दि ७ ऑगस्ट -**

बऱ्याच काळानंतर उसंत घेऊन सोलापूर शहरात पावसाची दमदार हजेरी लागली आहे. पुनर्वसू नक्षत्रातील पावसाने शहरास झोडपले. बुधवारी दुपारी ढगाळ वातावरण येऊन संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पावसाची एन्ट्री झाली.

ऑगस्ट महिन्यातील पावसाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. गेल्या आठ दिवसांपासून पावसाने ओढ दिली होती. नव्या नक्षत्रातील नव्या पावसाने शहरात चांगलीच हजेरी लावली आहे.



मंगळवारी संध्याकाळी आणि बुधवारी दुपारनंतर वरूणराजाने आपली कृपादृष्टी ठेवली आहे. बुधवारी दुपारी ढगाळ वातावरण निर्माण झाले होते.

त्यानंतर संध्याकाळी सहा वाजता पावसाची सुरुवात झाली. पुनर्वसू नक्षत्रातील पावसाने बुधवारी संध्याकाळी जोरदार बॅटिंग केली. रात्री आठ वाजेपर्यंत शहरात १५ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद हवामान विभागाकडे झाली आहे.

### सलग तीन दिवस मुसळधार पावसाचा ईशारा

राज्यात सलग तीन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ७, ८ आणि ९ ऑगस्ट असे तीन दिवस राज्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. गुरुवारी रात्री उशिरापर्यंत पाऊस कोसळत राहील असे देखील यावेळी सांगण्यात आले आहे.

## श्रावणमास प्रवचनमाला

### हरिदासांचा जन्म ज्या भूमीत होतो, ती भूमी पवित्र आहे ती भूमी भारत होय -डॉ. जयवंत महाराज बोधले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

हरे: दासा: हरिदास:। हरिचे जे दास आहेत, अशी जगात अन्य ठिकाण दिसून येतील. किंतु, भगवान ज्यांचा दास होतो ; अशा हरिदासांचा जन्म ज्या भूमीत होतो, ती भूमी पवित्र आहे. ती भूमी भारत होय! असे डॉ.जयवंत महाराज बोधले प्रवचनमालेच्या आज दूस-या सत्रात बोलताना सांगतात.



ज्ञानेबारायांचे दास्यत्व देवानं स्वीकारलं, तुकोबारायांचे स्वीकारलं, नाथबाबांच्या घरी पुष्कळ वर्षे नोकर म्हणून काम केले, माणकोजीबुवांचे दास्यत्व स्वीकारलं, ठाकूरबुवांच्या घरी गिरजामायचे बाळंतपण देवाने करावं, गोरा कुंभारांची मडकी बनवावी, जनाबाईंच्या गोव-या थापाव्या, सोयराबाईंचे दास्यत्व देवानं स्वीकारलं. भगवान परमात्मा ज्या भूमीत दास म्हणून राहिला ती भूमी म्हणजे पैठण!

**तीन देश को सजावत है, सती, संत और शूर।**
**तीन देश को लजावत है, कपटी, कायर और क्रूर।।**

पतीव्रता स्त्री, संतांचे वास्तव्य व शूरांचा जन्म देशाचे भूषण तर कपटीपणा करणारे, भित्रे आणि क्रूर वृत्तीचे लोक देशाचे दूषण आहेत. या कवणाचा दाखला देत डॉ.जयवंत महाराज पुढे पैठण क्षेत्राचे पावित्र्य विविधांगाने विशद करतात.

संत माणकोजी महाराजांच्या समकालीन संत केशव यांनी संत एकनाथांचे चरित्र लेखनामध्ये पैठणचा मूळ नामोल्लेख 'प्रतिष्ठान नगरी' असा केला आहे. केशवरायांना तिलकसंस्कार माणकोजीबुवांनी केलेला असल्याने आजही त्यांच्या परंपरेत माणकोजीबुवांना गुरुस्थानी ठेवून निस्सीम सेवा केली जाते. अलौकिक विचाराने प्रेरित असलेल्या या भूमीचे अधिष्ठान ब्रह्मतत्त्व आहे, असे डॉ.जयवंत महाराज वेदांतिक कसोटीवर श्रोत्यांना उकल करुन सांगतात. पुण्य हे नेहमी पापाच्या संबंधाने येते, तेव्हा 'पुण्यभूमी' हे पैठणचे नाव लौकिक पातळी दर्शवते. 'पाप आणि पुण्याच्या पलिकडे गेलेला जो विचार तोच खरा परमार्थ असतो, असे डॉ. जयवंत महाराज ठासून सांगतात.'

महानुभव पंथाची सुरुवात श्रीचक्रधर स्वामींनी पैठण येथून केली, दिगंबर जैनांचे मुख्य स्थान म्हणून पैठणला विशेष महत्त्व आहे. तसेच, आपल्या दिनदर्शिकेमध्ये शके शालिवाहन हे जे संबोधन वापरले जाते; तो शककर्ता राजा शालिवाहन राजाची राजधानी म्हणजे पैठण, अश्मक वंशातील राजा नृसिंहाचीही भूमी पैठण होय. धर्मपीठ म्हणून पैठणची पूर्वी ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी मुख्य पुरोहित गागाभट्टांचे गाव म्हणजे पैठण होय. एवढेच काय, ज्ञानोबारायांनी आत्मज्ञानाचा पहिला पाठ जेथे गिरवला ती पवित्र भूमी पैठण होय. असे नानाविध दाखल्यांनी डॉ. जयवंत महाराज पैठणच्या संपन्नतेची महती सांगतात. संत निळोबाराय नाथपरंपरेचा उल्लेख भानुदासांपासून करताना,

**वंदु भानुदास आता। जो का पितामहाचा पिता।**
**ज्याचेनी वंश भगवंता। जाहला सर्वथा प्रियकर।।**

असे करतात. सूर्य उपासक संत भानुदासांपासून नाथपरंपरेच्या महत्त्वपूर्ण विचारास सुरुवात होते. असे डॉ.जयवंत महाराज बोधले यावेळी सांगतात. 'सूर्याची उपासना भानुदासांनी का केली?' हे उद्याच्या सत्रात निरुपण होईल.



# शंभर फूट उंच राष्ट्रध्वज स्तंभ निर्माणचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ ऑगस्ट-**

आळंद-कलबुरगी राज्य महामार्गावरील लाडचिंचोळीजवळ नवनिर्मित जय भारत माता मंदिराच्या विस्तीर्ण मैदानावर शंभर फूट उंच राष्ट्रध्वज स्तंभ उभारणीचे भूमिपूजन जय भारत माता सेवा समितीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष हवा मल्लिनाथ महाराज यांच्या सान्निध्यात व कलबुरगी, बीदर, यादगीर सहकारी दूध उत्पादक (केएमएफ ) संघाचे अध्यक्ष आर. के. पाटील यांच्या हस्ते झाले. ध्वजस्तंभ निर्माणाची जबाबदारी सांभाळणारे आर. के. पाटील म्हणाले की, येत्या १५ ऑगस्टच्या आत या राष्ट्रध्वज स्तंभ उभारणीचे काम पूर्ण केले जाईल. सेवा समितीचे प्रवक्ते ॲड. वैजिनाथ झळकी यांनी हवा मल्लिनाथ महाराजांच्या विविध स्तरातील राष्ट्र व समाजसेवा कार्याची माहिती दिली. लाड चिंचोळीजवळील निसर्गरम्य परिसरातील टेकडीवर शंभर फूट ध्वजस्तंभावर कायम तिरंगा ध्वज फडकेल, असे सांगितले. याप्रसंगी शहाजीराव पाटील, मल्लिकार्जुन सारवाड, लिंगराज पाटील आळंद आदी उपस्थित होते.

## क्रीडा



### इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलला विजेतेपद

#### शालेय टेबल टेनिस स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

शालेय शहर टेबल टेनिस स्पर्धेत इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले.

इंदिरा गांधी स्टेडियमवरील मुळे पॅव्हेलियनमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी एस.आर. चंडक स्कूलचा पराभव केला. या संघात अनंत आशिफ शेख, अभिज्ञा वृंदर काब्रा, तनिषा सुनील हंद्रालमठ, अवनी विजय कबाडे, शोमिली असित चिडगुपकर यांचा समावेश होता. संघास क्रीडा शिक्षक अजय चाबुकस्वार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका मानसी जोशी यांनी अभिनंदन केले.

# महेश स्कूल, चंडक, सिद्धेश्वरच्या खेळाडूंचे वर्चस्व

#### शालेय सिकई स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

शालेय शहर सिकई स्पर्धेत महेश स्कूल, एस. आर. चंडक व सिद्धेश्वर विद्यालय आणि स्कूलच्या खेळाडूंची वर्चस्व प्राप्त केले.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव व सुप्रिया गाढवे यांच्या हस्ते झाले. यावेळी सिकई संघटनेचे इक्बाल शेख, सुहास छंचुरे, संतोष खेंडे, शिवानंद सुतार आदी उपस्थित होते.



**अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमाणे) :१४ वर्षाखालील :** मुले : २५ किलो : लक्ष सोनी (महेश स्कूल), समर्थ घोडके (इपाकायल). श्रीहर्ष भीमर्थी (एस.व्ही.सी.एस.). २९ किलो : ओंकार पेट्टी (इप्पाकायल), म. उजेर शेख (एस. एस. ए. ई. एम.), ऋतिक गुंडला (इप्पपाकायल). ३३ किलो : याहिया इनामदार (सोशल), अर्णव गज्जम (महेश स्कूल), प्रथमेश नराल (इप्पाकायल). ४५ किलो : पवनकुमार चकोले (सिद्धेश्वर स्कूल), अदिक धडांबे (एस.टी. ई. एम. सी.), श्रीराज घोलप (व्ही.एम.मेहता).

मुली : २३ किलो : श्रुती कमटम (महेश स्कूल), वेन्नेला गुंडला (इपाकायल), ऐश्वर्या बागले (अहिल्याबाई होळकर), २७ किलो :विधी दरगड (महेश स्कूल), परिणीती कदम (श्राविका), श्रेया कटके (सिद्धेश्वर कन्या). ३१ किलो : आर्या डोलार (सिद्धे कन्या), श्रावणी बिराजदार (महेश स्कूल), गौरी लोंढे (सेवासदन). ४१ किलो : ऋषिका चुंगीवडियार (एस.टी. ई.एम.एस.), समृद्धी भंडारी (आसावा), वेदिका परदेशी (लिटिल फ्लॉवर).

**१७ वर्षाखालील :** मुली : ३६ किलो : आस्था भुतडा (एस.आर. चंडक), तपस्या सारंगमढ (सिद्धेश्वर कन्या), लेखा कोप्पद (सिद्धे कन्या). ४० किलो : विद्या माढेकर (एस.आर.गर्ल्स), भारती चिंता (सिद्धेश्वर स्कूल), नक्षत्रा भोसले (सिद्धेश्वर कन्या). ४४ किलो : सृष्टी मोठे (एस. आर. गर्ल्स), वंशिका माळी (सिद्धेश्वर इंग्लिश), सुप्रिया घनाते (सिद्धेश्वर कन्या). ४८ किलो यशस्वी राठोड (एस.आर. चंडक), अनुष्का मळवदे (सिद्धेश्वर कन्या), लक्ष्मी पवार (सिद्धेश्वर कन्या). ५२ किलो : श्रेया जवळे (सिद्धेश्वर कन्या), आनंदी काळे (एस.आर.चंडक), सृष्टी म्हेत्रे (चौडेश्वरी प्रशाला). ५६ किलो : वैष्णवी सपताळे (सिद्धेश्वर कन्या), विशवा दिंडोरे, (एस.व्ही. सी.एस.), जयश्री आंदळकर (गांधीनाथा). ६० किलो : साक्षी चिडगे (गांधी नाथा), शितल गायकवाड, पुणम बगले (दोघी अहिल्याबाई होळकर). ६० किलोवरील : वर्षा कंठीमठ, दक्षतनया पुकाळे (दोघी सिद्धेश्वर कन्या), धैर्या भर्दे (एस.आर. चंडक).

# थ्रोबॉल स्पर्धेत राज स्कूल उपविजेता



**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

थ्रो बॉल असोसिएशन व छत्रपती शिवाजी प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या जिल्हा सब ज्युनिअर व ज्युनिअर आमंत्रित थ्रो बॉल स्पर्धेत राज मेमोरियल इंग्लिश मेडियम स्कूलच्या मुले व मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळवले.

संघास क्रीडाशिक्षक अतुल सोनके, राजू धसाडे, प्रशिक्षक विठ्ठल सरवदे यांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे संस्थाध्यक्ष महेश कोठे, डॉ. राधिकाताई चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्रा. विलास बेत, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी अभिनंदन केले.

**उपविजेता : मुले :** झैद शेख (कर्णधार), पियुष कबाडे, प्रथमेश शिंदे, आदर्श दिघोळे, आर्यन जाधव, विराज पावले ,रणवीर सुर्वे, मुस्ताब शेख, रिजवान पठाण, प्रीतम अनवेकर, जीशान शेख **मुली:** गौरी सुर्वे (कर्णधार), रंजना गडगडे ,मृणाली आमले ,सिंचना दुर्गे ,साक्षी साखरे ,तेजस्वीनी पवार, निकिता डोके, ऋतुजा चांदणे, सुमन ससाने ,सानवी पवार, राजनंदिणी वाघमारे.

# डॉजबॉल स्पर्धेत श्री सिद्धेश्वर स्कूलच्या मुली विजेत्या, मुलांना उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

जिल्हा डॉजबॉल स्पर्धेत श्री सिद्धेश्वर स्कूलच्या मुलींनी विजेतेपद व मुलांनी उपविजेतेपद संपादिले.

सोलापूर डॉजबॉल स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व छत्रपती शिवाजी प्रशाला यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली होती. संघास क्रीडा शिक्षक पवन भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, भीमाशंकर पटणे, गुरुराज माळगे, मल्लिकार्जुन कळके, सी. बी. नाडगौडा व समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापक योगेश राऊत पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले..



**संघ : मुली :** अमृता शृंगारपुरे, मिताली पाटील, नंदिता नंदुरकर, श्रावणी भुरळे, समृद्धी कोळेकर, रितिका पवार, आनंदी मादनशेट्टी, वैष्णवी लोंढे, अनन्या दुबे, श्रेया पुकाळे, संध्या गुब्याडकर, काव्यांजली सुतार.

**मुले :** श्रेयस बिराजदार, अंशुमन बेळकोटे, तनिष्क कोळेकर, प्रतीक संभेराव, अथर्व तद्देवाडी, श्रेयस जगताप, अथर्व तोगी, मोहित सिद्धे, नागराज कोंडा, शार्दुल फडतरे, जय कंदी, मयूर कुंभार, सिद्धार्थ काटकर, वीर खेड, अभिषेक पवार, सागर सतरले, साई कुमार सामल, श्रेयस कडागनुरे, सुप्रीत पुरुड, कौस्तुभ सुतार,पृथ्वीराज लाड.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## मनोज जरांगे-पाटील यांच्या शांतता रॅलीत

# भगवे झेंडे, भगव्या टोप्या, भगवेमय वातावरण

## लढेंगे जितेंगे-हम सब जरांगे.. एक मराठा, लाख मराठाचा जयघोष

### रॅलीसाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त

### सोलापुरात मराठ्यांचा महापूर

### महिलांची लक्षणीय उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी सोलापुरात बुधवारी काढलेल्या शांतता रॅलीसाठी सोलापूर शहर पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी ठिकठिकाणी बॅरीगेटींग केल्यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला.

जरांगे-पाटील यांची बुधवारी सोलापूरात शांतता रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीसाठी बुधवारी सकाळपासूनच छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे येणारे सर्व रस्ते हे शहर पोलिसांकडून वाहतूकीसाठी बंद करण्यात आले होते. भैय्या चौक, डफरीन चौक, जुना पूना नाका येथील चौक, बाळीवेस, सम्राट चौक आदी ठिकाणचे रस्ते बॅरीकेटींग करून बंद करण्यात आले होते. रस्ते बंद केल्यानंतर या परिसरातील वाहनकांची मात्र मोठी तारांबळ उडाली. पोलिस वाहनांसह सोडत नसल्याने अनेकांनी गल्लीबोळातील मार्ग पत्करला.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौक रस्त्यावर शहर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता शांतता मोर्चाच्या संयोजकांसह पोलिस विभागाने घेतली होती. उंच इमारतींवर तैनात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांकडून मोर्चाच्या मार्गावर निगरानी करण्यात येत होती. पोलिस आयुक्त एम राजकुमार, शहर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे हे स्वतः राज हाईटस् या लॉजच्या इमारतींच्या गच्चीवरून रॅलीवर लक्ष ठेऊन होते. तर उपायुक्त विजय कबाडे हे छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौकात तळ ठोकून होते. शांतता रॅलीसाठी पोलिस आयुक्त एम राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ४ सहायक आयुक्त, १२ पोलिस निरीक्षक, ३४ पोलिस उपनिरीक्षक, ६०० कर्मचारी, २५० होमगार्ड असा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



### तातडीची वैद्यकीय सेवा केली उपलब्ध

या सभेच्या निमित्ताने येणाऱ्या समाज बांधवांसाठी परिसरातील तीन ठिकाणी तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यात आली होती. मराठा डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने मेकॅनिक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक या ठिकाणी वैद्यकीय सेवेसाठी प्रत्येकी पाच डॉक्टरचे पथक तैनात होते. या ठिकाणी इमर्जन्सी किट आणि औषधे उपलब्ध होते. तसेच या परिसरात विविध ठिकाणी रुग्णवाहिका व अग्निशामक दलाच्या गाड्या तैनात होत्या.

### गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणला

संघर्ष योद्धा मनोज जरांगे - पाटील हे सभास्थळी येताच विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. एक मराठा लाख मराठा, हम सब जरांगे, तुमचं आमचं नातं काय - जय जिजाऊ जय शिवराय, आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं, जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है यांसह विविध गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.

जरांगे-पाटील हे रॅलीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून छत्रपती शिवाजी महाराज चौकात आले. यावेळी हजारोंचा जनसमुदाय त्यांच्यासमवेत रॅलीत सहभागी झाला होता. हा मार्ग भगवामय झाला होता.मराठा संघर्ष योद्धा मनोज जरागे पाटील यांच्या सभेसाठी मराठा समाजातील युवक युवती सोबतच महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. त्याचबरोबर लहान मुलांसह महिला उपस्थित होत्या.

**तातडीने बाटल्या व इतर कचऱ्याचे संकलन**

या सभेनिमित्ताने पाण्याच्या बाटल्या खाद्यपदार्थाच्या पिशव्या यासह इतर कचरा सभेच्या ठिकाणी पडू नये म्हणून तत्काळ पोत्यांमध्ये संकलित करण्याचे काम स्वयंसेवकांनी केले. यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी असूनही अस्वच्छता दिसून आली नाही.

**शिस्तीचे घडविले दर्शन**

संघर्ष योद्धा जरांगे-पाटील यांच्या सभेला अलोट गर्दी झाली होती मात्र कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. गालबोट लागू दिले नाही. शिस्तीचे दर्शन घडविण्यात आले. शांततेत ही सभा नेटक्या पद्धतीने पार पडल्याचे दिसून आले.

**ज्येष्ठांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती**

या सभेवेळी मराठा समाजातील केवळ युवक - युवती नाही तर प्रौढ महिला व पुरुष यांच्यासह जेष्ठ मंडळी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित असल्याचे चित्र पाहायला मिळाले. मोठ्या तन्मयतेने जरांगे पाटील यांचे भाषण सर्वजण ऐकत होते.

**सभास्थळी जरांगे-पाटलांची एन्ट्री होताच जल्लोष**

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सभास्थळी दुपारी ३.५५ च्या सुमारास जरंगे-पाटील यांची एन्ट्री होताच जल्लोषात त्यांचे उपस्थित विराट जनसमुदायाने स्वागत केले. टाळ्याचा कडकडाट झाला.

**विविध सामाजिक संस्था, संघटनांच्या वतीने अल्पोपहार आणि पाण्याची सोय**

जरांगे पाटील यांच्या सभेसाठी आलेल्या सहभागी बांधवांसाठी विविध सामाजिक संस्था संघटनांच्या वतीने अल्पोपहार आणि पाण्याच्या बाटल्याची सोय मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती. मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाज अक्कलकोट शहर, अमोलराजे भोसले मित्रपरिवार अक्कलकोट यांच्या वतीने मेकॅनिकी चौकात अल्पोपहार आणि पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था केली होती. नवीवेस पोलीस चौकी जवळ, मेकॅनिक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, छत्रपती संभाजी महाराज चौक परिसर आदी ठिकाणी अल्पोपहार व पाण्याची सोय होती. नेटक्या व्यवस्थेमुळे उपस्थित लोकांची कोणतीही गैरसोय झाली नाही.

**बालशिवबाने वेधले लक्ष**

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सभेच्या ठिकाणी बाल शिवबाच्या वेशभूषेत आलेल्या देगाव देशमुख वस्तीतील सुयोग सुयश शिंदे या दीड वर्षाच्या चिमुकल्याने सर्वांचे लक्ष वेधले.

**वरूणराजानेही केले जरांगे-पाटलांचे स्वागत**

सभेच्या ठिकाणी संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे मोठ्या जनसमुदायांबरोबरच वरूणराजानेही हजेरी लावून स्वागत केले. त्यामुळे वातावरणात उत्साह संचारला. दरम्यान पाटील यांच्या आगमनापूर्वीही पावसाच्या सरी बरसल्या.

**मुस्लिम ब्रिगेडचा सक्रिय पाठिंबा**

छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेडच्या वतीने हाती हिरवे आणि भगवे झेंडे आणि बॅनर घेऊन मुस्लिम कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे सभेत सहभाग नोंदवत पाठिंबा दर्शवला.

### ५१ तोफांची सलामी देऊन जरांगे-पाटलांचे भव्य स्वागत

जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात दुपारी साडेतीन वाजता च्या सुमारास जरांगे पाटील यांचे आगमन झाले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ५१ तोफांची सलामी देऊन जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर येथून ते उघड्या कारमधून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील सभास्थळी मार्गस्थ झाले.

### कानात प्राण आणून हजारोंच्या जनसमुदायाने ऐकले भाषण

संघर्ष योद्धा जरांगे पाटील हे सोलापुरातील सभेमध्ये काय बोलणार याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली होती. त्यामुळे सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत उपस्थित त्यांनी जरांगे यांचे भाषण कानात प्राण आणून अतिशय तन्मयतेने ऐकले. अधून मधून टाळ्यांच्या गजरात त्यांच्या भाषणाला प्रतिसाद दिला.

### शाहिरांनी पोवाड्यातून स्फुल्लिंग चेतविले

सभेपूर्वी तब्बल तीन तास शाहीर अरविंद घोगरे आणि त्यांच्या कला पथकाने विविध पोवाडे , शाहिरी सादर करून उपस्थित जनसमुदायांमध्ये जोश निर्माण करत स्फुल्लिंग चेतविले. रायगड किल्ला महाराष्ट्राची शान आहे, या मर्द मराठ्यांची म्हणूनच मान ताठ आहे ..!, दोनच राजे इथे गाजले.. एक त्या रायगडावर ,एक चवदार तळ्यावर.. यासह विविध प्रबोधनात्मक गीतांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. याप्रसंगी एक ॲम्बुलन्स त्याच मार्गावरून आली आणि तातडीने तेवढ्या अलोट गर्दीतही त्या ॲम्बुलन्सला मराठा समाज बांधवांनी तातडीने वाट मोकळी करून दिली.




### विजापूर रोड श्री जागृत नागनाथ देवस्थान उत्सव अध्यक्षपदी राजेश्वरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

विजापूर रोड श्री रेवणसिद्ध मंदिरसमोरील श्री जागृत नागनाथ देवस्थानच्या नागपंचमी उत्सव अध्यक्षपदी राजेश्वरी भादुले, उपाध्यक्षपदी विजया म्हमाणे तर सचिवपदी निर्मला भांजे यांची निवड करण्यात आली.




श्री जागृत नागनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष माजी आमदार शिवशरण आण्णा बिराजदार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत यंदाचे नागपंचमी उत्सव पदाधिकारी निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य : पल्लवी वाले, सौ. आरती कुसगल, सौ. शांता कन्नूरकर,सौ. अश्विनी पाटील, सौ. अपर्णा कोळी सौ. अश्विनी म्हमाणे, अर्चना पवार, वासंती निंबर्गी. शुक्रवारी नागपंचमी सणानिमित्त या मंदिरात मान्यवरांच्या हस्ते श्री.नागनाथ मूर्तीस अक्षिपुजा व दूध अभिषेक, महाप्रसाद वाटप व महिलांचा सत्कार आदी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या बैठकीस पुजारी वेदमूर्ती सिद्धय्या स्वामी, ट्रस्ट कोषाध्यक्ष विजय रामपुरे, सचिव शिवराया बुक्कानुरे, सकलेश बाभुळगावकर, सिद्राया माविनमर,गंगाधर पाटील, दुंडय्या स्वामी विश्वनाथ आमणे आदी मान्यवर उपस्थित होते.










हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● निवासी संपादक : प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## स्वागतासाठी रांगोळीच्या पायघड्या

संघर्षयोद्धा मराठा नेते मनोज जरांगे पाटील सोलापुरात दाखल झाले. त्यावेळीं रॅली मार्गावर मराठा समाज बांधवांच्या वतीने रांगोळीच्या पायघड्या साकारण्यात आल्या होत्या. रांगोळीच्या पायघड्यांनी यावेळी जरांगे पाटील यांचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी मोठ्या उत्साहात ही रांगोळी काढल्याचे यावेळी सांगण्यात आले.



रांगोळी-८

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### स्वामी समर्थ पालखी पदयात्रा शनिवारी

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

अक्कलकोट स्वामी समर्था महाराजांची पालखी पदयात्रा शनिवारी (दि. १०) सकाळी ८ वाजता अशोक चौक येथील मंदिरातून अक्कलकोटला मार्गस्थ होणार आहे. या पालखी पदयात्रीचे ३४वे वर्ष आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाळप्रसाद बाबर यांनी केले आहे.

### शरदचंद्र पवार प्रशालेत जिल्हा खो-खो पंच शिबीर

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशन व शरदचंद्र पवार प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा खोखो पंच प्रशिक्षण शिबिर रविवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी पुणे नाका एसटी स्टँडजवळील श्री शरदचंद्र पवार प्रशाला सोलापूर येथे आयोजित केले आहे. पंचानी आपली नोंदणी १५ ऑगस्टपर्यंत https://forms.gle/aprF9XhNYDwXzgwAA या लिंक वर करावी. हे पंच शिबिर सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळात होणार आहे. अधिक माहितीसाठी असोसिएशनचे सहसचिव राजाराम शितोळे (९८८११५३३६३) यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पंचांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सरचिटणीस ए. बी. संगवे यांनी केले आहे.

### मल्लिकार्जुन हायस्कूलचे संस्कृत सरल परीक्षेत यश

**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल नगर येथील संस्कृत सरल परीक्षेल बारा विद्यार्थी बसले होते, बाराही विद्यार्थी उत्तीर्ण होऊन प्रशालेचा शंभर टक्के निकाल लागला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते तर प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे हे होते. यावेळी अध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे व धरेप्पा हत्तुरे तसेच संस्कृत भारती प्रशिक्षिका सीमा अंजुटगी, पर्जन्य अंजुटगी यांच्या हस्ते ईश्वरी देशमुख, योगिता शिंदे, श्रद्धा हजारे, धानेश्वरी कोरे, ऐश्वर्या सन्नके, रक्षिता तवटे, आलिया म ुजावर, ज्योती वाले, लक्ष्मी मातनळ्ळी, सोनाक्षी अंबलगी, वैष्णवी जवळगे, ओंकार स्वामी या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दत्तात्रय अगरखेड, सविता कुलकर्णी, अण्णाराया तुप्पद, मारुती माने, गंगाराम घोडके, अनिलकुमार गावडे, रमेश आगवणे, बसवराज कोरे भारत राऊत तसेच सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### जैन गुरुकुलात विद्यार्थ्यांनी तयार केली पक्ष्यांची घरटी

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे निपून भारत व शिक्षण सप्ताहांतर्गत पर्यावरण संवर्धन जनजागृतीसाठी पक्ष्यांची घरटी निर्मिती तंत्र विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. कार्यशाळेचे उद्घाटन मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे ज्येष्ठ शिक्षक रमाकांत शिवशरण यांची प्रमुख उपस्थिती होती.. प्रारंभी सहशिक्षक सुभाष नागरसे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेसाठी हरित सेना प्रमुख संजय भस्मे यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. यामध्ये ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून घरट्यांची निर्मिती केली. तद्नंतर विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण करण्याची शपथ घेतली. नववीची विद्यार्थिनी नक्षत्रा लोखंडे हिने सूत्रसंचालन तर अभय पिस्के याने आभार मानले.

### द्वारकादीश मंदिरात उद्या श्रावणी कार्यक्रम

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

विजापूर रोडवरील ब्रम्ह प्रतिष्ठानच्या वतीने श्री. द्वारकादीश मंदिरात शुक्रवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता श्रावणी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे पौरोहित्य सप्रे गुरूजी हे करणार आहेत. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुहास देशपांडे यांनी केले आहे.

# विधानसभा लढविण्याची घोषणा २९ ऑगस्टला

## आरक्षणाचा विचार न केल्यास... उमेदवार उभा करणार अथवा पाडणार!

### आंतरवलीत २९ तारखेला फैसला

### जरांगे-पाटील यांचा सर्वपक्षीय पुढाऱ्यांना थेट इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न करूनही मराठा सम ाजाला आरक्षण मिळत नाही उलट मराठा समाजात अन् मराठा क्रांती मोर्चात फूट पाडण्याचाच सरकार विचार करीत आहे. दरम्यान, सत्ताधारी अन् विरोधकांनीही मराठा आरक्षणाचा प्रश्न तत्काळ निकाली न काढल्यास येत्या २९ ऑगस्टला मराठा समाजाचे उमेदवार उभे करायचे की, लोकसभेच्या धर्तीवर सर्वपक्षीय पुढाऱ्यांना पाडायचे? याचा फैसला आंतरवली सराटी येथील भव्य अशा जाहीर सभेत करणार असल्याचा निर्वाळा मराठा आरक्षणाचे लढवय्या मनोज जरांगे पाटील यांनी आज (दि. ७) सोलापुरातील जाहीर सभेत दिला. दरम्यान, त्यांचा हा इशारा सर्वपक्षीय नेत्यांनाच होता.

सकाळी ९ ते १० चा कार्यक्रम असतानाही मनोज जरांगे पाटील यांना व्यासपीठावर यायला ३ वा. ४० मि. लागली. तरीही मराठा समाजबांधव आणि महिलावर्ग जरांगेंना ऐकण्यासाठी भर पावसात बसून होता. सकाळी जरांगे पाटील हे सोलापुरातील रूपा भवानी चौकात आल्यानंतर त्यांचे जेसीबीतून हार घालून आणि पुष्पवृष्टी करून जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर जरांगे पाटील यांनी स्थानिक देवदेवता आणि महामानवांना अभिवादन करून शांतता रॅली काढली. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य अशी जाहीर सभा त्यांनी घेतली. यावेळी प्रथमत: जरांगे पाटील यांनी छत्रपती शिवाजी म हाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला आणि अभिवादन केले. यानंतर सोलापूरच्या सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांचा जेसीबीद्वारे पुष्पहार घालून भव्य असा सत्कार करण्यात आला.

यावेळी आपल्या भाषणातून त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, वंचित आघाडीचे प्रकाश आंबेडकर, मनसेचे राष्ट्रीय अध्यक्ष राज ठाकरे, उच्च शिक्षणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह इतरही काही नेत्यांवर थेट आरोप करून टिकाही केली. यावेळी ते म्हणाले की, मराठा समाजासाठी वेळोवेळी ओबीसीतून आरक्षणाची मागणी करूनही हे सरकार दखल



घेत नाही, सर्वपक्षीय राजकारण्यांनी आरक्षणच द्यायचे नाही असे ठरविले आहे. यामुळे आता मराठा बांधवांनो राजकारण्यांनी ज्या पध्दतीने आरक्षण द्यायचे नाही असे ठरविले आहे...त्याच धर्तीवर आताही आपणही एकतर सत्ताधाऱ्यांचे सर्व उमेदवार पाडायचे किंवा समाजाच्या वतीने सर्वच विधानसभा मतदारसंघातून विविध जाती-धर्माचे उम ेदवार उभे करून या पुढाऱ्यांची जिरवायचे धोरण आखायला हवे. यासाठी येत्या २९ ऑगस्टला आंतरवली सराटी येथे एक जाहीर सभेचे आयोजन करू आणि आपण सर्वांच्या विचाराने काहीतरी निर्णय घेवू असे जाहीरपणे सांगितले. म्हणजेच त्यांनी विधानसभा निवडणुकीचे रणशिंगच फुंकले आहे. माझ्याजवळ मराठा समाजाची मोठी संपत्ती असल्याने मी कोणाला भीक घालत नाही; माझा स्वाभिमान मी कधीही गहाण ठेवणार नाही...अशी ग्वाही त्यांनी मराठा समाजबांधवांना दिली. आगामी निवडणुकीत २०-३० आमदार जरी आपले आले तर आरक्षणाच्या मुद्द्यावर चांगला जोर लावता येणार आहे, याम ुळे आपण उभा केलेल्या सर्वच उमेदवारांना १०० टक्के मतदान करून निवडून आणण्याचे आवाहन केले. इतकेच कायतर प्रत्येक मतदारसंघातून एकच उमेदवार द्यावा...अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून आणि एकापेक्षा अधिक उमेदवारांनी न लढता... सर्वांनी एकच उमेदवार निवडून आणावा, असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी मुस्लिम बांधवांचा मला पाठिंबा मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. माझ्याविरोधात अपप्रचार करण्यासाठी फडणवीस यांनी एक पुढाऱ्यांची टोळीच सक्रीय केल्याचाही त्यांनी थेट आरोप केला. आपला सम ाज एकतर एकत्र येत नाही आणि आता खूप दिवसांनी एकवटला असून, आता आरक्षण मिळेपर्यंत कोणीही माघार घेवू नये...तुम्ही माझ्या मागे या...मराठ्यांना ओबीसीतून १०० टक्के आरक्षण देण्यासाठी मी कटिबध्द असल्याचीही ग्वाही त्यांनी दिली. आपल्याला आरक्षण नाही दिल्यास मी सरकारचे पुढारी टप्प्यात आले की त्यांचा राईट कार्यक्रम करतो. यावेळी सकल मराठा समाजाच्या लाखोंनी उपस्थित जनसमुदायास अनुसरून बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, हे आमच्या समाजाचे आग्या (मोठे) मोहोळ आहे. या मोहोळास पुढाऱ्यांनो डवचू नका...हे मोहोळ उठून चावायला लागले तर तुम्हास पळती भुई थोडी होईल. उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही राज्यातील मुलींच्या मोफत शिक्षणाची घोषणा केली मात्र निघालेला जीआर चुकीच्या पध्दतीने असल्याने शाळा-कॉलेजात फी घेतली जात आहे आहे असे नमूद करून यामध्ये दुरूस्ती करण्याची अपेक्षा जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी वंचित आघाडीचे प्रकाश आंबेडकर, राज ठाकरे यांच्यावरही आपल्या स्टाईलमध्ये टिका केली. इतकेच नाहीतर प्रसंग पडला तर आगामी काळात मराठा आरक्षणासाठी पुन्हा मुंबईला आपण सर्वजन धडक मारू. असेही शेवटी जरांगे पाटील यांनी सांगितले.

### छगन भुजबळ प्रचाराला जातील तो उमेदवार पाडणार!

उपमुख्यमंत्री फडणवीस ज्या मतदारसंघात छगन भुजबळ यांना प्रचारासाठी घेवून जातील...त्या ठिकाणचा उमेदवार आपण पाडणार असल्याचे जरांगे पाटील यांनी जाहीरपणे सांगितले. तर जे लोक मराठा आरक्षणासाठी काम करतील त्यांना आपण डोक्यावर घेवून नाचू...असेही त्यांनी सांगितले. यासाठी आगामी निवडणुकांत मराठा समाजाच्या नागरिकांनी आता सावध भूमिका घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### लोक सत्तेसाठी पावसात भिजतात आपण समाजहितासाठी भिजू

राज्यातील अनेक पुढारी सत्ता आणण्यासाठी पावसात भिजत-भिजत भाषण करतात मात्र आपण सम ाजहितासाठी पावसात भिजायचे; असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले मात्र त्यांचा निशाणा राष्ट्रवादी नेते शरद पवार यांच्याकडे होता.

### मी मॅनेजही होत नाही अन् फुटतही नाही

मी मराठा समाजाचे अत्यंत तळमळीने काम करतो...उपोषण काळात अनेक राजकीय पुढाऱ्यांनी माझ्याकडे येवून नाना आमिषं दाखविली. मात्र त्यांच्या आश्वासनाला...भुलथापांना मी कधीच बळी पडलो नाही. मराठ्यांच्या लेकरासाठी आयुष्यभर मी लढा देणार असून, मी कधीच कोणत्याही पक्षास, पुढाऱ्यास मॅनेज होणार नाही अन् फुटणारही नाही. अशी ग्वाहीही शेवटी मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

## जरांगे-पाटील यांच्या रॅलीत पारंपारिक हलगी, झांज आणि तुतारीच्या निनादात घोषणा

### एसटी बसेसची एन्ट्री गेटसह, टपऱ्या केले बंद

### शहराच्या मुख्य प्रवेशद्वार जुना पुणे नाका पोलीसांचा तगडा बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र राज्यामध्ये दौरा सुरू करण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने मराठा आरक्षण म ागणीच्या पार्श्वभूमीवर जरांगे-पाटील यांची सोलापूर शहरातून पश्चिम महाराष्ट्र दौऱ्याला सुरुवात झाली आहे. छत्रपती संभाजी महाराज चौकापासून ते छत्रपती शिवाजी महाराज चौकपर्यंत मराठा बांधव सभेसाठी उपस्थित होते. सारे वातावरण यावेळी भगवेमय झालेले



दिसून आले. सकाळपासूनच सोलापूर शहर जिल्ह्यातील मराठा समाज बांधव बंधू आणि भगिनी याठिकाणी दाखल झालेले होते.

पारंपारिक हलगी आणि तुतारीचा निनाद सर्वत्र घुमू लागला होता. क्रेनवरती भलामोठा हार, डोक्यावर भगवी टोपी, गळ्यात भगवा गमछा, हातात छत्रपती शिवाजी महाराज आणि जरांगे यांचे कटआऊट घेऊन मुखी जय जिजाऊ जय शिवराय, एक मराठा लाख मराठा घोषणा देत रॅली आणि सभेत मराठा आरक्षण मिळविण्यासाठी समाज बांधव एकत्रित आले होते. पोलीस प्रशास नाकडून सभेकडे येणारे सर्व रस्ते वाहतूकीसाठी बंद ठेवण्यात आले होते. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शहराचे मुख्यप्रवेशद्वार जुना पुणे नाका येथे पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरात येणारे वाहन अडवून वाहने पार्किंग करण्याच्या सूचना पोलिसांकडून दिल्या जात होत्या. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आला होता.

**सभेच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क**

जरांगे पाटील यांची रॅली आणि भव्य सभा संपन्न झाली. या सभेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सतर्कता बाळगून एसटी महामंडळाच्या बसेसना शहरातून दिली जाणारी एन्ट्री बंद करून सम्राट चौक येथून एन्ट्री आणि आऊट एकाच ठिकाणाहून करण्यात आली होती. बस स्थानक परिसरात असणारे सर्व कॅन्टीन टपऱ्या बंद ठेवण्यात आल्याचे दिसून आले. सोलापूर जिल्ह्यातील जे मराठा बांधव सभेसाठी उशिरा आले होते.



### डोक्यावर सामान घेऊन प्रवाशांनी एसटी स्टँड गाठले

एसटी बसेस बसस्थानक पर्यंत जात असल्याने अनेक महिला प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागले. काही एसटी बसेस पुना नाका ब्रिजवरच थांबवल्या गेल्या. तर काही एसटी बसेस सम्राट चौक या ठिकाणी थांबवल्या गेल्या त्यामुळे प्रवाशांना शहरात जाण्यासाठी पायपीट करावी लागली. यावेळी एसटी प्रशासनाने प्रवाशांना बस स्थानकमध्ये येण्या आणि जाण्यासाठी मागील प्रवेशद्वाराचे अवलंब करण्याचा सूचना देण्यात आल्या. त्यामुळे प्रवाशांना डोक्यावर सामान घेऊन एसटी स्टँड गाठावे लागले.

### वकिलांचाही सहभाग व जोरदार समर्थन

या रॅलीमध्ये सोलापूर वकील संघातील जेष्ठ व मान्यवर वकीलांनी देखील सहभाग नोंदविला. ही मराठा आरक्षणा साठीची निर्णायक व संविधानिक लढाई आहे. मराठा समाज मागास असल्याचे वेगवेगळ्या आयोगाने दिलेल्या अहवालावरून सिध्द झाले आहे.शासनकर्ते याला राजकीय स्वरूप देऊन हा लढा मोडण्याचा प्रयत्न करीत आहे. यामुद्यावरून बांगलादेशा सारखी स्थिती निर्माण होण्याची भिंती निर्माण झाली आहे.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून निर्णय घ्यावेत अशी मागणी देखील वकिलानी केली.या लढ्याला आपला पाठिंबा असल्याचे ॲड .सुरेश- बापू गायकवाड ज्येष्ठ वकील इंद्रजीत पाटील ॲड .दादासाहेब जाधव ॲड .विक्रम काटोळे ॲड .लक्ष्मण भोसले ॲड प्रज्योत मुटकुळे ॲड बाबूंशा साळुंखे, ॲड.समाधान दळवे,ॲड अजीत.पाटीलॲड . प्रशांत देशमुख/ॲड.प्रविण निकम ,बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष दत्तामामा मुळे आदीनी उपस्थिती दर्शवून सांगितले.




### मराठा बांधवांना पाणी बॉटल आणि फूड पॅकेटचे नियोजन

सभेला येणाऱ्या प्रत्येक मराठा समाज बांधवाला आयोजक मराठा क्रांती मोर्चा आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने फूड पॅकेट आणि पाणी बॉटलचे नियोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक त्यांवर विविध ठिकाणी फूड पॅकेटचे स्टॉल थाटण्यात आले होते. शहरातून जाणाऱ्या प्रत्येक मराठा समाज बांधवांना फूड पॅकेट आणि पाणी बॉटल देण्यात आले.

## जरांगे-पाटलांनी घेतले तामलवाडीच्या श्री विष्णू-महादेवाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

सोलापूरला शांतता रॅलीसाठी निघालेल्या मराठा आरक्षणाचे लढवय्या मनोज जरांगे पाटील यांचे तुळजापर तालुक्यातील ताम लवाडी येथील ग्रामस्थांनी सकल मराठा समाजाच्या वतीने पुष्पहार घालून जंगी स्वागत केले आणि महिलांनी औक्षण केले. तर यावेळी ग्रामस्थांनी येथील श्री विष्णू-महादेवाच्या हेमाडपंथी मंदिरात दर्शनाचा आग्रह केल्यानंतर जरांगे पाटील यांनी कसलीही अडचण न सांगता आपली गाडी थेट मंदिराकडे वळवून श्रींचे दर्शन घेतले. यावेळी जरांगे पाटील यांचा मंदिर पुजारी केशव गुरव यांनी सत्कार केला. तर पुजाऱ्यांनी येथील हेमाडपंथी बांधकाम असलेल्या श्री विष्णू महादेव मंदिराचे महत्वही त्यांना पटवून दिले. यावेळी राज्यातील मराठा समाजाच्या लेकरांच्या शिक्षणासाठी आणि भविष्यासाठी आरक्षणाचा विषय लवकर मार्गी लागावा, असेही साकडे यावेळी जरांगे पाटील यांनी श्री विष्णू-म हादेवाला घातल्याचे सांगितले. यानंतर जरांगे पाटील हे सोलापूरच्या सभेसाठी मार्गस्थ झाले.



प्रधान चॅरीटेबल ट्रस्टचा उपक्रम
सवलतीच्या दरात चष्म्याचा नंबर घालवण्याची सुवर्णसंधी
(18 ते 40 वर्षे वयोगटातील व्यक्तींसाठी)
मोफत लॅसिक लेसर तपासणी शिबीर
15 ऑगस्ट 2024 ; स. 9.00 ते सायं. 6.00
आमच्या येथे लॅसिक लेसरचे नवीन तंत्रज्ञान व सॉफ्टवेअर अपडेट झालेले आहे. या तंत्रज्ञानामुळे ट्रीटमेंटची अचूकता व सुरक्षितता आता अधिकच परिपूर्ण
शिबिरात निवड झालेल्या व्यक्तींना लॅसिकपूर्व तपासणी (टोपोग्राफी) व लॅसिक उपचारावर 20%* सवलत
नेत्रतज्ञ • डॉ. उमा राजीव प्रधान • डॉ. विराज राजीव प्रधान • डॉ. स्वाती विराज प्रधान
*अटी लागू
Jhaveri
प्रधान नेत्र रुग्णालय व लॅसिक लेसर सेंटर
नांव नोंदणीसाठी संपर्क - फोन : 0217-2552908, मो. 9881004304, 7058659342
जुळे सोलापूर शाखा (दु. ४ ते ७), प्रेरणा कॉम्प्लेक्स, डी-मार्ट व के.एल.ई शाळेच्या पाठीमागे, नृसिंह नगर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८५४

**काय सांगो तुझ्या चरणांच्या सुखा ।
अनुभवा ठाऊका नाहीं तुज ।।**

जगाच्या पाठीवर अशी अनेक मोठी माणसं आहेत, की जी खरोखच खूप मोठी आहेत. पण त्यांचा मोठेपणा त्यांनाच माहिती नसतो. कारण आपण मोठे आहोत ही कल्पनाच त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाही. म्हणूनच ही माणसं खऱ्या अर्थाने मोठी आहेत. पंढरीचा पांडूरंग जगाच्या कल्याणासाठी उभा असला तरी संत, महात्म्यांच्या सेवेत जायला विसरत नाही. कर्तव्य हाच त्याचा आधारस्तंभ आहे. कर्तव्य, समत्व, बंधुत्व, निस्वार्थ प्रेम जोपासण्याच्या हेतुने उभ्या असलेल्या या पांडूरंगाला स्वत:ची महती माहिती नाही. सर्व संत महात्म्यांना खांद्यावर, कमरेवर, डोक्यावर, हृदयात घेणाऱ्या या पांडूरंगाचे समत्व, बंधुत्व, प्रेमाचे पूर्ण ओझे पेलणाऱ्या त्याच्या पायाची महती त्यालाच माहिती नाही. त्याचे पाय मागे-पुढे नाहीत किंवा चढ उतारावर नाहीत. तर त्याचे पाय पूर्णत: सम पातळीवर एकमेकांना पूरक असे किंवा जोडल्यासारखे आहेत. सर्व चांगल्या गोष्टीची जोड करणाऱ्या, समत्व जोपासणाऱ्या या पायाची महती त्याला माहिती नसली तरी आम्हा भक्तांना माहिती आहे. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, काय सांगो तुझ्या चरणांच्या सुखा । अनुभव ठाऊका नाहीं तुज ।।



भारताच्या काना कोपऱ्यातून येणारे लाखों भाविक संसाराच्या विचाराचे डोक्यातील ओझे पांडूरंगाच्या पायावर टाकतात. प्रत्येकजण आपले वैचारिक ओझे पांडूरंगाच्या चरणावर डोक्यासह ठेवतो. त्याच्या चरणांवर डोके ठेवले म्हणजे भक्ताला बरे वाटते. कारण ओझे त्या चरणांवर पडते व डोके हलके वाटू लागते. करोडो भक्तांच्या डोक्यावरील विचाराचे ओझे आपल्या पायावर घेऊनही तो पांडूरंग चरणाचे समत्व ढळू देत नाही. अंगा खांद्यावरील जीवांना, भक्तांना त्याची झळ पोहचू देत नाही. अशा पांडूरंगाच्या पायाचा अनुभव, पायाचे सुख आम्ही अनुभवतो असे तुकाराम महाराजांनी हृदयपूर्वक म्हटले आहे. या नाशवंत देहात काम, क्रोध, ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, माया, मोह आदीची जोपासणूक करीत व्यावहारिक दृष्टीकोनातून कीर्तन, प्रवचन करणारी व स्वत:ला देव म्हणून घेणारी कांही ढोंगी मंडळी शेकडो लोकांकडून स्वत:च्या पायावर डोके ठेवून घेते. यांचे स्वत:चे चुकीच्या वर्तनाचे ओझे पेलण्याची ताकद नसणाऱ्या त्यांच्या पायात इतरांच्या डोक्यातील वैचारिक ओझे पेलण्याची ताकद राहिलच कशी? पण सर्रासपणे हा प्रकार चालल्याचे आपण आपल्या डोळ्यांनी पाहतो. चांगल्या व खऱ्या साधुसंतांची, कीर्तन-प्रवचनकारांची संख्या समाजात कमी आहे. चांगल्यांना बदनाम करणाऱ्यांची संख्या मात्र दिवसें दिवस वाढत आहे. साधु-संत हे समाजाचा आधारस्तंभ आहेत. या आधारस्तंभाला धक्का देण्याचा प्रयत्न करण्या-या ढोंग्यांना वेळीच चोप देण्याची गरज आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**
**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार**
**दि. ८ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**शु. चतुर्थी (२४.३६)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- उ.फाल्गुनी (२३.३३)**
**योग - शिव (१२.३७)**
**करण - वणिज (११.१९)**
**दिनविशेष - नागचतुर्थी**

**उपवास, चांगला दिवस**
**सोलापूर दै.तरुण भारत वर्धापन**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल.

**वृषभ :** दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील. आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल.

**मिथुन :** खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह :** वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे. कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल.

**कन्या :** मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल.मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** प्रवास सावधानीने करावा. चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** व्यापारिक कामे यशस्वी होतील. सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** आळस करू नका. शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** निष्कारण वाद विवाद टाळा.सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर.

**मीन :** कामाची गती अशीच राहू द्या. आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# दिव्यांगांसाठी सय्यद सायकल डिझायनरने मिळवला पेटंट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**



पुण्याच्या रोटरी क्लबने सोलापुरातील सायकल डिझाइनर फारुख सय्यद यांच्याकडून दोन्ही पायाने अधू असलेल्या दिव्यांगासाठी सायकल वरील चालते दुकान तयार करून घेतले आहे. त्याचा उपयोग करून कोणतीही दिव्यांग व्यक्ती सहजपणे या वाहनाच्या मदतीने व्यवसाय करू शकतो. या मॉडेलचा उपयोग पुढील काळात कोणतीही दुसरी कंपनी वापरू नये, यासाठी त्यांनी या मॉडेलचे पेटंट बुक केले आहे. गुरुनानक चौक येथील फारुख सय्यद असे पेटंट बुक केलेल्या सायकल डिझायनर आणि रिपेअर करणाऱ्या चालकाचे नाव आहे. पुण्याच्या रोटरी क्लबने दिव्यांगाना सायकलवर बसून त्यांचा व्यवसाय करता यावा, यासाठी सायकल चालवणाऱ्या दुकानाचे मॉडेल उपलब्ध करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी सोलापुरात सायकल डिझायनिंग व मॉडिफिकेशनचे काम करणारे फारुख सय्यद यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा फारूक सय्यद यांनी त्यावर काम करण्यास सुरुवात केली. दिव्यांग नागरिकांसाठी अनेक कंपन्यानी हाताने पायडल मारणाऱ्या सायकली बनवल्या आहेत. परंतु लकवा किंवा पॅरॅलीसमुळे ज्यांचे एक हात आणि एक पाय लुळे पडले आहेत, त्यांचे काय असा सवाल फारूक सय्यद यांना पडला होता. त्यासाठी त्यांनी भंगारातील जुनी सायकल घेत, त्याला आधुनिक रूप दिले. तसेच सीटवर बसून एक हात आणि एक पाय याद्वारे चालवता येणारी सायकल तयार केली आहे. एक सायकल बनविण्यास २५ हजार रुपये खर्च येतो. मात्र, पुणे येथील रोटरी क्लबच्या माध्यमातून ही सायकल अपंगांना देण्यात येते. तर पेटंट नोंदणी करण्यासाठी फारूक सय्यद यांना १२ ते १५ हजार रुपयांचा खर्च आला आहे. अनेक सायकल कंपन्यांना जे जमलं नाही ते सोलापुरातील सायकल मेकॅनिक फारूक सय्यद यांनी करून दाखवलं आहे.



### राष्ट्रीय सणांच्या दिवशी मोफत सायकल दुरुस्ती

फारुख सय्यद हे गेल्या ३२ वर्षापासून सोलापूर शहरात एक प्रसिध्द सायकल कारागिर हणून कार्य करीत आहेत. दरवर्षी १५ ऑगस्ट असो किंवा २६ जानेवारी या राष्ट्रीय सणा दिवशी सर्वांना मोफत सायकल दुरुस्ती सेवा पुरवित असतात देशसेवेप्रती आपली ही असलेली श्रद्धा अनेकांना प्रेरणा देणारी आहे. कोरोना सारख्या महाभयंकर विषाणू संक्रमणाच्या काळात देखील ते मागे हटले नाहीत. लोकांना मोफत सायकल दुरुस्ती सेवा पुरवित असतानाच त्यांनी आपल्या यांत्रिक कौशल्याचा वापर करुन सायकलींच्या सुट्या भागापासून सॅनिटायझर ब्रेक स्प्रे ची निर्मिती केली आहे.

# गुणवंत शिक्षक, उपक्रमशील शाळा पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

मनपा प्राथमिक शिक्षण विभाग सोलापूर अंतर्गत सर्व मनपा/खासगी प्राथमिक शाळेतील पात्र शिक्षकांचे गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी तसेच शाळेचे उपक्रमशील शाळा पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन महापालिका उपायुक्त तैमुर मुलाणी यांनी केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार शिक्षक दिन साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या समवेत शिक्षक संघटना प्रतिनिधीनी बैठक घेण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त गिरीश पंडीत, पर्यवेक्षक भगवान मुंढे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे दत्तात्रय चौगुले, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक महासंघाचे कल्लप्पा फुलारी, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मागासवर्गीय शिक्षक संघाचे नागेश गोसावी, अमोल भोसले, मनपा शिक्षक संघाचे फैय्याज शेख, महाराष्ट्र राज्य मान्य खासगी प्राथमिक शिक्षक महासंघाचे विश्वजीत माणिकशेट्टी, राज्यशिक्षक सेनेचे मुरलीधर कडलासकर, शिक्षक सेनेचे भारत गुणापुरे, विश्वजीत माणिकशेट्टी, युवक शिक्षक कर्मचारी संघाचे सोमेश्वर याबाजी, शिक्षक भारती संघटनेचे विजयकुमार गुंड, देवदत्त मेटकरी, प्राथमिक उर्दू टिचर्स फेड्रेशनचे फजलअहमद शेख आदी शिक्षक संघटना प्रतिनिधी उपस्थित होते. शिक्षकांनी मुख्याध्यापकांच्या स्वयंस्पष्ट शिफारस फोटो व आवश्यक कागदपत्रासह विहित कालावधीत संबंधित शाळेतील पर्यवेक्षक यांच्याकडे सादर करावेत. यावर्षी नऊ गुणवंत शिक्षक पुरस्कार व दोन उपक्रमशील शाळा पुरस्कार देण्यात येणार आहेत, असे मुलाणी यांनी सांगितले.



# सुरेख लोखंडे यांना संरक्षा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

मध्य रेल्वेच्या १७ कर्मचाऱ्यांना ऑगस्ट महिन्यासाठी महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार मिळाला. यामध्ये सोलापूरच्या सुरेश लोखंडे यांचा समावेश आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करन यादव यांच्या हस्ते मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे कार्यक्रमात मुंबई विभागातील ९, भुसावळ विभागातील ४, नागपूर विभागातील २ आणि पुणे व सोलापूर विभागातील प्रत्येकी १ अशा १७ कर्मचाऱ्यांना मध्य रेल्वे संरक्षा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. या पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तिपत्रक आणि रोख २ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रभात रंजन, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी एम एस उप्पल, प्रधान मुख्य अभियंता रजनीश माथूर, प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक एस एस गुप्ता, प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता सुनील कुमार, मुख्य सिग्नल दूरसंचार अभियंता धरमवीर मीना, प्रधान मुख्य सुरक्षा आयुक्त एस एन चौधरी, आणि प्रधान मुख्य विद्युत अभियंता एन पी सिंग आणि मध्य रेल्वेचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# आईच्या दुधात सर्व प्रकारची पोषकसत्वे

## डॉ. समन तांबोळी; स्तनपान जनजागृती सप्ताहामध्ये केले प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

आईच्या दुधात पोषक सत्वे असतात त्यामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ती चांगली होते. बाळ सुदृढ व निरोगी होते. नियमित स्तनपान केल्याने बाळाचे व आईचे आरोग्य चांगले राहते, असे प्रतिपादन सोलापूरच्या प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ डॉ. समन तांबोळी यांनी केले.

त्या सोलापूर टॉवेल सिटी राऊंड टेबल १५० व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह निमित्त आयोजित गरोदर व स्तनदा मातांना प्रोटीन पावडर डब्याचे वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.



यावेळी व्यासपीठावर देगावकर हॉस्पिटलच्या स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ डॉ. सुनीता देगावकर, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाचे सेवानिवृत्त स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ डॉ. ज्ञानेश्वर सोडल, सोलापूर टॉवेल सिटी राऊंड टेबल १५० चे सचिव ओंकार पतकी, खजिनदार श्रीराज राठी, यश शहा, भव्य शहा, रोहन शालगर, युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. ओंकार पतकी यांनी सोलापूर टॉवेल सिटी राऊंड टेबल १५० च्या वतीने लोकोपयोगी होत असलेल्या कार्याची माहिती दिली तर शेवटी अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केला.कार्यक्रमात उपस्थित ५० गरोदर महिलांना व स्तनदा मातांना प्रोटीन पावडरच्या डब्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. कविता चंडक यांनी केले. प्रास्ताविक शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार रोहन शालगार यांनी मानले.

# १० ऑगस्ट रोजी शायरी मैफलचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

नवोदित शायरांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने सोलापुरातील शायरांची मैफल या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ऊर्दु घर सांस्कृतिक समितीचे उपाध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी दिली. ही मैफिल शनिवार, दि.१० ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७.३० वाजता ऊर्दु घर सोलापूर ( छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय समोर) होत आहे. या मुशायरामध्ये सोलापूर तसेच सोलापुरातील जेष्ठ शायरांचा व नवोदित कवींचा सहभाग असणार आहे. या मैलिलीच्या अध्यक्षस्थानी अब्दुल रशीद अरशद व निवेदक आसिफ इकबाल असणार आहेत.



# काडादी शाळेच्या १९७४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

केएल ई सोसायटी संचालित काडादी प्रशालेच्या एस.एस.सी.(जुनी अकरावी) १९७४ बॅचला २०२४ मध्ये ५० वर्षे पूर्ण झाली. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत काडादी प्रशालेच्या प्रांगणात स्नेहमेळावा आयोजित केला होता. सुमारे नव्वद माजी विद्यार्थी विद्यार्थीनी आपल्या जोडीदारासह मेळाव्यास उपस्थित होते.

मेळाव्याचे उदघाटन के. एल. ई. संस्था, बेळगावीचे चेअरमन डॉ. प्रभाकर कोरे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी शाळेतील १२५० विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तसेच सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित माजी विद्यार्थ्यांनी साडेचार लाख रुपये निधी संकलित करून उभारलेल्या अत्याधुनिक गणित प्रयोगशाळा कोनशिलेचे अनावरण व हस्तांतरण डॉ. कोरे यांनी केले. यावेळी 'सुवर्ण-स्मृती' या स्मरणिकेचे प्रकाशनही डॉ. कोरे यांच्या हस्ते झाले. आभार बंडू अनाळकर यांनी सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमास के.एल.ई.संस्थेचे संचालक मंडळ, पदाधिकारी, तसेच काडादी प्रशालेच्या नियामक मंडळाचे सदस्य, मुख्याध्यापक, सहशिक्षक आदिंचीही उपस्थिती होती. याप्रसंगी ८७ वर्षीय माजी शिक्षिका श्रीमती एखंडे यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्यासाठी सोलापूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर, कलबुर्गी अशा विविध ठिकाणांहून विद्यार्थी उपस्थित होते. तसेच गणित प्रयोगशाळेसाठी आर्थिक योगदान देणाऱ्यांना ग्रंथ व आभार-पत्र देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मेळावा यशस्वी करण्यासाठी चंद्रशेखर इंडी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वश्री उपेंद्र ठाकर, शरद ढोकळे, विजयसिंग रजपूत, परशुराम मढेकर, सिद्धेश्वर पाटील, बंडुकांत अनाळकर, हितेंद्र देढिया, वेणुगोपाल शेट्टी, सुनील शेटे, नंदकिशोर तिवाडी, शैलेंद्र पटेल, चन्नबसवेश्वर सोलापुरे, शिरीष गांधी, मधुकर राजगुरु, ओंकार खानापुरे, राजेंद्र मार्डीकर, गौरीशंकर उटगे तसेच पुष्पा आळंगे, स्नेहलता कर्जाळ, संजीवनी साबळे विशेष परिश्रम घेतले.

# बुद्धिबळ स्पर्धेचे शनिवारी आयोजन

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

राज मेमोरियल इंग्लिश स्कूल व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त १९, १३ व ८ वर्षाखालील गटाच्या जिल्हास्तरीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन शनिवार दि.१० ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता सुशील रसिक सभागृह, सूर्या हॉटेल जवळ, मुरारजी पेठ, सोलापूर येथे करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धा फिडेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ७ फेऱ्यात संपन्न होणार असून खेळाडूंना प्रत्येकी १० मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी उदय वगरे ८८८८०४५३४४ व प्रशांत पिसे ८६२६०३७७३९ यांच्याकडे संपर्क साधावा.

# मानवी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शिक्षण महत्वाचे

## उल्हास पवार; माईर्स एमआयटी संस्था समूहाचा स्थापना दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ७ ऑगस्ट -**

सृष्टीवर वाढत जाणाऱ्या मानवी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शिक्षण म्हणजे शहाणपण आणणे गरजेचे आहे. संकटात सापडलेल्यांना वाळवंटात पाण्याचा झरा जसा हवा असतो तसे सामाजिक व्यवस्थेसाठी शिक्षण महत्वाचे आहे, असे विचार उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

देशातील शिक्षण क्षेत्रात माइल स्टोन ठरलेली माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचा ४२वा स्थापना दिवस कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयू मधील संत ज्ञानेश्वर सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, ज्येष्ठ संपादक बाळासाहेब बडवे, डॉ. विनायक घैसास, डॉ. संजय उपाध्ये, अधिष्ठाता प्रा. शरदचंद्र दराडे पाटील व एम आयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस उपस्थित होते. प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, संस्थेत जगभरातील विद्यार्थ्यांनी दाखला घ्यावा अस संकल्प घेऊन त्या दिशेने सर्वांनी कार्य करावे. शिक्षकांच्या निरलस कार्यामुळे ५ खोल्यांतून सुरू केलेल्या संस्थेचा आज मोठा वटवृक्ष झाला आहे. संस्थेची ५ विद्यापीठे आणि विश्वशांतीचा नारा देणारा जगातील सर्वात मोठ्या घुमटाची निर्मिती झाली. बाळासाहेब बडवे, डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. संजय उपाध्ये, डॉ. विनायक घैसास यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांनी संदेशातून आपल्या शुभेच्छा दिल्यात. एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.अतुल कुलकर्णी व प्रा. शालिनी टोणपे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर.एम.चिटणीस यांनी आभार मानले.



### ११ कर्मचाऱ्यांचा सन्मान

माईर्स एमआयटीच्या ४२ व्या स्थापनादिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वाटचालीत महत्वाचे योगदान देणाऱ्या ११ कर्मचाऱ्यांचा व संस्थेत १४ वर्षे अविरत सेवा देणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये दिलीप पाटील, गणेश कराड पाटील व राजू उगलमुगले यांचा विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच विश्वंभर गदले, पद्माकर फड , विशाखा कुलकर्णी, हेमंत शिंदे, राहुल जोशी , गौरव मगर , अनिरुद्ध भातलवंडे , दत्तात्रय स्वामी , भालचंद्र लवाटे, सुनीता भोसले , कल्याण साखरे यांचा सन्मान करण्यात आला.



# भावसार व्हिजन क्लबच्या वतीने विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

भावसार व्हिजन सोलापूर क्लबच्या वतीने समाजातील २५ विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी हैद्राबादहून नॅशनल सेक्रेटरी मनीष सुत्रावे व पुण्याहून एरिया गव्हर्नर सविता अभंगे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर क्लबचे अध्यक्ष प्रणिता महिंद्रकर, सचिव विशाल खमितकर, नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे, माजी गव्हर्नर गिरीश पुकाळे व फाउंडेशन डायरेक्टर आशिष जवळकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गायत्री महामंत्राने करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रमाची प्रस्तावना व मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष प्रणिता महिंद्रकर यांनी केले. त्यानंतर उपस्थित २५ भावसार विद्यार्थिनींना प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रत्येकी ६ हजार रुपयांच्या शिष्यवृत्तीच्या धनादेशचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन माजी अध्यक्ष संतोष पुकाळे यांनी केले, तर सचिव विशाल खमितकर यांनी आभार मानले. यावेळी भावसार समाजातील व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### पंढरपूर येथील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सात विद्यार्थ्यांची 'वर्ली'त निवड

**पंढरपूर, दि. ७ ऑगस्ट-**

कोर्टी (ता.पंढरपूर) येथील एस.के.एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात शेवटच्या



वर्षात शिक्षण घेत असतानाच ७ विद्या0थ्यांची वर्ली प्राइवेट लिमिटेड कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. एस.के.एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पंढरपूर मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात शिक्षण घेत असतानाच पंढरपूर येथील कुमारी आर्या अमर आराध्ये, सुमेधा त्रिविक्रम गोहाड, निकिता यशवंत कुलकर्णी, निकिता विठ्ठल देठे, अढेगाव (ता. माढा) दिपाली हरिदास निकम, निमगाव (ता. इंदापूर) नेहा अभिजित काळे, तुळसी (ता. माढा) येथील सिद्धेश्वर दत्तात्रय मोरे आदी ७ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली असून कंपनीकडून वार्षिक ५.१५ लाख पगार मिळणार आहे. वर्ली प्राइवेट लिमिटेड या कंपनीचे मुख्यालय ऑस्ट्रेलिया मध्ये असुन भारत देशातील प्रमुख कार्यालय मुंबई येथे आहे. हि कंपनी बांधकाम, फॅब्रिकेशन, प्रकल्प वितरण, तंत्रज्ञान उपक्रम, डिजिटल धोरण, कन्सल्टींग, खरेदी आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन, डेटा वापर आदी क्षेत्रात सेवा प्रदान करत आहे. या कंपनीचे कार्य ४५ देशांमध्ये आहे. अशा कंपनीत पंढरपूर सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमधील ७ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाल्याने त्यांना इतर देशांमध्ये काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे. वर्ली प्राइवेट लिमिटेड कंपनीत ७ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उप-प्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. दिपक गानमोटे, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, प्रा. अभिजित सवासे, प्रा. अतुल कुलकर्णी आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### सुळेवाडीतील अमोल सुळे पोलीस झाल्याने कुसमोड ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**पिलीव, दि. ७ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील अमोल बाळू सुळे याने अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असताना पोलीस भरती परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन करीत रत्नागिरी जिल्ह्यात पोलीसपदाला गवसणी घातली. सुळेवाडीसारख्या कायमस्वरूपी दुष्काळी गावातील अमोल हयाला त्याच्या आई-वडिलांनी दुसऱ्या शेतावर शेतमजुरी करुन आर्थिक मदत केली. याची जाणीव ठेवत अमोल याने पोलीसपदाला गवसणी घातली. याबददल अमोल सुळे यांचा नुकताच कुसमोड येथे सत्कार करण्यात आला. यावेळी कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील, आबा मदने, अशोक शिंगाडे, सुभाष मदने, दत्तू गारुळे, सूर्यकांत वाघमोडे, नाथा मदने, सतिश गोंजारी, कुमार राऊत, विनायक मदने, शंकर मदने, प्रगतशील बागायतदार विजय मदने, चेअरमन बंटी काळे, अंकुश मदने, सुरेश मदने, सुखदेव मदने, संतोष मदने, सागर गोंजारी, सुरेश मदने, दादा मदने, यल्लप्पा पवार, नितीन मदने-इंदलकर, वैभव मदने, जयराम मदने यांच्यासह उपस्थित होते.



### स्वयंम् फाउंडेशनतर्फे शांतता रॅलीत सहभागी झालेल्यांना झुणका भाकरीचे वाटप

**मंद्रुप, दि. ७ ऑगस्ट-**

मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलन अंतर्गत शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात बुधवार ७ ऑगस्ट रोजी सोलापुरातून झाली. या शांतता रॅलीसाठी उपस्थित मराठा बांधवांना कुणीही उपाशी राहू नये, यासाठी स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व दक्षिण सोलापूर विधानसभेचे इच्छुक उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी रॅलीसाठी येणाऱ्या मराठा समाज बांधवांसाठी झुणका भाकरीचे वाटप स्वयंसेवकाच्या माध्यमातून केल्याने वैद्य यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. महात्मा बसवेश्वर महाराजांनी सांगितलेल्या विचारातून समता, बंधूता जोपासण्याचे काम सोमनाथ वैद्य करीत आहेत. जनसेवा हीच ईश्वरसेवा असे म्हणत मराठा बांधवांनी सोमनाथ वैद्य यांना दिल्या शुभेच्छाही दिल्या. यापूर्वी सोमनाथ वैद्य अनेक सामाजिक उपक्रमातून थेट जनतेसमोर जाऊन मदत करीत आहेत.

### सुनिता शिंदे सेट परिक्षेत उत्तीर्ण



**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**

कै. वत्सलादेवी देसाई विद्यालय व कै.आण्णासाहेब घुले सरकार ज्यु. कॉलेज,जवळे येथील ग्रंथपाल सुनिता शिंदे या एप्रिल २०२४ रोजी पुणे विद्यापीठातून घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत उत्तीर्ण झाल्या. विद्यालयातील ग्रंथपाल या पदावर त्यांनी २२ वर्षे ग्रंथपालाचे काम अतिशय उत्कृष्ठपणे पार पाडले. सुनिता शिंदे यांना संस्थेचे अध्यक्ष माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील, प्राचार्य बाळासाहेब शिंदे, सचिव सुभाष लऊळकर यांच्यासह शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# केवायसीविना हजारो खाती पडताहेत बंद

## पिलीव येथील बँक ऑफ इंडियातील प्रकार

## ताबडतोब केवायसी करुन खाते सुरु करण्याची ग्राहकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ ऑगस्ट-**

पिलीव व आसपासच्या दहा-पंधरा खेडापाड्यातील गावांसाठी ही एकमेव राष्ट्रीयकृत बँक आहे. याठिकाणी खातेदारांची संख्या प्रचंड मोठी आहे. गेल्या काही दिवसांपासून या ठिकाणी असणाऱ्या खातेदारांची केवायसी विना खाती बंद पडत आहेत. यामुळे खातेदार ग्राहकांची प्रचंड तारांबळ उडाली आहे. सतत व्यवहार असणाऱ्या खातेदारांना काही अडचण येत नाही. पण गरजेनुसार व्यवहार करणाऱ्या खातेदारांना बँकेत व्यवहार करणयास गेल्यांनतर खाते बंद पडल्यामुळे प्रचंड अडचणी येत आहेत. यामुळे पैसे असुनही पैसै लवकर मिळत नाहीत.

बँकेचे व्यवहार थांबल्याने विविध प्रकारच्या लोनचे हप्ते तटत आहेत. तसेच चेक बाउन्स होणे यामुळे नागरिकांना प्रचंड अडचणीचा सामना करावा लागत



आहे. या बँकेत कर्मचारी संख्या कमी असल्याने जे कर्मचारी आहेत, त्यांच्यावर प्रचंड मोठा ताण आहे. यामुळे वेळेत काम होत नाही. यामुळे इतर बँकेत एका दिवसात जशी केवायसी होते तशी याठिकाणी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. तसेच अनेक वयस्कर पुरुष, महिला तसेच आजारी माणसांची खाते बंद आहेत. यासाठी बँक कर्मचारी व्यक्तीसमोरच पाहिजे अशी अट घालतात. पण एकाच कुटुंबातील पती, पत्नी, आई, वडील किंवा मुलगा, मुलगी यांची सर्व कागदपत्रे असल्यानंतर बँक प्रशासनाने केवायसीबाबत अडवणूक करु नये अशी मागणी खातेदारांमधून होत आहे. याठिकाणी कागदपत्रे दिल्यानंतर केवायसीसाठी किंवा नवीन खाते उघडण्यासाठी अनेक दिवस लागतात. यामुळे केवायसी कमीत कमी ७२ तासांत तरी व्हावी. जेणेकरून खातेदारांची अडचण होणार नाही, याकडे बँक प्रशासनाने लक्ष देणयाची आवश्यकता आहे. केवायसी करणयासाठी बँकेत एक स्वतंत्र कर्मचारी व टेबल ठेवावा जेणेकरून ग्राहकांची तारांबळ होणार नाही.

**दुसऱ्या राष्ट्रीयकृत बँकेची शाखा सुरु करण्याची मागणी**

पिलीव येथे दुसऱ्या राष्ट्रीयकृत बँकेची शाखा झाल्याशिवाय ग्राहकांना चांगली सेवा मिळणार नाही. लोकप्रतिनिधीनीकडे लक्ष देऊन याठिकाणी राष्ट्रीयकृत बँकेची नवीन शाखा सुरू करण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी होत आहे.

सध्या कर्मचारी संख्या कमी आहे. तसेच केवायसीविना अनेक खातेदारांची खाती बंद पडत आहेत. यासाठी आम्ही स्वतंत्र यंत्रणा सुरु करुन ताबडतोब बंद पडलेली खाती सुरु करु. राहिलेल्या खातेदारांनीसुद्धा ताबडतोब केवायसी करुन घ्यावी. जेणेकरून खाते बंद पडण्याची समस्या येणार नाही.

**-दीपक खटके,**
**शाखाधिकारी, बँक ऑफ इंडिया, पिलीव शाखा**



# मुंबई येथील भक्ताकडून विठ्ठल मंदिर समितीला भेटवस्तू अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ ऑगस्ट-**

मुंबई येथील डॉ. शुभम राजाराम माने या विठ्ठल भक्ताने मंदिर समितीस १ लाख ३१ हजार किमतीची अल्युमिनियम भांडी भेट दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

डॉ. माने हे नेहमी दर्शनासाठी येत असतात. त्यांनी लाडू प्रसाद विभागाचे सहायक विभाग प्रमुख विशाल देवकते यांच्याकडे बुंदी लाडू प्रसाद तयार करण्यासाठी उपयोगी असणाऱ्या वस्तू भेट स्वरूपात देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी मंगळवारी (ता.६) ६४,६२ व ४८ नंबरची प्रत्येकी ५ प्रमाणे एकूण १५ पातेले झाकणासह उपलब्ध करून दिली आहेत. त्याचे एकूण वजन ३७० किलो होत आहे. मंदिरे समिती मार्फत श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना श्रीचा प्रसाद म्हणून अल्प देणगी मूल्य आकारून बुंदी लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. सदरचा बुंदी लाडू प्रसाद चांगल्या गुणवत्तेचा व पुरेसा प्रमाणात भाविकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समिती मार्फतच लाडू प्रसाद तयार करण्यात येत आहे. डॉ. माने या देणगीदारांनी उपलब्ध करून दिलेली पातेले, बुंदी लाडू प्रसाद तयार करण्यासाठी वापरण्यात येणार असल्याचे लाडू प्रसाद विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत यांनी सांगितले.

# झेडपीच्या सीईओंची सुर्डीला भेट

## 'फार्मर कप'मधील तुरीची पाहणी; शेतकऱ्यांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, ७ ऑगस्ट -**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी सुर्डी गावास भेट देऊन वॉटर कप आणि फार्मर कपचा प्रवास जाणून घेतला.

दुष्काळी परिस्थितीमध्ये सुर्डीकर पाण्यासाठी वणवण करीत फिरायचे. पण पाणी म्हणजे जीवन, शेतकऱ्याचे सर्वस्व आहे हे जेव्हा लोकांना समजले तेव्हा पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून श्रमदान, लोकवर्गणी करून जलसंधारणाच्या कामाला एकत्रित येऊन जिद्द, चिकाटी, मेहनत करून जलसंधारणाची कामे



केली. त्याचे फळ सुर्डीकरांना विविध पुरस्काराने मिळाले आहे, असे गौरव उद्‌गार मनिषा आव्हाळे यांनी काढले. फार्मर कप स्पर्धेत सहभागी सुर्डी गावच्या विजेता शेतकरी गट आणि कृशीसखी महिला शेतकरी गट या दोन्ही गटांच्या तूर पिकाची पाहणी केली. यावेळी पाणी फाउंडेशनचे प्रोजेक्ट डायरेक्टर नामदेव ननवरे, गटविकास अधिकारी सुळे, मास्टर ट्रेनर रविंद्र पोमने, उमेद तालुका समन्वयक गणेश पाटील, जिल्हा समन्वयक सत्यवान देशमुख, विनायक डोईफोडे, मालवंडी प्रभाग समन्वयक विद्या पाटील, बार्शी तालुका समन्वयक नितीन आतकरे व ओम कुरडे उपस्थित होते.

# अन्नछत्रामुळे अक्कलकोटचा नावलौकिक : संगापुरे

**अक्कलकोट, दि. ७ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अखंडपणे सुरु असलेल्या अन्नछत्रामुळे तिर्थक्षेत्र अक्कलकोटचा नावलौकिक झाला असून, श्रींच्या कृपेने चार्टड अकौंटट्स् परीक्षेत पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झाल्याचे स्नेहल संगापुरे यांनी सांगितले.

गळोरगी येथील स्नेहल शिवलिंगप्पा संगापुरे यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. स्नेहल संगापुरे म्हणाल्या की, जून २०२४



मध्ये चार्टड अकौंटट्स् फाऊंडेशन परीक्षेसाठी महाराष्ट्रभर ९२ हजार विद्यार्थी बसले होते. महाराष्ट्राचा १५ टक्के निकाल लागत त्यामध्ये फक्त १२ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेत यश मिळवले. परंतु सोलापूर जिल्ह्यात ३०० विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्यामध्ये ३९ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिवलिंगप्पा संगापुरे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शाम राव मोरे, शहाजीबापू यादव, सतिश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस. के. स्वामी, धनंजय निंबाळकर, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्वनाथ कलशेट्टी, खंडेराय होटकर उपस्थित होते.

# उजनीचे पाणी कालव्यांद्वारे सोडून साठवण तलाव भरा

## डॉ. बसवराज बगले यांची मागणी

**मंद्रुप, दि. ७ ऑगस्ट-**

उजनीतील अतिरिक्त पाणी नदीऐवजी कॅनॉलद्वारे सोडून उत्तर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील सर्व लहान-मोठे तलाव भरून घ्यावेत, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते डॉ. बसवराज बगले यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेल्या निवेदनात डॉ. बगले यांनी म्हटले आहे की, काही ठिकाणी अतिपावसामुळे पिकांची हानी झाली आहे तर भीमा आणि सीना नदीत सोडलेल्या पाण्यामुळे महापुरात नदीकाठचे ऊस, केळी, मका, तूर पाण्याखाली गेली आहेत. उजनी जलाशय भरल्याने भीमा-सीना नदीतून पाणी सोडण्यात येत आहे. त्याचबरोबर दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील बहुतांश भागात भविष्यात पाणी टंचाईची स्थिती उद्‌भवण्याची शक्यता आहे. म्हणून या तिन्ही तालुक्यातील सर्व गावतलाव, जलसंपदा विभागाचे लहान-मोठे तलाव आणि पाणीसाठे भरून घेणे गरजेचे आहे. उजनी जलाशयातील पाण्याने भीमा-सीनाकाठची हानी होत आहे. त्याऐवजी हिप्परगा, एकरूख, दारफळ तलाव, होटगी तलाव, शिरवळचा धुबधुबी तलाव, हिळळी बंधारा, घोळसगाव बंधारा, मंद्रुपचा सीतामाई तलाव, धोत्री तलाव, आचेगाव तलाव, कुरनूर धरण, याचबरोबर सर्व पाझर तलाव, सिमेंट बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि साठवण तलाव भरून घ्यावेत, अशी मागणी केली आहे.

# पंढरपुरातील स्वच्छतागृहांचा प्रश्न लागणार मार्गी

## युवक काँग्रेसच्या आंदोलनानंतर प्रशासनाला आली जाग; अधिकाऱ्यांनी दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ ऑगस्ट-**

पंढरपुरातील स्वच्छता गृहाबाबत युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन केल्यानंतर जागे झालेल्या प्रशासनाने याची दखल घेत तात्काळ प्रश्न मार्गी लावण्याची आश्वासन दिले. युामळे स्वच्छतागृहांचा प्रश्न मिटण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असून येथे लाखो संख्येने भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात. स्थानिक पुढाऱ्यांच्या दबावाखाली शहरातील मुताऱ्या पाडण्यात आल्या. तसेच सदर मुताऱ्या स्वच्छतेसाठी काढण्यात येणारे टेंडरची देखील चौकशी करण्यात यावी व प्रत्येक मुतारीच्या स्वच्छतेचे फोटो प्रशासनाने सादर करावेत व महिलांसाठी असणाऱ्या मुताऱ्यांचे ऑडीट करण्यात यावे कारण कागदोपत्री व प्रत्याक्षात मुताऱ्यात यात मोठी तफावत आहे. बाजारपेठेतील भाजी विक्रेत्या महिला, नगरपरिषद गाळेधारक (नगरपरिषदसमोर मुतारी नाही) व तेथील दुकानदार, ग्राहक व बाहेरून येणाऱ्या महिला भाविक यांची मुतारी (स्वच्छतागृह) नसल्याने प्रचंड गैरसोय होत आहे. या मागण्यांसाठी पंढरपूर शहर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदिप शिंदे यांच्यावतीने काँग्रेस पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोमवारी पंढरपूर नगरपरिषदेच्या समोर जागरण गोंधळ घालून उपोषण करत आंदोलन करण्यात आले. यानंतर नगरपरिषदेचे अधिकारी यांनी आंदोलनकर्त्यांशी फोनवरून चर्चा करत तुमच्या मागण्यासंदर्भात संबंधित अधिकारी व आंदोलक यांची चार दिवसांत मिटींग लावून तुमचा प्रश्न मार्गी लावला जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदिप शिंदे म्हणाले की, सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे व सोलापूर जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार व काँग्रेस कमिटीचे पंढरपूर शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आलेले आहे. बाजारपेठेमध्ये नगरपरिषद ते एसटी स्टँडकडे जाणारा रस्ता, स्टेशन रोड, संत गजानन महाराज पार्कींग व प्रदक्षिणा मार्गावर सहा ते सात मुताऱ्या उभारण्यात याव्यात अशी मागणी केलेली आहे. यावेळी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी, जिल्हा सरचिटणीस किशोर जाधव, जिल्हा उपाध्यक्ष संदिप पाटील, किसान काँग्रेस तालुकाध्यक्ष अक्षय शेळके, किरण घाडगे, सेवा दल शहराध्यक्ष गणेश माने, युवक शहर उपाध्यक्ष रवि अग्रवाल, संग्राम मुळे, अक्षय वनसाळे, महेश अधटराव, नागनाथ अधटराव, सुहास भाळवणकर, आण्णा पवार, रमेश पवार, पांडुरंग इरकल, मिलिंद भोसले, उमेश सर्वगोड, श्रीनिवास उपळकर, विशाल आर्वे, समीर कोळी, दिलीप साबळे,मल्हारी फाळके, शिवकुमार भावलेकर, बाळासाहेब आसबे यांच्यासह बहुसंख्य उपस्थित होते.

# कासेगावात हजार वर्षांपूर्वीचे हेमाडपंथी महादेव मंदिर

## सुंदर नक्षीकामात मढलेले पुरातन शिवमंदिर; तेराव्या शतकातील वास्तूकलेचा सुंदर नमुना

**तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे सुमारे १ वर्षापूर्वीचे हेमाडपंथी शंभु महादेव मंदिर पुरातन वास्तुकलेचा सुंदर नमुना आहे. मंदिरातील गाभाऱ्यात दीड ते दोन फूट उंचीवर सिंहासनावर शिवलिंगाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

सिंहासनावरील शिवलिंग दुर्मिळ असल्याचे येथील जेष्ठ मंडळी सांगतात. मंदिराची रचना अशा पध्दतीची आहे की सकाळच्या वेळी सूर्याची किरणे लिंगावर पडतात. मंदिर अतिशय सुबक, रेखीव आहे. मंदिरातील दगडावर सुंदर नक्षीकाम असून दगडी खांब कोरीव व आकर्षक आहेत. पर्यटकांना विलोभनीय वाटते. शिखराबर हनुमान व इतर देवदेवतांच्या मूर्ती आहेत. वरच्या बाजूला १२ ज्योतिर्लिंग आहेत. लिंगासमोर पितळी धातूचा नंदी आहे. मंदिराशेजारी त्याच पध्दतीची गणपती व बळी या देवतांची स्वतंत्र मंदिरे आहेत. मंदिराशेजारी चाफा हे फुलाचे झाड आहे. शंकराला चाफा हे फुल प्रिय आहे असे मानले जाते. मंदिरात पहाटे व संध्याकाळी पूजा व आरती केली जाते. दरवर्षी चैत्र महिन्यात पात्रा भरते. सात दिवस यात्रा चालते. शंभू महादेवाच्या यात्रेपूर्वी गंगेवाडी व कासेगाव येथील ग्रामस्थ कावड शिखर शिंगणापूरला नेतात. अवघड अशा मुंगी घाटातून ही कावड सहज पार केली जाते. तेथून कावड परत आणून मंदिरात पूजा जाते.

श्रावण महिन्यातील दर सोमवारी पूजा बांधली जाते. या पूजेसाठी विविध फळांचा वापर केला जातो. पालखी मिरवणूक काढली जाते. महाप्रसादाचे वाटप केले जाते. श्रावण महिन्यातील पवित्र वातावरणात दर्शनासाठी पंचक्रोशीतील नागरिकांची झुंबड उडते. नुकतेच ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून मंदिराच्या शिखराचे जीर्णोद्धार केले आहे. शिखरावर केलेल्या रंगरंगोटीमुळे मंदिर अधिकच आकर्षक दिसत आहे.



मंदिर खूप पुरातन असून प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. धार्मिक पर्यटनासाठी उत्तम आहे. मंदिर बाराव्या ते तेराव्या शतकातील असून कोरीव काम आकर्षक आहे. पितळी नंदी दुर्मिळ असल्याचे पुरातत्व खात्याचे अभ्यासक सांगतात.

**-यशपाल वाडकर, सरपंच, कासेगाव**



आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बार्शीच्या प्रेरणा पाटील सेट परीक्षेत उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि ऑगस्ट**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महाराष्ट्र विद्यालय बार्शीतील किमान कौशल्य विभागात कार्यरत असलेल्या प्रा. प्रेरणा स्वप्निल पाटील यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित महाराष्ट्र सेट परीक्षेमध्ये मराठी विषयांमध्ये सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी. पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व्ही. एस. पाटील, बी. के. भालके, सर्व कार्यकारिणी सदस्य व संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के. डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, किमान कौशल्य विभाग प्रमुख मारुती भांडवलकर यांनी अभिनंदन केले.





## संक्षिप्त वृत्त...



### भातंबरे येथे शेतकरी संघटनेच्या शाखेचे उद्घाटन; शेतकऱ्यांनी घेतली शपथ

**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

तालुक्यातील भातंबरे गावी शेतकरी संघटनेच्या शाखेचे उद्घाटन शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. गायकवाड यांनी शेतकऱ्यांना संघटित करुन, शेतकऱ्यांच्या विविध समस्यांना वाचा फोडण्यासाठी लढा तीव्र करणार असल्याचे सांगून, सर्व शेतकऱ्यांना संघटनेची शपथ दिली. त्यावेळी गावातील महिलांसह, अमोल खुणे, तानाजी साळुंखे, अभिजीत खुणे, चंद्रकांत माळी, सुनील मेंढे, सादिक मुलाणी, प्रकाश मोहिते, शंकर बेताळे, तात्या शिंदे, शिवाजी शिंदे, रामा माने, प्रल्हाद तांबे, तुकाराम खुणे, शंकर खुणे, विक्रम खुणे, बापू खुणे, गणेश पाटील, शशिकांत खुणे, दादासाहेब शिराळ, विलास तांबे, पांडुरंग खुणे, प्रतीक पाचपुते, दीपक खुणे, सचिन चव्हाण, राहुल पवार, नामदेव खुणे, रामेश्वर निकम, भय्या जाधव, सचिन पाटील, दिलीप पवार, संतोष खुणे, भीमा माळी, अर्जुन खुणे, श्रीनिवास खुणे, अरुण पवार, लक्ष्मण खुणे, श्रीराम खुणे, दत्तात्रय साळुंके, दशरथ जगदाळे, बाबा जाधव, बारकू माळी मनमंथ बेताळे आदींसह ग्रामस्थ व पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शंकर बेताळे यांनी केले तर सूत्रसंचालन अमोल खूने यांनी करुन, तानाजी साळुंखे यांनी आभार मानले.



### करकंबच्या चौडेश्वरी मंदिरात राष्ट्रीय विणकर दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

**करकंब, दि. ७ ऑगस्ट-**

सन २०१५ पासून वस्त्रोद्योग मंत्रालय व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने वस्त्रोद्योगात होणाऱ्या उत्पादनांना चालना देणे,नवीन बाजारपेठ निर्माण करून देणे व नवनवीन हातमाग उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी ७ ऑगस्ट हा राष्ट्रीय हातमाग दिवस घोषित करण्यात आला. त्यानिमित्त करकंब येथे श्री.चौंडेश्वरी मंदिर येथे विणकर समाज बांधवांच्यावतीने देवांगमुनी व श्री. चौंडेश्वरीमातेच्या प्रतिमेची आरती व पूजन करण्यात आले.याप्रसंगी पेंशन संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत रसाळ गुरुजी,मा.पंचायत समिती सदस्य बाळासाहेब वास्ते,एसबीसी संघर्ष समितीचे जयंत टकले, संजय दुधाणे, विजय भागवत, अभिजीत टेके, जगन्नाथ दुधाणे, अनुप टेके,संतोष पिंपळे, कल्याण टकले, चंद्रकांत टकले, शितल दळवी आदी समाजबांधव उपस्थित होते.



### माढेकर महाराज मठामध्ये साहित्य वाटप

**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**

सांगोला येथील वीरशैव लिंगायत समाज व महात्मा बसवेश्वर युवक संघटनेच्या वतीने माढा येथील श्रीषब्र १०८ प्रभूदेव शिवाचार्य माढेकर महाराज मठ येथे वेदपाठ शिकणाऱ्या शिष्यांना चादर २० नग, सतरंजी २० नग, तेल १ डबा,५ किलो शेंगदाणे व ५ किलो साखर देण्यात आली. यावेळी श्रीषब्र १०८ प्रभूदेव शिवाचार्य माढेकर महाराजांनी सांगोल्यातील समाज बांधवांना शुभआशीर्वाद दिले व उपस्थित सदस्यांचा सत्कार केला. यावेळी संघटनेचे काशिनाथ ढोले, संतोष महिमकर, प्रसाद जिरगे, ओंकार उकळे, औदुंबर लोखंडे, राजवर्धन ढोले उपस्थित होते.

### सेट परीक्षेत सूरज गायकवाडचे यश

**टेंभुर्णी, दि. ७ ऑगस्ट-**

सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांनी ७ एप्रिल २०२४ रोजी घेतलेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (सेट) मध्ये येथील सूरज दशरथ गायकवाड याने पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले असून तो चांगल्या मार्क्सने उत्तीर्ण झाला आहे. सीनियर कॉलेज मधील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ही परीक्षा अत्यावश्यक असते. सुरज गायकवाड याने इंग्रजी व पोलिटिकल सायन्स विषयात पुणे विद्यापीठातून एम.ए. केले आहे तर



ग्रॅज्युएशन बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कॉलेजमधून केले आहे. सूरज गायकवाड याचे या यशाबद्दल विकास अधिकारी डी. एन. लंगोटे, टेंभुर्णी प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश चौगुले, उपाध्यक्ष अमरसिंह शेंडे, सचिव धनंजय मोरे सर्व पत्रकार यांनी अभिनंदन केले आहे.

# जन्मेजयराजे भोसलेंनी लावला उजनीच्या पाण्यासाठी दादांना फोन!

## विकासाबाबत व्यक्त केले समाधान; कुरनूर धरण भरण्यासाठी घेतला पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अक्कलकोट शहराच्या व तालुक्याच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील असणारे जन्मेजयराजे भोसले यांनी उजनी धरणातील पाणी हे कुरनूर धरणात सोडण्याची मागणी केली. याबाबत त्यांनी अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मोबाईल फोनद्वारे संपर्क साधून उजनीतील पाणी कुरनूर धरणात सोडण्यात यावी ही मागणी केली.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी याबाबत कार्यवाही





करण्याचे आश्वासन जन्मेजयराजे भोसले यांना दिले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांची पत्रकारांनी सोमवार दिनांक पाच ऑगस्ट रोजी सदिच्छा भेट घेतली. जन्मेजयराजे भोसले यांनी यावेळी अक्कलकोट शहर व परिसरातील विकास कामांबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीचा अल्पावधीत झालेला विकास हा सर्वांनाच दिलासादायक असल्याचे सांगितले. यावेळी जन्मेजय भोसले यांनी उजनी धरण हे शंभर टक्के भरले असून या धरणातून लाखो लिटर पाणी हे भीमा नदीत सोडण्यात येत आहे. उजनी धरणातील पाणी हे कुरनूर धरणात सोडल्यास याचा फायदा हा अक्कलकोट शहर व तालुका वासियांना होणार आहे असे सांगितले. जन्मेजय भोसले यांनी तात्काळ आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मोबाईल वरून फोन लावला. उजनी धरणातील पाणी हे कुरनूर धरणात सोडण्यासाठी पाठपुरावा करावा अशी मागणी केली. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी याबाबत पाठपुरावा सुरू असून लवकरच याची कार्यवाही होणार असल्याची माहिती जन्मेजयराजे भोसले यांना दिले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून धार्मिक सामाजिक सेवा करणारे लाखो भाविकांना महाप्रसादाची मोफत सोय करणारे जन्मेजय राजे भोसले हे अक्कलकोट शहर व तालुक्यातील जनतेसाठी तेवढेच कार्यतत्पर असल्याचे त्यांच्या कृतीतून दिसून आले. जनतेच्या समस्यासाठी सदैव दक्ष असल्याचे जन्मेजयराजे भोसले यांच्यातून दिसून आले.



# शांतात रॅलीत अक्कलकोटच्या तब्बल ४१५ वाहनांचा ताफा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ ऑगस्ट-**

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या सोलापूर येथील शांतता रॅलीसाठी तालुक्यातून ११५ जीप, ३०० दुचाकीच्या माध्यमातून हजारो अखंड मराठा समाजबांधव सहभागी झाले होते. अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या वतीने १ लाख फूड पाकीट आणि पाणी बॉटल सोलापूर रॅलीत वाटप करण्यात आले.

दरम्यान अक्कलकोट शहर व तालुक्यातील हजारो अखंड मराठा समाज बांधवांनी ११५ जीप, ३०० दुचाकीच्या माध्यमातून शहरातील प्रमुख मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराज की जय..! संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील आगे बडो..! आरक्षण आमच्या हक्काचे..! आशा घोषणा देत मार्गस्थ झाले. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक जन्मेजयराजे भोसले यांनी सोलापूर रस्त्यावरील विजय बाग येते रॅलीचे स्वागत केले. रॅलीचे समाज बांधवांनी चोक नियोजन केले होते. या रॅलीत हजारोंच्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होते.

# सांगोल्यात रविवारी नोकरी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**

राजर्षी शाहू महाराज क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ,चिकमहुद यांच्यावतीने तसेच आ. शहाजीबापू पाटील यांच्या संकल्पनेतून सांगोल्यात रविवारी ११ ऑगस्ट रोजी पाचवी ते पदवीपर्यंतचे शिक्षण झालेल्या बेरोजगार तरुणांसाठी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत हर्षदा लॉन्स, मिरज रोड, सांगोला येथे नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नोकरीपूर्व मुलाखत प्रशिक्षण शिबीरही घेण्यात येणार आहे.

गुरुवारी ८ ऑगस्ट रोजी स्वेरी इंजीनियरिंग कॉलेज गोपाळपूर, कर्मयोगी कॉलेज शेळवे, शुक्रवारी ९ ऑगस्ट रोजी फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज, सह्याद्री फार्मसी कॉलेज मेथवडे तर शनिवारी १० ऑगस्ट रोजी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज सांगोला व दीपकआबा साळुंखे-पाटील कॉलेज कोळा या ठिकाणी नोकरीपूर्व मुलाखत प्रशिक्षण शिबीर होणार आहे. या नोकरी महोत्सवात बजाज ऑटो, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, झोमॅटो, ॲक्सिस बँक, डॉ. रेड्डीज फाऊंडेशन, इक्वीटास स्मॉल फायनान्स बँक, फुकोकू इंडिया प्रा. लि, क्विझ कॉर्प लि, जिनियस ग्लोबल, पॉलीबाँड इंडिया लि, रॉयल इन्फोटेक, यशस्वी ग्रुप, साई श्रद्धा इंटरप्रायजेस, युवाशक्ती फाऊंडेशन, एक्साईड बॅटरी, युनो मिंडा लि, इलेक्ट्रो टेक्नॉलॉजी लि, युनीकेअर हेल्थ केअर, सुमित फॅसिलिटीज लि, डीएमसी फिनिशिंग प्रा.लि यासह मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिकल, बँकिंग, सेल्स, रिटेल इंडस्ट्रीज, हॉटेल इंडस्ट्रीज, फार्मा, सिक्युरिटी, मार्केटिंग, ऑटोमोबाईल्स क्षेत्रातील नामवंत ६० कंपन्या सहभागी होणार आहेत. गरजू युवकांनी या नोकरी महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. नोकरीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी https://maharashtrajobfair.com/shahajibapupatil या वेब पेजवरील फॉर्म भरून ऑनलाईन नोंदणी करावी.ज्या इच्छुकांना ऑफलाईन नोदणी करावयाची आहे. त्यांनी आ. शहाजीबापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयातील फॉर्म भरून देण्याचे आवाहन केले आहे.



# सांगोल्याचे सिद्धेश्वर गावडे करतात मेंढ्यांचा वाढदिवस

**तभा वृत्तसेवा । दीपक भाकरे**
**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**

जुना मेडशिंगी रोडवरील गावडे वस्ती येथील मेंढपाळ सिद्धेश्वर सदाशिव गावडे हे श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी मायेपोटी आपल्या मेंढ्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात.

परंपरागत चालत आलेला मेंढपाळ हा व्यवसाय सिद्धेश्वर गावडे करत आहेत. त्यांच्याकडे सध्या मोठ्या ८० तर लहान २० मेंढ्या आहेत. त्याच्याबरोबर एक घोडा पण आहे. मेंढ्यांबरोबर फिरण्याने सिद्धेश्वर गावडे यांचा या प्राण्यावर जीव बसला आहे. त्यामुळे ते प्रत्येक वर्षी श्रावण महिना चालू झाल्यावर पहिल्या सोमवारी आपल्या मेंढ्यांचा वाढदिवस साजरा करतात. यावर्षी सोमवारी त्यांनी मेंढ्यांच्या वाढदिवसाचे फलक लावून शहरातून हलग्यांच्या कडकडात वाजत-गाजत मिरवणूक काढून राजमाता अहिल्यादेवी होळकर उद्यान येथे केक कापून वाढदिवस साजरा केला. त्यानंतर उपस्थितांना फराळ वाटप केले. यावेळी ऋषिकेश सुरवसे, प्रकाश गावडे, सचिन गावडे, आकाश गावडे, संतोष गावडे, प्रवीण गावडे, निखिल जानकर उपस्थित होते.

> मेंढ्या चरण्यासाठी बाहेरगावी फिरत असताना जेथे मुक्काम पडेल तेथे मेंढ्या हेच आपले गाव व हीच आपली माऊली असे वाटते. मायेपोटी व श्रद्धेपोटी श्रावण महिन्यात पहिल्या सोमवारी मेंढ्यांचा वाढदिवस साजरा करतो. मेंढ्यांमुळे आपल्याला कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचणी कधीच आल्या नाहीत.
>
> **-सिद्धेश्वर सदाशिव गावडे, मेंढपाळ**



## प्रविण वाळके, सिदोबा नागणे यांची सोलापूरला बदली

**अक्कलकोट, दि. ७ ऑगस्ट-**

अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यातील ठाणे अंमलदार प्रविण वाळके, सिदोबा नागणे यांची सोलापूर येथे बदली झाल्याबद्दल पोनि राजेंद्र टाकणे यांच्या हस्ते सत्कार करून निरोप देण्यात आला. शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या वतीने प्रविण वाळके, सिदोबा नागणे यांच्या उत्कृष्ठ सेवेबद्दल सत्कार करण्यात आला. जिल्हा उपाध्यक्ष सुनिल कटारे, महिला संघटिक जयश्री ढेपे, शिवम ढेपे, पोसई खापरे, केदारनाथ सुतार, रमजान पाटील, गीते हवलदार, रफिक बिराजदार, फुलारी हवालदार, पोसई राजू राठोड, पोसई रामचंद्र राठोड आदी उपस्थित होते.

# लायन्स क्लब बार्शी टाउन करणार ऑक्सिजन पार्कची निर्मिती

## पाच हजार वृक्षारोपण चळवळीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ विभाग १ उपविभाग ४ लायन्स क्लब बार्शी टाऊन यांच्यावतीने बार्शी शहरात रविवार दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता कुर्डूवाडी रोड, ढगे मळा येथे ५,००० वृक्षारोपण चळवळीचा भव्य शुभारंभ होणार असून शहराच्या विविध भागात दहा ऑक्सिजन पार्क निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती लायन्स क्लब ऑफ बार्शी टाउनचे अध्यक्ष महावीर कदम यांनी दिली आहे.

यावेळी क्लबचे सचिव हेमंत जमदाडे, खजिनदार किरण आवटे, ऑक्सीजन पार्क क्रमांक एकचे प्रकल्प प्रमुख वासुदेव ढगे, अमित कटारिया, डॉ. सागर हजगुडे आदी उपस्थित होते. यावेळी कदम म्हणाले, आपला देश आणि जगासमोर वाढते उष्णतामान हे सर्वात गंभीर संकट आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल कायम राहण्यासाठी व पर्जन्यमानासाठी वनीकरण अत्यावश्यक आहे. त्यामुळे आम्ही लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊनच्या माध्यमातून या चळवळीला शहराच्या कासारवाडी रोड, उपळाई रोड, अलिपूर रोड, रेल्वे स्टेशन रोड, जामगांव रोड, आगळगाव रोड, धस पिंपळगाव रोड, परांडा रोड, कुर्डुवाडी रोड, इत्यादी भागात वृक्षारोपण करुन पाठबळ देणार आहोत. सामाजिक वनीकरणांमध्ये बार्शी शहरात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या मॉर्निंग सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी नगरसेवक विजयनाना राऊत यांच्या हस्ते शुभारंभ करत आहोत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आर के क्लबचे अध्यक्ष गौतम कांकरिया, डॉ. मुकुंद तांबारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या रोपण केलेल्या वृक्षांची आगामी काळात योग्य निगराणी करुन त्यांचे संवर्धन करणार आहोत. तसेच या ऑक्सिजन पार्कच्या माध्यमातून शहर हिरवेगार मनोहारी दिसावे, अशी आमची इच्छा आहे. तरी या वनीकरण चळवळीच्या भव्य शुभारंभास पर्यावरणप्रेमींबरोबरच नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महावीर कदम यांनी केले आहे.

# ऐतिहासिक कार्याच्या माध्यमातून सूर्यकांतदादांनी जपली जनसेवा : पांडुरंग माने-देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ ऑगस्ट-**

लोकनेते स्वर्गीय सूर्यकांतदादा माने देशमुख यांनी आपले जीवन समाजसेवेसाठी समर्पित केले होते. जनसेवेचा ध्यास घेऊन त्यांनी



ऐतिहासिक कार्य केले त्यामुळे आजही त्यांच्या कार्याला उजाळा मिळताना दिसतो आहे असे मत वेळापूर येथील आदर्शवत व्यक्तिमत्व तथा श्री महादेव देवालय ट्रस्टचे ट्रस्टी पांडुरंगभाऊ माने देशमुख यांनी व्यक्त केले.



लोकनेते स्वर्गीय सूर्यकांत माने देशमुख यांच्या जयंतीनिमित्त वेळापूर ग्रामस्थांच्या वतीने विकास सेवा सोसायटी या ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अभिवादन सभेत ते बोलत होते.याप्रसंगी सुरुवातीला जयंतीनिमित्त लोकनेते सूर्यकांत माने देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पत्रकार सुर्यकांत भिसे यांनी अनेक आठवणी सांगितल्या. यावेळी विकास सेवा सोसायटीचे व्हाईस चेअरमन महादेव ताटे,कै. सूर्यकांतदादांचे ज्येष्ठ चिरंजीव तथा श्री महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतभैया माने देशमुख, मार्केट कमिटीचे संचालक बाळासाहेब माने देशमुख, सोसायटीचे संचालक दत्तात्रय माने, श्रीधरराव देशपांडे, विश्वजीत माने देशमुख, ग्राम पंचायत सदस्य दीपक राऊत,ड. ताटे, शरद साळुंखे, राजकुमार बनसोडे, मोहन आडत, पत्रकार सूर्यकांत भिसे, अनंत क्षीरसागर, विश्वास वाघे, रंगनाथ माने आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी लोकनेते सूर्यकांतदादाचे विश्वासू सहकारी तसेच वेळापूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **स्व. सूर्यकांतदादांच्या आठवणींना उजाळा**
>
> सोलापूर जिल्हा परिषदेचे सुर्यकांतदादा उपाध्यक्ष असताना शेतकऱ्यांसाठी विविध योजना त्यांनी राबविल्या. आपल्या दातृत्वातून त्यांनी अनेकांचे संसार फुलवले. वेळापूर येथे ऐतिहासिक निर्णय घेत महावितरण ला जागा देणे, पाण्याचा प्रश्न मिटावा यासाठी तळे बांधण्यासाठी देखील त्यांनी जागा दिली. शाळा, बंधारे, समाजमंदिरे, हातपंप अशा माध्यमातून त्यांनी आपल्या कार्याची ओळख निर्माण केली.

# विश्वकर्मा फौंडेशनच्या वतीने 'उद्योजक व्हा' शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

विश्वकर्मा फौंडेशनच्या सोलापूर यांच्यावतीने सोलापूर जिल्ह्यातील तरुण- तरुणींसाठी 'उद्योजक व्हा' या शिबिराचे आयोजन दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत सोलापूर येथे करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी दिली.

या शिबिरात मी उद्योजक होऊ शकतो का, कोणते गुण उदयोजक होण्यासाठी लागतात, ते कसे आत्मसात करावे, उद्योग संधी कशी शोधावी या विषयावर नागेश कोकरे तर गारमेंट व्यवसाय संजय सरवदे, ई गव्हर्नन्स व ई कॉमर्स ई मार्केटिंग या विषयावर आणि अमित कामतक,र शेअर मार्केट व बँक रवी हलसगीकर, जीवन विमा लहू नरळे, आरोग्य विमा संतोष जाधव या व्यवसायात असलेल्या संधीची माहिती देतील. शेती व शेतीला पूरक व्यवसाय जसे पशुपालन गाय, शेळी, मेंढी, कोंबडी डॉ. संतोष थिटे व ट्रेडिंग व एजन्सी या विषयात ओंकार कुलकर्णी अशा ५० उद्योगाची माहिती तज्ञ व्यक्तीकडून दिली जाणार आहे. बँक लोन कागदपत्रे व प्रोसेस या विषयात जनता बँकेचे जय कोकाटे, शासकीय योजनांची याची माहिती विविध महामंडळाचे अधिकारी देणार आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक, युवती, महिला, पुरुष यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. या शिबिरासाठी पूर्व नोंदणी आवश्यक असून ९४२२०६५८५७, ८०८०९३३२०२ या नंबरवर किंवा भैय्या चौक, गायकवाड बिल्डींग, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वह्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

महाराष्ट्राचे लाडके नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य मकरंद पाटील यांनी सुरु केलेला शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम अंतर्गत आज (दि.७) कळंब शहरा नजीकाच्या संत ज्ञानेश्वर मूकबधिर विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

निरागसतेसोबतच निसर्गाचे सानिध्य, साहित्य वाटप करताना व देवेंद्रजीबद्दल ऐकताना त्या निष्पाप बालकांचे भाव नजरेने टिपताना मनात जे तरंग उठले ते अद्भुत होते.



कार्यक्रमासाठी प्रदेश कार्यकारिणी सदस्य मकरंद पाटील, जिल्हा सचिव भाजपा धाराशिव वनिता कटाळे, तालुका सरचिटणीस संजय जाधवर, दादासाहेब पाटील, कृष्णा जगताप व शाळेचा शिक्षक वृंद उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### मनोज जरांगे-पाटलांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.७ ऑगस्ट -**

मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवार दि.६ रोजी रात्री तिर्थक्षेत्र तुळजापूरात येवुन श्री तुळजाभवानी मातेची पुजा करुन मनोभावे दर्शन घेतले. नंतर देविजींच्या मंगळवार सांयकाळच्या विविध धार्मिक विधीत भाग घेतला. त्यांनी श्री तुळजाभवानी मातेच्या मंदीरात जावुन पुजा अर्चा केली. यावेळी पुजेचे पौराहित्य पुजारी कुमार टोले यांनी केले. नंतर त्यांनी महंत तुकोजी बुवांचा मठात जावुन श्री अन्नपुर्णा देविचे दर्शन घेतले. नंतर देविचे महंत तुकोजी बुवा, महंत वाकोजी बुवा यांचे दर्शन घेतले. यावेळी आशिर्वाद देवुन त्यांचा देविचा प्रसाद देवुन शाल घालुन सन्मान केला.



### रोहित मोटे याचे सेट परीक्षेत यश

**नळदुर्ग, दि.७ ऑगस्ट -**

नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी रोहित लिंबराज मोटे याने महाराष्ट्र राज्याच्या प्राध्यापक पात्रता परीक्षा (सेट) परीक्षेत यश संपादन केल्यामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. एप्रिल २०२४ मध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे अंतर्गत झालेली पदार्थ विज्ञान या विषयाची सेटची परीक्षा रोहित मोटे याने दिली होती. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयातील फिजिक्स विभागाच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. रोहिणी महिंद्रकार, प्रा. प्रशांत अमृतराव, प्रा. नेताजी जाधव, प्रा. हणमंत पाटील, प्रा. धनंजय पाटील, डॉ. दिपक जगदाळे, प्रा. नेताजी बिराजदार, प्रा. बाबासाहेब सुर्यवंशी, प्रा. किरण भोसले, काशिनाथ कोळी आदिजन उपस्थित होते.

### लोहारा शहराच्या विकासासाठी ५ कोटी रूपयांचा निधी मंजुर

**लोहारा, दि.७ ऑगस्ट -**

लोहारा शहरातील विविध विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडुन ५ कोटी रूपये निधी मंजुर झाल्याची माहिती आ. ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे. सदर कामांना मंजुरी मिळण्यासाठी ते सातत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी करीत होते. या कामांना मंजुरी मिळाली असुन याबददल आमदार ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे आभार मानले आहेत.



### प्रा. रोहिणी माने सेट परीक्षा उत्तीर्ण

**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

तेरणा महाविद्यालय धाराशिव येथील कॉम्प्युटर सायन्स विषयाच्या प्रा. रोहिणी माने या महाराष्ट्र राज्य प्राध्यापक पात्रता परीक्षा कॉम्प्युटर सायन्स या विषयामध्ये उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य, डॉ. अशोक घोलकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. चंद्रजीत जाधव, डॉ.डी.बी. मोरे, डॉ. अरुणा सावरगावकर, डॉ. अनघा तोडकरी, प्रा. अर्चना तवले प्रा. भाग्यश्री पवार, प्रा. सुधाकर चव्हाण, डॉ. तुळशीराम उकिरडे, प्रा. सुनिल पाटील, प्रा. विजयकुमार साळुंके, डॉ. दीपिका देशमुख, प्रा. अर्चना तवले, प्रा. सुचेता कोल्हे, प्रा. जयंत कांचनबटवे, डॉ. सुशीलकुमार सरवदे, प्रा. बालाजी काकडे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### खामसवाडीत शेतकऱ्यांना खतांचे वाटप

**कळंब, दि.७ ऑगस्ट -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे दि.६ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयात तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना सोयाबीन प्रकल्पाअंतर्गत नॅनो डिएपी व नॅनो युरिया चे निवड झालेल्या शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. तसेच उपस्थित शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक बालाजी देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

### तुळजापुरात आज रक्तदान शिबिर

**तुळजापूर, दि.७ ऑगस्ट -**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त ९ ऑगस्ट रोजी तुळजापूर शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ,युवास्पंदन सामाजिक संस्था, आर्ट ऑफ लिविंग, रोटरी क्लब तुळजापूर व शिवपार्वती मंगल कार्यालय यांच्यावतीने शिवपार्वती मंगल कार्यालय तुळजापूर खुर्द रोड तुळजापूर येथे सकाळी ९ ते दुपारी २ या कालावधीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# जिल्हा हागणदारी मुक्त अधिक घोषीत; जिल्ह्यातील ७२० गावे ओडीएफ प्लस घोषीत

**तभा वृत्तसेवा / देविदास पाठक**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन टप्पा दोन अंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील ७२० गावे हागणदारी मुक्त अधिक झाल्याने संपूर्ण धाराशिव जिल्हा हागणदारी मुक्त अधिक घोषित झाला आहे.

धाराशिव जिल्ह्यातल्या आठ तालुक्यातील सातशे वीस गावात घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन, वैयक्तिक शौचालय उभारणी, शाळांमध्ये शौचालये, सार्वजनिक शौचालयांची उभारणी तसेच प्लास्टिक संकलन केंद्र आदि कामे पूर्ण झाली आहेत.



यात धाराशिव जिल्ह्यातील सर्वाधिक १२६ गावे धाराशिव तालुक्यातील असून त्या खालोखाल तुळजापूर तालुक्यातील १२१ गावे हगणदारीमुक्त अधिक झाली आहेत. उमरगा ९६, भूम ९३, परंडा ९४, कळंब ९०, वाशी ५५, लोहारा ४७ अशी सर्व मिळून ७२० गावे हगणदारीमुक्त अधिक झाल्याचे घोषित करण्यात आले आहे.

या गावात स्वच्छ भारत मिशन टप्पा दोन अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन किंवा सांडपाणी व्यवस्थापन ची कामे झाली आहेत. यासोबतच गावात वैयक्तिक शौचालय, शाळांमध्ये शौचालय, सार्वजनिक शौचालय आणि प्लॉटीक संकलन केंद्र झाली आहेत.

आता पुढच्या टप्प्यात डिसेंबर २०२४ पर्यंत ही गाव हागणदारी मुक्त अधिक मॉडेल व्हावीत म्हणून या गावात कचरा संकलन वाहन व्यवस्था, मैला गाळ व्यवस्थापन आणि स्वच्छतेबाबतची नियमित जनजागृती करण्यात येणार आहे.

यासाठी दोन ऑक्टोबर रोजी विशेष ग्रामसभांचे आयोजन केले जाणार आहे. याकामासाठी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामीण पाणीपुरवठा आणि स्वच्छता समिती, ग्रामसेवक आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही, बचत गट महिला यांचा सहभाग घेतला जाणार आहे. त्यामुळे यापुढे संपूर्ण धाराशिव जिल्हा हागणदारी मुक्त अधिक मॉडेल करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

डिसेंबर २०२४ पर्यत सर्व गावे हगणदारीमुक्त अधिक मॉडेल करण्यावर भर दिला जाणार आहे.

# परंडा विधानसभा लढवावी ही मागणी जनतेतीच : प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.७ ऑगस्ट -**

परांडा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी गाव संवाद दौरा चालू केला आहे. या गाव संवाद दौऱ्यास मतदार संघातील नागरिकांमधून चांगला प्रतिसाद मिळत आहे. डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी भूम, परंडा, वाशीच बोला, एकत्रित चला हा मंत्र घेऊन ही संवाद यात्रा चालू केली आहे. या यात्रेत ते ४१ दिवसांत मतदारसंघातील २४८ गावांना भेटी देणार आहेत.



यामध्ये डॉ. पाटील हे मतदार संघातील नागरिकांच्या समस्या ऐकून घेणार आहेत. ही संवाद यात्रा त्यांनी आगामी विधानसभा निवडणूक समोर ठेऊनच चालू केली आहे. मतदारसंघात लोक या दौऱ्याच्या माध्यमातून रस्ता, पाणी, वीज, दूध दर यासह विविध समस्या मांडत आहेत. भूम येथील शासकीय विश्रामगृहात त्यांनी पत्रकार बांधवांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले कि, नागरिक महायुतीवर प्रचंड नाराज आहे. त्यांची नाराजी लोकसभेच्या निवडणुकीत दिसून आली आहे. महाविकास आघाडीला सर्वत्रच चांगली संधी आहे.

परंडा विधानसभा मतदारसंघातही महायुतीला चांगली संधी आहे. मी गेली १० वर्षांपासून जनमानसात आहे. माझ्या परीने मी ग्रामीण भागात आरोग्यशिबिरे, महिला मेळावे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, धान्य वाटप यासह विविध उपक्रम राबविले आहेत. हा संवाद दौरा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या सूचनेवरून करत आहे. हा दौरा झाल्यानंतर मी त्यांच्याकडे माझा अहवाल सादर करणार आहे असेही यावेळी ते म्हणाले.

पुढे ते म्हणाले कि, मी या मतदारसंघातून त्यांच्याकडे उमेदवारी मागितली आहे, मी लोकशाही मानणारा कार्यकर्ता आहे, त्यामुळे मला जर उमेदवारी मिळाली तर मी निश्चितपणे निवडून येईल. मला महाविकास आघाडीतील घटक पक्षांसह, इतर समविचारी पक्षांचा, संघटनांचा मला पाठिंबा आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## येणेगुर आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ ऑगस्ट -**

तालुक्यातील येणेंगुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवंता मानांकन मिळाले आहे. या आरोग्य केंद्राला ८९.२१ गुण मिळाले असून अधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नामुळे हे यश प्राप्त झाले असल्याची माहिती प्रा.आ. केंद्राच्या आरोग्य अधिकारी ऋतुजा साळुंखे यांनी माहिती दिली.

प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून सार्वजनिक रुग्णालयाची विश्वासार्हता वाढवण्यासाठी राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके उपक्रम राबवण्यात येत आहे. या नुसार १२ व १३ जुलैला येणेगुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके परीक्षण समितीकडून मूल्यांकन पडताळणी करण्यात आली.

मानांकनासाठी डॉ. नंदकुमार नेहरकर आदींच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा साळुंखे, डॉ. रूपाली आंग्रे, डॉ. वैष्णवी जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## मुरूम शहरात पहाटे सहा दुकाने जळून खाक; जीवितहानी टळली

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.७ ऑगस्ट -**

मुरूम बसस्थानक समोरील जवळपास सहा दुकानाना पहाटे ४ च्या सुमारास अचानक भीषण आग लागून सहा दुकाने जळून खाक झाली आहेत. यादरम्यान सुदैवाने जीवित हानी टळली असून दुकानदारांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.




पहाटेच्या सुमारास गंभीर भीषण घटना घडत असताना आपप्ती व्यवस्थापन समिती आणि नगर परिषदचे मुख्याधिकारी तसेच मुरूमचे प्रमुख पोलिस अधिकारी आणि महावितरणचे अधिकारी त्याचप्रमाणे तहसीलदार हे पहाटेच्या सुमारास केवळ कर्मचाऱ्यावरती जबाबदारी सोपवल्याने मोठी अडचण निर्माण झाल्याचे चित्र पाहता आले. मुख्य चौक छत्रपती शिवाजी महाराज चौकातील बस स्टँड समोरील लिंगायत स्मशानभूमीलगत हॉटेल व बेकरी आणि फायनान्स व इतर अनेक दुकाने आहेत. यातील सहा दुकानांना बुधवारी पहाटे चारच्या सुमारास अचानक आग लागल्याने मोठी धावपळ उडाली. न.प.च्या अग्निशमन दलातील गावोगावात असलेल्या अनेक नगर परिषदच्या कर्मचाऱ्यांना कांही युवकांनी फोनद्वारे व प्रत्यक्ष भेटून आग विजवण्यासाठी विनंती केल्यावर कर्मचारी हजेरी लावून आग आटोक्यात आणण्यासाठी शर्यतीचे प्रयत्न करत राहिले. कर्मचाऱ्यांनी शर्यतीचे प्रयत्न करून देखील सर्व दुकाने आगीत खाक झाले. या आगीत हॉटेल साम्राज्य चहा तसेच कुबेर फायनान्स, बाळराजे मोबाईल, पारस स्वीट मार्ट असे सहा दुकाने जळून खाक झाली आहेत. तर जवळच असलेल्या जाधव यांच्या दुकानातील कांही वस्तू जळून गेल्या आहे.

त्यानंतर दुपारी घटनास्थळी नायब तहसीलदार काजळे, मंडळ अधिकारी आमले, सपोनि. संदिप दहिफळे आदींनी भेट देऊन पाहणी केली.

## तेर येथील विश्रामगृहाला आलेय उकीरडयाचे स्वरुप

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.७ ऑगस्ट -**

पर्यटक, अभ्यासक, भाविकभक्त यांची रहाण्याची सोय व्हावी म्हणून १९९२ ला बांधण्यात आलेले धाराशिव तालुक्यातील तेर येथील पाटबंधारे विभागाच्या विश्राम गृहाला उकीरडयाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.



धाराशिव तालुक्यातील तेर येथे १९९२ ला पर्यटक, अभ्यासक यांना रहाण्याची सोय व्हावी म्हणून पाटबंधारे विभागाच्या वतीने विश्रामगृह बांधण्यात आले. या विश्राम गृहात दुसऱ्या मजल्यावर एक व्हीआयपी खोली असून खाली एक मिटींग रूम आहे तर दोन खोल्या रहाण्यासाठी असून एक खोली स्वयंपाकाची आहे. तर विश्रामगृहाच्या समोर पटांगण आहे. परंतू गेल्या दहा वर्षांपासून या विश्रामगृहाला उकीरडयाचे स्वरुप आले आहे. विश्रामगृहामध्ये विद्युत वायरींग विविध ठिकाणी खराब झाल्याने विश्रामगृह पूर्णपणे अंधारात असून विश्रामगृहातील चांगल्या प्रकारे आलेली विविध झाडे पाण्याअभावी वाळूत गेली आहेत. सर्वत्र गवत झाल्याने विश्रामगृहाला उकीरडयाचे स्वरूप आले आहे. चक्क विश्राम गृहात जनावरे फिरताना दिसत आहेत. पाटबंधारे विभाग क्र.१ धाराशिव या कार्यालयाअंतर्गत हे विश्रामगृह येते.

गेल्या पंधरा वर्षापासून विश्रामगृहाच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले गेले नाही. पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकारी तेर येथील विश्रामगृहातला आलेले उकंडयाचे स्वरूप कधी घालविणार याकडेच नागरीकांचे लक्ष लागले आहे.

## मराठा आरक्षण संघर्षाची २९ ऑगस्टला दिशा ठरविणार : मनोज जरांगे-पाटील

**तुळजापूर, दि.७ ऑगस्ट -**

मराठा आरक्षण संघर्षची पुढील दिशा ठरविण्यासाठी आंतरवाली येथे २९ ऑगस्टला या, असे आवाहन मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटील यांनी मंगळवारी रात्री श्री तुळजाभवानी दर्शनानंतर बोलताना केले.

मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटलांचे तिर्थक्षेत्र तुळजापूरात तब्बल चार तास उशीरा आगमन होवुन पाऊस होत असताना प्रचंड संख्येने मराठा बांधव उपस्थितीत होते. प्रथमता जेसीबीने व चिमकल्यांच्या हस्ते पाचशे किलो फुलांचा हार घालुन जरांगे-पाटलांचे स्वागत सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले. यावेळी फटाक्याची प्रचंड आतिषबाजी करण्यात आली. यावेळी बोलताना जरांगे-पाटील म्हणाले कि, छत्रपती शिवाजी महाराज यांना वदंन करुन श्री तुळजाभवानी मातेच्या पवित्र नगरीत सर्वांना जय शिवराय या पवित्र स्थळी तुमच्या काय मनात आहे ते जास्त काही बोलणार नाही. धाराशिव जिल्हयाने आमच्या मागे मोठी ताकद उभी केली आहे. ते योगदान कधीच वाया जावू देणार नाही. मराठ्यांचा फैसला २९ ऑगस्टला होणार असल्याचे स्पष्ट केले. या सभेला रात्री असुन महिलांची संख्या लक्षणीय होती.

# तुळजापूर विधानसभा लढविण्यासाठी संभाव्य उमेदवारांची 'तिकीटा'साठी चढाओढ

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ ऑगस्ट -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघात संभाव्य उमेदवारांकडुन विधानसभा निवडणुकीच्या प्रचारास सुरुवात करण्यात आली असुन जो तो संभाव्य उमेदवार मलाच पक्षाचे तिकीट मिळणार म्हणुन जोरदार प्रचार यंत्रणा राबवित आहे. त्यामुळे सध्या तुळजापुर विधानसभा मतदार संघातील राजकीय वातावरण चांगलेच तापत चालले आहे.

सर्वच राजकीय पक्षांकडुन सध्या विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी सुरु आहे. अनेकाला कामाला लागा अशा सुचना पक्षाकडुन मिळाल्यामुळे एकाच पक्षाचे दोन, दोन, तीन, तीन संभाव्य उमेदवार सध्या तुळजापुर विधानसभा मतदार संघात प्रचार करताना दिसुन येत आहेत. सध्या तुळजापुर विधानसभा मतदार संघात भाजपचे विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील, काँग्रेसचे जेष्ठ नेते व राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) अशोक जगदाळे, देवराज मित्र मंडळाचे देवानंद रोचकरी यांच्याकडुन सध्या निवडणुकीची मोर्चेबंधाणी जोरदारपणे सुरु आहे. असे असले तरी सध्या आमदार राणाजगजितसिंह पाटील व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) अशोक जगदाळे हे प्रचारात आघाडीवर आहेत.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मतदार संघातील सर्वच गावामध्ये आपले कार्यकर्ते पाठवुन अतिशय नियोजनबद्ध निवडणुकीचे काम सुरु केले आहे. तर दुसरीकडे अशोक जगदाळे यांनीही त्यांनी केलेल्या कामांचे एक माहिती पत्रक काढुन या मतदार संघातील प्रत्येक गावातील घरात हे माहिती पत्रक पोहचविण्याचे काम अतिशय नियोजनबद्धपणे पार पाडत आहेत. त्यामुळे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि अशोक जगदाळे यांनी आज संपुर्ण तुळजापुर विधानसभा मतदार संघ पिंजुन काढला आहे. काँग्रेसचे जेष्ठ नेते व माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी पुन्हा एकदा निवडणुक लढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे अशोक जगदाळे यांची डोकेदुखी वाढली आहे. कारण हे दोन्ही नेते महाविकास आघाडीचे असुन महाविकास आघाडीची उमेदवारी ही एकालाच मिळणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार या मतदार संघात कोण राहणार हे पाहणे गरजेचे आहे.



तुळजापुर विधानसभा मतदार संघात आज जुन्या मतदार संघाच्या भागातील उमेदवारांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. हे भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पथ्यावर पडणारे आहे. कारण मधुकरराव चव्हाण, अशोक जगदाळे, देवानंद रोचकरी हे जुन्या तुळजापुर विधानसभामतदार संघात तुल्यबळ आहेत. मात्र या मतदार संघाला नव्याने जोडलेल्या धाराशिव तालुक्यातील ७२ गावांमध्ये यांची म्हणावी तितकी राजकीय ताकद नाही. या ७२ गावांमध्ये आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची ताकद मोठी आहे. हे मागच्या विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळाले होते.

या ७२ गावांमध्ये मागच्या विधानसभा निवडणुकीत मधुकरराव चव्हाण व अशोक जगदाळे यांना कमी मतदान मिळाले होते. त्यामुळे जुन्या मतदार संघात त्या भागातील उमेदवारांची गर्दी होत असल्याने यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात मतांची विभाजनी होऊ शकते. निश्चितच याचा फायदा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना होऊ शकतो.

या मतदार संघात ओबीसी समाजाच्या नेत्या डॉ. स्नेहा सोनकाटे याही निवडणुक लढविणार आहेत. ओबीसी समाजाची एकजुट झाली तर या मतदार संघात डॉ. स्नेहा सोनकाटे हे सर्वच तुल्यबळ उमेदवारांवर भारी पडु शकतात. त्यांनी या मतदार संघात सर्व ओबीसी घटकातील समाजाला एका झेंड्याखाली आणण्याचे काम सुरु केले आहे. यामध्ये त्यांना किती यश मिळणार यावर त्यांचे या मतदार संघातील राजकीय भवितव्य अवलंबुन आहे.

याच मतदार संघात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) सक्षणा सलगर हेही निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. यांनीही या मतदार संघात मतदारांच्या गाटी भेटी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे सध्या तुळजापुर विधानसभा मतदार संघात सर्वत्र राजकारणावरच चर्चा सुरु आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### जि.प.लेखा संघटनेच्या अध्यक्षपदी भाऊसाहेब व्हरकटे; जाधव, इगे यांच्या हस्ते सत्कार

**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य लेखा कर्मचारी संघटना-१४२५ अंतर्गत धाराशिव जिल्हा परिषद जिल्हा कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये जिल्हाध्यक्षपदी भाऊसाहेब फुलचंद व्हरकटे, सचिवपदी जयप्रकाश हिरोळे, कार्याध्यक्षपदी गोपाळ पांचाळ, उपाध्यक्षपदी राहुल थापडे तर कोषाध्यक्षपदी किशोर ढेंगळे यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव व मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विजयसिंह ठाकुर, बुधाजी बोडखे, मकरंद कुलकर्णी, होळकर, माळी, प्रविण सुर्यवंशी, वाघमारे आदींसह सर्व लेखासंवर्गीय अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

### पशुसंवर्धन पंधरवाडा कार्यक्रम : पशुधनावर उपचार पशुपालकांच्या अडचणी सोडविणार

**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने दि. ०१ ऑगस्ट ते १५ ऑगस्टच्या दरम्यान पशुसंवर्धन पंधरवडा आयोजित करण्यात येत आहे. या पंधरवड्यात पशुधन उपचार सेवा पशुपालकांच्या अडचणी सोडविण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे.त्याचप्रमाणे सध्या दुग्ध उत्पादक पशुधनाच्या दुधास ५ रुपये प्रति लिटर अनुदान योजनेबाबत पशुपालकांच्या सर्व अडचणींचे निराकरण करण्यासाठी योजनेत सहभागी असलेल्या सर्व घटकांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पशुपालकांकडील गाई-म्हैस यांची वंध्यत्व तपासणी व त्यावर उपचार शिबिरांचे या कालावधीत आयोजन करण्यात येणार आहे त्याचप्रमाणे पशुधनाची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी पशुपालकांना मार्गदर्शन शिबीर आयोजित केले जाणार आहे.राष्ट्रीय पशुधन अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत पशुसंवर्धनामध्ये उद्योजकता विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अंतर्गत शेळीपालन,कुक्कुटपालन, वैरण विकास आदी नवीन प्रकल्प राबविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. गावनिहाय केंद्र व राज्य शासनाच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या माहितीसाठी जनजागृती करण्यात येणार असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.वाय.बी.पुजारी यांनी सांगितले. प्रत्येक गावाचा चारा आराखडा तयार करणे गुणवत्तापूर्ण पोषक चारा निर्मिती करणे, चारा टंचाईवर मात करणे, मुरघास निर्मितीबाबत शेतकरी तथा पशुपालकांना मार्गदर्शन या पंधरवड्यात करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पशुधनाची रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने सहभागी पशुधनाचे १०० टक्के जंत निर्मूलन रोगप्रतिबंधक लसीकरण तसेच पशुधनाला सकस आहार देण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या मोहिमेतून समाधानकारक रोगप्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाद्वारे प्रयत्न करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शेतकरी व पशुपालकांनी या पशुसंवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभाग, धाराशिवच्या वतीने करण्यात आले आहे.



### राज्यस्तरावर रोलबॉल स्पर्धेसाठी धाराशिव जिल्ह्याचा संघ जाहीर

**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

महाराष्ट्र रोलबॉल संघटनेच्या अधिपत्याखाली बुलढाणा जिल्हा रोलबॉल संघटनेच्या वतीने चिखली (बुलढाणा) येथे होणाऱ्या १४ वर्षे वयोगटातील राज्यस्तरीय रोलबॉल स्पर्धेसाठी धाराशिव जिल्हा मुलाचा संघ जिल्हा संघटनेचे सचिव गिरीश पाळणे आणि निवड समिती अध्यक्ष प्रताप राठोड यांनी जाहीर केला. धाराशिव जिल्हा रोल बॉल संघटनेच्या वतीने गुंजोटी येथे घेण्यात आलेल्या १४ वर्षे वयोगटातील जिल्हास्तरीय रोलबॉल स्पर्धेतून मुलांचा संघ ठेवण्यात आला. स्पर्धेत तांत्रिक समिती अध्यक्ष कैलास लांडगे आणि सचिव साई राठोड यांनी काम पाहिले आहे. निवड करण्यात आलेल्या संघात अधिराज जाधव (कर्णधार), ओमकार सोनवणे, श्लोक खंडाळकर, अल्तमश अत्तार, सोहम क्षीरसागर, अर्णव गिराम, असद शेख, असीम इनामदार, श्रेयन राठोड आदींचा समावेश असून संघमार्गदर्शक पदी प्रताप राठोड व संघ व्यवस्थापक पदी साई राठोड यांची निवड करण्यात आली आहे. खेळाडूंचे धाराशिव जिल्हा रोलबॉल संघटनेचे अध्यक्ष खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन शिंदे, उपाध्यक्ष धनंजय पाटील, सचिव गिरीश पाळणे, सहसचिव प्रताप राठोड, कोषाध्यक्ष सचिन देवगिरे आदींसह संघटनेचे पदाधिकारी खेळाडू पालक आणि क्रीडा प्रेमींनी अभिनंदन करत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महायुती सरकारकडून अभूतपूर्व विकास कामांना मंजुरी : आ. राणाजगजीतसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट-**

महायुती सरकारने धाराशिव जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात इतिहासात सर्वात जास्त विकास कामे मंजूर करत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला असून गावातील प्रमुख कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे प्रतिपादन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी मेंढा ता. धाराशिव येथे सुमारे २ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांच्या उद्घाटन व भूमिपूजन प्रसंगी बोलताना केले.



आ. राणाजगजितसिंह पाटील यावेळी बोलताना म्हणाले की, राज्यात जाती धर्मावर राजकारण करून जाती जातीत भांडणे लावून तेढ निर्माण करत आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांकडून केला जात आहे. मात्र अशा राजकारणापासून आपण सावध राहावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कोणत्या एका समाजासाठी नाही, तर पूर्ण जाती-धर्मातील गोर गरीब व गरजू महिलांसाठी आहे. सर्व पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन देखील त्यांनी केले.

यावेळी बोलताना पुढे ते म्हणाले की, जिल्ह्याच्या अर्थकरणाला चालना देण्यासाठी पर्यटन क्षेत्रात मोठा वाव असून तुळजापूर तीर्थक्षेत्राचा मोठा विकास करायचा आहे. तुळजापूर तीर्थक्षेत्र महामार्गाने जोडलेले असून भाविकांना रेल्वेने देखील येथे येता यावे, याकरिता केंद्र व राज्य सरकारने आवश्यक तो निधी मंजूर केला आहे. त्याचेही काम जलद गतीने चालू आहे. आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येणारे भाविक किमान एक-दोन दिवस तुळजापूर मध्ये राहतील, येथे पर्यटन करतील व त्या माध्यमातून येथील उत्पन्न वाढेल, अर्थकारण सुधारेल यासाठी काम सुरू आहे. तुळजापूर तीर्थक्षेत्राचा विकास व जिल्ह्याच्या समृद्धीसाठी माझे मनापासून प्रयत्न चालू असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोकराव पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी भाजपचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ पाटील, मेंढा गावचे सरपंच नामदेव माळी, धाराशिव पंचायत समितीचे माजी सदस्य नागनाथ पवार, टाकळी बेंबळी येथील माजी सरपंच तानाजी गायकवाड, उपसरपंच रुक्मीन विठ्ठल घुले, अशोकराव पाटील, शिवाजी माळी, अरुण शेटे, बाबा जावळे, तानाजी जावळे, मेंढा ग्रामपंचायतचे सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयराम ढोरमारे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## विधिज्ञ मंडळाच्या विजयी उमेदवारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ ऑगस्ट -**

उमरगा विधिज्ञ मंडळ पदाधिकरांची निवडणूक जाहीर व नवनिर्वाचित विजयी उमेदवार घोषित करण्यात आले.

त्यानिमित्त उमरगा येथील ॲड.शितल चव्हाण फॉउंडेशनच्या कार्यालयात नवनिर्वाचित अध्यक्ष या पदासाठी ॲड.मोहन प्रेमनाथ कोथिंबरे, तसेच उपाध्यक्ष या पदासाठी ॲड.मल्हारी नारायण बनसोडे, तसेच सचिव या पदासाठी ॲड. शिवाजी शंकरराव बिराजदार, तसेच कोषाध्यक्ष या पदासाठी ॲड.कृष्णा माधवराव पाटील, तसेच सहसचिव या पदासाठी ॲड.श्रीमती भाग्यश्री बिभीषण गुंड आदी मान्यवरांचा अनुक्रमे ॲड.शितल चव्हाण, ॲड.अक्षय तोतला, ॲड.सयाजी शिंदे फॉउंडेशनचे उपाध्यक्ष व्यंकट उर्फ राजू भालेराव, ॲड.अर्चनाताई जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन पेढे भरवून यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. शितल चव्हाण यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभार ॲड.

सयाजी शिंदे यांनी केले व सूत्र संचालन ॲड. शेख ख्वाजा यांनी केले.

दरम्यान ॲड.प्रवीण तोतला व नूतन विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड.मोहन प्रेमनाथ कोथिंबरे यांची समयोजित भाषणे झाली, ॲड. कोथिंबरे यांनी ॲड.शितल चव्हाण फॉउंडेशनच्या सामाजिक कार्यास सहकार्य करण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे मनोगत व्यक्त केले.

## माझा महाराष्ट्र प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ ऑगस्ट -**



माझा महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेतील राज्यस्तरी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विठ्ठल माने, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी गिड्डे, मार्गदर्शक रामहारी चाटे, प्रभा पुंडगे, ओंकार कुलकर्णी, राजेंद्र बिक्कड, प्रा. बोंदर यांच्या उपस्थित प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रवीण तांबडे म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणांना वाव मिळावा यासाठी माझा महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा आयोजित करण्यात आलेले आहे व त्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न करण्याचा हेतू आहे.

राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता दुसरीतील विद्यार्थी परिहार शांषक यांनी प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल टॅब, ट्रॉफी, गोल्ड मेडल, सर्टिफिकेट देऊन सत्कार करण्यात आला. तर विभागीय स्तरीय प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना १००१ रुपये, स्कूल बॅग, ट्रॉफी, सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०१ रुपये, स्कूल बॅग, सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. तालुकास्तरावर प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना २५१ रुपये, स्कूल बॅग, ट्रॉफी, सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. तसेच केंद्रस्तरावर एक ते सहा लेव्हलपर्यंतचे गोड मेडल, ट्रॉफी, सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

माझा महाराष्ट्र प्रज्ञाशोध 'बेस्ट टीचर' पुरस्कार माझा महाराष्ट्र पब्लिकेशन तर्फ शिक्षक अनिल शिरसागर, शहाजी पुरी, संदिप मगर, बालाजी नाडे यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षा किंवा नवोदय सारख्या परीक्षेत अतुलनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना हा पुरस्कार देण्यात आला.

# पत्रकारांच्या पेन्शनसाठी लादलेल्या किचकट अटी शिथिल करा : चोरडिया

### शिर्डी येथील अधिवेशनास पत्रकारांनी उपस्थित रहावे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट-**



पत्रकार सर्वसामान्यांच्या बातम्यांना शासन व प्रशासन दरबारी मांडून त्यांना न्याय देण्याचे काम करतो. मात्र पत्रकारांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो विशेष म्हणजे त्यांची आर्थिक बाजू सक्षम नसल्यामुळे त्यांचे आर्थिक स्त्रोत वाढला पाहिजे. तसेच ६० वर्षानंतर पत्रकारांना किमान व्यवस्थित जगता यावे, यासाठी पेन्शन मिळणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी जाचक अटी लाद्या असून त्या अटी शिथिल करण्यात याव्यात, अशी मागणी व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया यांनी दि.७ ऑगस्ट रोजी केली.

दरम्यान शिर्डी येथे दि. ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर असे दोन दिवशीय होणाऱ्या पत्रकारांच्या अधिवेशनास सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले.

व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे व्हाईस ऑफ मीडियाच्यावतीने अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या संदर्भात धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, मराठवाडा उपाध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, जिंतूर तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना चोरडिया म्हणाले की, पत्रकारांचे विशेषतः ग्रामीण भागातील पत्रकारांचे विविध प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रश्न प्रलंबित आहेत. ते प्रश्न व्हाईस ऑफ मीडियाने प्रशासन व शासन दरबारी मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले.

सततच्या पाठपुराव्यामुळेच शासनाने पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली असून त्यासाठी दोन सदस्य अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. या मंडळाच्या माध्यमातून पत्रकारांना छोटे मोठे उद्योग उभे करण्यासाठी अर्थसाह्य उपलब्ध करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पत्रकारांना कुठल्या प्रकारची सुरक्षा नसल्यामुळे ते असुरक्षित असून त्यांची राज्यस्तरावर पत्रकारांची १० लाख रुपयांची विमा पॉलिसी उतरविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

तर अधिस्विकृतीसाठी १० वर्ष पत्रकारिता केली असल्याचा अनुभव ग्राह्य धरून सरसकट पत्रकारांना अधिस्विकृती देण्यात यावी अशी आग्रही मागणी त्यांनी केली. तसेच शंकरराव चव्हाण कल्याण निधीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या पेन्शनच्या अटीमध्ये सलग ३० वर्षे एका दैनिकात काम करणे ही अट रद्द करावी व २० वर्ष पत्रकारितेची सेवा ग्राह्य धरावी असे त्यांनी सांगितले.

यावेळी महानगराध्यक्ष मल्लिकार्जुन सोनवणे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद, आकाश नरोटे, डिजिटल विंगचे जिल्हाध्यक्ष वैभव पारवे, एज्युकेशन विंगचे जिल्हाध्यक्ष शितल वाघमारे, आकाश नरोटे,

जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सलीम पठाण, जिल्हा कार्यवाहक कुंदन शिंदे, साप्ताहिक विंगचे जिल्हा उपाध्यक्ष जफरोद्दीन शेख, किशोर माळी, प्रमोद राऊत, रवींद्र लोमटे, संतोष वीर, बालाजी बिराजदार, निळकंठ कांबळे, अजित चंदनशिवे, किरण कांबळे, मुस्तफा पठाण, अजहर शेख, बळीराम कोकाटे, राजेश बिराजदार, अल्ताफ शेख आदींसह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# हंगरगा तांडा विद्यार्थ्यासाठी बस सेवा सुरू

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.७ ऑगस्ट -**

राजीव गांधी विद्यालय, हंगरगा (नळ) येथे हंगरगा तांडा येथून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासून बंद पडलेली बस सेवा अखेर सुरू झाली.



गेल्या अनेक वर्षापासून हंगरगा तांडा येथील अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी राजीव गांधी विद्यालय हंगरगा (नळ) येथे ये-जा करतात. ३० ते ३५ विद्यार्थी हंगरगा तांडा येथून हंगरगा (नळ) येथे शिक्षणासाठी विद्यार्थी कधी पायी तर खाजगी वाहनाने येत होती. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून ग्राम पंचायत कार्यालय व राजीव गांधी विद्यालय यांनी ठराव घेऊन बस सुरू करण्यासाठी गेल्या पंधरा दिवसांपूर्वी प्रस्ताव दिला होता. याचा पाठपुरावा करण्यासाठी हंगरगाचे सरपंच अतुल कलशेट्टी, दयानंद चौगुले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आबेद शेख, संजय वाघोले या सर्वांनी खासदार ओमराजे निंबाळकर त्यांच्याकडे स्वतः जाऊन बस सुरू करण्यासंदर्भात शिफारस पत्र घेऊन बस सुरू करण्यासाठी खूप प्रयत्न केले.

खासदार यांच्या शिफारस पत्रामुळे बस सुरू करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आणि दि.६ ऑगस्ट रोजी बस सेवा सुरू झाली. तांडा वस्तीतील सर्व विद्यार्थी, पालक खा. ओमराजे निंबाळकर यांचे आभार व्यक्त करत आहेत. तांडावस्तीची जवळपास ३००० लोकसंख्या असून सुद्धाही वस्ती शासकीय बस सेवेपासून वंचित होती. विद्यार्थ्यांच्या बरोबर इतर प्रवाशांची सोय झाल्याबद्दल पालक आनंद व्यक्त करताना दिसत आहेत.

सकाळी ९ वाजता बस तांडा वस्तीमध्ये आली. त्यावेळी त्या बसचे हलगी वाजवून, फटाके फोडून मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. चालक आणि वाहक यांचाही फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

# नागेशराव जावळे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**



शहरातील सांजा रोड येथील संत गोरोबा काका नगर येथील रहिवाशी नागेशराव अंबादास जावळे (वय ७१) यांचे बुधवारी दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता सोलापूर येथील अश्विनी सहकारी रुग्णालयात उपचार सुरु असताना निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी ४ वाजता त्यांच्या सांजा शिवारातील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. ते गेल्या आठ वर्षांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त होते.

त्यांच्या पश्चाप पत्नी, तीन मुले, एक विवाहित मुलगी, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. धाराशिव पोलीस दलातील पोकॉ अमोल जावळे, पोकॉ राहुल जावळे, पोकॉ अतुल जावळे यांचे वडील होत.

# अंगदानाबद्दलचे गैरसमज टाळून अंगदानाची चळवळ निर्माण व्हावी : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट-**

वेळेवर अवयव न मिळाल्याने भारतात दरवर्षी जवळपास पाच लाख लोकांचा मृत्यू होतो.यातील दोन लाखांवर लोकांचा हा लिव्हर खराब झाल्यामूळे, पन्नास हजार लोकांचा ह्रदय तर दीड लाखांपेक्षा जास्त लोकांचा किडनी न मिळाल्यामुळे मृत्यू होतो. हे मृत्यू थांबविणे समाजाच्या हाती असून समाजाने अंगदानाबददलचे गैरसमज टाळून अंगदानाची चळवळ निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांनी केले.



शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी बोलत होते. जनजागृती रॅलीची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा दोमकुंडवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली.

अंगदानाविषयी जनजागृती निर्माण व्हावी यासाठी भारत सरकार निर्देशानुसार ११ जुलै ते ३ ऑगस्टदरम्यान कार्यक्रम राबविण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये रांगोळी, निबंध, पोस्टर, घोषवाक्य, कविता, पथनाटय असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे पुढे म्हणाले की, भारतामध्ये किडनी आणि नेत्र प्रत्यारोपणाची गरज असणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त असल्याने अंगदान ही काळाची गरज आहे. यामुळे समाजाने अंगदानाबददलचे गैरसमज दुर करुन समाजात चळवळ निर्माण होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच रुग्णालयातील डॉक्टर,नर्सेस,विद्यार्थी व कर्मचारी यांनी हिपाटायॅसिंस बी चे लसीकरण करुन घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

वैद्यकीय अधिष्ठाता डॉ.शिल्पा दोमकुंडवार यांनी अवयवदानाचे महत्व विषद केले. यावेळी धाराशिव सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.तानाजी लाकाळ यांनी अवयवदान तसेच हिपाटायॅसिस आजारावर आळा घालण्यासाठी वेळीच निदान व उपचार मोफत असल्याचे सांगितले.

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.श्रीराम जिंतूरकर, आयएमएचे डॉ.सचिन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. अवयवदान कार्यक्रमाच्या नोडल अधिकारी डॉ.हेमलता रोकडे यांनी नियोजन केले. या कार्यक्रमास शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालयाच्या डॉ.मनिषा डावरे, जनऔषध वैद्यकशास्त्र विभागातील डॉ.मोहन राऊत, डॉ. गणेश ताठे, डॉ.स्वप्नील सांगळे, डॉ.दिपक निभोंरकर, कर्मचारी प्रमोद गायकवाड, प्रज्ञावंत रणदिवे, अल्लाऊदिदन शेख व वर्षाराणी कांबळे आदींनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नर्सिंग महाविद्यालयाचे भांगे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील व जिल्हा रुग्णालययातील सर्व कर्मचारी, सुरक्षारक्षक यांनीही परिश्रम घेतले.

**जाहीर नोटीस**
**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये) बदल अर्ज क्रमांक १०६/२००७**
**(फेरचौकशी)**

श्री शांतेश्वर शिक्षण समिती, सास्तूर ता. लोहारा जि. उस्मानाबाद न्यास नोंदणी क्रमांक एफ-७/उस्मानाबाद

**अर्जदार : मुरलीधर विश्वंभर पवार रा. सास्तूर ता. लोहारा जि.उस्मानाबाद विरुध्द**
**गैरअर्जदार : सुर्यभान काळे व ईतर**

ज्याअर्थी, श्री शांतेश्वर शिक्षण समिती, सास्तूर ता. लोहारा जि. उस्मानाबाद एफ-७ (उस्मानाबाद) या न्यासाचे कलम २२ अन्वये प्रकरण प्रलंबीत आहे. सदर प्रकरणात मा. सहायक धर्मादाय आयुक्त, धाराशिव यांनी निशाणी क्रमांक ६८ वर दिनांक ०६/०८/२०२४ रोजी जाहीर प्रगटनद्वारे आपणास कळविणेबाबत आदेश पारीत झालेले आहेत.

त्याअर्थी, गैरअर्जदार सुर्यभान रामजी काळे, मिनाबाई सुर्यभान काळे, बाबुराव मल्लिकार्जुन दलाल व मिनाक्षी शेषेराव मोहीते सर्व राहणार सास्तुर ता. लोहारा जि.धाराशिव यांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आपण दिनांक २३/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता या कार्यालयात स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे उजर/कैफीयत दाखल करावेत, अन्यथा आपली काहीही हरकत नाही असे समजून सदर प्रकरणात पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील,

ही नोटीस माझ्या सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, धाराशिव यांच्या शिक्क्यानिशी आज दिनांक ०६/०८/२०२४ रोजी दिली.

**स्वाक्षरित /-**
**(द.अ.जाधवर)**
**अधिक्षक,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धाराशिव विभाग, धाराशिव.**

# निष्क्रिय आघाडी सरकारमुळे मतदार संघात निर्माण झालेला विकासाचा बॅकलॉग आमदार पवारांनी भरून काढला

## नुकताच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ६५ कोटी तर अर्थसंकल्पातून ८२ कोटीचा निधी मंजुर

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ ऑगस्ट**

गेवराई मतदार संघात नव्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ७ गावच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी ६५ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला तर अर्थसंकल्पातून २३ गावच्या रस्त्याला ८२ कोटी ४५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. शेवटच्या टप्यातही मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून आमदार पवार आघाडी सरकारच्या काळातील विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत.

आ. लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघातील जवळजवळ सर्वच प्रमुख व गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागले आसून उर्वरित रस्त्यासाठीही त्यांचा पाठपुरावा व प्रयत्न सुरू असुन नव्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गेवराई मतदार संघातील रामपुरी ते ढालेगाव रस्ता ४.७१ किमीसाठी रु ७ कोटी ४३ लक्ष, प्रजिमा माटेगाव ते ब्राम्हगाव ३ किमी या रस्त्यासाठी रु ४ कोटी ३९ लक्ष, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी या रस्त्यासाठी रु ७ कोटी ९० लक्ष, मारफळा फाटा ते लोणाळा – खेरडावाडी ते चिंचोली ४.६५० किमी या रस्त्यासाठी रु ६ कोटी ६७ लक्ष, रुपयाच्या निधीला मंजुरी मिळाली आहे.

तलवाडा रोड ते रेवकी देवकी गोंदी रस्ता १२.२०० किमीसाठी रु २७ कोटी ७ लक्ष, टाकरवन – तलवाडा रोड ते सेलू ३.५४ किमी या रस्त्यासाठी रु ५ कोटी २४ लक्ष, सावरगाव ते चिखली रस्ता ४.२०० किमीसाठी रु. ६ कोटी २७ लक्ष असा या ७ गावच्या ४० किमी सिमेंट काँक्रिट रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयाच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. तलवाडा रोड ते रेवकी–देवकी ते गोंदी रस्ता अवैध वाळू वाहतुकीमुळे पूर्णपणे खराब झाला होता. या रस्त्यावरून वागणे अक्षरशः नागरिकांना असाहाय्य झाले होते.



विशेष बाब म्हणून आमदार पवार यांनी नामदार गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून साडेपाच मीटर रुंदीचा सिमेंट काँक्रिट हा एकमेव रस्ता मंजूर करून घेतला आहे. गेवराई मतदार संघातील प्रत्येक गावांची रस्त्यांची अडचण दुर करण्यासाठी विविध योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून प्रत्येक वर्षी रस्ते मंजुर करून मतदार संघातील दळण वळणांचा मार्ग सुकर करत आसल्याचे त्यांनी कळवले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात एकूण २३ रस्त्याच्या कामांना ८२ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यामध्ये चकलांबा ते तरडगव्हान रस्ता २ कोटी ५० लक्ष, बोरगाव ते कुरणपिंपरी ६ कोटी, गोपतपिंपळगाव ते काठोडा तांडा व काठोडा तांडा ते जातेगाव या सिमेंट काँक्रिट रस्त्यासाठी रु १५ कोटी तर, तलवाडा चौक ते गंगावाडी फाटा २ कोटी ५० लक्ष, चकलांबा मुख्य रस्ता ते धुमेगाव ५० लक्ष, धानोरा मुख्य रस्ता ते तळवट बोरगाव ८० लक्ष रु., चकलांबा रस्ता ते हिवरवाडी ५० लक्ष, चव्हाणवाडी ते विठ्ठलनगर ६० लक्ष, गढी माजलगाव रस्ता ते जांभळीतांडा – खोपटी तांडा – गावखोरी तांडा ते भिल्लखोरी तांडा ४ कोटी ७० लक्ष, चकलांबा रस्ता ते महाडूळा १ कोटी, कवडगाव थडी ते सुरडी नजीक ३ कोटी ५० लक्ष, राष्ट्रीय महामार्ग ते कोल्हेर रस्ता ५ कोटी, केकत पांगरी ते हरीलाल नाईक तांडा २ कोटी रु, गुळज ते नरसिंह तांडा ३ कोटी ५० लक्ष, राष्ट्रीय महामार्ग ते भेंड खु. भेंड बु ३ कोटी, गेवराई– कोल्हेर (उजवा कालवा) रस्ता ४ कोटी, माजलगाव राष्ट्रीय महामार्ग ते तालखेड ५ कोटी, बीड एमआयडीसी ते कुर्ला ५ कोटी, राष्ट्रीय महामार्ग ६१ ते तळेवाडी ३ कोटी ५० लक्ष, उमापूर फाटा ते उमापूर ७ कोटी ५० लक्ष, राष्ट्रीय महामार्ग ६१ हरकी निमगाव ते मंगरूळ ६ कोटी, पाचेगाव रस्ता ते आहेर वाहेगाव ३५ लक्ष रुपये या रस्त्यांचा समावेश आहे.

गोपत पिंपळगाव येथे गोदावरी नदीवर केंद्रीय रस्ते विकास निधी मधून ३५ कोटी रुपयांचा पूल मंजूर झाला आहे.सध्या ते काम देखील प्रगतीपथावर आहे. विदर्भ मराठवाड्याला जोडणारा हा एक भविष्यातील प्रमुख मार्ग असून परिसराच्या विकासासाठी हा रस्ता एक प्रमुख रस्ता ठरणार आहे. याही रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामासाठी गोपत पिंपळगाव – रामपुरी – काठोडा – गोळेगाव ते जातेगाव या रस्त्याच्या कामासाठी वरील प्रमाणे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आणखीन ४० किलोमीटरचे रस्ते प्रस्तावित असून येणाऱ्या काळात त्याही रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळून निधी उपलब्ध होईल असे आमदार पवार म्हणाले.

तलवाडा – टाकरवण या रस्त्याप्रमाणेच गेवराई – चकलंबा गावाच्या रस्त्याचे काम प्रगती पथावर असून पाडळसिंगी – पाचेगाव – पिंपळनेर – ताडसोन्ना या रस्त्याचे कामही प्रगती पथावर आहे. तसेच गेवराई – जातेगाव – मारफळा या ७ मिटर रुंदीच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याचे कामही लवकरच सुरू होणार आहे. गेवराई शहरातून गेलेल्या महामार्गाचे सुद्धा सुशोभीकरण व रुंदीकरणासाठी प्रकल्प अहवाल तयार असून त्यालाही लवकरच निधी मंजूर होईल.आघाडी सरकारच्या काळात गेवराई विधानसभा मतदारसंघातील रस्ते दुसऱ्या मतदारसंघांमध्ये पळून नेत असताना डोळे झाकून बघ्याची भूमिका घेणारे, विकासाचा दृष्टिकोन नसलेले ,स्वार्थी व केवळ विकासाचा आव आणणारे निवडणुका येतात हळद लावून पिवळे झाले असल्याचा शेवटी टोला देखील आमदार पवार यांनी नाव न घेता आपल्या राजकीय विरोधकांना लावला.रस्त्याचा प्रश्न मार्गी लावताच RDSS या केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी योजने अंतर्गत गेवराई मतदार संघातील विजेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठीही रु ८८ कोटी मंजूर केले आहेत.

# हिवरापाहाडी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी नंदिनी यादव उपअध्यक्ष पदी अंकुश शिंदे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट**

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरापाहाडी येथील शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया दि ६ रोजी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनंदा ससाने यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत पार पडली अध्यक्ष पदी नंदिनी आदिनाथ यादव तर उप अध्यक्ष पदी अंकुश लक्षमन शिंदे यांची निवड करण्यात आली बीड तालुक्यातील हिवरापाहाडी येथे दि ६रोजी शालेय व्यवस्थापन समिती ची निवड प्रक्रिया शाळेच्या मुख्याध्यापिका सुनंदा ससाने यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत पार पडली अध्यक्ष पदी नंदिनी आदिनाथ यादव तर उप अध्यक्ष पदी अंकुश लक्षमन शिंदे यांची निवड करण्यात आली सदस्य पदी सूंदर वाघमारे कावेरी वाघमारे आसलम शेख अशोक वैद्य स्वाती जाधव शारदा गायके गोविंद शेळके रेणूका देवकते परसराम दूरगुडे गवळन शेळके नामदेव शिंदे सावित्रीबाई शिंदे यांची निवड करण्यात आली सर्वांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला हि निवड प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी किरण जवकर आजय जाधव नितीन सरोदे योगेश कुलकर्णी यांनी जे के जाधव यांनी पार पाडली या वेळी शाळेतील शिक्षिका उगलमुगले बडे भाले दामूरडे कांतागळे कदम व डोळस सर यांनी काम पाहिले आभार हारीदास ठोंबरे सर यांनी केले या वेळी पिंपळनेर पोलीस स्टेशन चे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# अमोल राजपंखे इंग्रजी मध्ये 'सेट' परीक्षा उत्तीर्ण



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ ऑगस्ट**

अंबाजोगाई शहरातील नागझरी वसाहत या ठिकाणीचे रहिवासी व शालेय जीवनापासून इंग्रजी विषयात प्राविण्य मिळविण्याची जिद्द असणारे अमोल राजपंखे यांनी यावर्षी ७ एप्रिल रोजी झालेल्या सेट परीक्षेत इंग्रजी या विषयात उत्तीर्ण होऊन सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत.

अंबाजोगाई शहरातील नागझरी वसाहत या ठिकाणी राहणारे अमोल गणपती राजपंखे यांच्या घरची परिस्थिती जेमतेम असताना ही या परिस्थितीतवर मात करून त्यांनी शिक्षणाची आवड कायम राहु दिली. त्यांचे शिक्षण हे अंबाजोगाई येथील योगेश्वरी विद्यालय या ठिकाणी झाले. त्यांना इंग्रजी विषयाची आवड ही शालेय जीवनापासूनच होती. त्यांनी इंग्रजी या विषयात प्राविण्य मिळवायचे ही जिद्द मनात ठेवली होती. मनात ठेवलेल्या जिद्दीचे त्यांनी खऱ्या अर्थाने पुर्ण केले असून यावर्षी ७ एप्रिल रोजी झालेल्या सेट परीक्षेत इंग्रजी या विषयात उत्तीर्ण होऊन सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत. अमोल राजपंखे यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# केंद्रिय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला भरीव मदत मिळाली, विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी, हिंमत असेल तर उघडा डोळे, बघा निट – प्रवक्ते कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट**

केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला एक लाख कोटी रूपये मिळाल्याचा दावा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला असुन काहीच मिळालं नाही असं म्हणत विरोधक केवळ राजकिय स्वार्थापोटी ओरड करत असल्याची टिका त्यांनी केली. वाढवण बंदराला ७६ हजार कोटी तर रेल्वे प्रकल्पासाठी १५ हजार कोटी एवढेच नव्हे तर मराठवाड्यातले सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी ६०० कोटी रूपायाची आर्थिक तरतुद असल्याचे सांगत उघडा डोळे, बघा निट असं म्हणत विरोधकांना त्यांनी टोला मारला.



केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सविस्तर बोलण्यासाठी प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांची पत्रकार परिषद पक्षाच्या संघर्ष योद्धा जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कामगार मोर्चाचे संयोजक ओमप्रकाश गिरी यांची उपस्थिती होती.

केंद्र सरकारने सामान्य माणसाचं हित आणि देशातील प्रत्येक घटकाचा विचार केला. उत्पादन वाढ करताना गरिब माणसाचा विचार ज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतुन एक कोटी घरं, गरिबाच्या मुलांनी शिक्षणात पुढे गेले पाहिजे यासाठी नाममात्र व्याजदरावर दहा लाखाचं कर्ज, आयकरामध्ये नोकरदारांच्यासाठी चांगला निर्णय एवढेच नव्हे तर देशातील राज्य सरकारला पंधरा वर्षासाठी बिनव्याजी कर्ज देणार याचाच अर्थ विकास योजना राबवण्यासाठी प्रोत्साहन देणार. सामान्य लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सरसारख्या रोगावरील औषधांच्या किमती कमी केल्या तर हिंदु, बौद्ध, जैन धर्मस्थळांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद केली. बेरोजगारी हटवण्यासाठी देशातील युवकांना कौशल्य विकास उपक्रम हाती घेवुन रोजगार निर्मिती कशी करता येईल हा विचार देखील यात आहे. स्पर्धेच्या युगात इलेक्ट्रॉनिक वहाने, सौरऊर्जा त्यासाठी दिलेली सवलत एवढेच नव्हे तर देशातील शेतकर्यांचे उत्पादन वाढले पाहिजे त्या दृष्टीने शेतीपुरक योजना राबवणे असतील किंवा अवजाराच्या किंमती स्थिर ठेवणे असेल या गोष्टीला प्राधान्य दिलं. अनेक वस्तुवरील कस्टम ड्युटी कमी केल्याचा परिणाम सोन्या चांदीचे भाव कालच पाच हजारांनी उतरले. संरक्षण किंवा इतर देशातील मुलभुत सुविधा यासाठीही कोट्यावधी रूपये आर्थिक तरतुद करण्यात आली. आपल्या देशाच्या भविष्यावरही मोठी गुंतवणुक करणारा अर्थसंकल्प ज्यामध्ये शेतकरी, महिला, युवा, गरिब चार घटक वर्ग डोळ्यासमोर ठेवले. तरूणांच्यासाठी केंद्र सरकारही आता अॅप्रेंटिस योजना हाती घेणार आहे. १०० नविन क्लस्टर तयार करण्याचा घेतलेला निर्णय ज्यामध्ये उत्पादन, आयटी सेवा या सर्व क्षेत्रात रोजगार उपलब्ध होईल. विरोधक महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही म्हणून केवळ राजकिय स्वार्थापोटी खोटं बोलत आमच्या विरोधकांनी सुरू केलेला तमाशा बिनपैशाचा असुन एक कोटी पेक्षा जास्त महाराष्ट्राला निधी मिळाला. तरी एक रूपाया मिळाला नसल्याची ओरड विरोधक केवळ बदनामीसाठी करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. मुंबई, पुणे–नागपूर मेट्रोसाठी २४०० कोटी रूपये, इंडस्ट्रिअल कोरीडॉर ४९९ कोटी, नागरी वाहतुक प्रकल्पासाठी ९०८ कोटी, ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रोजेक्ट १५० कोटी, नदी पुनर्विकास ५०० कोटी, मुळा–मुठा नदी पुनर्विकास ६९० कोटी, ग्रामीण रस्ते ४०० कोटी, सर्व समावेशक इकॉनिमिक कोरीडॉर ४६६ कोटी, आरोग्य सेवा आणि पोषण आहार ३२०० कोटी, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २५०० कोटी मंजुर इतर सुविधांना देखील करोडो रूपये मंजुर केले. तरी सुद्धा विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी असल्याची टिका कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली.

# महसूल पंधरवड्या निमित्त शासकीय कार्यालय केले स्वच्छ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट**

महसूल पंधरवडा निमित्त जिल्हाधिकारी आणि अन्य शासकीय कार्यालयाने रविवारी विशेष स्वच्छता मोहीम आखून स्वच्छता केली. राज्य शासनाच्या शासन निर्णयाद्वारे महसूल पंधरवडा साजरा करण्यात येत असून या अंतर्गत जिल्ह्यातील कार्यालय स्वच्छ करण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष स्वच्छता मोहीम राबवून महसूल विभागाने आपापल्या पक्षाची आणि परिसराची स्वच्छता केली. या अंतर्गत कार्यालयाचे अभिलेख व दस्तऐवज यांचे वर्गीकरण व व्यवस्थापन, निदणीकरण व महत्वाच्या दस्ताऐव जांचे स्कॅनिंग व संगणकीकरण करण्यात आले. ही स्वच्छता मोहीम निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनात कर्मचाऱ्यांनी केली.

# बीडमध्ये फिरते बाल वाचनालय सुरु

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट**

शशहरातील संभाजी प्राथमिक शाळेत बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून फिरत्या बाल वाचनालयाचे उद्घाटन मंगळवारी (दि.६) करण्यात आले.



कार्यक्रमास बालरंगभूमी परिषदेच्या डॉ.दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, प्रा.अनिता शिंदे, प्रा.विजयकुमार राख, प्रा.सुरेश थोरात, चंदनशिव, सुरेश साळुंके, मुख्याध्यापिका भोज खरसाडे, रणखांब, वीर, धर्मे, वायभट आदींची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी बालगीते, राज्य गीत, देशभक्तीपर गीते गायली आणि नृत्याचे सुंदर असे सादरीकरण केले.

बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलमताई शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचा भाग म्हणून डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी फिरते वाचनालय सुरु केले आहे. या उपक्रमामध्ये दोन पेट्या तयार करण्यात आलेल्या असून एक जिल्ह्यासाठी तर दुसरी तालुक्यासाठी असेल. ज्यामध्ये बालक, कुमारवयीन मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, बोधकथा, बालगीते, समाजसुधारकांचे विचार अशी अनेक बालसंस्कार आणि बाल मनोरंजन करणारी पुस्तके आहेत. १० दिवस ही पुस्तक पेटी एका शाळेत मुलांना वाचनासाठी उपलब्ध राहील. पुढे १० दिवसांनी दुसर्या शाळेत फिरवल्या जाईल, असे हे फिरते बाल वाचनालय आहे. यावेळी ग्रंथालय प्रमुख डॉ.शेख यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांना पुस्तके वाचनासंबंधी सूचना दिल्या. संभाजी शाळेच्या मुख्याध्यपिका वीणा भोज यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वीर यांनी केले. आभार डॉ.दुष्यंता रामटेके यांनी मानले.

शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा–डॉ.दिपाताई क्षीरसागर

सध्या मुले लहानपणापासूनच मोबाईलच्या आहारी जाऊन, डोळ्याचे विकार असतील व इतर आजार किंवा डिप्रेशनने ग्रासलेले दिसतात. तेव्हा वाचन संस्कृती वृद्धिंगत करून हा संस्कार बाल मनावर रुजवावा. या उद्देशाने फिरते बाल वाचनालयाची सुरवात करण्यात आली आहे. सर्व शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे मत बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.





बीड शहरातील मोढा रोडवर खड्डे पडल्यामुळे नागरिकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे.(छाया–कृष्णा शिंदे)



# बीडला आनंदऋषी डायग्नोस्टीक सेंटरमध्ये रविवारी कॅन्सर शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट**

शहरातील जालना रोडवरील आनंद ऋषीची डायग्नोस्टिक सेंटर येथे आजपर्यंत विविध मोफत शिबिरांचे आयोजन करत हजारो रुग्णांना लाभ मिळवून देण्यात आला आहे. अनेक रुग्णांवर अल्पदरात नेत्र शस्त्रक्रिया आणि चष्म्याचे वाटप आनंदऋषीजी हॉस्पिटल अहिल्यानगर यांच्याकडून करण्यात आले आहे. मागील तीन वर्षात बीड येथील आनंदऋषीजी डायनोस्टिक सेंटरच्या माध्यमातून सर्वसामान्य, गोरगरीब गरजू रुग्णांना मोठा आधार देण्याचे काम अविरतपणे सुरू झाले आहे. याच आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रुग्णांचा मिळणारा मोठा प्रतिसाद लक्षात घेऊन येत्या रविवार दि. ११ ऑगस्ट २०२४ रोजी कॅन्सर रुग्णांसाठी सुप्रसिद्ध कॅन्सर तज्ञांच्या माध्यमातून तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.नावनोंदणीसाठी मोबाईल क्र. ८२६२००९०९१ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.शहरातील जालना रोडवरील छत्रपती शाहू बँकेजवळील आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे दि.११ ऑगस्ट २०२४, रविवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजे पर्यंत प्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे यांच्या मार्गदर्शनात हे कॅन्सर शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या कॅन्सर शिबिरात तोंड, स्तन, फुफ्फुस, आतडी,लिव्हर, स्वादुपिंड आणि गर्भाशयाच्या कॅन्सरसह इतर अवयवांच्या कॅन्सरची तपासणी केली जाणार आहे. रुग्णांना या तपासणी शिबिरासाठी केवळ शंभर रुपये इतके अल्प फीस आकारून नाव नोंदणी करता येणार आहे त्यामुळे या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटरच्या वतीने करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी मोबाईल क्र. ८२६२००९०९१ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

CMYK

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले



## येरोळ जि. प. शाळेच्या शालेय समितीच्या अध्यक्षपदी दाडगे

**येरोळ, दि.७ ऑगस्ट-**

येरोळ जिल्हा परिषद शाळेची नवीन शालेय समिती मुख्याध्यापक धर्मपाल निचळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली.

यावेळी पालकांच्या उपस्थित वर्गनिहा, संवर्ग निहाय, संख्या निहाय पन्नास टक्के महिला पन्नास टक्के पुरुष आशी सदस्याची निवड करण्यात आली.याप्रसंगी नुतन शालेय समिती अध्यक्ष म्हणून तानाजी दाडगे उपाध्यक्ष शिल्पा पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर सदस्य उपसरपंच सतिश सिंदाळकर, संदीप येरोळकर, विश्वनाथ नल्ले, दादाराव साकोळकर, सुरेश कासार, नितेश झांबरे, अनुराधा गरिबे,नसिमा पठाण,अंजली जंगमे,सलमा मुजेवार, गोकर्णा कांबळे,तज्ञ शिक्षक प्रभाकर चोचंडे, सहशिक्षक एम एस बिरादार यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी अमर माडजे,लक्ष्मण वाघमारे, उमेश पालकर, सिध्देश्वर भुसारे, सचिन गरिबे,चॉद मुजेवार,गुडेराव चौसष्ठे यांच्या सह पालक विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त



### शिवाजी महाविद्यालयाचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

**उदगीर, दि.७ ऑगस्ट-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ब झोन बुद्धिबळ (पुरुष)अंतर महाविद्यालयीन स्पर्धा उज्वल ग्रामीण महाविद्यालय घोनसी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेत शिवाजी म हाविद्यालयाच्या पुरुषांच्या संघाने तृतीय स्थान प्राप्त केले.संघाचा कर्णधार कोयलवार सक्षम, गिरी अवधूत, कुलकर्णी श्रीकांत, मोरे सुरज, सावंत सिद्धार्थ व कुंभार मल्लिकार्जुन यांच्या समावेश होता. सर्व खेळाडूंनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. अरविंद नवले , खेळाडूंना नेहमी प्रोत्साहित करणारे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी.टि. शिंदे, कौषाध्यक्ष गुंडेराव पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विलास भोसले, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. सूर्यवंशी, शिक्षक वृंद, कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. क्रीडा संचालक प्रा. नेहाल अहेमद, प्रा. गजानन माने यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.



### लाड समितीच्या शिफारशीनुसार मयताच्या वारसांना नियुक्ती

**निलंगा, दि.७ ऑगस्ट-**

मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित निलंगा नगरपालिकेच्या मयत कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना मुख्याधिकारी गजानन शिंदे यांनी लाड समितीच्या शिफारशीनुसार नगरपालिकेत कर्मचारी म्हणून नियुक्ती दिली. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४-०२-२०२३ रोजीच्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचीका क्र. ३२०४/२०२३ गोरोबा आरिदवाड विरुध्द महाराष्ट्र शासन व रिट याचिका क्रमांक २९५०/२०२३ कैलास राजकौर व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन याद्वारे आव्हानीत करण्यात आलेले होते. त्यास मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दिनांक २४ जून २०२४ रोजी सुनावणी झाली असून उच्च न्यायालयाचा आदेश उपलब्ध करुन देण्यात आलेला आला असून सदरील आदेशामध्ये उच्च न्यायालयाने वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील सफाई कामगाराच्यासोबत अनुसुचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील सफाई कामगारांचा समावेश केलेला आहे. त्यास अनुसरुन निलंगा नगर परिषदेचे मुख्याधिकारी गजानन शिंदे, यांनी आस्थापना विभागास प्रस्ताव सादर करण्याबाबत आदेशीत केले होते. त्यावर आस्थापना विभागाने तातडीने प्राप्त अर्जाची छाननी करुन आवश्यक कागदपत्राची पुर्तता संबंधीताकडून करुन घेवून सविस्तर प्रस्ताव मुख्याधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला. त्यामध्ये निलंगा नगर परिषदेचे मयत सफाई कामगार कै. उमाकांत नागु कांबळे, व कै. राम रतन कांबळे यांच्या वारसास अनुक्रमे नागेश उमाकांत कांबळे व श्रीमती रंजना राम कांबळे यांचे प्रस्ताव मंजूर करुन त्यांना ६ ऑगस्ट रोजी नियुक्तीपत्र देण्यात आलेले आहे. या कामी संगणक अभियंता अभंग गायकवाड व कर निर्धारक आरुणा कौडगावे यांनी परिश्रम घेतले. पात्र वारसांना मुख्याधिकारी गजानन शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी कार्यालयातील अजय बन्सी दळवी, कार्यालीयन अधिक्षक प्रेमनाथ गायकवाड, रमेश कांबळे व इतर कर्मचारी व मयत सफाई कामगाराचे कुटुंबिय उपस्थित होते.



### रामराव पाटील विद्यालयात पीएसआय येडले यांचा सत्कार

**दैठणा, दि. ७ ऑगस्ट-**

दैठणा येथे रामराव पाटील विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी यज्ञजीता येडले ही पीएसआय होण्यात यशस्वी झाल्यामुळे तिचा रामराव पाटील विद्यालयाच्या वतीने व तसेच शाळेच्या संचालक मंडळाकडून सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाळेचे सचिव तथा जिल्हा मध्यवर्तीचे संचालक व्यंकटराव बिरादार यांच्याकडून शाल श्रीफळ व पुष्पहार घालून यशस्वी विद्यार्थिनीचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कदम, विश्वजीत सांगवे, राजीव गुडे, गोविंद पेंटमशेटे, माजी शिक्षक व्यंकटराव मुळे, संदीपान पाटील, ज्येष्ठ नागरिक चंद्रराव बिरादार आदींनी पीएसआय यज्ञजीता येडले यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी यज्ञजीता येडले यांच्याकडून विद्यार्थ्यांना खूप असे मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामध्ये त्यांच्याकडून करण्यात आलेले प्रयत्न प्रयत्नाला आलेले यश मी शिकलेली शाळा शिक्षणातील अडचणी घरची परिस्थिती शेतकरी कुटुंब आणि यशस्वी होण्यासाठी या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना एक कानमंत्र यांच्याकडून देण्यात आला. सूत्रसंचलन कदम यांनी केले.

## गिरकचाळ नदीपात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा

### ६४ लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.७ ऑगस्ट-**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने निलंगा तालुक्यातील गिरकचाळ येथे नदीपात्रातील वाळूची बोटीच्या साह्याने बेकायदेशीररित्या उपसा व साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून ६४ लाखांचा मुद्देमाल जप्त केले आहे.

पोलीस प्रशासनाच्या या धाडसी कामगिरीमुळे तालुक्यातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्यासंदर्भात मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दिनांक ६ ऑगस्ट रोजी शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याच्या हदीमध्ये मध्ये अवैधपणे वाळूचा उपसा करून, चोरटी विक्री व्यवसाय करण्यासाठी साठवणूक करून मांजरा नदी पात्राच्या परिसरात आडगळीच्या ठिकाणी लपवून ठेवल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली.

त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकाने महसूल विभागाला सोबत घेऊन निलंगा तालुक्यातील मौजे गिरकचाळ येथील मांजरा नदीच्या पात्रालगत मोकळ्या जागेमध्ये मांजरा नदीपात्रातून लोखंडी बोटीच्या सहाय्याने बेकायदेशीररित्या शासकीय परवानगी शिवाय वाळूचा उपसा करून अंदाजे १,११० ब्रास वाळूचा अवैध साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात आलेले पाच लोखंडी बोटी असा एकूण ६४ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहेत.

वाळूचा अवैध उत्खनन करून विना परवाना चोरटी विक्री व्यवसाय साठी साठवणूक करणारे भगवान भाऊराव शिंदे, भगवंत भाऊराव शिंदे, धनु बाबुराव शिंदे, शरद बाबुराव शिंदे, ईश्वर नागोराव शिंदे सर्व राहणार गिरकचाळ तालुका निलंगा जिल्हा लातूर यांच्यासह इतर आठ ते दहा लोकांविरुद्ध पोलीस ठाणे शिरूर आनतपाळ येथे कलम ३०३ (२) ३ (५) भारतीय न्याय संहिता व कलम ४८ (७) ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, पोलीस अमलदार विनोद चिलमे, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, मोहन सुरवसे, राजाभाऊ मस्के, तुराब पठाण, जमीर शेख यांनी केली आहे.

## विजेचा झटका बसू नये यासाठी काळजी घ्या; मनपाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.७ ऑगस्ट-**

सध्या पावसाळ्याचे दिवस असून ओलाव्यामुळे विजेचा झटका बसू शकतो. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी म नपाच्या इमारती तसेच सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर प्रकाश पडावा या उद्देशाने दिवाबत्तीची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.मनपाने उभारलेले खांब तसेच महावितरणच्या खांबांवरून दिवाबत्तीची सोय केली जाते. मनपाकडून या व्यवस्थेची आवश्यकतेनुसार दुरुस्तीही केली जाते. या खांबांवरून प्रकाश व्यवस्थेसाठी सिंगल फेज २३० व्होल्ट व थ्री फेज ४४० व्होल्टचा वीजपुरवठा सुरू असतो. यामुळे शहरातील नागरिकांनी जागरूकता बाळगावी, असे मनपाने कळविले आहे. नागरिकांनी पथदिव्यांचे खांब व त्याच्याशी निगडित विद्युत यंत्रणेशी छेडछाड करू नये. विद्युत खांब तसेच फिडर पिलरला स्पर्श करू नये. पथदिव्यांचे खांब तसेच मनपाच्या वीज मीटर मधून विनापरवाना वीज घेऊ नये.विद्युत तसेच सिग्नल यंत्रणा असणाऱ्या खांबांना जनावरे बांधू नयेत.जंक्शन बॉक्सवर पाय ठेवून खांबावर चढू नये.कपडे वाळत घालण्यासाठी विद्युत तसेच सिग्नलच्या खांबांना तारा बांधू नयेत. बांधकामासाठी पथदिव्यांच्या खांबांचा वापर करू नये. पथदिवे तसेच सिग्नल यंत्रणा असलेल्या खांबांना होर्डिंग तसेच फ्लेक्स बांधू नयेत.विद्युत खांबावर कोणत्याही प्रकारची केबल अथवा तार ओढू नये.लहान मुलांना विद्युत खांबाजवळ खेळू देऊ नये. पावसाळ्यात वादळी वारे व पावसामुळे खांबावरील वायर तुटून रस्त्यावर किंवा अन्यत्र पडण्याची शक्यता असते. नागरिकांनी दक्षता घेऊन मनपाच्या सूचनांचे पालन न केल्यास जीवितास धोका होण्याची व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी विद्युत खांबांपासून दूर रहावे, असे आवाहन उपायुक्त डॉ.पी.एस. खानसोळे यांनी केले.

## आशिवच्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली मानांकित कोथिंबीरची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.७ आगस्ट-**

देशभरात सर्वात सुवासिक आणि पारंपरिक व नुकतेच राष्ट्रीय पातळीवर जी आय मानांकन मिळविलेली औसा तालुक्यातील आशिव येथील शेतकरी नामदेव काकडे , साहेबराव काकडे यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घूगे यांना कोथिंबीर आणि कोथिंबीरचे बियाणे (धने) बुधवार दि ७ रोजी भेट दिले.

उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, तालुका कृषी अधिकारी संजयकुमार ढाकणे , कृषी मंडळ अधिकारी विकास लटुरे उपस्थित होते. औसा तालुक्यातील कोथिंबीर या पिकास विशिष्ट असा सुगंधित सुवास असून टिकून राहण्याची क्षमता अधिक आहे .याचबरोबर सर्वाधिक चकाकी असल्यामुळे बाजारात सर्वाधिक मागणी असून शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक दर मिळतो . यामुळे या भागातील कोथिंबीर बियाण्यास नुकतेच भौगोलिक जी आय मानांकन प्राप्त झाले आहे. भौगोलिक मानांकन मिळविण्यासाठी आशिवच्या कोथिंबीर उत्पादक शेतकरी गटाने खुपच मेहनत घेतली होती. त्यांना वेळोवेळी कृषि विभागाचे विशेष सहकार्य मिळाले .यामुळे भौगोलिक मानांकन कोथिंबीर बियाण्यास मिळाले आहे. आशिव, उजनी, चिंचोली काजळे, मातोळा व वांगजी परिसरामध्ये कोथिंबीर पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.तसेच खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामात सुद्धा या पीकाचे उत्पन्न घेतले जाते. कमी कालावधीत, कमी खर्चात अधिक उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून शेतकऱ्यांचा कल या कोथिंबीर पिकाकडे वाढला आहे. रब्बी हंगामात या पिकापासून धने बियाणे मोठ्या प्रमाणात घेतले जाते .आणि याच बियाणाची विक्री खरीप ,रब्बी व उन्हाळी हंगामातील कोथिंबिरीची मोठ्या प्रमाणात विक्री होते.या कोथींबीर उत्पादक शेतकऱ्यांना कृषी विभागातील गाव पातळीवरील कृषी सहाय्यक ते वरिष्ठ अधिकारी वेळोवेळी मार्गदर्शन करतात. अशी माहिती कृषी मंडळ अधिकारी विकास लटुरे यांनी यावेळी बोलताना दिली.

**जिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकारले शेतकऱ्यांचे आमंत्रण**

आशिव येथील शेतकऱ्यांनी कोथींबीर आणि बियाणाची भेट दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी सर्वच स्तरातून सविस्तर चर्चा केली. तसेच पोळा सणानिमित्त कोथींबीरचे फड पाहण्याचे आमंत्रण दिले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे यांनी क्षणाचाही विलंब न करता यंदाचा पोळा सण आशिव येथे करुन कोथींबीरचे फड पाहणार असल्याचे आश्वासन देत शेतकऱ्यांचे आमंत्रण जिल्हाधिकाऱ्यांनी स्विकारले आहे.





## समाजभूषण पुरस्काराने बी. पी. सूर्यवंशी सन्मानित

### सामाजीक कार्यात योगदान दिल्याबद्दल पानगाव येथे सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि.७ आगस्ट -**

समाजात केलेल्या समाज हिता साठी आणि समाज परिवर्तनासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बि.पी. सूर्यवंशी यांना पानगाव येथे आयोजीत करण्यात आलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त आयोजीत कार्यक्रमात पानगाव येथील जयंती उत्सव समितीच्या वतीने समाजभुषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सामाजीक कार्य करण्यासाठी कलापंढरी या सामाजीक संस्थेची स्थापना करुन मित्र व संस्था कार्यकर्त्यांच्या साहाय्याने जीवनातील ३५ वर्षे अविरत समाज कार्यात घातली. बहुजनाचे नेते ॲड एकनाथ आवाड यांच्या खंबीर नेत्रत्वाने प्रेरीत होऊन सामाजीक चळवळीत स्वतः ला झोकून दिले.

पानगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी सेवा निवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुभाष हणवते होते तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर,रेणापूर क्वंद्रचुड चव्हाण, जेष्ठ साहित्यिक प्रा.रामकिशन सम्मुखराव, प्रा.दयानंद कांबळे, सरपंच मिना मोटाडे, उपसरपंच प्रमीला वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## अपराध्यांच्या पुनर्वसनासाठी लातुरात परिवर्तन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. ७ ऑगस्ट-**

शहर व जिल्ह्यामधील रेकॉर्ड वरील व सवयीच्या अपराधी यांना एकत्र करुन त्यांचे परिवर्तन व पुनर्वसन करण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दिनांक ६ व ७ ऑगस्ट रोजी दोन दिवशीय परिवर्तन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरची कार्यशाळा भालचंद्र ब्लड बँक येथे सुरू झाली.

देशभर बंदी कैद्यांवर काम करणारी टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई संचलित प्रयास सामाजिक संस्थेच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित केली आहे. याशिवाय सोसायटी फॉर वेल बेईंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन लातूर, आधार फाउंडेशन लातूर व स्वयंरोजगार क्षेत्रातील अग्रगण्य प्रथम संस्था, किल्लारी यांनी देखील यात सहभाग नोंदविला आहे.

उद्घाटन कार्यक्रमास श्री सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक लातूर, श्री बी के जाधव, जिल्हा कारागृह अधीक्षक, श्री शहानवाज पठाण, सीनियर कॉर्डिनेटर प्रयास मुंबई, डॉ. मिलिंद पोदार मानसोपचार तज्ञ, प्रवीण पाटील, संतोष गुंजोटी व इतर मान्यवर उपस्थित होते. व्यक्ती हा काही जन्मताच अपराधी नसून जे लोक रस्ता चुकलेले आहेत त्यांना सामाजिक प्रवाहामध्ये आणून पुनर्वसन करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित केली आहे. गुन्हेगारीचे वाढते प्रमाण पाहता गुन्ह्यांच्या प्रतिबंधासह गुन्हेगारांमध्ये परिवर्तन घडवून आणणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन श्री सोमय मुंडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. सदर कार्यशाळेचा शुभारंभ शिवशाहीर संतोष



साळुंखे यांच्या देशभक्तीपर गायनाने झाला. यावेळी डॉ मिलिंद पोदर, शाहनवाझ पठाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या कार्यशाळेत विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने सवयीच्या अपराधी यांना रोजगाराचे प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच अपराधींची म ानसिक स्थिती बदलून त्यांच्यामध्ये परिवर्तन होण्यासाठी विविध क्षेत्रातील मार्गदर्शक यांच्याकडून समुपदेशन करण्यात येत आहे. यावेळी विपसना मेडिटेशन, विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात येत आहे. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी मोठ्या संख्येने उपस्थिती दिसून आली. प्रयासचे मुरलीधर जगताप, सुरेंद्र वाघमारे, सय्यद हे परिश्रम घेत आहेत. स्वागत पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी तर सूत्रसंचालन सपोनि दयानंद पाटील यांनी केले.

## औसा येथे शिवसेनेचा भगवा सप्ताह

### संतोष सोमवंशी यांच्या उपस्थितीत सदस्य नोंदणीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ७ आगस्ट -**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार औसा विधानसभा मतदारसंघात उध्दव ठाकरे शिवसेनेच्या भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत सह संपर्कप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या उपस्थितीत उजनी येथे गणेशनाथ मंदिरात दर्शन घेऊन शिवसेना पक्ष सदस्य नोंदणी शुभारंभ करण्यात आला.

सदस्य नोंदणी अभियानाच्या शुभारंभानंतर उजनी येथील आठवडी बाजारात सर्व व्यापाऱ्यांच्या भेटी घेतल्या, याचबरोबर त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत यावर उपाय योजना करण्यासाठी आगामी काळात प्रयात्न करणार असल्याचे आश्वासन बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी व्यापाऱ्यांना यावेळी दिले.

यावेळी खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखरअण्णा चव्हाण, बाजार समितीचे माजी उपसभापती किशोर जाधव, बसवराज बरदापूरे, ॲड. दिपक वळके, एकंबीचे सरपंच काका पाटील, बंजारा ब्रिगेड तालुकाध्यक्ष राम चव्हाण, बाळकृष्ण कदम, उपतालुकाप्रमुख श्रीधर साळुंके, गणेश जाधव, विजय पवार, सरपंच सुरेश मुसळे, किशोर भोसले, श्रीहरी उत्के, माजी सरपंच बेलपान कास्ते, सोहेब शेख, अमित मुकडे, सुनिल जाधव, महेश जोशी, बाबा सगर, विकास वळके, सागर चव्हाण, उमाकांत सूर्यवंशी, काकासाहेब जवदराव, माऊली ढवण उपस्थित होते.

**भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे**

सदस्य नोंदणी अभियानाच्या माध्यमातून शिवसैनिकांनी सक्रिय होवून सक्रिय व्हावे. तसेच औसा मतदार संघात पुन्हा भगवा ध्वज फडकाविण्यासाठी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन सहसंपर्क प्रमुख संतोष सोमवंशी यांनी केले.



सोलापूर
# तरुण भारत
## ४०वा वर्धापन दिन विशेष

गुरुवार, ८ ऑगस्ट २०२४ www.tarunbharat.org सोलापूर तरुण भारत

## दै. सोलापूर तरुण भारत च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

With Best Compliment From



Hon.Mr.Vijaysinh Mohite-Patil
Former Deputy Chief Minister



Sahakar Maharshi Shanakarrao Mohite-Patil
Ratnaprabhadevi Shankarrao Mohite-Patil



Shivratna Shikshan Sanstha

**ADMISSION OPEN**

### SHANKARRAO MOHITE - PATIL ENGLISH SCHOOL & JR. COLLEGE, AKLUJ
(Pre-Primary & Std.1 to 12th, S.S.C. Board)
Ph. (02185) - 222552 / 227065 / 7517827801
Email - smpesakluj@gmail.com

### SHIVRATNA PATTERN, AKLUJ
NEET / JEE / MH- CET Coaching Center
Mob.8956993001 / 7517827801
Email - shivratnapatternakluj@gmail.com

### VIJAYSINH MOHITE - PATIL COLLEGE OF NURSING & MEDICAL RESEARCH INSTITUTE, AKLUJ
(M.Sc. Nursing, Basic B.Sc. Nursing, R.G.N.M. & R.A.N.M., - Affiliated to I.N.C. New Delhi, M.N.C. Mumbai & M.U.H.S., Nashik)
Ph. (02185) - 226752 * Email - akluj_nursing@rediffmail.com

### SHIVRATNA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AKLUJ
(B.B.A. - Affiliated to Solapur University,
M.B.A., M.Com. - YCMOU, Nashik Study Center )
Ph. (02185) - 222509 * Email - rmpakluj@gmail.com

### SHIVRATNA GIRL'S HOSTEL, SHANKARNAGAR-AKLUJ
Ph. 9604695339 * Email - shivratnagirlhostel@gmail.com

### SHIVRATNA C.B.S.E. SCHOOL, AKLUJ
(Std. 1 to 7- C.B.S.E. Curriculum)
Ph. (02185) - 222552 / 227065 / 7517827801
Email - smpesakluj@gmail.com

### SHIVRATNA SEMI ENGLISH SCHOOL, AKLUJ
(Pre-Primary & Std. 1 to 6, S.S.C. Board)
Ph. (02185) - 227552 / 222552
Email - smpsemienglishakluj@gmail.com

### TARARANI WOMEN'S WRESTLING ACADEMY, AKLUJ
### SHIVRATNA BOY'S WRESTLING ACADEMY, AKLUJ
Mob.7387311005 * Email - twwa.akluj@gmail.com

### SHIVRATNA BOYS HOSTEL, AKLUJ
Ph. (02185) 224952
Email - shivratnashikshansanstha@gmail.com

### SHIVRATNA SPORTS ACADEMY, SHANKARNAGAR-AKLUJ
* Ph. 80875 41009

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students

## SHIVRATNA SHIKSHAN SANSTHA

SHIVRATNA KNOWLEDGE CITY, SHIVAMRUT ROAD, SHANKARNAGAR-AKLUJ TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS)
Phone : (02185) 224952 / 227552 ■ Email - shivratnashikshansanstha@gmail.com ■ Web : www.sssakluj.org

- ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024
- KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION



# सोलापूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीच्या पाऊलखुणा

**सोलापूर ही क्रांतिकारी विचारांची भूमी आहे. इथे अनेक राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक प्रबोधनाच्या चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये आंबेडकरी चळवळीचा इतिहास क्रांतदर्शी आहे. सोलापुरी भूमीला प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पदस्पर्श लाभले. इथल्या लोकांनी बाबासाहेबांना डोळे भरून पाहिले. ती माणसे आज हयात नसली तरी आंबेडकरी चळवळीच्या ऐतिहासिक पाऊलखुणा सोलापूरच्या भूमीमध्ये रुजलेल्या आहेत. त्याचे मंथन करणे काळाची गरज वाटते. भारतीय इतिहासामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जगविख्यात विद्वान, तत्त्वज्ञ, थोर राष्ट्रपुरुष, दलितांचे नेते, ज्येष्ठ भारतीय समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, कायदेविशारद, भारतरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि बौध्द धम्माचे प्रवर्तक अशा विविध संबोधनांनी ओळखले जाते. वास्तविक ही संबोधने कमी पडतील, असे बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच भारतीयच नव्हे तर जागतिक पातळीवर त्यांच्या क्रांतिकारक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडलेला दिसतो. बाबासाहेबांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि कुशल नेतृत्वाच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पातळीवर निर्णायक चळवळ निर्माण करून युगप्रवर्तक असे कार्य केलेले आहे. या युगप्रवर्तक विचारकार्यातूनच भारतीय परिप्रेक्ष्यात आंबेडकरी चळवळ निर्माण झाली. दलित, शोषित, वंचित समुहाला आत्मभान देण्याचे, त्याला सन्मानाने जगण्याची जाणीव आणि आपल्या हक्क व अधिकारासाठी लढण्याचे बळ या चळवळीने दिले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या चळवळीचे ब्रीदवाक्य आहे. बाबासाहेबांनी भारताच्या कानाकोपऱ्यात ही चळवळ पोहोचवली होती. महाराष्ट्रामध्ये मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर याबरोबरच सोलापूर हे आंबेडकरी चळवळीचे मुख्य केंद्र होते.**

सोलापूर जिल्ह्याला आंबेडकरी चळवळीचा मोठा इतिहास आहे. बाबासाहेबांनी सोलापूरला विविध प्रसंगांच्या निमित्ताने भेटी दिल्या होत्या. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी परिषदा, सभांच्या निमित्ताने भाषणे दिली होती. विशेषतः आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात सोलापूरमधून करताना बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून दलितांच्या मुलांसाठी बोर्डिंग त्यांनी काढले होते. तसेच जिवाप्पा ऐदाळे, निंगाप्पा ऐदाळे, हरी भाऊ तोरणे या आणि इतर आंबेडकरी शिलेदारांशी त्यांचा सातत्याने पत्रव्यवहार झालेला आहे. शेटफळ बावी येथे रमाबाई वास्तव्यास असताना बाबासाहेब तेथे आलेले होते. काही काळ तेथे राहिलेले होते. हा सगळा इतिहास अभ्यासताना सोलापूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ऋणानुबंध आपल्या लक्षात येतात. बाबासाहेबांनी सर्वप्रथम सोलापूरजवळील बार्शी येथे झालेल्या मुंबई प्रांतिक परिषदेच्या निमित्ताने मे १९२४ मध्ये सोलापूर जिल्ह्याला भेट दिलेली होती. या परिषदेमध्ये त्यांनी दिलेले भाषण क्रांतिकारक असून सामाजिक परिवर्तनाची नांदी या भाषणातून त्यांनी व्यक्त केलेली होती. दि. २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी जिल्हा वतनदार महार परिषदेचे दुसरे अधिवेशन सोलापुरात झाले. त्यावेळी बाबासाहेब सोलापूरला आले होते. भारतीय राऊंड टेबल परिषदेच्या मतदान कमिशनची स्पेशल गाडी रविवार, दि. ६ मार्च १९३२ रोजी सोलापूला आली. त्यावेळी बाबासाहेब काही काळ येथे थांबलेले होते आपल्या कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधलेला होता. मे १९३२ मध्ये बाबासाहेबांना सोलापूरच्या जनतेने मानपत्र दिले. स्वतंत्र मजूर पक्षाच्या दौऱ्याचा कार्यक्रम २४ जानेवारी १९३७ साली सोलापूर जिल्ह्यात झाला तेव्हा मंद्रुप, वळसंग, कुंभारी, बार्शी, कुर्डूवाडी, टेंभुर्णी, करमाळा भागात तुफानी दौरा केला होता. दि. ३० डिसेंबर १९३७ रोजी करकंब, ता. पंढरपूर येथे परिषदेला हजर राहताना कुर्डुवाडी, बागलकोट या गावांना भेटी देऊन त्यांनी दलित समाजाला मार्गदर्शन केले होते. सोलापुरातील ख्रिस्ती समाजासाठी बाबासाहेबांनी भाषण केले होते. दि. २३ फेब्रुवारी १९४१ रोजी तडवळे येथे महार, मांग, वतनदार परिषद घेण्यात आलेली होती. या परिषदेला आल्यानंतर बाबासाहेबांनी बार्शीला भेट देऊन तेथील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले होते. या सर्व ऐतिहासिक घटना असून इथे केवळ त्यांचा उल्लेख केलेला आहे. मात्र, त्याचे तपशील सोलापूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास मांडणारे आहेत.

सोलापूर जिल्ह्यामध्ये बाबासाहेबांचे अत्यंत विश्वासू आणि कर्तबगार अनुयायी होते. आमदार जिवाप्पा ऐदाळे, हरी भाऊ तोरणे, निंगाप्पा ऐदाळे ही महत्त्वाची नावे आहेत. बाबासाहेबांचा या तिघांवर अत्यंत विश्वास होता. सोलापूरमधील आंबेडकरी चळवळीचे हे प्रमुख शिलेदार होते. जिवाप्पा ऐदाळे यांनी राजकारणामध्ये दलितांचे प्रतिनिधित्व केले. हरी भाऊ तोरणे यांनी वैचारिक व प्रबोधनात्मक कार्य केले. तर निंगाप्पा ऐदाळे यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. यांच्याबरोबर उध्दव धोंडो शिवशरण, केरू रामचंद्र जाधव, एन.टी. बनसोडे, मारुती साळवे यांच्या परिश्रमामुळेच सोलापूर जिल्ह्यात आंबेडकरी चळवळ रुजली. या आंबेडकरी शिलेदारांनी बाबासाहेबांचा विचार जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला. सोलापूर जिल्ह्यात अनेक परिषदा, सभा घेतल्या. संघटनात्मक पातळीवर कार्य करून राजकीय पातळीवर दबावगट निर्माण केला. पुढे दलित पँथरच्या काळात डी. व्ही. फडतरे, दलितमित्र रणशृंगारे, खासदार एन. एस. कांबळे, डी. बी. खुणे, केरू लंकेश्वर इ. नेतेमंडळी तयार झाली. दलित पँथरमध्ये सोलापूर जिल्ह्यातील मोठा कार्यकर्तावर्ग होता. या पँथर लढ्यातून रिपब्लिकन पक्षाचे नेते तयार झाले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, सुभानजी बनसोडे, प्रमोद गायकवाड, आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे, रवी गायकवाड, सुशिलाताई आबुटे, सुशीला व्हनसाळे, युवराज पवार, शांतीकुमार नागटिळक, राम सरवदे, यशवंत फडतरे, सुनिल सर्वगोड आदींसह आंबेडकरी चळवळीतील नेतृत्वाने आजची आंबेडकरी चळवळ विकसित करण्याचे कार्य चालू ठेवलेले आहे.

सोलापूर जिल्ह्यात आंबेडकरी उर्जेतून राजकीय, सामाजिक चळवळीबरोबर साहित्याची चळवळ निर्माण झाली. यामध्ये चळवळीत कार्य करणारे कार्यकर्ते चळवळीला बळ देण्यासाठी लेखन करत होते. जुन्या काळामध्ये यात हरी भाऊ तोरणे यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. त्यांनी श्री चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारी आणि चावडीतील बैठक ही पुस्तके आणि दीनमित्र या मासिकातून लिहिलेले 'काठीचे सपाटे' हे लेख अतिशय महत्वाचे आहेत. तसेच एन.टी.बनसोडे यांचे दामू झाला प्रधान हे लोकनाट्य दलित समाजाचे वास्तव मांडणारे होते. या स्वातंत्र्यपूर्व काळात दलित शाहिरांनी लिहिलेले जलसे हे आंबेडकरी चळवळीतील साहित्यिकांचे योगदान अधोरेखित करणारे महत्त्वाचे दस्तऐवज आहेत. समकालात सोलापूर मधील ज्येष्ठ आंबेडकरी लेखक म्हणून योगीराज वाघमारे यांना ओळखले जाते. त्यांनी कथा, कांदबरी, नाटक, कविता अशा विविध साहित्यप्रकारांमधून दर्जेदार लेखन केलेले आहे. उद्रेक, बेगड, गुडदाणी, बारव, सभापती, जेतवन, संसद ही त्यांची गाजलेली पुस्तके असून त्यांच्या उद्रेक या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेला आहे. स्मृतिशेष ल.सि.जाधव यांनी उतारवयात केलेले लेखन दलित साहित्यविश्वात महत्त्वाचे ठरलेले आहे. त्यांचे होरपळ हे आत्मकथन खूप गाजले. दलितांचे जग या दोन्ही ज्येष्ठ लेखकांनी चित्रित केले. यांचे लेखन आत्मचिंतन, समाजचिंतन मांडणारे होते. त्याबरोबरच काळोखाच्या गर्भात, भिक्षुणी वासवदत्ता, उध्दवस्त अशी नाटके आणि अमृतनाक ही कादंबरी लिहिणारे भि. शि. शिंदे, अक्करमाशी या आत्मकथनाने संपूर्ण दलित साहित्यात आगळेवेगळे आणि अलक्षित जगणे लिंबाळे यांनी मांडले. त्यांचे लेखन केवळ महाराष्ट्रच नाही तर देशपातळीवर नावलौकिक प्राप्त केलेले आहे. बारामाशी ते सनातन पर्यंतच्या त्यांच्या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या आहेत. कोल्हाटयाचे पोर या आत्मकथनातून भटक्या विमुक्त् तमासगीर समाजाचे भयावह वास्तव डॉ. किशोर काळे यांनी मांडले.

या पुस्तकाला सोलापूर मधील मानाचा भैरूरतन दमाणी पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचेच मी डॉक्टर झालो हे पुस्तकही अतिशय महत्त्वाचे आहे. आभरान हे पार्थ पोळके यांचे पुस्तक दलित आत्मकथनामध्ये खूप गाजले.

अलीकडच्या काळात दलित लेखकांची नवी पिढी नव्या उमेदीने लेखन करत आहे. त्यामध्ये तुंबन या कथासंग्रहाचे लेखक अर्जुन व्हटकर, कायरं या नाटकाचे लेखक अरूणकुमार इंगळे, कवी, समीक्षक संजय लांडगे, सर्जनशील लेखक प्रमोद लांडगे, वस्ती अजून थकलेली नाही, सूर्य कोपणाऱ्या विस्तवाच्या प्रदेशात या संग्रहांचे लेखक कवी चंद्रकांत मागाडे, कविता मानवतेच्या या कवितासंग्रहाचे लेखक, पत्रकार, संपादक, कवी भरतकुमार मोरे, प्रबुध्द् रंगभूमीच्या माध्यमातून विविध नाटकांचे लेखन करणारे नाटककार किर्तीपाल गायकवाड, सांग लाडके तुझी जात कोणती या संग्रहाच्या लेखिका कवयित्री अंजना गायकवाड, चीवर या कवितासंग्रहाचे लेखक कवी कांबळे, नागवंश या गाजलेल्या कथासंग्रहाचे लेखक कथाकार बा.ना. धांडोरे, अपेक्षा उपेक्षा या संग्रहाचे कवी जगदीश मागाडे, वेदनांकित घुंगरोच संदर्भ या संग्रहाचे लेखक कवी महादेव कांबळे, वॉन्टेड या कांदबरीचे लेखक वामन जाधव, वाटणी, होरपळ ते हिरवळ या आत्मचरित्राचे लेखक भास्कर बंगाळे, कावदान, झांजड, हावळा या कथासग्रंहांचे लेखक गणपत जाधव इत्यादी लेखकांचा समावेश करावा लागतो. याबरोबरच भटक्या विमुक्त समाजातील भिमराव जाधव, गुरुनाथ संगटे, नागनाथ गायकवाड, कवी अब्दुल हमीद राजेसाहेब शेख इत्यादी लेखकांचे लेखनही दलित समुहांच्या जगण्याच्या कक्षा कवेत घेते. दलित वैचारिक लेखनात दत्ता गायकवाड, एम.डी. शिंदे, बी.के. तळभंडारे, डॉ. गौतम कांबळे, मनिष सुरवसे इत्यादी लेखकांनी महत्वाची भूमिका पार पाडलेली आहे.

एकूणात सोलापूर जिल्हा हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला आहे. इथे आंबेडकरी उर्जेचे स्त्रोत मोठ्या प्रमाणात आहेत. राजकारण, समाजकारण, धर्म, साहित्य व कलांच्या माध्यमातून आंबेडकरी उर्जा जपली जात आहे. जुन्या काळातील प्रेरणा विचारात घेऊन आबेडकरी चळवळीचा हा क्रांतदर्शी इतिहास नव्या पिढीने लक्षात घेणे. आजच्या काळाची गरज वाटते.



डॉ. सारीपुत्र तुपेरे

मो. ९८२२९८४३१३

---





## कामगारांचा आधारवड !

# झुंजार कामगार नेते अशोक जानराव !!

**कामगार चळवळ म्हटलं की जानराव साहेब, हे समीकरणच बनले आहे. अशोक पंढरी जानराव यांची कामगार नेते म्हणून अवघ्या महाराष्ट्रात ओळख आहे. महापालिका कामगारांचा बुलंद आवाज, मुलुख मैदानी तोफ म्हणजे कामगार नेते अशोक जानराव !**

गेल्या ४५ वर्षापासून कामगार क्षेत्रात ते नेतृत्व करत आहेत. केवळ कामगारच नव्हे तर सामाजिक व राजकीय क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीचे ते अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य महापालिका कामगार संघटना फेडरेशनचे सरचिटणीस, कामगार क्रांती युनियनचे मार्गदर्शक यासह विविध पदे ते जबाबदारीने भूषवित आहेत.

१९७८ पासून कामगार नेते अशोक जानराव यांनी कामगारांसाठी लढा सुरू केला. आतापर्यंत किमान सुमारे १३५ आंदोलने महापालिका व इतर कामगारांच्या न्याय हक्कासाठी कामगार संघटनेमार्फत केली. इतर छोट्या मागण्या संदर्भातील आंदोलनाची तर मोजदादच नाही. कामगार नेते अशोक जानराव यांनी बीए पर्यंत शिक्षण घेतले. पुढे १९७८मध्ये सोलापूर महापालिकेमधील रोजंदारी कामगारांना कायम करावे तसेच इतर रोजंदारी कामगारांना त्यावेळी रोज तीन रुपये पगार होता, या रोजंदारी कामगारांच्या वेतनात वाढ व्हावी, या मागणीसाठी प्रारंभी चक्री उपोषण केले. त्यानंतर या मागणीसाठी विविध आंदोलने केली, त्याला यश मिळाले. वेतन वाढ झाली. वेळोवेळी आंदोलने केल्याने रोजंदारी कामगारांना आता रोज ३५० रुपये पगार मिळतोय. महापालिका कामगार संघटना कृती समिती आणि कामगार क्रांती युनियनच्या माध्यमातून मोठे संघटन उभे केले. विधायक मार्गाने आंदोलन करून कामगार हिताचा लढा यशस्वी केला.

कामगारांना सेवेत घ्यावे म्हणून संघटनात्मक दीर्घ लढा दिला. दरम्यान, महापालिकेतील सन २००१मध्ये ५७२ कामगारांना तर सन २००३ मध्ये ५७२, अधिक हद्दवाढ मधील ३४० कामगारांना कायम करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. सन २००८ ला ८६४ कामगारांना सेवेत कायम करण्यात आले असे एकूण २ हजार ३०८ कामगारांना सेवेत कायम करण्यात आले. हा कामगार एकजुटीचा विजय होता. कामगार नेते जानराव यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे अनेक आंदोलने केली. ती विधायक आणि सनदशीर मार्गाने होती.

महापालिकेतील सफाई कामगार, झाडूवाली तसेच चतुर्थ श्रेणी पासून सर्व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लढा दिला. सर्वांशी त्यांचा समन्वय व संपर्क दांडगा आहे. महापालिका कामगारांना संरक्षण साहित्य द्यावे, देय रकमा मिळाव्यात, कामगारांना सेवेत कायम करावे, महागाई भत्ता वाढवावा, पाचवा वेतन, सहावा वेतन आयोग लागू करावा, वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम योजना लागू करावी, आश्वासित प्रगती योजना लागू करावी, लाड कमिटी योजना, अनुकंपा प्रकरणे, दिवाळीदरम्यान बोनस, सानुग्रह अनुदान, ॲडव्हान्स मिळावा आदी विविध मागण्यांसाठी त्यांनी वेळोवेळी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या म ाध्यमातून यशस्वी लढा दिला. सतत पाठपुरावा करून कामगारांच्या मागण्या मंजूर करून घेतल्या.

१९९२च्या निवडणुकीत कामगार नेते जानराव हे नगरसेवक म्हणून पालिकेत निवडून गेले. पालिका सभागृहातही त्यांची ऐतिहासिक भाषणे व कामगिरीचे किस्से सांगितले जातात. महापालिकेच्या संदर्भात विविध मागण्यांसाठी २००१मध्ये ६ दिवसांचा कडकडीत संप करण्यात आला. पालिकेचा कर्मचारी मयत झाला तर अंत्यविधीसाठी महापालिकेकडून १० हजार रुपये निधी दिला जातो. त्यासाठी प्रयत्न केले.

कामगार नेते म्हणून कामगार आणि त्यांच्या कुटुंबाचा आपण एक पालनकर्ता आहोत या भूमिकेतूनच त्यांनी आतापर्यंत जबाबदारी पार पाडली. कामगारांचा कोणताही प्रश्न असो, अडचण असो कामगार नेते जानराव हे सोडविण्यासाठी तत्पर असतात. अडचणींना धावून जातात. अशी भावना कामगारांकडून ऐकायला मिळते. ते कामगारांना संकटकालीन मार्ग वाटतात. कामगारांना ते आधारवड वाटतात.

इतकेच नव्हे तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान निर्मितीसाठी ऐतिहासिक यशस्वी लढा दिला. त्यानंतर आजही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीच्या माध्यमातून त्यांच्या अध्यक्षतेखाली गुणवत्तापूर्ण सुशोभीकरणासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.



किरण बनसोडे

मो. ९८२२६१६१४१



राज्यात येत्या एक, दोन महिन्यांमध्ये विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. त्या अगोदर निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच मंत्रीमंडळ विस्तार तसेच विविध महामंडळांवर महायुतीमधील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितपवार गट) या प्रमुख तीन पक्षांसह अन्य घटक पक्षांमधील नेत्यांच्या नियुक्त्या करण्यात येणार आहेत. याबरोबरच गेल्या दहा वर्षांपासून कार्यरत असलेली पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीदेखील बरखास्त करुन नवीन मंदिर समितीची निर्मिती केली जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या दहा वर्षात विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने कोरोनाच्या काळात केलेले नियोजन तसेच भाविकांना केंद्रस्थानी मानून केलेल्या कार्याचा घेतलेला लेखाजोखा..

# कोरोना काळात निभावले सामाजिक उत्तरदायित्व



## पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीची कामगिरी; दहा वर्षांच्या काळात भाविकांसाठी विविध उपाय योजना

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर, मंदिर समितीने सामाजिक उत्तरदायित्व व मानवतावादी भूमिकेतून अनेक समाजोपयोगी कामे या कालावधीत केली. त्यामध्ये प्रामुख्याने मुख्यमंत्री सहायता निधीला एक कोटी रूपयाची मदत, उपजिल्हा रूग्णालय पंढरपूर यांना पाचशे पीपीई किट (८२ हजार), तीन नग हाय फलो ऑक्सिजन मशीन (९ लक्ष) व रूग्णवाहिका उपलब्ध करून दिली. तसेच पंढरपूर शहरातील निराधार व परराज्यातील मजुरांना तीन महिने दैनंदिन दोन वेळा फुड पॅकेट वाटप (अंदाजे पंधरा लक्ष खर्च), पंढरपूर शहरातील भटक्या जनावरांना तसेच बार्डीच्या (ता. पंढरपूर) वनक्षेत्रातील वनगाईंना व इतर वन्यजीवांना चारा-पाण्याची सोय (तीन लक्ष अंदाजे खर्च), परजिल्ह्यातील व परराज्यातील मजुरांना निवास व्यवस्थेसाठी व विलगीकरण कक्षासाठी वेदांता, व्हिडिओकॉन, एमटीडीसी असे तीन भक्तनिवास प्रशासनास उपलब्ध करून दिली. कोविड रूग्णालयातील कर्मचारी वर्गासाठी श्री विठ्ठल-रूक्मिणी भक्तनिवास (एक विंग) व व्हिडिओकॉन भक्तनिवास उपलब्ध करून दिले. तसेच पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांना तीन महिने पन्नास कमांडोज (खर्च १२ लक्ष) व उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंढरपूर व नगरपरिषद, पंढरपूर यांना २५ लिपीक, सेवक संवर्गातील कर्मचारी उपलब्ध करून दिले. याशिवाय, पूरपरिस्थितीमध्ये मंदिर समितीने तीन हजारांहून अधिक नागरिकांच्या भोजनाची व निवासाची व्यवस्था केली.

### गुणात्मकदृष्ट्या आषाढी, कार्तिकी यात्रांचे नियोजन

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी १२ ते १५ लाख लोकांची आषाढी व कार्तिकी वारी साजरी करता आली नाही. परंतु, संख्यात्मकदृष्ट्या कमी पण गुणात्मकदृष्ट्या भरलेली आषाढी व कार्तिकी वारी आयोजित केली. कोरोना कालावधीतील श्रींचे सर्व नित्योपचार परंपरेनुसार सुरू ठेवले. त्याच्या स्वरूपात किंवा तिच्या पध्दतीत कोणत्याही प्रकारचे खंड न पाडता किंवा व्यत्यय न आणता मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन पूजोपचार चालू ठेवण्यात आले. तसेच इतर सणवार, उत्सव परंपरेनुसार साध्या पध्दतीने साजरे करण्यात आले. तसेच प्रातिनिधिक वारी आधुनिक समाज-माध्यमांचा वापर करून घराघरात पोहोच केली.

### श्रींचे दर्शन सुलभ व जलद होण्यासाठी विविध उपाययोजना

श्रींचे दर्शन सुलभ व जलद होण्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडपातील आठ गाळ्यापैकी दोन गाळ्यातून रांग सुरू ठेवली. याशिवाय, कमांडोज नियुक्ती, भाविक मोजणी मशिन बसूवन आवश्यक त्या उपाययोजना केल्या. तसेच यात्रा कालावधीत रांगेत बॅरीकेटींग, उड्डाणपुल, पत्राशेड, कुलर-फॅन, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बॅग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा - खिचडी वाटप इ. व्यवस्था करण्यात येत आहे.

### मंदिर जतन आणि संवर्धनाचे काम घेतले हाती

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर हे खूप जूने, ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि स्थापत्यशास्त्रीय महत्व असणारे मंदिर आहे. हे मंदिर दुरूस्तीला आल्याने, त्याचा जतन व संवर्धनाचा आराखडा तयार करून शासनाच्या निधीतून या कामास प्रत्यक्ष सुरवात केली. त्यामध्ये गाभा-यांतील काम पूर्ण केले आहे. सदर मंदिर लवकरचं मुळ रूपात येईल. याशिवाय, मोबाईल बंदी, व्हिआयपी व ऑनलाईन दर्शन पासवर निर्बंध, मुर्तीस पुरातत्व विभागामार्फत वज्रलेप, मंदिर समिती मार्फत लाडूप्रसादाची निर्मित्ती, मोबाईल लॉकर्स, दर्शनमंडपातील दवाखान्याचे आधुनिकीकरण, ध्वजस्तंभ बसविणे इत्यादी महत्वपूर्ण निर्णय घेणत आले. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील व मंदिराबाहेरील परिवार देवतांच्या भंग पावलेल्या मुर्ती विधिवत पुजा करून नव्याने स्थापित केल्या.



**महेश भंडारकवठेकर**

मो. ७५८८०२०७६६



### सण, उत्सवाच्या वेळी फुलांची आरास

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात विविध सण व उत्सवानिमित्त फुलांची आरास व विद्युत रोषणाई, यात्रा कालावधीत भाविकांच्या पायांना खडे टोचू नये म्हणून दर्शनरांगेत मॅटींग, एकादशीला शाबुदाणा खिचडी वाटप, द्वादशीला तांदळाची खिचडी व बुंदी वाटप, मिनरल वॉटर, चहा, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल इ. उपक्रम सुरू केले.

### स्कायवॉक व दर्शन हॉलसाठी तत्त्वतः मंजुरी

श्रींच्या दर्शनरांगेत कायमस्वरूपी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने स्कायवॉक व दर्शनहॉल बांधकाम करणेकामी आराखडा तयार करून त्यास कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांची तांत्रिक मान्यता घेऊन, उक्तकामी रू.१०३ कोटी इतका निधी मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर केला असून, त्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्वत: मंजुरी दिली आहे, तशी घोषणा देखील आषाढी एकादशीला केली आहे.

### मंदिर समिती कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग

मंदिर समिती कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग, पगारी रजा-सुट्टया, नित्यपुजेचा लाभ, गणवेश, ओळखपत्र, सेवा शर्ती लागू करणे, कर्तव्य सुची निश्चित करून देणे, विमा पॉलीसी अशा प्रकारच्या सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या. भाविकांची वाढती पुजेची मागणी विचारात घेऊन, नित्यपुजेत दोन भाविक कुटुंबियांचा सहभाग व तुळशी पुजेची सुरवात केली. त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### ग्रीन बिल्डिंग प्रमाणपत्रप्राप्त ३०० खोल्यांचे सुसज्ज भक्तनिवास इमारत

भाविकांना चांगल्या दर्जाची निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तीनशे खोल्यांची सुसज्ज अशी श्री. विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवासाची इमारत उभी केली. यामध्ये तबक उद्यान, उद्वाहन, ऑनलाईन बुकींग, गरम पाण्याची सोय, उपहारगृह, हॉल, प्रशस्त पार्किंग, वातानुकुलित यंत्रणा व इतर अनुषंगीक अशा अत्याधुनिक सोयी सुविधा आहेत. या इमारतीस ग्रीन बिल्डींग प्रमाणपत्र मिळाले असून, असे प्रमाणपत्र मिळालेली जिल्ह्यातील ही एकमेव इमारत असावी. याव्यतिरिक्त वेदांता व व्हिडीओकॉन भक्तनिवास देखील उपलब्ध असून, या तिन्ही भक्तनिवासातून एक हजार ५०० भाविकांची निवासाची सोय होत आहे.

### अन्नछत्रात मोफत प्रसाद सुविधा

> कोरोना कालावधीत मंदिर समिती मार्फत संख्यात्मक ऐवजी गुणात्मकदृष्ट्या मदत व सर्व प्रथा - परंपरांचे पालन करण्याचे महत्वाचे नियोजन मंदिर समिती मार्फत करण्यात आले. दर्शनरांगेत पुरेसा सोई सुविधा निर्माण करून भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून दिले. या बरोबरच मंदिर समितीच्या उत्पन्नात भरघोस वाढ देखील करण्याचा कसोशीने प्रयत्न केला गेला आहे.
>
> **- गहिनीनाथ महाराज औसेकर,**
> सहअध्यक्ष, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर

श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रातील भोजन प्रसादामध्ये बदल करून दुपारी व सायंकाळी असे दोन वेळा प्रसाद उपलब्ध करून देण्यास सुरवात केली. त्याचा दैनंदिन सुमारे तीन हजार भाविक लाभ घेत आहेत.

### पुरातन अलंकारांसह भाविकांनी भेट दिलेल्या अलंकार आणि वस्तूचे जतन

श्रीस परिधान करण्यात येणारे मौल्यवान दागदागिन्यांचे मुल्य, अमुल्य असून सदरचे अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहे, यासर्व अलंकाराचे जतन करण्यात आले आहे. तसेच भाविकांकडून आतापर्यंत सुमारे ४० किलो सोने व एक हजार १५० किलो चांदीच्या वस्तू भेट प्राप्त झालेल्या आहेत.

### कम्युनिटी रेडीओ केंद्र सुरू करण्याची कार्यवाही सुरू

मंदिरात भजन, किर्तन व सप्ताह अशा प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांना चांगले व्यासपीठ मिळवून देणे व या कार्यक्रमांचा आनंद भाविकांना घरबसल्या उपलब्ध करून देण्याबाबत कम्युनिटी रेडीओ केंद्र सुरू करण्याची कार्यवाही सुरू केली.

### वार्षिक उत्पन्नात भरघोस वाढ

वारकरी भाविकांकडून चांगले दान मिळत असून, आता मंदिर समितीचे वार्षिक अंदाजपत्रक १५ ते २० कोटी वरून ६५ ते ७० कोटी झाले आहे.

एकंदरीत, या सर्व कार्यात प्रशासन, वारकरी संप्रदाय व मंदिर समितीने चांगला समन्वय ठेवून वारकरी-भाविकांना केंद्रबिंदू मानुन मंदिर समितीकडून आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

---

मूळचा सोलापूरचा असलेला, सोलापूरच्याच सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये शिकलेला अर्शिन अतुल कुलकर्णी याच्या क्रिकेटमधील खेळाची चुणूक त्याच्या आज्जी, आजोबांना अगदी शालेय वयातच जाणवली आणि त्याचे डॉक्टर असलेले आई (आसावरी) वडील (अतुल) यांचे प्रोत्साहन मिळाल्याने शालेय क्रिकेट स्पर्धेत सरस कामगिरी बजावली. आणि तेंव्हाच त्याची निवड महाराष्ट्राच्या १६ वर्षाखालील मुलांच्या संघात झाली आणि तिथून त्याच्या क्रिकेटमधल्या उत्तुंग यशाला सुरूवात झाली.

# तब्बल १८ वर्षानंतर रणजीमध्ये सोलापूरचा अर्शिन कुलकर्णी

अर्शिननेन महाराष्ट्र ज्युनिअर संघाकडून खेळताना देशांतर्गत स्पर्धेत पश्चिम विभागच्या अनेक सामन्यात बहारदार खेळ केला. त्याने पुण्यातील केडन्स क्रिकेट अकादमीमध्ये पुढील अद्ययावत प्रशिक्षण घेण्यास सुरूवात केली. तत्पूर्वी अर्शिनची क्रिकेट आवड पाहता ६व्या वर्षापासूनच त्याला प्रशिक्षणासाठी साऊथ सोलापूर क्रिकेट क्लबमध्ये त्याचे वडील डॉ. अतुल कुलकर्णी यांनी घातले. तेथे प्रशिक्षक अशोक टिळक आणि त्यानंतर उत्कृष्ठ क्रिकेटपटू (स्व.)सलीम खान यांनीही त्याला मार्गदर्शन केले. सेंट जोसेफ स्कूलमध्ये राजेंद्र गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने शालेय स्पर्धा गाजविल्या. त्याला जिल्हा स्पर्धेसाठी उदय डोके आणि चंद्रकांत रेंबर्सु यांचेही मार्गदर्शन लाभले. सोलापूर जिल्ह्याकडून १४ वर्षाखालील गटात दोन वर्ष खेळताना त्याने उत्तम सादरीकरण केले. सुरुवातीला फिरकी गोलंदाज बनण्याचे त्याचे स्वप्न होते पण त्याचे क्रिकेटर असलेले आजोबा यांनी त्याला फलंदाजीमध्ये निष्णात करण्याचे ठरविले. क्रिकेटचे बाळकडू त्याला घरातच मिळाले असल्याने आणि त्याच्या आई वडिलांनी त्याला पूर्ण सहकार्य केल्याने त्याने फलंदाजीमध्ये चुणूक दाखवली. दरम्यानचे काळात, कोरोना मुळे सगळीकडे खेळाचा सराव आणि सामने बंद असताना त्याचे वडिलांनी त्याला घरातच अस्ट्रोटर्फचे पीच(खेळपट्टी) बनवून दिली आणि त्यावर त्याने दिवसातले ६ तास बॉलिंग मशीनद्वारे फलंदाजीचा सराव केला. कॅडन्स मधील प्रशिक्षक हर्षल पाठक आणि नंतर निखिल पराडकर यांच्या योग्य मार्गदर्शनात अर्शिन तयार होत गेला.

### सैद मुश्ताक अली टी ट्वेंटी स्पर्धेसाठी निवड

२०२१-२२ या सिझनमध्ये कूच बिहार स्पर्धेत ७ सामन्यात ११ डावात ४५ पेक्षा जास्तीची सरासरी राखत सर्वोच्च १७० धावांची खेळी करत ४५९ धावा केल्या होत्या. त्याच वर्षी मर्यादित षटकांच्या विनू मंकड स्पर्धेत देखील ८ सामन्यात २५५धावा आणि २०२२-२३ मध्ये त्याच स्पर्धेत ८ सामन्यात २-२ शतके अर्धशतक साजरे करत ११९ सर्वोच्च धावा करताना ५७ची सरासरी राखत स्पर्धेत सर्वाधिक ३९९ धावा पण केल्या. तर कूच बिहार स्पर्धेत ५०च्या सरासरीने ५ सामन्यात ७ डावात ३५६ धावा काढल्या. आणि त्याच्या याच खेळीच्या जोरावर त्याने राष्ट्रीय पातळीवर भारताच्या ज्युनियर संघाच्या निवड समितीचे देखील लक्ष वेधले आणि त्याला बंगलोर येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये भारताचे अनेक ज्येष्ठ, वरिष्ठ, प्रतिथयश खेळाडूंच्या मार्गदर्शनात खेळ आणखी बहारदार करण्यासाठी बोलाविले गेले. तिथून त्याने मागे पाहिलेच नाही, गेल्या वर्षी २०२३-२४ या सिझनमध्ये देशांतर्गत अनेक स्पर्धा-विनू मंकड (२ सामने २६६ धावा, १०५ सर्वोच्च, ८२ सरासरी) कूच बिहार, चॅलेंजर ट्रॉफी मध्ये देखील दमदार खेळी केली. आणि त्याचेच बक्षीस म्हणून त्याची महाराष्ट्राच्या वरिष्ठ संघात सैद मुश्ताक अली टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली. त्यातील ६ सामन्यात त्याने १२१ धावा केल्यानंतर तो आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यासाठी दुबईला जाऊन आल्यावर दिल्ली येथे महाराष्ट्राच्या रणजी संघाकडून त्याला सर्व्हिसेस विरुद्ध एक सामना खेळत रणजी पदार्पणची संधी मिळाली व त्या सामन्यात पहिल्या डावात २ धावा केल्यानंतर दुसऱ्या डावात ५८ धावा करत २ गडी टिपले.



**मिलिंद गोरे**

मो. ९४२००८८४००

### १९ वर्षाखालील भारतीय संघात

देशांतर्गत खेळल्या जात असलेल्या या विविध स्पर्धांमध्ये अर्शीनकडून धावांचा रतीब घातला जात असल्याने आणि सोबत गोलंदाजची भूमिका निभावत बळी घेत असल्याने त्याची निवड १९ वर्षाखालील मुलांच्या भारतीय संघात झाली. एमसीए १६ वर्षाखालील मुलांच्या संघाकडून खेळताना अनेक उत्कृष्ठ खेळी केल्याने १९ वर्षाखालील निवड समितीने अर्शिनची दखल घेतली. हर्षल पाठक यांनी त्याच्यात अमुलाग्र सकारात्मक बदल घडवत तसेच महाराष्ट्राचा रणजी संघाचा माजी कर्णधार राहिलेला निखिल पराडकरने त्याच्या फलंदाजीमध्ये अधिक आक्रमकपणा आणला आणि त्याचे फलीत पाहायला मिळाले ते बीसीसीआयच्या १९ वर्षाखालील मुलांच्या आंतरराज्य कुचबिहार, विनू मंकड क्रिकेट स्पर्धेत. मागच्याच वर्षी दुबई येथील आशिया चषक स्पर्धेत जबरदस्त फटकेबाजी आणि अष्टपैलू खेळीमुळे त्याला साऊथ आफ्रिकामध्ये झालेल्या आयसीसी १९ वर्षाखालील मुलांच्या वर्ल्डकप मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली व तिथे देखील त्याने चांगले प्रदर्शन करत आयपीएलसाठी आपली दावेदारी नक्की केली.



### आयपीएलमध्ये लखनऊ सुपरजायन्ट्स कडून प्रतिनिधित्व


आत्तापर्यंत अर्शिनने आशिया कप (५ सामने), वर्ल्ड कप मध्ये (७ सामने) विविध देशा सोबत १२ सामने खेळले असून १ शतक, अर्धशतक लगावले असून ३९५ धावा केल्या आहेत त्या ३५.९० चे सरासरीने. आणि त्याचेच बक्षीस म्हणून त्याला लखनऊ सुपरजायन्ट्स संघाने विकत घेतले. सोबतच महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने सुरू केलेल्या एम.पी.एल. या प्रतीतयश स्पर्धेत त्याला नाशिक संघाने विकत घेतले आणि तिथे देखील त्यांनी आपला बहारदार खेळ चालूच ठेवला. मागच्या वर्षीच्या एमपीएल मधली त्याची तडफदार शतकीय खेळी, ती पण भारतीय संघातील खेळाडू ऋतुराज गायकवाडचे संघाविरुद्ध केलेली सबंध देशभर गाजली आणि त्यामुळेच आयपीएलमध्ये त्याला संधी मिळाली. नव्याने सुरू झालेल्या पहिल्या वहिल्या एमपीएल स्पर्धेत अर्शिनने विशेष छाप सोडली आणि त्याचे उत्तुंग फटके, सामना जिंकताना साठी टिच्चून केलेली गोलंदाजीचे त्याचे व्हिडिओ तुफान व्हायरल होऊ लागले. सोशल मीडियावर युवा खेळाडू सोबतच अनेकांचा तो फेवरेट खेळाडू बनला. त्यादरम्यान त्याला एनसीए मध्ये पुढील प्रशिक्षणसाठी स्पर्धा अर्धवट सोडून जावे लागले पण ३ सामन्यात १९५ धावा आणि ५ बळी घेत त्याने



आपल्या खेळाची चुणूक दाखवून दिली. यावर्षीच्या एमपीएलचे आधी त्याला आयपीएलमध्ये केवळ २च सामने त्याला खेळायला जरी मिळाले तरी भारताच्या संघातील सर्व उत्कृष्ठ खेळाडूंचा खेळ त्याला अगदी जवळून बघता आला. अनेक प्रतिथयश खेळाडूंचे त्याला अनमोल मार्गदर्शन आणि महत्त्वाच्या टीप्स लाभल्या. विशेषतः महाराष्ट्राचा माजी कर्णधार आंतरराष्ट्रीय खेळाडू केदार जाधवचे त्याला विशेष मार्गदर्शन आणि पाठिंबा राहिला तसेच एमसीए अध्यक्ष आमदार रोहित पवार यांचा देखील तो लाडका खेळाडू ठरला. या वर्षीच्या एमपीएल स्पर्धेत देखील अर्शिनचा जबरदस्त जलवा बघायला मिळाला. तिथे देखील त्याने १३ सामन्यात ३०७ धावा आणि १२ बळी अशी जबरदस्त खेळी करत सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार पटकावला तो त्याच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर. एमपीएल मध्ये त्याने फलंदाजीसोबतच गोलंदाजीमध्ये देखील नवा चेंडू टाकत महत्त्वाचे बळी घेतले आणि पुन्हा एकदा वरिष्ठ निवड समितीचे लक्ष वेधले.

### प्रशिक्षक सुलक्षण कुलकर्णी त्याला घडवत आहेत

गेल्या महिन्यात राज्यातील सर्वोत्कृष्ट ४० खेळाडूंचे सराव सामने सोलापूरातच पार पडले आणि अर्शिनची निवड रणजी संभाव्य संघात २८ खेळाडूमध्ये झाली असून कर्णधार ऋतुराज गायकवाड, राहुल त्रिपाठी, अंकित बावणे, मुकेश चौधरी, प्रशांत सोळंकी, विकी ओस्तवाल, निखिल नाईक या आंतर राष्ट्रीय-आयपीएल खेळाडू सोबत अझीम काझी, सत्यजित बच्छाव, हितेश वाळुंज यांच्यासह संघाचा सराव सोलापूरात इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर चालू असून तो रोज तिथे घाम गाळत असून यावर्षी त्याच्या कडून महाराष्ट्राला चांगल्यात चांगल्या कामगिरीची अपेक्षा असून संघाचे नवीन प्रशिक्षक सुलक्षण कुलकर्णी हे त्याला घडवत आहेत.







PRECISION where Passion meets Performance

EMOSS FUTURE INSIDE

# इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात प्रिसिजन – इमॉसची कामगिरी

प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड आणि इमॉस इंडियाने इलेक्ट्रिक मोबिलिटी व्यवसायाच्या क्षेत्रात सन २०२३ या एकाच वर्षात लक्षणीय कामगिरी केली. इलेक्ट्रिक मोबिलिटीमधील संशोधन, उत्पादन सुविधा निर्माण करणे, ग्राहक आधार वाढवणे, वितरण व्यवस्था निर्माण करणे अशा सर्वच विभागात भविष्यवेधी कामगिरी पार पडली आहे. इमॉस इंडियाने इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील एक सर्वोत्तम टीम उभी केली आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या बाजारपेठेत व्यावसायिक वाहन आणि विशिष्ट सेवा क्षेत्रामध्ये प्रचंड वाढीची क्षमता आहे. इमॉस ही कंपनी इलेक्ट्रिक वाहन विभागातील विकासात आघाडीवर राहण्यासाठी सदैव कार्यरत आहे.

आमच्या कंपनीने नेदरलँड मध्ये एकूण ६०० हून अधिक वाहने रेट्रोफीट केली आहेत.भारतातील आमची EV टीम आता हे तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचे स्थानिकीकरण करत आहे.

प्रिसिजनची मजबूत आर्थिक भागीदारी आणि ३० वर्षांहून अधिक काळ ऑपरेशन्स आणि मॅन्युफॅक्चरिंगचा अनुभव याचा फायदा इमॉस इंडियाला नक्की होणार आहे. भविष्यातील होणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांच्या क्रांतीसाठी आम्ही आता सज्ज आहोत.



करण शहा
कार्यकारी संचालक

## ई– एलसीव्हीचे ग्राहकांना हस्तांतरण

नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२३ मध्ये आम्ही रिपॉवर केलेल्या ई–एलसीव्ही काही महत्वपूर्ण ग्राहकांना वितरित केल्या. या गाड्यांच्या माध्यमातून आमच्या संशोधनाचा एक सकारात्मक परिणाम ग्राहकांच्या व्यवसायावर आणि पर्यावरणावर होताना दिसतो आहे.

देशभरातल्या विविध क्षेत्रातील हे ग्राहक आहेत. गाडीबद्दलची विश्वासार्हता, तत्परता आणि परफॉर्मन्स याबाबत ग्राहकांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी हे महत्वपूर्ण पाऊल होते.

पर्यावरणपूरक वाहतूक, कार्बन वायुचे उत्सर्जन कमी करणे आणि हरित भविष्याकडे वाटचाल करणे या बाबी या भागीदारांमधला समान धागा आहे.आम्हाला सांगायला अभिमान वाटतो की, आम्ही आमच्या पहिल्याच इलेक्ट्रिक वाहनामध्ये ९० टक्के सुटे भाग हे भारतीय बनावटीचे आहेत.

सगळ्या ई–एलसीव्ही गाड्यांची जोडणी भारतातच आणि भारतीय ग्राहकांसाठीच करण्यात येते. या नव्या प्रवासात आमचे पुरवठादार, ग्राहक आणि संपूर्ण टीमची खूप मोठी साथ लाभली. या सर्वांचे पाठबळ व कंपनीचे चेअरमन यतिन शहा तसेच संचालक व सीएफओ रवींद्र जोशी यांचे मार्गदर्शन हे वेगळं काही करण्याच्या आमच्या ध्येयासाठी मोठी ऊर्जा देते. सर्वात महत्वाचे इमॉसवर विश्वास दर्शवून इलेक्ट्रिक वाहनांच्या भविष्यातील वाटचालीत भागीदार झाल्याबद्दल आमच्या सर्व ग्राहकांचे मनापासून आभार.



"ई–एलसीव्ही च्या उत्पादनासाठी सोलापुरात अत्याधुनिक उत्पादन कारखाना सुरू करून २०२३ या वर्षाची सुरुवात झाली. या प्लान्टमुळे ई–मोबिलिटी क्षेत्रातील नाविन्य, संशोधन आणि उत्कृष्टता साध्य करण्याच्या दिशेने प्रिसिजनने मोठी झेप घेतली आहे. हलक्या व्यापारी वाहनांचे (ई–एलसीव्ही) विद्युतीकरण करणे याच उद्देशाने या प्लांटची उभारणी करण्यात आली. एका शिफ्टमध्ये, एका स्टेशनवर संपूर्ण एलसीव्ही गाडीचे इलेक्ट्रिफिकेशन करण्याची क्षमता या प्लांटमध्ये आहे.

वाढत्या गरजेनुसार नजिकच्या भविष्यात चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील नव्या कारखान्यात या ई–एलसीव्ही उत्पादनाचं विस्तारीकरण केलं जाणार आहे. प्रिसिजन आणि इमॉसच्या टीमने एकाच वर्षात लक्षणीय कामगिरी केली आहे. या यशामध्ये टीमचे कौशल्य, तंत्रसिद्धता आणि समर्पण वृत्ती याचा मोठा वाटा आहे. कंपनीच्या सर्वच विभागातील कामात नवीन दृष्टीकोन, कौशल्ये आणि अनुभव देणाऱ्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील सदस्यांचे टीममध्ये स्वागत करण्यासाठी आम्ही नेहमीच उत्सुक असतो . ई–मोबिलिटी क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. इमॉस इंडियाची इंजिनिअरिंग टीम आता बाणेर, पुणे येथील कार्यालयात आणि उत्पादनाची टीम सोलापुरातील प्लांटमध्ये कार्यरत आहे.

आपल्या मर्यादांच्या पलिकडे जात काम करणे हाच आमच्या प्रवासाचा आत्मा आहे, मागच्या वर्षी 'टाटा एस आणि अशोक लेलँडची दोस्त' या दोन गाड्यांचे इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर प्रिसिजनने केले. त्यासाठी टीमने अथक मेहनत घेतली. यातून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि वाहतुकीसाठी शाश्वत पर्याय देणे याबाबत असलेली आमची बांधिलकी दिसून येते. हे करत असताना भारतातील परिस्थिती आणि इथली आर्थिक स्थिती याबद्दलही आम्ही सजग होतो. गाडीची एका चार्जिंगमधील रेंज आणि बॅटरी पॅकबाबत आम्ही उत्तम पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. या इलेक्ट्रिक गाडीच्या पेलोडमध्ये – वजन वाहून नेण्याच्या क्षमतेमध्ये – कुठेही तडजोड न करता एका चार्जिंगमध्ये १०० किलो मिटर्सची शहरांतर्गत वाहतुक करू शकणारी वाहने आम्ही ग्राहकांकडे सुपूर्द केली आहेत.






सोलापूर महानगर पालिकेच्या आयुक्त शीतल तेली उगले यांना ई–एलसीव्हीची चावी प्रदान करताना यतिन शहा व करण शहा



पुणे मनपा आयुक्त विक्रम कुमार व अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांना ई–एलसीव्हीची चावी प्रदान करताना करण शहा.



सोप्पा या ट्रान्सपोर्टेशन,सप्लाय चेन व स्टोअरेज क्षेत्रातील कंपनीच्या अधिकाऱ्यांना चावी प्रदान करताना मा. करण शहा.



प्रिसिजनची इमॉस इंडिया आणि ब्लुव्हील्झ यांच्यात टाटा एस एलसीव्हीच्या विद्युतीकरणासाठी धोरणात्मक भागीदारी

## दै. सोलापूर तरुण भारत च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

*With Best Compliment From*



Sahakar Maharshi Shanakarrao Mohite-Patil
Ratnaprabhadevi Shankarrao Mohite-Patil

सातत्य, साहस, निष्ठा
SHREE SHIVPARVATI SARVAJANIK VIKAS TRUST
AKLUJ




**Hon.Mr.Vijaysinh Mohite-Patil**
Former Deputy Chief Minister







**ADMISSION OPEN**





- **THE GREENFINGERS SCHOOL, SHANKARNAGAR - AKLUJ**
  Affiliated to Central Board of Secondary Education.
  Co-ed Boarding School From KG to std. 10th.
  **Ph. (02185) 222325 * Email : gfsakluj@gmail.com * www.gfsakluj.com**

- **GREENFINGERS COLLEGE OF COMPUTER & TECHNOLOGY, SHANKARNAGAR-AKLUJ**
  Affiliated to Solapur University. BCA, B.Sc. (ECS), MCA, M.Sc. (Computer Science)
  **Ph. (02185) 223225 * Email : greenfingerscollege@rediffmail.com**
  **www.gfcct.in**

- **GREENFINGERS GLOBAL SCHOOL, KHARGHAR, NAVI MUMBAI**
  Affiliated to Central Board of Secondary Education.
  **Ph. (022) 27745420 * Email : admin@greenfingersglobalschool.com**
  **www.greenfingersglobalschool.com**

- **GREEN FINGERS AYURVEDA HOSPITAL AND MEDICAL RESEARCH CENTRE, SHANKARNAGAR-AKLUJ**
  **Mob : 94235 53333/86685 11922 * Email : shivparvatiakluj@gmail.com**

- **VIJAY CAREER ACADEMY, AKLUJ**
  UPSC, MPSC, PSI, STI, ASST., STAFF SELECTION, BANKING, POLICE TRAINING,
  PERSONALITY DEVELOPMENT ACADEMY. **Ph : 9527301000 * Email : vcaakluj@gmail.com**

SWAMIRAJ ADS.9503773073

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students

# SHRI SHIV-PARVATI SARVAJANIK VIKAS TRUST, SHANKARNAGAR-AKLUJ

TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS) ■ Phone : 8668511922 ■ Email - shivparvatiakluj@gmail.com

ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024 KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION



# ज्ञान, संस्कार व गुणवत्तेचे प्रकाशकेंद्र

## सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

**व्यक्तीचा विकास, समाजाची प्रगती आणि राष्ट्राचा सर्वांगीण अभ्युदय चिरंतन स्वरूपात होण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही. श्रेष्ठ दर्जाचे शिक्षण हे मानवी जीवनासाठी प्रकाश आणि प्रगतीचे वरदान आहे. ते माणसाला सुंदर करते, समृद्ध करते आणि सशक्तही बनवते. त्याचबरोबर 'स्व'चा 'सर्वस्व' पर्यंतचा होणारा विकास केवळ एका चांगल्या शिक्षणामुळेच होत असतो. हा विचार प्रमाण मानून शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून तालुक्यातील मुलांच्या दर्जेदार शिक्षणासाठी व त्यातून समाजाच्या बांधणीचे व देशाच्या उभारणीसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचा गुणात्मक व रचनात्मक विकास करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन थोर स्वातंत्र्यसेनानी, देशभक्त गुरुवर्य चंद्रशेखर विश्वनाथ तथा बापूसाहेब झपके यांनी ३ मार्च १९५२ रोजी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या रुपाने ज्ञान, संस्कार व गुणवत्तेचे प्रकाशकेंद्र उभे केले.**

**प्रा. धनाजी चव्हाण**
मो. ८२७५०२५१५१



### एक लोकोत्तर व्यक्तिमत्त्व

१९५२ साली सांगोला विधानसभेची निवडणुकीची संधी चालून आलेली असतानाही स्वातंत्र्यसेनानी बापूसाहेब झपके यांनी ही संधी नम्रतापूर्वक नाकारून माझे राजकारण हे करीअर नसून शैक्षणिक चळवळीमध्ये काम करायचे आहे असे सोबतच्या सहकाऱ्यांना सांगितले. १९५२पूर्वी सांगोला तालुक्यात केवळ प्राथमिक शिक्षणाची सोय होती. त्यापुढील शिक्षणासाठी पंढरपूर किंवा सोलापूरला जावे लागत होते. कायम दुष्काळी भाग असलेल्या सांगोला तालुक्यातील लोकांना दिवसभराच्या पोटापाण्याची भ्रांत असताना शिक्षणासाठी पैसे कुठून आणायचे? हा प्रश्न असल्यामुळे अक्षर ओळख होईपर्यंत मुलांचे शिक्षण घेत असायचे. पुढील शिक्षणाची सोय नाही म्हणून शाळा सोडून द्यावी लागे. शाळा सुटल्यामुळे एक तर या मुलांना शेतामध्ये काम करावे लागे किंवा कोणाच्या दुकानात चाकरी करावी लागत असे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन सर्वप्रथम सांगोला विद्यामंदिरच्या माध्यमातून आपल्या विचाराने आणि कर्तृत्वाने व सकस अध्यापनाने गुरुवर्य बापूसाहेबांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा, कौशल्यांचा, जीवनदृष्टीचा व जीवनशैलीचा विकास केला. एवढेच नव्हे तर प्रत्येक विद्यार्थ्याला अधिक उन्नत, अधिक व्यापक अधिक समृद्ध, अधिक निकोप, अधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच संस्थेतील अनेक विद्यार्थी नामवंत, ज्ञानवंत, कलावंत,व गुणवंत झाले व आजही हा प्रवास सुरू आहे.

संस्थापक अध्यक्ष



गुरुवर्य कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके

### उपक्रमशील संस्था

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शाखांमधील विद्यार्थी पुस्तकी ज्ञानाबरोबरच कला, साहित्य, वक्तृत्व, खेळ यांमध्ये परिपूर्ण व्हावेत यासाठी पोटतिडकीने प्रयत्न केले जात आहेत. गेली ४२ वर्षे संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य पूज्य बापूसाहेब झपके यांच्या स्मृतीसमारोहा निमित्त राज्यस्तरीय निमंत्रित पुरुषांच्या बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बास्केटबॉल खेळाविषयीची आवड निर्माण करून विविध खेळ प्रकाराच्या शालेय स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर यश मिळवता आले आहे. तसेच जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात येत आहे. त्यामुळे संस्थेतील विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेत राज्यस्तरावरती चमकले आहेत.

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी गुणवंत विद्यार्थी-पालक योजना, 'कै.गुरूवर्य बापूसाहेब झपके दीपस्तंभ योजना' अंतर्गत विविध स्पर्धा परीक्षा तयारी, भाषेविषयीची आवड व गुणवत्ता वाढीसाठी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सांगोला व सांगोला विद्यामंदिरच्या माध्यमातून 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. तसेच संस्थेतील विद्यार्थी जगाच्या स्पर्धेमध्ये कोठेच मागे पडू नये म्हणून बारावी नंतरच्या विविध देशपातळीवरील स्पर्धा परीक्षांची भीती विद्यार्थ्यांच्या मनातून निघून जावी यासाठी संस्था स्तरावर नामांकित शिक्षकांना बोलावून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते. त्यामुळे उपक्रमशील संस्था अशी ओळख निर्माण झाली आहे.



संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके

### नवे शैक्षणिक धोरण आणि दूरदृष्टी

आजवर स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थीच स्पर्धात्मक पॅटर्ननुसार अभ्यास करत असत. शालेय विद्यार्थी तर विविध बोर्ड पॅटर्नच्या पलीकडे अभ्यास करत नसत. मात्र, अशा साचेबद्ध अभ्यास पद्धतीमुळे गुणी विद्यार्थी भविष्यातील स्पर्धात्मकतेला तोंड देऊ शकत नाहीत ही गोष्ट लक्षात घेऊन सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने फाउंडेशन पॅटर्न तयार केला गेला. विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट व्हाव्यात, शालेय स्तरापासूनच त्यांना स्पर्धात्मक पॅटर्नचे प्रश्न सोडवण्याची सवय लागावी, विद्यार्थ्यांची शिकण्याची आणि अभ्यास करण्याची पद्धत अधिक एप्लीकेशन ओरिएंटेड असावी, अशी विविध उद्दिष्टे समोर ठेवून नवीन शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आली आहे.

### गुणवत्तेचा ध्यास असलेले विद्यमान संस्थाध्यक्ष

प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या आचार- विचार पाठीमागे मूल्यांचे तेज, विद्यार्थ्यांचा गुणात्मक व रचनात्मक विकासाठीचा ध्यास आहे. त्यामुळेच सांगोला विद्यामंदिर व विद्यामंदिर परिवारातील प्रत्येक शाखेची चौफेर प्रगती झालेली दिसत आहे. आज सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संस्थेअंतर्गत एकूण ११ शाखा कार्यरत आहेत. पूर्व प्राथमिक इयत्ता बारावी पर्यंत सुमारे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून ३२५ पेक्षा अधिक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थापक अध्यक्ष पिताश्री कै. चं. वि. तथा बापूसाहेब झपके व माजी अध्यक्षा मातोश्री कै. शोभनतारा उर्फ बाईसाहेब झपके यांचे विचार व तत्व याला प्रमाण मानून संस्थेमध्ये नोकरीसाठी कोणत्याही स्वरूपाची देणगी घेतली जात नाही. त्यामुळे संस्थेत कर्मचारी म्हणून निवड होण्यासाठी फक्त आणि फक्त गुणवत्ता हा एकच निकष मानला जातो. त्यामुळे संस्थेत घडणारा प्रत्येक विद्यार्थी हा गुणवत्तापूर्ण आहे. त्यामध्ये एस.टी.एस, एम.टी.एस, स्कॉलरशिप, एन.एम.एम.एस, इन्स्पायर स्कॉलरशिप, चित्रकला, क्रीडा, वक्तृत्व स्पर्धेमध्ये तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीमध्ये येणारे विद्यार्थी, दहावी, बारावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी, विविध विषयांमध्ये शंभर पैकी शंभर गुण मिळवणारे विद्यार्थी, दहावी, बारावी बोर्ड परीक्षेत ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा चढता आलेख, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज व इतर शाखांना विविध तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर मिळालेले पुरस्कार या संदर्भात सिंहावलोकन करताना विद्यमान अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके सर्व संस्था सदस्य यांच्या मार्गदर्शनाखालील सकारात्मक व विधायक व्यवस्थापन याला प्रशासन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मिळालेली साथ यामुळे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या संस्थेची विजयपताका गगनात डोलत आहे याचा सार्थ अभिमान आहे.

माजी अध्यक्षा



कै. शोभनतारा उर्फ बाईसाहेब झपके

---

**आषाढी वारीत यावर्षी विज्ञान वारी काढूया गेल्याच वर्षी शैक्षणिक वारीचा उपक्रम झाला होता. मग विज्ञान वारीत काय करायचे? काय नवीन आणायचे? समाज प्रबोधन कसे करायचे त्याचबरोबर परंपरा संस्कृती भक्ती यालाही स्थान द्यायचे. हा विचार सुरू होता शेवटी ठरले की आपण या विज्ञान वारीत विठ्ठलाला बोलवायचे, तो माझ्या शाळेच्या छोट्या वारकऱ्यांसाठी नक्की येणार.**

# धन्य माझा विठ्ठल...



माझ्या शाळेच्या पंढरीत विठ्ठलाला बोलण्यासाठी विज्ञान वारीचे साकडे घातले गेले मोठे सुंदर अवकाश यान बनवले. सर्व विद्यार्थी व शिक्षक यात मग्न झाले. ते यान कसे उडवायचे आणखी त्यासाठी काय साहित्य बनवायचे मग त्यात ग्रह आले, तारे आले अंतराळवीर आले, वैज्ञानिक वस्तूंचा संग्रह आला जसे कीर्तनातून अभंगातून विठ्ठल नामाचा जागर होतो तसेच पथनाट्य सादर झाले पाऊले चालती विज्ञानाची वाट अंधश्रद्धेची सोडुनिया पाठ असे स्वर घुमले छोटे वारकरी ग्रंथदिंडी घेऊन पाऊल खेळत निघाले आणि खरंच त्या वारीत ज्ञानेश्वर मुक्ताई तुकाराम रखुमाई सगळे झाले माझा भोळा विठ्ठल ही मग कसा थांबेल तोही आमच्यात मिसळला. तो म्हणाला, अरे वेड्यांनो मी इथेच तर आहे, या चिमुकल्यात त्यांच्या हसण्यात खेळण्यात बागडण्यात हे सर्व जाती-धर्माचे पंथाचे संप्रदायाचे लोक एकत्र येऊन तल्लीन होतात तेव्हा ना कोणी गरीब ना कोणी श्रीमंत ना कोणी उच्च ना कोणी नीच सगळेच एका भक्तिमार्गावरील सेवक बनतात.

खरंच मित्रांनो त्या दिवशी मी माझ्या शाळेच्या पंढरीत विठ्ठल पाहिला आणि धन्य झाले. विठ्ठला मी जरी येऊ नाही शकले तरी तू मला माझ्या या विद्यार्थ्यात येऊन भेटत जा अशी मनोमन प्रार्थना केली धन्य माझी शाळा, धन्य माझा विठ्ठल, धन्य माझी पंढरी.



**निलम कांबळे**
मो. ९५२७८४८२६२

---


**सध्याच्या विज्ञान युगात आधुनिक काळामध्ये तरुण म्हटला की गुटखा चघळत फिरणारा, बेकारीने त्रस्त, वैफल्यग्रस्त व चित्रपटगृह व मोबाईल जगताकडे ओढ असणारा तरुण व तरुणी डोळ्यासमोर येतात. ही तरुण पिढी कुठेतरी भरकटत तर जाणार नाही ना? अशी शंकेची पाल मनामध्ये चुकचुकत असताना सांगोला शहरातील २०,२५ तरुणांनी एकत्र येऊन सद्गुरु श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर नाम साधना मंडळाची स्थापना केली. सध्या मंडळात दीडशे ते दोनशे साधक साधिका श्री महाराजांची उपासना सामुदायिक व वैयक्तिक पातळी करतात. यामध्ये रामरक्षा, करुणाष्टके, जपमाळ, पंचपदी, ध्यानधारणा अशा आध्यात्मिक गोष्टी चालु असतात. बौद्धिकवाद व अध्यात्मवाद या झगड्यात प्रापंचिकाचा कल बुद्धिवादाकडेच जास्त असतो. त्यांच्या मनाला परमार्थाची शिकवण देणाऱ्या गोष्टी या ठिकाणी अवलंबिल्या जातात.**

# सांगोल्यातील निसर्गरम्य आध्यात्मिक केंद्र-ध्यान मंदिर



मंडळाच्या स्थापनेपूर्वी प्रत्येक जण आपापल्या घरी वैयक्तिक पातळीवर नामस्मरण व उपासना करीत होता. पण श्री महाराजांनी सामुदायिक उपासनेला महत्त्व दिले आहे. त्यामुळे कै. सुनील बिडकर व हरी हरिदास या धडपड्या साधकांनी १९९५ सालातील नाथषष्ठी पासून या नामस्मरण तथा उपासनेला सामुदायिक स्वरूप दिले आणि बघता बघता अनेक स्त्री पुरुष साधक यात सहभागी झाले. श्री गोंदवलेकर महाराजांच्या विचाराचा, राम नाम स्मरणाचा प्रसार व्हावा म्हणून ही मंडळी झटू लागली. यातूनच पुढे ध्यानमंदिर वास्तुची संकल्पना पुढे आली आणि ध्यान मंदिराची उभारणी सुरू झाली. २००४ ते २००७ दरम्यान सांगोला-मंगळवेढा रोडवर सुंदर अशी ध्यान मंदिराची वास्तु उभी राहिली. २००७ ते २०१३ पर्यंत तीन मजले बांधून झाले. २००७मध्ये मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडला. २००८मध्ये ध्यान मंदिराच्या आवारातच श्री हनुमंताची ध्यानस्थमूर्ती, २०११ मध्ये श्री महाराजांची पंचधातूची मूर्ती आणि २०१३ मध्ये श्रीकृष्णाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली. तिसऱ्या मजल्यावर अध्यात्मिक लायब्ररीसाठी नियोजन केले आहे. श्री महाराजांच्या उपदेशानुसार कोणाला काही न मागता साधकांनी स्वनिधीतून व उत्स्फूर्तपणे दान देणाऱ्या दात्यांच्या सहकार्याने ही वास्तू उभी राहिली. वास्तू उभ्या राहतात आणि ओसही पडतात पण ध्यान मंदिरातील साधक भूमिपूजेपासून आजपर्यंत ध्यान मंदिरामध्ये उपासनेला दृढ चालवावे या भूमिकेतून सकाळ संध्याकाळ उपासना करतात. आज मंडळाचे एका साधकाच्या घरी दर गुरुवारी सकाळी जप उपासना नामस्मरण केले जाते. दररोज ध्यान मंदिरात पहाटेपासून पूजा आरती जप उपासना तसेच रात्री संत चरित्र वाचन, नमस्कार त्रयोदशी, दररोजचे प्रवचन वाचन होते.

दर पौर्णिमेला कीर्तन प्रवचन महाप्रसाद असतो. सर्व संतांच्या पुण्यतिथी, जयंती उत्सव कार्यक्रम मंदिरात होतात. श्रीराम नवमी, दास नवमी, श्री हनुमान जन्मोत्सव, श्री महाराजांची पुण्यतिथी, जयंती उत्सव इ.कार्यक्रम मोठ्या प्रमाणात उत्साहाने साजरे होतात. मंडळाने आज पर्यंत सर्वश्री राजीव दीक्षित, बाबा कदम, डॉ.दत्ता भोसले, द.मा. मिराजदार, वा.ना. उत्पात, ज्येष्ठ पत्रकार तथा निरूपणकार विवेक घळसासी, अभय भंडारी, ह.भ.प.डॉ.जयंत बोधले महाराज अशा विद्वानांची व्याख्याने, प्रवचने तसेच दीपक देशपांडे यांचा हास्यकल्लोळ, पंडित अजित कडकडे, भावगीतकार अरुण दाते, गायक जयवंत कुलकर्णी व पुष्पा पागधरे, सुवर्णा माटेगावकर यांचे गायनाचे कार्यक्रम आयोजित केले व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे. मंडळाने अशा अनेक कार्यक्रमाचे आयोजन करून अध्यात्मा बरोबर सामाजिक प्रबोधन करून एक वेगळा ठसा उमटलेला आहे.



ध्यान मंदिराच्या प्रांगणात आनंद सागर व्यासपीठ, श्री ब्रह्मानंद कोठी असून साधक निवास बांधण्याचा मानस आहे. ध्यान मंदिरात आलेल्या साधकाला व नातेवाईकांना, तसेच भेट देणाऱ्या नामप्रेमींना प्रसन्न वाटावे म्हणून येथील सर्व साधक स्वच्छता व सौंदर्य, पुष्पांची सजावट, पुष्प वाटिका, बगीच्या यासाठी विशेष प्रयत्न करतात. सांगोल्याच्या वैभवात, सौंदर्यात भर घालणारी ही वास्तू नुसतीच सुंदर नसून मनाला आत्मिक समाधान देणारी, प्रत्येकाला आपलीशी वाटणारी वास्तू आहे.

मंडळाच्या एकंदर उपक्रमामध्ये नाविन्यता असल्यामुळे सांगोल्यातील वैद्यकीय, स्थापत्य, न्यायालयीन, बँकिंग, चार्टर्ड अकाउंटंट, व्यापारी, नोकरदार अशा अनेक व्यक्ती पासून ते सामान्य नागरिकापर्यंत व तरुणापर्यंत या मंडळाचा व्याप वाढलेला आहे. श्री महाराजांच्या कृपा आशीर्वादाने हे काम वटवृक्षासारखे फोपावले आहे. यापुढे रोगनिदान शिबिरे, रक्तदान शिबिरे व वेगवेगळ्या प्रकारची व्याख्याने, कार्यशाळा आयोजित करण्याचे मंडळाने ठरविले आहे.

या मंडळामध्ये गेली २५ वर्षे मी साधनेत आहे. श्रींच्या पूजेचा मान मला मिळाला ही श्रींची कृपा आहे. आयुष्यात चढउतार आले. कधी मन सुखाने हुरळून गेले नाही की कधी दुःखाने पिचले नाही. ही मनाची समावस्था फक्त आणि फक्त श्री महाराजांच्या कृपा आशीर्वादामुळेच लाभली आहे. सांगोल्यातील सर्वांनी याचा लाभ घ्यावा.आपले नातेवाईक मित्र यांना घेऊन अवश्य भेट द्यावी असे मला वाटते. कोणत्याही प्रकारचा दुजेपणा नाही. राजकारण नाही. केवळ आत्मोन्नती आणि परमेश्वराशी शरणागती या उद्देशाने सर्वांनी यावे आणि श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या कृपेला पात्र व्हावे अशी सदिच्छा आहे.



**प्रद्युम्न कांबळे**
मो. ९४०३५१७५६८

**संकलन : दिपक लक्ष्मण भाकरे**


# 'नारीरत्न- भारत भूमीचे'

**काही तरी उत्तुंग करण्याची जिद्द बाळगावी, विचारांवर विश्वास ठेवावा आणि आपल्या कर्तृत्वाने ते साध्य करावे. कर्तृत्वाचे एक नाव ज्यांना मी प्रत्यक्ष भेटले नसले तरी त्यांचा मी मनापासून आदर आणि सन्मान करते.**



डॉ. दीपांजली माने
मो. ७३८५३०१०१२

संसद सदस्य (राज्य सभा) विद्यमान ८ मार्च २०२४. ज्या पद्मश्री, पद्मभूषण, पुरस्काराने सन्मानित आहेत. त्या उत्तम शिक्षक, अभियंता, सह संस्थापिका, शास्त्रज्ञ आणि आदर्श भारतीय महिला आहेत. ज्यांचे नाव सुधा नारायण मूर्ती. ज्यांना पित्याकडून विद्वत्ता, संस्कार प्राप्त झाले, वडील डॉ. आर. एच. कुलकर्णी व आई विमल कुलकर्णी. सुधाजी यांचे शिक्षण एम.ई, एम.टेक असून बीई एलेक्ट्रिकलची पदवी सुवर्ण पदकासह मिळवली आहे. सुधाजीनी संगणक शास्त्रज्ञ व अभियंता म्हणुन आपल्या करियरची सुरुवात केली. टेलको कंपनीमध्ये निवड झालेल्या त्या पहिल्या महिला अभियंता होत्या. या कंपनी साठी त्यांनी पुणे, मुंबई आणि जमशेदपूर येथे काम केले. पुण्याच्या ख्रायेस्त कॉलेज येथे त्या प्राध्यापिका होत्या. बेंगलोर विद्यापीठात त्या अभ्यागत प्राध्यापक असून इन्फोसिस च्या विश्वस्त म्हणूनही त्या काम पाहतात. त्या आवडीने समाज कार्यही करतात. त्या उत्तम लेखिका आहेत. त्यांनी मराठी, कन्नड आणि इंग्लिशमध्ये लिखाण ही केले आहे.इन्फोसीसच्या त्या सह संस्थापिका आहेत. या संस्थेकडून त्यांनी कर्नाटका तील ग्रामीण भागात संगणक आणि ग्रंथालये उपलब्ध करून दिली. त्यांनी एचडब्ल्यूआरडी विद्यापीठात मूर्ती क्लासिकल लायब्ररी या नावाचे ग्रंथालय सुरु केले.




त्यांनी बेंगलोर आणि ग्रामीण परिसर मध्ये १० हजारच्या वर शौचालये बांधली आहेत. तामिळनाडू आणि अंदमान येथे त्सुनामी काळात वेशेष सेवा कार्य केले. महाराष्ट्रात दुष्काळी प्रांतात वारंवार संस्था मदत कार्य देत असते. त्यांची दोन्ही मुले प्रथित यश मिळून संस्था आणि सामाजिक कार्यामध्ये ही योगदान देतात.त्या संसद सदस्य म्हणुन प्रथम संसदेत बोलल्या त्या वेळीही त्यांचे भाषण अभ्यास पूर्ण आणि समाज पूरकच होते. त्यांनी शासनाला अशी सुचना केली की किशोर अवस्थेतील मुलीना गर्भाशयाचा कर्क रोग होऊच नये यासाठीची जी लस दिली जाते ती मोफत देण्यात यावी आणि पोलिओ सारखे या रोगाचेही निर्मुलन व्हावे.

एक भारतीय म्हणुन तर मला आणि सर्वाना त्यांचा अभिमान आहेच पण एक नारीशक्ती ,एक आदर्श आई ,मुलगी, पत्नी, आणि समाज सेविका म्हणूनही मला यांचा अभिमान आहे.आशा आदर्श स्त्री ला कोण कडून प्रे रण मिळाले असेल ,तर त्या रतनजी टाटा यांना आपला आदर्श मानतात ,ते त्यांचे रोल मॉडेल आहेत असे त्या म्हणतात ,कर्मचार्यांना दिले जाणारे माणुसकीचे वर्तन ,उदारता,साधेपण ,आणि काम करण्याची शैली हे गुण त्यांना आदर्श वाटतात .

वयाच्या या टप्प्यावर त्यांनी भौतीकतेला फाटा देणारा एक निर्णय त्यांनी घेतला आहे तो म्हणजे नविन साड्या न खरेदी करण्याचा आहे ,असे हे उत्तुंग व्यक्तिमत्व तरीही जमिनीशी नाते टिकऊन आहे.आशा या आदर्श नारीला माझे शत शत प्रणाम आणि भावी राजकीय आणि सामाजिक कारकिर्दी साठी शुभेच्छा, कर्मयोगी भारतीयांची आपल्या भारत भूमीमध्ये नेहमीच वाखानणी होते ,पण यांचे आदर्श युवा पिढीत रुजवण्यासाठी पण आपण प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत .

**जयहिंद**

# श्रावण विशेष : सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर

**काळाच्या ओघात नगरांची नावं ही बदलत जातात. जसे पुंडरिकपूर चे 'पंढरपूर' झाले. पुण्यनगरी चे 'पुणे' अलंकापूरीचे 'आळंदी' झाले. तसेच आजच्या सोलापूरचे नाव अकराव्या बाराव्या शतकात 'सुवर्णपूर' 'सोन्नलिगे' असे होते. हे शिवयोगी सिद्धारामेश्वरांनी वसविलेले अत्यंत पवित्र नगर होते. ज्याला 'अभिनव श्रीशैलम' असही त्या काळी म्हटलं जात असे. पुंडलिकच्या नावाने जसे 'पुंडरिकपूर' नाव रूढ झाले. तसेच सिद्धरामेश्वरांनी वसविलेले नगर 'सोन्नलिगे' तथा 'सोन्नलापूर'-'सोलापूर' असा या नामाचा विकास झालेला दिसतो. काही इतिहास संशोधकाच्या मते सोलापूर जिल्ह्याचे नाव हे समूहवाचक आहे. म्हणजे सोळा गावांनी मिळून सोलापूर हे नाव तयार झाले आहे. त्यांची नावे १.अहमदपूर २.अदिलापूर ३.चमलादेव ४.फत्तेपूर ५.जामदारवाडी ६.शेकपूर ७.सोलापूर ८.सोन्नलगी ९.सोनापूर १०.काळजापूर ११.खादरपूर १२.खंडेराववाडी १३.महमदपूर १४. राणापूर १५.संदलपूर १६.वैद्यवाडी अशी आहेत.**

विविध ऐतिहासिक साधनातून सोलापूर शहराच्या नावाबद्दलची माहिती मिळते. सोलापूर ग्रामनामचा उल्लेख काही ताम्रशिलांमधून सोन्नलिगे, सोन्नलगे म्हणजेच सोलापूर होय. श्री सिद्धरामेश्वरांच्या काळात सोन्नलिगे येथे नागप्पा जहागिरदार आणि त्यांची पत्नी चामलादेवी राहत होते. त्यांनीच श्री सिद्धरामेश्वरास गाव वसविण्यासाठी एक कोस प्रदेश दिल्याचा उल्लेख आहे. गुंजेगाव, अक्कलकोट, तडवळ, कामती खुर्द व आचेगाव इत्यादी ठिकाणी सापडलेल्या शिलालेखात सोन्नलपूरच्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन देवस्थानास दान दिल्याचा उल्लेख आहे. पुरातत्व उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या तांब्याच्या वस्तू व वस्तू उद्योगाची प्राचीनता महाराष्ट्रातील सोनारांच्या कामगिरीवरून दिसून येते. शिलाहार राजा गंडरादित्य यांचा शके १०५८च्या कोल्हापूर येथील शिलालेखामध्ये सोनाराने द्यावयाच्या करास सुवर्णकर म्हटले आहे. तशाच स्वरुपात सोन्नलिगे नगराचाही उल्लेख यादवराजा महादेव यांच्या शके ११८६च्या संगुर लेखात आणि जैतुगी यांच्या तिथीसहित जामगाव ताम्रपटात सापडतो. यावरूनही सोन्नलिगे स्थलनाम सोनारांचे अस्तित्व दर्शविणारे वाटते. मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे एक संस्कृत शिलालेख आहे. तो इ.स. १२३८ या वर्षातील असून त्यामध्ये सोलापूर शहराचे नाव सोनालीपूर असे दिसून येते. मध्ययुगीन काळात यादवांच्या राजवटीच्या अस्तानंतर मुस्लिम काळात सोलापूर या शहराचे संदलपूर हे नाव होते. त्यानंतर सोलापूर हे नाव रूढ झाले. देवगिरीच्या यादवांच्या शासन काळात सोलापूर परिसरात वीरशैव संप्रदायचे मोठे केंद्र होते. या काळात सोलापूर विभागामध्ये सोन्नलिगे येथे वीरशैव पंथाचे थोर संत श्री सिद्धरामेश्वर यांचे मूळठिकाण होते. त्यामुळे सोन्नलिगे या ग्रामास वीरशैवांचा पवित्र आणि महत्वपूर्ण दर्जा प्राप्त झालेला होता. कवी राघवांक यांनी रचलेल्या सिद्धराम पुराणामध्ये असा उल्लेख आहे की सिद्धरामेश्वराने सोन्नलिगे येथे तलाव बांधून शिवलिंगाची स्थापना केली. इ.स. ११६० मध्ये होऊन गेलेल्या बसवेश्वरांच्या बहिणीचा मुलगा चन्नबसव यांचाही सोन्नलिगे या स्थळांशी संबंध होता. प्रसिद्ध इतिहास संशोधक ग. ह. खरे यांनी १६ खेडी मिळून सोलापूर हे नाव मिळाले असावे असे म्हटले आहे. शोळा म्हणजे सोला आणि पूर म्हणजे खेडी यावरून शोलापूर, सोलापूर असे नाव प्राप्त झाले. ज्या सोळा खेड्यापासून सोलापूर शहर बनले त्या सोळा खेड्यात स्वन्नलगी, सोलापूर, सोनापूर या खेड्यांची नावे सोलापूर शहराच्या नावाशी मिळती जुळती आहेत. स्वन्नलगी म्हणजे 'सुवर्णवल्ली' या शब्दावरून सोलापूर हे सोन्यासारखे सुंदर होते, असा अर्थ प्राप्त होतो. ब्रिटिश राजवटीत सोलापूर या शब्दाचा उच्चार 'शोलापूर' असा केला जात होता. स्वन्नलगीचे स्वन्नलपूर, स्वन्नलपूरचे स्वल्लापूर आणि स्वल्लापूरचे सोलापूर झाले असावे. सन १९७४ मध्ये महाराष्ट्र सरकारने शोलापूर चे सोलापूर अशी दुरूस्ती करून सोलापूर हे नाव निश्चित केले.

### सिद्धरामेश्वरांचे जीवन व कार्य


आजपर्यंत अनेक श्रेष्ठ शिवयोगी प्राचीन काळापासून होऊन गेलेले आहेत. त्यांनी शिवयोगाचा उपयोग लोककल्याण आणि धर्मप्रसारासाठी केला. अश्या शिवयोग्यांच्या परंपरेतील सोलापूरचे शिवयोगी सिद्धरामेश्वर हे एक श्रेष्ठ शिवयोगी होते. परमवैराग्यशील अल्लमप्रभूंनी श्रेष्ठ व्यक्तिमत्वाबद्दल 'प्रकाशातील प्रकाश, ज्योतीरहित प्रभा' असे म्हटले आहे. सिद्धेश्वरकालीन सर्व शिवशरनांनी 'शिवयोगी' सिद्धरामेश्वरांची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. सिद्धराम शिवयोगी होते असे संशोधकांनीच नव्हे तर स्वतः सिद्धरामांनी एका वचनातून व्यक्त केले आहे.

**लाभले नीललोचनेस लिंगपूजा केल्याचे फळ,**
**लाभले चन्नबसवण्णांस जंगमपूजा केल्याचे फळ,**
**लाभले अजगनण्णांस मंत्रपूजा केल्याचे फळ,**
**लाभले शिवयोगी सिद्धरामास योगाची पूजा केल्याचे फळ, देखा कपिलसिद्ध मल्लिकार्जुन.**

शिवयोगी सिद्धरामेश्वर हे शिवयोग साधनेतील अत्युच्च शिखरावर पोहोचलेले साधक होते. जन्मतःच त्यांच्याकडे शिवयोग होता. नंतर आणखी साधना करून ते अत्युच्च अवस्थेला पोहोचले होते. शिवयोगी सिद्धरामेश्वरांची सावली पडत नसे आणि चालताना त्यांची पावले उमटत नसत, असे त्यांच्याविषयी सांगितले जाते. याविषयी अल्लमप्रभूंच्या पुढील वाक्यावरून पुष्टी मिळते. शिवयोग केलेल्या साधकाची सावली पडत नाही आणि त्यांची पावले उमटत नाहीत.

श्री सिद्धरामेश्वरांचा जन्म 'सोन्नलिगे' येथे मुद्दगौडा व सुग्गलादेवी यांच्यापोटी इ. स. ११२७ मध्ये झाला. सिद्धरामांचे बालपणीचे नाव धुळीमहंकाळ होते. हे सिद्धरामेश्वरांच्या कुलदैवताचे नाव आहे. बाराव्या शतकाच्या दरम्यान बसवेश्वरांच्या समकालीन म्हणून श्री सिद्धरामांना ओळखले जाते. त्यांनी महाराष्ट्रात लिंगायत पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. महात्मा बसवेश्वरांनी अठरा-पगड जातीतील स्त्री-पुरुषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी १२व्या शतकात कर्नाटकातील कल्याणी येथे 'अनुभव मंटप ' नावाचे सामाजिक व सांस्कृतिक विचारपीठ निर्माण केले. बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात अक्कमहादेवी, अल्लमप्रभू, चेन्नबसवण्णा यांच्याबरोबर सिद्धरामेश्वर होते. चेन्नबसवेश्वरांकडून सिद्धरामांना इष्टलिंगाची धारणा आणि षटस्थळ ज्ञान धारणेचा बोध झाला. श्री सिद्धरामांनी आपल्या वचनातील अनुभव गीतामध्ये स्वत:चे वीरशैवत्व स्पष्ट सांगितले आहे. कारण षटस्थल आणि अष्टावरणाबद्दल सिद्धरामांनी लेखन केलेले आहे आणि हे दोन्ही वीरशैवत्व स्पष्ट करणारे आहेत.



जसे- **तन शुद्ध झाले माझे चन्नबसवण्णांच्या कारणे,**
**जीव शुद्ध झाला माझा बसवण्णांच्या कारणे,**
**भाव शुद्ध झाला माझा प्रभूदेवांच्या कारणे, अशा या तन, जीव, भाव यात इष्ट, प्राण, भाव लिंगाची खून जाणून, झालो मी परवश आश्चर्याच्या आविगे कपिलसिद्ध मल्लिकार्जुन.**



प्रमोद हंचाटे
मो. ८१४९१८२१३५

सिद्धरामांनी ६८ हजार वचने लिहिली, परंतु त्यांनी लिहिलेली सर्व वचने आज उपलब्ध नाहीत. कर्नाटक विश्वविद्यालयाने संशोधन केल्यामुळे १४०० वचने सापडली आहेत. सिद्धरामांच्या प्रत्येक वचनांच्या अखेरीस 'कपिलसिद्ध मल्लिकार्जुन' असे अंकित आहे सिद्धरामेश्वरांशी संबंधित एकूण ३६ शिलालेख आजपर्यत उपलब्ध झाले आहेत. यांपैकी सर्वाधिक शिलालेख सोलापूर जिल्हयात उपलब्ध असून त्यांची संख्या १२ आहे. त्यानंतर विजयपूर जिल्ह्यात ११, धारवाड ५, धाराशिव ४, शिवमोग्गा, मंड्य, चित्रदुर्ग या जिल्ह्यांत प्रत्येकी १ शिलालेख सापडला आहे. शिलालेख व काव्यात शिवयोगी सिद्धरामांचा जगद्गुरु असा उल्लेख आहे. कवी राघवांकने तर शैव साम्राज्य चालवणारा चक्रवर्ती असा गौरव केला आहे.

शिवयोगी सिद्धरामेश्वरांनी शिवयोगाबरोबरच कर्मयोगालाही महत्व दिले. त्यांच्या कार्याची कीर्ती ऐकून अनेक देशांचे राजे सिद्धरामेश्वरांच्या दर्शनाला आले होते. त्याचवेळी राणी चामलादेवी एक नवे शहर निर्माण करण्याकरिता सिद्धरामेश्वरांना जमीन देते. त्यावेळी तलाव खोदत असताना एक काहील भरून सोने सापडते. त्याच उत्पन्नातून सिद्धरामेश्वर आपल्या आराध्यदैवत श्री मल्लिकार्जुनाचे मंदिर बांधतात. (सोलापूरच्या भुईकोट किल्ल्यात या मंदिराची स्थापना केली होती. परंतु कालांतराने परकीय सत्तांच्या काळात हे मंदिर सध्याच्या बाळीवेस येथे स्थलांतर करण्यात आले.) व त्याच परिसरात १६ लिंगांची स्थापना एकाच मुहूर्तावर करतात. गरीब निराश्रितांसाठी अन्नछत्र सुरू केले. लोकोद्धारासाठी जागोजागी ६८ शिवलिंगे, ६८ तीर्थे, क्षेत्राच्या अष्टदिशेस कालभैरव व त्यांच्या अष्टशक्ती यांची शहर विस्तारांसह स्थापना केली. सोलापूरच्या आठ दिशेला आठ गणपती स्थापन केले. त्याचबरोबर जगामध्ये ज्ञात उपलब्ध पुराणातून सामूहिक विवाहाचा पाहिला प्रयोग सिद्धरामेश्वरांनी सोन्नलगी नगरीत केला. दर तीन वर्षानी एक हजार याप्रमाणे एकूण २१ वर्षात सात हजार लोकांचे विवाह सिद्धरामेश्वरांनी लावून दिले. त्याच विवाहाची आठवण म्हणून प्रतीकात्मक विवाहसोहळा यात्रेच्या निम्मित्ताने भरवला जातो. सामुदायिक विवाहाचे इतके प्राचीन उल्लेख जगाच्या पाठीवर कोठेच नाहीत. त्यामुळे सोलापूरची ओळख सामुदायिक विवाहसोहळे प्रथम सुरुवात करणारे गाव म्हणूनही आहे. सिद्धरामेश्वरांच्या या अलौकीक कार्यामुळेच ते सोलापूरचे ग्रामदैवत बनले. सिद्धरामेश्वरांचे जन्मस्थान, कर्मस्थान, तपोभूमी व त्यांचे समाधीस्थान अशी तीनही पवित्र स्थाने या सोलापूरात असल्यामुळे या पावन क्षेत्राला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. दा.का. थावरे यांनी 'आठशे साडे आठशे वर्षापूर्वी सिद्धरामेश्वरांच्या रूपाने एक तेजोवलय महाराष्ट्राच्या ललाटी चमकून गेले असे म्हटले आहे'.

### श्री सिद्धेश्वर मंदिर

महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिरांपैकी सिद्धरामेश्वरांचे मंदिर आहे. सिद्धेश्वर तलावाच्या मध्यभागी पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचे बांधकाम ८०० वर्षापूर्वी झाले आहे. हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास आले आहे. महात्मा बसवेश्वरांच्या कल्याण येथील अनुभव मंटपात सिद्धरामेश्वरांनी वीरशैव पंथाचे धडे घेतल्यानंतर सिद्धेश्वर तलावाच्या काठी पश्चिमेकडील बाजूस मल्लिकार्जुन मंदिर बांधले. त्यानंतर त्यांच्या सामाजिक व धार्मिक कार्यास चालना मिळत गेली. आज ज्या ठिकाणी सिद्धेश्वर मंदिर आहे. त्याठिकाणी सिद्धरामेश्वरांच्या योगसाधनेची जागा होती. मंदिराच्या बाजूला त्यांचे समाधीस्थळ होते या स्थळास 'योगसमाधी' अथवा 'योगीनाथ' असे नाव आहे. सिद्धेश्वर मंदिराचे संपूर्ण काळ्या बेसाल्ट दगड व चुन्यात केलेले बांधकाम अतिशय कौशल्याचे व तंत्रशुद्ध आहे. मंदिराच्या अंतराळात चांदीच्या पत्र्याने मढविलेला पश्चिमाभिमुख नंदी असून गाभाऱ्यात चांदीचा देव्हारा व पिंडीवर चांदीचा सिद्धरामेश्वरांचा मुखवटा आहे या मुखवटयास विडयाच्या पानांची व फुलांची सजावट केलेली असते. त्याचबरोबर सिद्धेश्वर मंदिर परिसरात अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. त्यामध्ये सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगापैकी श्री ओंकारेश्वर लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री परमेश्वर लिंग, श्री माहेश्वर लिंग, श्री अकलेश्वर लिंग, श्री अमृतलिंग, श्री योगीनाथ लिंग, श्री आहेश्वर लिंग, श्री वज्रेश्वर लिंग, श्री पापेश्वर लिंग अशी दहा लिंगे मंदिर परिसरातच आहेत शिवाय सिद्धरामेश्वरांची योग समाधी, येडूर बिल्लेशाचे मंदिर, नातलवाड विरविरेश्वर मंदिर, पांडुरंग मंदिर, अल्लम प्रभूलिंग इत्यादी मंदिरांचा त्यात समावेश होतो.

### सिद्धेश्वर तलाव

मल्लिकार्जुन मंदिरात अन्नछत्र उघडल्या नंतर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, म्हणून मल्लिकार्जुन मंदिराच्या पूर्वेला तलाव खोदण्यास प्रारंभ केला. त्यावेळी शहरातील अनेक लोकांनी त्यासाठी आर्थिक मदत पुरविली. कष्टाला श्रमाला प्रतिष्ठा देणाऱ्या सिद्धरामांनी श्रमप्रतिष्ठेचा धडा घालून दिला आहे. स्वत: हातात पहार घेऊन तलाव खोदण्यास सुरुवात केली. ४ हजार लोकांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. तेव्हा सर्वोपयोगी तलाव निर्माण झाला. यामुळे सुमारे ९०० वर्षांपासून अनेक जीव जगले, जगत आहेत. कोणतेही काम पूज्यभावाने केल्यास आनंद मिळतो. त्यांच्या वचनात तलावाबद्दल ते म्हणतात.

**केरेयल्लिय तीर्थ, मनदल्लिय सर्वजीवद्यापरत्व मैदेगेदडे,**
**निम्म पादसाक्षी, यन्न मनसाक्षी कपिलसिद्ध मल्लिकार्जुना.**

या तलावातील पवित्र तीर्थ पूज्यभाव सोडणार नाही. आणि माझे मन सर्व प्राणिमात्राबद्दल दया भाव सोडणार नाही, हे कधीही होणार नाही. याला तुमचे चरण, माझे मन साक्ष आहे कपिलसिद्ध मल्लिकार्जुना. अशा पूज्य भावाने त्यांनी कार्य केले म्हणूनच सोलापूर (सोन्नलगी) हे आज पवित्र तीर्थक्षेत्र, शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी शिवसानिध्यात श्रमपरिहार होऊन चित्तशांती मिळते, हे लोकांना पटवून दिले. सोलापूरच्या भूमीवरील सजीव आनंदाने जगावेत, त्यांचे जीवन सुखी व्हावे यासाठी या परिसरात त्यांनी निसर्गसृष्टी निर्माण केली. सिद्धरामेश्वरांनी तलाव खोदून पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचीही सोय सोलापूरसारख्या दुष्काळी भागाकरिता केली होती. त्यांच्या कृतीतून शेतीचे महत्व ही बाब समजून येते. सोलापूर शहराच्या भौगोलिक परिस्थितीचे, सोलापूरच्या भूगर्भातील व भूगोलाचे सर्वस्वी ज्ञान असणाऱ्या सिद्धरामेश्वरांच्या अलौकीक व अचाट बुद्धिमत्तेचे एक वेगळ्या दृष्टीने मूल्यांकन होते. ते म्हणजे जलक्रांतीचे जनक श्री सिद्धरामेश्वर. शिवपुराणात वर्णिल्याप्रमाणे आजच्या सिद्धेश्वर तलावाची निर्मिती करून त्याभोवती झाडे वाढवून पशुपक्ष्यांना आसरा व निवारा त्यांनी दिला. सिद्धरामेश्वरांनी वचन दिल्याप्रमाणे सोलापूरच्या तळ्याचे पाणी कधीही आटणार नाही. ते आजही आटले नाही, याची प्रचिती येते. सिद्धरामेश्वर दररोज सकाळी तुडुंब भरलेल्या तलावाच्या मध्यभागी असलेल्या बेटावर ध्यानस्थ बसत. त्यांना एकांतवास आवडे. पुढे त्याच ठिकाणी समाधी घेण्याचे त्यांनी ठरविले, असे सिद्धरामेश्वर कर्मयोगी होते.




## सोलापूर तरुण भारतच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त कारखान्याच्या वतीने हार्दिक शुभेच्छा









सोलापूर
# तरुण भारत
# ४०वा वर्धापन दिन विशेष
गुरुवार, ८ ऑगस्ट २०२४
www.tarunbharat.org
सोलापूर तरुण भारत

## वाचकांच्या पसंतीला उतरलेले प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक तरुण भारत














**दे**वाची नगरी पंढरी आणि संतांची नगरी मंगळवेढा. मंगळवेढा हे शहर सोलापूर जिल्ह्यातील मुख्यालयापासून नैऋत्येस ५४ किलोमीटर अंतरावर असून मंगळवेढा हे शहर समुद्र सपाटीपासून ४५८ मीटर उंचीवर आहे. मंगळवेढा हे शहर श्रीमंत दामाजी पंत, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली ही संतभूमी. याच भूमीमध्ये अक्कलकोट स्वामी समर्थांची तपोभूमी. मोहनी बुवा, लतिबबुवा, श्री सिताराम महाराज हेही याच भूमीतील तर वीर शिव पंथाचे संस्थापक महात्मा बसवेश्वर यांची ही कर्मभूमी आहे.



# मंगळवेढे संतभूमीला तीर्थक्षेत्र व पर्यटनाचा दर्जा मिळावा

मंगळवेढा या शहराला ऐतिहासिक परंपरा आहे. शहराचे वैभव असलेली शिल्पकृती शिलालेख हेमाडपंथी खांब यांचे अवशेष आज मंगळवेढ्याच्या शहरांमध्ये व जागोजागी पहावयास मिळतात. मंगळवेढा ही संतांची भूमी असली तरी खेदाने म्हणावे वाटते की, मंगळवेढा संतांची भूमी असून तीर्थाची भूमी झाली नाही. धर्म संस्थापकांची भूमी असून देखील क्षेत्र झाली नाही. शिल्पे व शिलालेख असून देखील हे पर्यटन झाले नाही. तेव्हा मंगळवेढ्याच्या वाटेला ठेविले अनंते जैसेची रहावे अशा पार्श्वभूमीवर मंगळवेढा या ऐतिहासिक नगरीला पर्यटनाचा दर्जा मिळून हे तीर्थक्षेत्र व्हावे. तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी शासनकर्ते राज्यकर्ते व धार्मिक क्षेत्रातील अनेक प्रमुख मंडळींनी मंगळवेढ्याच्या संतभूमीला तीर्थक्षेत्राचा व पर्यटनाचा दर्जा मिळावा तसेच या नगरीचे पुरातत्त्व संशोधन केंद्र व्हावे आणि मंगळवेढा शहराचा विकास व्हावा यासाठी या शहराला शासनाकडून पर्यटनाचा दर्जा मिळणे गरजेचे आहे. भविष्यात मंगळवेढा हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे संतभूमीचे पर्यटन स्थळ म्हणून गणले जावे. यासाठी मंगळवेढाला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळणे आवश्यक आहे. गायक प्रल्हाद शिंदे यांनी आपल्या मधुर गाण्यातून मंगळवेढ्याचे नांव संपूर्ण जगात केले.



भीमराव मोरे

मो. ९८९०१११२२७

मंगळवेढ्याची संत नगरी अनेक भक्तगणांना संपूर्ण देशाची दक्षिण काशी असलेल्या पंढरपूर येथे जेव्हा भाविक येतात तेव्हा मंगळवेढा आणि मंगळवेढ्याची संत परंपरा या पर्यटकांना व भक्तांना सातत्याने आकर्षित करीत असतात. ही भूमी अध्यात्मिक सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. या शहरात आणि



तालुक्यामध्ये असलेल्या प्रमुख धार्मिक स्थळांना अनेक भक्तजन सातत्याने येत असतात. हुन्नूरचा बिरोबा आणि हुलजंतीचा महालिंगराया ही देखील मंगळवेढा तालुक्यातील धार्मिक स्थळे भक्तांना आकर्षित करून घेणारी आहेत. तसेच नंदेश्वर येथील बाळकृष्ण महाराज यांचे अनेक भक्तं जण मुंबई, कोकण परिसरात असून तेही या ठिकाणी येऊन गर्दी करीत असतात. चिक्कलगी मधील भुयार येथे संत गाडगेबाबा यांच्या शिष्य परंपरेतील संत बागडे बाबा यांचे शिष्यही मोठ्या प्रमाणावर मंगळवेढा येथे येत असतात. तसेच माचणुर येथे संत आर्वीकर महाराज यांचेही शिष्य मोठ्या प्रमाणात माचणुर येथे येतात. मंगळवेढ्यातील दामाजीपंत, कानोपात्रा, स्वामी समर्थ, महात्मा बसवेश्वर, मोहनी बुवा, टीकाचार्य, सिताराम महाराज यांचे वास्तव्य असल्याने ही भूमी संत परंपरेची पावन भूमी आहे.

तसेच मंगळवेढ्यातील शिल्पकलेचा एक नमुना व हेमाडपंथी बांधकाम असलेले काशी विश्वेश्वराचे मंदिर यास मंदिराशेजारी असलेल्या महादेव विहिरीमध्ये ब्रह्मदेवाची मूर्ती असून ही मूर्ती जगातील ब्रह्मदेवाच्या मूर्तीपैकी एक असल्याचे बोलले जाते. त्याचबरोबर या शहराच्या मध्यभागी जुन्या काळातील गणेश मंदिर असून हे अत्यंत कोरीव व समोर असलेली गणेश विहीर हेही मंगळवेढ्याच्या धार्मिकतेचे वैभव आहे. त्याचबरोबर मंगळवेढ्याच्या पूर्वेस असलेली संत गोपाबाईची विहीर व त्या विहिरीमध्ये आजही गोपाबाई ची मूर्ती व संसारातील भांडी पहावयास मिळतात. अशा ह्या संतांच्या धार्मिक नगरीला ऐतिहासिक वारसा असलेल्या या तालुक्याच्या नगरीला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यास या तालुक्याचे व शहराचे आर्थिक दृष्ट्या कायापालट होणार आहे. तरुणांना रोजगार उपलब्ध होणार असून या ठिकाणच्या व्यापारी वर्गाला विशेषतः चालना मिळणार आहे.

यासाठी मंगळवेढा शहराला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळून ही भूमी संतभूमी म्हणून धार्मिकतेच्या नकाशावर कोरली जावे हीच साथ हीच सार्थ अपेक्षा सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट सोलापूर या तीर्थक्षेत्राबरोबरच मंगळवेढ्याला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यास या शहराकडे जास्तीत जास्त संख्येने भक्तगण व इतिहास संशोधक व इतर पर्यटक आकर्षित होतील. यासाठी मंगळवेढ्याला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळणे ही जनतेची सार्थ अपेक्षा आहे.

---




# गाथा सेवासदनची

## स्त्री शिक्षणाचा उज्ज्वल वारसा जपत शतकोत्तर वाटचाल करणारी शिक्षण संस्था

**"रमाईने स्वप्न पाहिले**
**माजघरामध्ये दीप लाविले**
**त्या दीपांचे तेज झळकले**
**दूर करीत तिमिराला**
**मंगल दिन हा आला..."**

**महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील एक अग्रगण्य नाव म्हणजे सेवासदन ही शिक्षणसंस्था. कै. रमाबाई रानडे यांनी २ ऑक्टोबर १९०९ मध्ये पुण्यात सेवासदनची मुहूर्तमेढ रोवली. यथावकाश स्त्री शिक्षणाचा विस्तार करण्याच्या हेतूने मुंबई, नाशिक, नागपूर, सोलापूर अशा प्रमुख शहरांमध्ये सेवासदनचा शाखाविस्तार झाला आणि स्त्रियांच्या शिक्षणाचे क्षितिज विस्तारले.**



**शीला मिस्त्री**

**अध्यक्ष**

**पुणे सेवासदन संस्था, शाखा सोलापूर.**

सोलापूर शहराच्या सरस्वती चौकातील, अगदी मध्यवर्ती गजबजलेल्या भागात सेवासदनची टूमदार वास्तू दिमाखात उभी आहे. शैक्षणिक यशाची उज्ज्वल, वैभवशाली परंपरा असलेली, सोलापूरच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि वाड्.मयीन जीवनात आपल्या अमूल्य योगदानानं जनमानसात स्थान मिळवलेली, स्त्रियांच्या शिक्षणाचा वसा घेऊन तो अविरतपणे पुढे चालवत शताब्दी वर्ष विविध उपक्रमांनी साजरी करत असलेली ही शैक्षणिक वास्तू म्हणजे सोलापूरचं वैभवच आहे.

१ मे १९२३ रोजी सोलापूरचे जुन्या पिढीतील द्रष्टे-विद्वान कार्यकर्ते रावबहादूर डॉ. दादासाहेब मुळे यांच्या प्रोत्साहनाने कै. गोपाळ कृष्ण देवधर सेवासदनच्या सोलापूर शाखेची स्थापना केली. त्याकाळातील कुर्डूवाडीचे शिक्षणप्रेमी रामलाल परदेशी, सोलापूरचे प्रसिद्ध उद्योगपती गोविंदजी रावजी दोशी, विजयकुमार भैय्या, डॉ. घ. द. तगारे आदींच्या अमूल्य आर्थिक पाठबळानं सेवासदनची देखणी इमारत हळूहळू आकाराला आली. ऑक्टोबर १९२३ मध्येच प्राथमिक व प्रशाला विभागही सुरू झाला. हळूहळू पूर्वप्राथमिक शिक्षणापासून ते कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या सोयीसुविधा सेवासदनच्या प्रांगणात मूर्त झाल्या आणि या शिक्षण-संकुलाच्या रूपानं सोलापुरातील मुलींसाठी शिक्षणाची ज्ञानगंगा घराघरांपर्यंत पोहचली. सोलापुरातील कष्टकरी वर्गांना, मिल कामगारांना, वंचित घटकांना आपली वाटणारी ही हक्काची शाळा.

'मना चंदनाचे परि त्वां झिजावे' हे संस्थेचे ब्रीद शिरोधार्य मानत आजवर येथील प्रत्येक घटक समर्पणभावाने सेवा करीत आहे. अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात आणि विज्ञान प्रदर्शनात तसेच अनेक क्रीडा प्रकारांत राष्ट्रीय स्तरावर मिळविलेले सुयश, दिल्ली येथे महाराष्ट्राचे सांस्कृतिक दर्शन घडविण्याचा मिळालेला बहुमान, कलासंस्कृती क्षेत्रातील दिग्गजांनी सेवासदनला दिलेल्या भेटी, विज्ञान-तंत्रज्ञानक्षेत्रात देशविदेशात विद्यार्थिनींनी घेतलेली गरूडझेप या साऱ्या गोष्टी सेवासदनचे भूषण आहेत. सोलापुरातील सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रोहिणी देशपांडे, आघाडीची शास्त्रीय संगीत गायिका श्रुति विश्वकर्मा-मराठे, देवमाणूस फेम-(मंगल) अंजली ठेकेदार, प्रशासकीय अधिकारी मंजुषा मिसकर आणि सुचेता जगताप, सोलापूरच्या माजी महापौर सुशीला आबुटे, माजी उपमहापौर नसीम पठाण, पोलीस सहआयुक्त (गुप्तवार्ता विभाग संगीता हत्ती, वैदिक गणित तज्ज्ञ असणाऱ्या शीतल रामदासी, जर्मनीस्थित शास्त्रज्ञ दीप्ती धायगुडे, नासा या जगप्रसिद्ध अंतराळ संशोधन संस्थेत विशेष योगदान दिलेली शास्त्रज्ञ डॉ. दीपा चारी, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत योगदान दिलेल्या हेमा पाठक अशा उच्च पदांवरील असंख्य विद्यार्थिनींचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.



डॉ. प्रिया निघोजकर

मो. ९८९०६४२१६१

सेवासदनला अनेक थोर, समाजहितैषी व्यक्तींचा वारसा लाभला आहे. यामध्ये सोलापुरात संस्थेची पायाभरणी करणारे अध्यक्ष दादासाहेब मुळे आणि संस्थेच्या कार्यविस्तारात मौलिक योगदान दिलेले काकासाहेब मुळे, कुमुदिनीबाई दोशी, कुमुदिनीबाई प्रधान, मन्मथ रुद्राक्षी, सचिव नानासाहेब पाठक तसेच वा.उ. तडवळकर, राष्ट्रीय पातळीवर आदर्श शिक्षिका हे पारितोषिक मिळवणाऱ्या राजेश्वरी आपटे, वैजयंती केळकर, सविताताई लळीत आदींचे अमूल्य योगदान आहे. त्याबरोबरच विद्यमान अध्यक्षा शीला मिस्त्री, विद्यमान सचिवा वीणा पत्की तसेच डॉ.श्रीकांत येळेगावकर, अमोल चाफळकर, ॲड. उमेश मराठे, दिलीप अत्रे, डॉ. राजीव प्रधान, शिरीष गोडबोले, राजेंद्र गांधी, विजया निसर, ॲड. लक्ष्मीकांत गवई, ॲड. अर्चना कुलकर्णी, तृप्ती बापट, सी.ए. मंजिरी कुलकर्णी, डॉ. सुहासिनी शहा, विद्या लिमये हे सर्व संस्था -पदाधिकारी एकोप्याने आणि परस्पर समन्वयातून सेवासदनचे उत्तरोत्तर उन्नयन होण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

सेवासदन हे सर्वार्थाने सेवेचे सदन आहे. ही केवळ दगडवीटांची एक वास्तू नाही ; तर एक सांस्कृतिक केंद्र आहे. विद्यार्थिनींच्या कलागुणांना, क्रीडाकौशल्यांना वाव देणारे हे ज्ञानाचे मंदिर आहे.

शंभर वर्षांपूर्वी केवळ १५-२० विद्यार्थिनींपासून सुरू झालेला शिक्षणाचा प्रवास आज शतकोत्तर वाटचाल करीत असताना बालवर्ग, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातून एकूण ३००० विद्यार्थिनींपर्यंत पोहचला आहे. "इवलेसे रोप लावियेले द्वारी तयाचा वेलू गेला गगनावरी" या उक्तीप्रमाणे सेवासदन विस्तारत आहे.

### गजराबाई दोशी कन्या वसतिगृह

सेवासदनचं वैशिष्ट्य म्हणजे ही केवळ मुलींसाठीच कार्यरत असणारी सोलापुरातील एक महत्त्वाची शिक्षणसंस्था आहे. सेवासदनमध्ये माफक दरात वसतिगृह सुविधा उपलब्ध असल्याने सोलापूर, लातूर, उस्मानाबाद आदी जिल्ह्यांतील ग्रामीण भागातील मुली येथे उत्तम शिक्षण घेत आहेत.

### गोकुळ पाळणाघर

कुटुंब, मुले सांभाळत नोकरी करताना स्त्रियांना खूप तारेवरची कसरत करावी लागते. इच्छा असूनही कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्या घरातून बाहेर पडू शकत नाही. ही अडचण लक्षात घेऊन सेवासदनमध्ये गोकुळ पाळणाघर सुरु करण्यात आले. आज ते अत्यंत उत्तम पद्धतीने चालवले जात आहे.

### अविष्कार कलावर्ग

प्रशालेतील विद्यार्थिनींमध्ये विविध कलांची आवड निर्माण होऊन त्या कला जोपासल्या जाव्यात यासाठी आविष्कार अंतर्गत कथ्थक, भरतनाट्यम, मातीकाम, वेदिक गणित, इलेक्ट्रॉनिक आणि रोबोटिक्स प्रयोगशाळा इत्यादी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

### अखिल भारतीय गांधर्व मंडळ

याशिवाय गांधर्व महाविद्यालयाच्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या गायन, वादन, नृत्य परीक्षांचे केंद्र गेल्या अनेक वर्षापासून इथे आहे. सोलापूर आणि आणि आजूबाजूच्या अनेक गावातील विद्यार्थांना त्यामुळे गांधर्व मंडळाच्या परीक्षा देण्यासाठी मध्यवर्ती परीक्षा केंद्र सेवासदनच्या माध्यमातून उपलब्ध आहे.

स्त्रियांना आत्मनिर्भर करणे, स्वावलंबी बनवणे आणि सर्वांगाने त्यांचे उन्नयन करणे, त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देणे, त्यांच्यात सामाजिक दृष्टी विकसित करणे व राष्ट्रीय संवर्धनात तिचा सहभाग वाढवणे असा रमाबाई रानडेंनी दिलेला बहुउद्देशीय वसा आजच्या एकविसाव्या शतकातही सेवासदनने टाकलेला नाही. याउलट कालसुसंगत बदल स्वीकारत, तंत्रज्ञानाची कास धरत आपले ज्ञान मंदिर हे केवळ साक्षरता केंद्र अथवा संस्कार केंद्र न राहता ते शिक्षणाचे बोध केंद्र बनेल या दिशेने सेवासदन पावले टाकत आहे. मूलभूत शिक्षणाबरोबरच मुलींचे संतुलित आरोग्य यासाठीही सेवासदन सर्वोतोपरी प्रयत्नशील असते.


उदात्त अशा सामाजिक जाणिवेतून उदयाला आलेली, माणूसपणाची ज्योत आपल्या विद्यार्थिनींच्या रूपाने वर्धिष्णू करणारी, समाजसन्मुख अशी सेवासदन शिक्षण संस्था ही निश्चितच सोलापूरचे वैभव आहे.



## प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक तरुण भारत





















सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
CAMBRIDGE
Discover Style
शुभेच्छुक
CAMBRIDGE
Readymades
नवी पेठ, सोलापूर




कर्मयोगी
कै.सुधाकरपंत परिचारक (मालक)
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
जिल्ह्याचे आमदार
मार्गदर्शक
मा.आ.प्रशांतराव (मालक) परिचारक
मा.उमेशराव परिचारक (मालक)
पंढरपूर बेदाणा मर्चंन्टस् असोसिएशन, पंढरपूर
मा.सचिन फडे (सचिव)
मा.सोमनाथ डोंबे (अध्यक्ष)
मा.मुकुंददास मर्दा (उपाध्यक्ष)




सोलापूर
तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
फोन (०२१७) २६००३९८/४९८. email : starunbharat@gmail.com
मल्टिकलर प्रिंटींग
लग्नपत्रिका
मासिक
साप्ताहिक
स्मरणिका
स्टिकर प्रिंटींग
रजिस्टर/बील बुक
सर्व प्रकारच्या प्रिंटींगसाठी अवश्य भेट द्या.
Komori Offset
PP Precision PRINTS
pricisionprints@gmail.com
Cell : 7774044459/8888847280
दैनिक तरुण भारत कार्यालय, १९/२०, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर-४१३००३.
BROCHURE
FLYER
NEWSPAPER
POSTER
INVITATION CARD
WEDDING CARD
LABLE
TICKET
STICKER
YEARBOOK
SOUVENIR PROGRAM
NEWS LETTER
RECEIPT
INVOICES
ENVELOPE
CERTIFICATE
SCHOLL DAIRY
SCHOOL STATIONERY
CONTINUOUS FORM
PACKAGING MATERIAL
PAPER BAG PRINTING
CALENDAR
DIWALI BOOK
PAMPHLET
Contact : 7774044459/8888847280 Email : pricisionprints@gmail.com




सोलापूर
तरुण भारत
सोलापूर आवृत्ती
४० व्या वर्धापन दिना निमित्त हार्दिक शुभेच्छा..
देवेंद्र राजेश कोठे
माजी नगरसेवक सो.म.पा.
संस्थापक अध्यक्ष: स्व विष्णुपंत कोठे प्रतिष्ठान

# शेतकऱ्यांच्या शेतावर प्रशिक्षण

**उत्तम शेती व उच्चतम उत्पादन घेणार्या शेतकऱ्यांच्या शेतावर प्रशिक्षण असेही काही कार्यक्रम राबवता येतात. वेगवेगळे सेमिनार, कंपन्याचे छोटे कार्यक्रम यासाठी हॉटेलऐवजी चांगला पर्याय यातून देता येतो.**

**चिंचणी गावकऱ्यांनी चालवलेलं कृषी पर्यटन केंद्र**

सातारा जिल्ह्यात १९७८ च्या दरम्यान कण्हेर धरणाची निर्मिती झाली. त्यामुळे येथील चिंचणी गावाचे सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली माळरानावर पुनर्वसन झाले. आषाढीला पंढरपूर येथे जाणारे श्री. संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री. संत तुकाराम महाराज यांच्यासह सर्व पालखी सोहळे येथे एकत्र येतात. त्यामुळे ऋटप्पाऋ नावाने ओळखले जाणारे हे श्रद्धा आणि आस्थेचे ठिकाण आहे. सुमारे ६५ कुटुंबे व ३७५ लोकसंख्येचे चिंचणी गाव आहे. पुनर्वसनात प्रत्येक कुटुंबाला राहण्यासाठी चार गुंठे जागा आणि दोन एकर शेती मिळाली. सातार्यातील सह्याद्री आणि जावळीच्या खोर्यातील महाबळेश्वरच्या पायथ्याला हिरवाईने नटलेलं निसर्गसंपन्न चिंचणी गाव थेट सोलापूरसारख्या दुष्काळी भागात वसलं. ही बाब ग्रामस्थांसाठी असह्य आणि वेदनादायी होती. पण आपल्या मूळ गावाप्रमाणेच हा परिसर नव्याने उभारण्याची धडपड त्यांनी सुरु केली. गावातील मोहन अनपट यांच्यासारखं धडाडीचं, निःस्वार्थी आणि प्रत्येक उपक्रमात पुढाकार घेणारं नेतृत्व चिंचणीला मिळालं. मग गावालाही सोलापूर सोशल फाउंडेशनसह श्रमिक मुक्ती दलाचे डॉ. भारत पाटणकर, आमदार सुभाष देशमुख, आमदार बबनराव शिंदे आदी लोकप्रतिनिधींचं वेळोवेळी साह्य मिळालं. पूर्वी पिराची कुरोलीमध्ये हे गाव ग्रुप ग्रामपंचायत म्हणून समाविष्ट होते. आज त्यास स्वतंत्र मान्यता मिळाली आहे. आणखी वैशिष्ट्य म्हणजे गावातील कोणीही राजकारणात नाही किंवा कोणत्याही पक्षाचे सदस्यत्व गावातील कोणी घेतलेले नाही. जाणीवपूर्वक राजकारणापासून दोन हात लांब राहण्याचा गावकर्यांचा प्रयत्न आहे.

**महिलांच्या सहभागाचे कृषी पर्यटन केंद्र**

एके काळी सह्याद्रीच्या कुशीत आयुष्य व्यतीत केलेल्या गावकर्यांनी आपत्तीत संधी शोधली. चिंचणीलाही निसर्गरम्य बनवण्यासाठी १५ एकरांच्या गावठाणात तब्बल दहा हजार झाडांची वनराई फुलवली. शासनाने त्याची दखल घेत छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्काराने गावाला सन्मानित केलं. त्यामुळे गावकर्यांचा उत्साह आणखी वाढला. ही वनराई, निसर्गरम्यता व रोजगारसंधी लक्षात घेऊन गावात ग्रामीण पर्यटन केंद्र सुरु करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. ग्रामदैवत वरदायिनी देवीच्या नावाने महिलांच्या नावे वरदायीनी महिला बहुउद्देशीय सामाजिक सेवा सहकारी संस्थेची स्थापना केली. त्या माध्यमातून पर्यटन संचालनालय नोंदणीकृत चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र' सुरू झाले.

**चाळीस तोळे सोने ठेवले गहाण**

कृषी पर्यटन केंद्राचा आराखडा तयार झाला. पण भांडवल नव्हते. मग महिलांनीच मार्ग काढत आपल्याकडील तब्बल ४० तोळे सोने गहाण ठेवण्यासाठी दिले. मग काय, अवघ्या काही महिन्यांतच काम सुरु झाले. तेरा जून,२०२२ मध्ये केंद्राची सुरवातही झाली. केवळ दोन वर्षे पूर्ण होता होता गावाने ग्रामीण जीवनशैली आणि खाद्यसंस्कृतीच्या अनुभव देत पर्यटकांची पसंती मिळवली. त्यातून गहाण ठेवलेले सोने सुटलेच. पण महिला आणि पुरुषांना रोजगार उपलब्ध झाला.

**विकासात आघाडी**

वृक्षराजीने गाव समृद्ध आहेच. पण पिण्याचे पाणी, प्रशस्त रस्ते, वीज आदी सुविधाही पुरेशा प्रमाणात आहेत. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत हागणदारीमुक्त अभियानात पहिल्याच वर्षी चिंचणीने पहिला क्रमांक मिळवला. जलशुद्धीकरण प्रकल्पाद्वारे पाच रुपयांमध्ये वीस लिटर शुद्ध पाणी मिळते. सर्व कुटुंबे 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' करतात. त्यातून वर्षाला सुमारे तीन लाख कोटी लिटर पाणी जमिनीत मुरते.




**ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव-**

गावाच्या प्रवेशद्वारालाच श्री विठ्ठलाची प्रतिकात्मक मोठी 'फ्रेम' स्वागत करते. त्यात विविध भाषांतील शब्दांची झालेली देवाण-घेवाण उलगडून सांगितली आहे. प्रत्येकाच्या घरासमोर आंबा, जांभूळ, सीताफळ, पेरू, चिकू, नारळ, जंगली, वनौषधी झाडे लक्ष वेधतात. बहुतांश झाडांना ठिबक सिंचन आहे.

मध्यवर्ती भागात वसलेले मुख्य पर्यटन केंद्र खुणावते. ग्रामपंचायतीच्या प्रशस्त आधुनिक इमारतीसह ग्रामदैवत वरदायिनी मंदिर, रम्य वातावरणातील जिल्हा परिषदेची शाळा, अंगणवाडी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीची अभ्यासिका, सार्वजनिक वाचनालय, घसरगुंडी, झोके आदी खेळाचे विविध साहित्य पाहण्यास मिळते. खुली व्यायामशाळाही आहे. ग्रामीण वस्तू संग्रहालयात कणगीं, जुन्या काळातील घर, माजघर, व्हरांडा, अंगणातील दगडी विहीर, रहाट, देखणी बैलगाडी आदी गोष्टी पर्यटकांचे आकर्षण ठरतात.

**ग्रामीण जेवणाचा स्वाद-**

पर्यटनाची सैर झाल्यानंतर अस्सल ग्रामीण जेवणाच्या आस्वादासाठी पाट-चौरंगावरील बैठक व्यवस्था लक्ष वेधते. बेसन, ठेचा, वांगी, पातवड्याची आमटी, गव्हाची गुळात बनवलेली खीर, चुलीवरील गरमागरम भाकरी असा बेत असतो. हुरड्याच्या हंगामात तर पर्यटकांना आधी 'बुकिंग' करावे लागते. आगटीवर भाजलेल्या लुसलुशीत कणसाचा हुरडा, सोबत विविध चटण्या, गोडी शेव, रेवड्या असा फक्कड बेत असतो. त्याशिवाय पपई, पेरू, शेंदाड, डाळिंब, बोरं, हरभर्याचा डहाळा असा रानमेवा सोबतीला असतो.

**गावातच मिळतोय रोजगार-**

पर्यटन केंद्राची मालकी आणि उत्पन्न सार्वत्रिक ठेवण्यात आले आहे प्रत्येकाने आपली जबाबदारी वाटून घेतली आहे. काही कुटुंबे स्टॉल उभारून वस्तू, पदार्थांची विक्री करतात. कोणत्या ना कोणत्या रूपात गावात रोजगार उपलब्ध होतो. अशा पद्धतीने कार्यपद्धती सांभाळणारं राज्यातील हे बहुधा पहिलंच गाव असावं. सुमारे शंभर एकरांपर्यंत शेती गावाच्या भोवताली आहे. या क्षेत्रावर विविध प्रकारचा सेंद्रिय शेतमाल पिकवून पर्यटकांना त्याची चव चाखायला लावायचा गावकर्यांचा मानस आहे. आम्ही आधीच पुनर्वसित आहोत. त्यात पुन्हा रोजगारासाठी स्थलांतरित होण्याऐवजी गावातच पर्यटन केंद्राच्या माध्यमातून रोजगारक्षमता विकसित केली. जिकिरीचे, कष्टाचे हे काम गावकर्यांच्या एकीतून शक्य झाले. त्यातून पर्यटकांना आणि आम्हालाही मिळणारा आनंद अवर्णनीय आहे.

**फायदे :**

-शेतकरी कुटुंबातील सदस्य आणि तरुणांना रोजगाराच्या संधी. शेतकर्यांसाठी उत्पन्नातील चढउताराला पर्यायी अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत. सामाजिक नैतिक मूल्यांसह शहरी आणि ग्रामीण लोकांमधील सांस्कृतिक समन्वय. ग्रामीण आणि कृषी विकास प्रक्रियेस चालना.

या सुविधांकडे लक्ष द्या...

**अ) पायाभूत सुविधा:-**

ग्रामीण स्वरूपाचे सर्व किमान आवश्यक सुविधांसह फार्महाउस असावे. शेतीतील समृद्ध संसाधने, झाडे, वेली, औषधी, सुगंधी वनस्पती यांच्या नावानिशी लागवड केलेली असावी. पाण्याची सोय, जलस्रोत जवळ असावा. पर्यटकांना स्वारस्य शेती काम, स्वयंपाक किंवा अन्य शेतीपूरक कामे करता येईल, अशी सुरक्षित सोयी कराव्यात. प्रथमोपचार पेटीसह आपत्कालीन वैद्यकीय सेवा. मासेमारी, पोहण्यासाठी विहीर किंवा तलाव, वेगवेगळे खेळ साधने, नेमबाजी इ. शेळी फार्म, इमूपालन, रेशीम शेती, ग्रीन हाउस इ.

**ब) पुरविल्या जाणार्या सुविधा :-**

नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्री अशा तिन्ही जेवणासाठी वेगवेगळा अस्सल ग्रामीण मेनू असावा. पर्यटकांना ग्रामीण खेळ, कामांमध्ये सहभागी होण्याची संधी. संस्कृती, पेहराव, कला, हस्तकला, सण, ग्रामीण परंपरा याबद्दल माहिती देण्याची सोय. काही कलांचे प्रात्यक्षिकही देता येते. घोडेस्वारी, बैलगाडी, पाण्यात म्हशीची स्वारी, तुमच्या तलावात किंवा जवळच्या तलावात मासेमारीची सुविधा इ. फळे, कॉर्न, शेंगदाणे, ऊस आणि इतर शेतातील ताजी व प्रक्रिया उत्पादने उपलब्ध करावीत. लोकनृत्याचा कार्यक्रम, शेकोटी, लोकगीते, भजन, कीर्तन, लेझिम नृत्य, धनगरी गजा, इ. कार्यक्रम पाहणे व सहभागी होण्यास संधी द्या.

**- प्रतिनिधी**





# संत निळोबांच्या गाथेतील 'रामनाम' महती

**संत तुकाराम महाराजांच्या शिष्यांपैकी संतकवयित्री बहेणाबाईंची रामभक्ती आपण मागील लेखात पाहिली. या लेखात तुकोबांच्या शिष्यपरिवारातील संत निळकंठ मकासरे- पिंपळनेरकर तथा 'संत निळोबा' यांच्या अभंग साहित्यातील 'रामनाम महती' पाहू... संत निळोबा हे वारकरी संत मालिकेतील अखेरचे संत मानले जातात. त्यांच्या नंतर वारकरी संप्रदायाची वृद्धी व विस्तार 'फड परंपरेने' झाली आहे. संत निळोबांच्या अभंगगाथेत सुमारे १५०० पेक्षा अधिक अभंग समाविष्ट आहेत. त्यामध्ये विठ्ठल नाम भक्ती, श्रीकृष्णाच्या बालक्रिडांचे वर्णन आहे. तसेच 'रामनाम' महतीचे प्रबोधनात्मक प्रतिपादनही आहे.**


विद्याधर ताठे
मो. ९८८१९०९७७५

सकळ मंत्रामाजी मंत्र उत्तम। दोन अक्षरे जपता 'राम'।। संत निळोबा (अ.क्र.४७५) तुकोबांचा शिष्य परिवार खूप मोठा आहे. त्यामध्ये संत बहेणाबाई शिऊरकर या शिष्याग्रणी होत्या, नंतरच्या शिष्यांमध्ये पिंपळनेरचे संत निळोबा हे प्रमुख शिष्य मानले जातात. संत बहेणाबाईंप्रमाणेच संत निळोबांच्या नावावर सुद्धा विपुल व वैविध्यपूर्ण अभंग संपदा आहे. संत निळोबांची स्वतंत्र अभंग गाथा उपलब्ध आहे. त्यामध्ये सुमारे १५०० अभंग आहेत. पण काही अभ्यासकांच्या मते निळोबांचे सुमारे १९०० अभंग उपलब्ध आहेत. संत निळोबांच्या अधिकार स्थितीबद्दल डॉ.भा.पं.बहिरट म्हणतात, 'तुकोबांच्या नंतर त्यांचा सांप्रदायिक वारसा शिष्य म्हणून समर्थपणे पुढे नेला तो संत निळोबांनी. तुकाराम महाराजांचे पुत्र नारायण महाराज यांचे निळोबा हे समकालिन होते. निळोबांना तुकोबांचा स्वप्नदृष्टांताने अनुग्रह प्राप्त झालेला होता. तुकोबांचे पुत्र नारायण महाराज यांनी त्यांच्या घराण्यात पूर्वंपार चालत आलेली विठ्ठल भक्ती-पंढरीची वारी समर्थपणे पुढे चालविली. देहू-आळंदी-पंढरपूर असा भव्य दिव्य पालखी सोहळ सुरू केला. आणि तुकोबांचे शिष्य निळोबा यांनी वारकरी संप्रदायाचे कार्य केले. जगद्गुरू तुका अवतार नामयाचा। संप्रदाय सकलांचा तेथोनिया। निळा म्हणे मज उपदेश केला। संप्रदाय दिला सकळ जना।। तुकोबांच्या प्रसादाने कृपेने दीड हजारांपेक्षा अधिक अभंग लिहून तुकोबांच्या भक्तीबोधाचा प्रसार केला. संत निळोबा यांना वारकरी संत परंपरेतील अखेरचे संत मानले जाते. निळोबांनंतर वारकरी संप्रदायाचा विस्तार 'फड' परंपरेच्या सामुहिक नेतृत्व पद्धतीने झाला. 'संत निवृत्तीनाथ ते संत निळोबा' अशी विठ्ठलभक्तांची दैदिप्यमान परंपरा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. निळोबांचे शिष्य शंकरस्वामी शिऊरकर आणि त्यांचे शिष्य मल्लाप्पा वासकर अशी परंपरा आहे. संत नामदेवांचा फड, संत तुकोबांचा देहूकर फड आणि मल्लाप्पांचा 'वासकर फड' या तीन फडांचा विस्तार म्हणजे आजचा विविध फड, मठ, दिंड्या यांनी विस्तार पावलेला वारकरी संप्रदाय होय.




निळोबांच्या अभंग गाथेमध्ये पूर्वसुरी निवृत्ती-ज्ञानदेव आणि सद्गुरू तुकोबांप्रमाणेच 'राम' व 'रामनाम' महिमा कथन करणारे अनेक अभंग आहेत. निळोबा एका अभंगात त्रिअक्षरी मंत्र 'गोविंद', चतुराक्षरी मंत्र 'नारायण' याचे महत्त्व सांगून या सर्वात सोपा आणि उत्तम दोन अक्षरी मंत्र म्हणजे 'राम' अशी रामनामाची महती वर्णन करतात. रामनामाला निळोबांनी 'सकळ मंत्रामाजी मंत्र उत्तम' म्हणून गौरवलेले आहे. राम नामाचे माहात्म्य कथन करताना निळोबा वाल्या ते वाल्मिक ऋषी या व्यक्ति विकासाचा कथेचा दाखला देतात. सिद्धींसाठी तपादी साधनांची गरज नाही. केवळ रामनामाने सर्व सिद्धी प्राप्त होतात. एवढेच नव्हे तर राम नामाने साधक स्वतःच 'राम' रूप होऊ जातो जसा वाल्मिकी झाला. काय करिसी तप साधने। हरिनाम चिंतने सर्व सिद्धी। हा गे वाल्मीक रामचि झाला।। ..अ.क्र.४४५. या अभंगात हरिनाम व रामनाम यामधील ऐक्य निळोबा व्यक्त करतात. त्यांच्या दृष्टीने हरीनाम हेच राम नाम आणि रामनाम हेच हरीनाम. ही अद्वैत दृष्टी आपल्याला सर्व संतांच्या अभंगातून दिसते. निळोबांना ही अद्वैत दृष्टी जगद्गुरू तुकोबांच्या कृपादानाने आशीर्वादाने प्राप्त झालेली आहे. पुढील 'राम नाम' पर अभंगातूनही असाच ऐक्यभाव दिसतो. यम नियम प्राणायाम। साधे जपता रामनाम।।१।। रामनाम जपता आधी। नाशताती आधीव्याधी।।२।। रामनामी जडली वाचा। हरिरूप होय साचा।।३।। निळा म्हणे राम नाम। पावलासे मोक्षधाम।।४।। (अ.क्र.४४६) केवळ रामनामाने यम नियम प्राणायाचे फळ प्राप्त होते. एवढेच नव्हे तर सर्व 'आधी' व्याधी म्हणजे मानसिक व शारीरिक आजार केवळ रामनामाच्या जपाने बरे होतात असे निळोबा विशासाने सांगतात. ते वाचून महात्मा गांधींच्या 'सर्व व्याधींवर एकच उपाय' केवळ 'राम' नाम, या ठाम विशासाची आठवण होते. महात्मा गांधींचे 'रामनाम' पुस्तिका सर्वांनी जरूर वाचावी. ती पुस्तकी राष्ट्रसंत विनोबा भावे यांनी लिहिलेली आहे. परमार्थ करताना अनेक साधकांना-उपासकांना संसार हा मोठा अडथळा वाटतो. अशा संसारी साधकांना निळोबा म्हणतात, रामनाम घेत जा, संसाराची चिंता वाटणार नाही; राम हा दीनबन्धु- भवसिंधुतारक आहे. तो संसाराच्या भव सागरातून तुला तारून नेईल. रामनाम उच्चारिता। नुरे संसाराची चिंता।।१।। राम हाचि दीनबन्धु। तोचि तारी भवसिंधु।।२।। दृष्टि रामरूपी रंगली। आत्माराम होऊनि ठेली।।३।। निळा म्हणे राम हरी। हेचि भवसागर तारी।।४।। संसाराच्या चिंतेबरोबरच साधक, भक्तांना 'मृत्युचे भय' सतावत असते. हे मृत्युचे भय सुद्धा रामनामाने नष्ट होईल. एवढेच नव्हे तर रामनाम जपाने तुझे जीवन धन्य होईल, कृतकृत्य होईल. यमा हाती सुटशी। राम नाम उच्चारिशी।।१।। मुखी राम उच्चारता। नुरे भवरोगाची व्यथा।।२।। नित्य वदे राम राम। तो प्रत्यक्ष आत्माराम।।३।। निळा म्हणे कृतकृत्य। रामनामे होय अमर्त्य।।४।। (अ.क्र.४५३) निळोबांच्या या उपरोक्त सर्व अभंगात प्राधान्याने परब्रह्म रामाचे, रामनामाचेच माहात्म्य कथन केलेले आहे. दशरथपुत्र- अयोध्यापती रामाच्या चरित्रा विषयीचे निळोबांच्या अभंगात फारसे दाखले नाहीत हे विशेष आहे. एका अभंगात वानरसेनेचा व त्यांच्या उद्धाराचा अगदी ओझरता उल्लेख हा त्याला अपवाद आहे. तो असापहा नवलाव हा कैसा। वानरां रिसां

# महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व अध्यात्म विचार

**धर्म व भक्तीचे व्यापकत्व स्पष्ट करताना भक्ती चळवळीच्या उदयामागची पृष्ठभूमी सखोलपणे व्यक्त करणारी आपली अध्यात्म परंपरा आहे. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ काळाच्या विविध टप्प्यातून कशी प्रवाही झाली, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील विविध भक्ती संप्रदायाचा परिचय व आचारधर्म संतांनी मांडला आहे. भक्ती चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान, अध्यात्म तत्त्वज्ञान यावर संत साहित्याने अतिशय अचूकपणे भाष्य केले आहे. धर्म व भक्ती या संज्ञांची उकल करताना एक गोष्ट महत्त्वाची वाटते की, धर्माची बाब माणसाच्या उत्पत्तीसोबतच जुळलेली आहे, असा महत्त्वाचा उलगडा संत करतात. धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असली, तरी तिला नीती व तत्त्वज्ञानाची जोड ही प्रत्येक धर्माने दिलेली आहे.**

महाराष्ट्राच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पृष्ठभूमीचा विचार करताना महाराष्ट्रातील प्रमुख बौद्ध, इस्लाम, हिंदू, ख्रिश्चन, इसाई या धर्मांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. आर्य आणि द्रविड संस्कृत या दोघांचाही विचार महत्त्वाचे मानतात. त्यात भक्ती चळवळीच्या उदयामागची कारणे राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक पृष्ठभूमी याचा संत साहित्याने घेतलेला मागोवा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भक्ती चळवळ एकूणच ज्या पृष्ठभूीवर निर्माण झाली; त्यामध्ये विविध पंथांचे आध्यात्मिक व सांस्कृतिक योगदान हा महत्त्वाचा धागा वाटतो. समाजातील वैफल्यग्रस्तता, देवाची, पापकर्माची भीती, भक्तीचे स्थान, अघोरी भक्ती, भूतखेत यांना प्रसन्न करणारी भक्ती या सर्व बाबी संत विचारात घेतात. स्त्रियांना समाजातील दुय्यम स्थान, देवादिकांच्या जीवनातील घटना व प्रसंग या सगळ्या बाबी विचारात घेऊन मूर्तिपूजा, शाक्त, शैव शक्ती संप्रदाय, नरबळी, उत्सव, अंधश्रद्धा, भूतखेत या बाबींचा समाजातील रुजलेला विचार कारणीभूत ठरतो. 'वारकरी संप्रदाय' हा अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारित असलेला संप्रदाय आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भक्ती संप्रदायांनी जसे नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव पंथ, आनंद संप्रदाय, रामदासी संप्रदाय, चैतन्य संप्रदाय या सर्वांनी आपापल्या कालखंडामध्ये भक्तीचा मार्ग अधिक सुकर केला आहे. भक्ती चळवळीची पताका या प्रत्येकाने आपल्या खांद्यावर घेऊन वेगवेगळे तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यातील वारकरी संप्रदाय आजतागायत खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाचे स्थान हे आजही अढळ आहे, असा महत्त्वाचा विचार सर्व अभ्यासक अधोरेखित करतात. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ ही... आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।। मच्छिंद्राने बोध गोरक्षशी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।। गहिणी प्रसादे निवृत्ती दातार । ज्ञानदेवा सार चोजविले ।।



प्रस्तुत उक्तीप्रमाणे आदिनाथांपासून चालत आलेली ही वारकरी संप्रदायाची परंपरा जवळजवळ ७०० वर्षांपूर्वीपासूनचा हा वारकरी चळवळीचा वाहणारा झरा वेगवेगळ्या कालखंडातून वेगवेगळ्या शतकांच्या प्रवासातून फुलत गेलेला आहे. त्यामध्ये सर्वांचे आराध्य दैवत असणारा श्री विठ्ठल व भक्त पुंडलिक या दोन अनुबंधातून निर्माण झालेला आहे. त्यामध्ये नाथ संप्रदायाचे हटयोगी विचारापासून तर महानुभावांचा महानुभावी स्मरण भक्ती विचारापर्यंत सर्वांचा एकत्रित केलेला भक्ती पुष्पगुच्छ म्हणजे वारकरी संप्रदाय होय. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहून या वारकरी संप्रदायाला अद्वैत तत्त्वज्ञान विचाराचा भक्कम आधार दिला. त्यानंतर संत एकनाथ, संत नामदेव, तुकोबा या संतांनी तर या वारकरी परंपरेची पताका अधिक उंच केली. संत नामदेवांनी ही पताका महाराष्ट्राबाहेर नेऊन पंजाबातसुद्धा फडकविली. महाराष्ट्रामध्ये आजही सर्वांच्या मुखोद्गत ही अभंगवाणी आहे. वारकरी संत परंपरा ही अतिशय शुद्ध, सात्त्विक व स्पष्ट असल्याने या संप्रदायाशी अनेक संप्रदायांनी जुळवून घेतले. महाराष्ट्राच्या या मातीमध्ये संत बहिणाबाई वारकरी परंपरेचा इतिहास परंपरा लिहिताना म्हणतात ज्ञानदेवे रचिला पाया। उभारले देवालया।। नामा तयाचा किंकर। जेणे केला हा विस्तार।। नाथ दिला खांब तोचि मुख्य आधार। तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।। महाराष्ट्रातील भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाने आपले तत्त्वज्ञान निश्चित केले आणि या तत्त्वज्ञानाच्या बळावर अद्वैत सिद्धांत मांडला. या अद्वैत सिद्धांताने आमचा विठ्ठल हा एकच आहे, तो आमच्या अंतरात्म्यामध्ये बसलेला आहे, याची साक्ष प्रत्येक अभंग व प्रत्येक ओवी वारकरी संप्रदायाची समाजाला देत असते. पंढरपूरचे आराध्य दैवत विठ्ठल आणि चंद्रभागा ही या संप्रदायाची भक्ती-मुक्तीची प्रमुख साधने आहेत. जो वारकरी असेल त्याने गळ्यामध्ये तुळशी माळ घालावी, कपाळाला बुक्का लावावा, मुखामध्ये 'राम-कृष्णहरी' हा मंत्र असावा, असा साधा आचारधर्म वारकरी संप्रदायाने मांडला.

अध्यात्माच्या भक्ती चळवळीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास व जीवन तत्त्वज्ञान हे खूप सात्त्विक सृजनशील आणि प्रत्येकाने अंगीकारावे असे आहे. प्रत्येक व्यक्तीने आपले मूल्यमापन केले तर प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये समाधानाचा व मनःशांतीचा भाव निर्माण होईल, इतकी ताकद त्या भक्ती संप्रदायामध्ये आहे. समाधान ही तर अलौकिक बाब, परंतु तीसुद्धा संतांच्या विचारांच्या अभ्यासामध्ये प्राप्त होते. हा विश्वास संताच्या विचारांचा परामर्श घेताना व्यक्त करावासा वाटतो. संत विचाराची मांडणी करताना अतिशय प्रांजळपणे कबुली देता येईल की, महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व वारकरी संप्रदाय हा सामान्य भक्तांचा जीवनाचा मूलाधार आहे. भक्ती विचार हा जीवन विचार आहे आणि सामान्य माणसाच्या जगण्याचा विचार आहे. सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वताएवढे।। माणसाच्या जीवनातील दुःखाची वास्तवता आणि सुखाची क्षणभंगुरता ही संत तुकाराम मांडतात. जणू काही ते आपल्याच जगण्याची कथा सांगत आहेत, असे प्रत्येकाला वाटते, असा विचार संतांनी व्यक्त केला आहे.

**- प्रा. डॉ. हरिदास आखरे**

डॉ. कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० तयार करून ते भारत सरकारने स्वीकारून, शिक्षण व्यवस्थेत शालेय ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत आधुनिक सुधारणा आणल्या गेल्या. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्याच्या विचारसरणीवर हे धोरण उभे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सोलापूर हे एक उत्तम शैक्षणिक पार्श्वभूमी, भौगोलिक रचना-भीमा नदी व सीना नदीच्या खोऱ्यात, तीन राज्यांच्या सीमावरती भागात वसलेले, सांस्कृतिक व भाषिक विभिन्नता-मराठी, कन्नड, तेलुगु, हिंदी, उर्दू जपणारे शहर व जिल्हा आहे. सोलापूरचा शैक्षणिक इतिहास विचारात घेतला तर इ. स. १८२४ मध्ये, पूर्व मंगळवार पेठ, तुळजापूरवेशीतल्या मारुती मंदिरात करंजकर विद्यालयाची स्थापना झाली.

# सोलापूर : शैक्षणिक पार्श्वभूमी, शिक्षणाचे बदलते स्वरूप व आव्हाने








प्राचार्य विजयकुमार उबाळे

मो. ९४२३५३५४४५



इ. स. १८५२ मध्ये सोलापूर नगरपालिकेची स्थापना करते वेळेस लोकसंख्या ३०,८१९ होती. नगरपालिकेच्या स्थापनेपासून १८८५ पर्यंत शिक्षणाची सर्व जबाबदारी सरकारवरच होती. त्यावेळेस शहरात ४ मराठी शाळा, २ मुलींच्या शाळा, १ गुजराती शाळा, १ हिंदुस्तानी शाळा व १ संस्कृत शाळा अशा शाळा होत्या. कालपरत्वे त्यात वाढ होत गेली, या शाळांना आर्थिक मदत नगरपालिका करत होती. आज शहराची लोकसंख्या १० दहा लाखापेक्षा जास्त झाल्यानंतर त्यात लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होण्याच्या ऐवजी त्याकाळी अस्तित्वात असणाऱ्या शाळा अनेक शाळा बंद पडल्या. त्या शैक्षणिक संकुलाच्या जमिनी, जागा उत्पन्नाचे साधन म्हणून भाडेतत्त्वावर वापरण्यात येऊ लागल्या. उलटपक्षी त्या संस्थांमध्ये काळानुरूप बदल करुन आधुनिकतेकडे वाटचाल केली असती तर सोलापूरची आणखीन प्रगती व विकास झाला असता व विद्येचे माहेरघर म्हणून नावलौकिक प्राप्त झाला असता.

ज्या काळात सोलापूर विकासाच्या मार्गावर चालत होते त्या काळात उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक सुविधामुळे, व उपजत कलागुणामुळे अनेक प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्वे निर्माण झाली. जसे अभिनेत्री शशिकला (हिंदी फिल्मसृष्टी), अभिनेत्री सरला येवलेकर (मराठी फिल्मसृष्टी) लालचंद हिराचंद, दमाणी असे उद्योगपती, जब्बार पटेल, अतुल कुलकर्णी, नागराज मंजुळे, रिंकू राजगुरू , चित्रकार एम. एफ. हुसेन, संगणक तज्ञ अच्युत गोडबोले, सुशीलकुमार शिंदे (माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल) विजयसिंह मोहिते पाटील (माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य), लोकशाहीर राम जोशी, कवी रा. ना. पवार, कवी दत्ता हलसगीकर, सुंदरी वादक जाधव, कलाकार भगवान रामपुरे, पेंटर यल्लादासी, कुलगुरू के. भोगीशियन, डॉ. इरेश स्वामी, डॉ. बाबासाहेब बंडगर, डॉ. एन. एन. मालदार, डॉ. विजय फुलारी व असे अनेक धुरंदर प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्वे या शहर व जिल्ह्यातून तयार झाली. शहराच्या व जिल्ह्याच्या वाटचालीत राजकारण, समाजकारण, सहकार हे त्यावेळी उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक सुविधामुळेच होऊ शकले. त्यासाठी शैक्षणिक योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**सोलापूर विद्यापीठाचा इंडस्ट्री कनेक्टचा प्रयत्न**

शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत असताना हरीभाई देवकरण प्रशाला, चंडक प्रशाला, महात्मा आनंद स्वामी सरस्वती यांनी आर्य समाजाच्या माध्यमातून निजामाच्या जुलमी राजवटीच्या विरोधात दिलेल्या लढ्याची आठवण म्हणून स्थापन केलेली दयानंद शिक्षण संस्था, कर्मयोगी काडादी यांनी स्थापन केलेली संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, वालचंद शैक्षणिक समूह, पद्मभूषण कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी श्री शिवाजी बोर्डिंग पासून सुरुवात करून निर्माण केलेले श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्था, शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज या व इतर अनेक शिक्षण संस्थामुळेच बहुजन समाजातील मुले शिकली.



शिक्षणाच्या बाबतीत सोलापूर जिल्हा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळाच्या पुढे राहिला. भारत देश स्वतंत्र होण्याच्या अगोदर स्वातंत्र्य अनुभवलेल्या सोलापूर शहर व जिल्हा यांच्या जडणघडणीत चार हुतात्मे श्री मल्लाप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन यांच्या त्यागातून निर्माण झालेल्या सोलापूर कायमच सर्व बाबतीत अग्रेसर राहिले आहे. या जिल्ह्यामध्ये पारंपारिक शिक्षणाची सोय होती व आहे. त्यामध्ये वरील संस्था प्रामुख्याने ज्ञानदानाचे कार्य करत होत्या. नंतरच्या काळात शासकीय तंत्रनिकेतन, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालय, ऑर्चिड, सिंहगड, एमआयटी या व इतर संस्था बदलत्या काळानुरूप तंत्रज्ञानाचे, इंजीनियरिंगचे शिक्षण देण्यास सज्ज झालेल्या आहेत. डॉ. विष्णू गणेश वैशंपायन यांनी १९६३ मध्ये खाजगी शिक्षण संस्था म्हणून स्थापन केलेली नंतर वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय म्हणून नावारूपास आलेले, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, आयुर्वेदिक महाविद्यालय, होमिओपॅथिक महाविद्यालय, फार्मसी, कृषी, नसिग महाविद्यालय अशा अनेक व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण झाल्या.

सोलापूर शहर हे चादर, हँडल्युम, पॉवरलूम यासाठी प्रसिद्ध आहे. या शहरांमध्ये जुनी गिरणी, नरसिंग गिरजी, लक्ष्मी मिल, जामश्री मिल, विष्णू मिल अशा अनेक सूतगिरण्या कार्यरत होत्या. त्या आज अस्तित्वात नाहीत. शहर व जिल्ह्यामध्ये औद्योगिक क्रांती अपेक्षित होती. उजनी धरणाची निर्मिती व सीना भीमा जोड कालवा झाल्यानंतर, बागायती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानंतर साखर कारखानदारी निर्माण झाली परंतु इतर पूरक उद्योगधंदे निर्माण झाले नाहीत.

सामान्य लोकांचा जसा आर्थिकस्तर उंचावत चालला तसे शैक्षणिक बदल व व्यावसायिक शिक्षण याकडे पाहण्याचा दृष्टिकोन खूप मोठ्या प्रमाणात बदलला . पारंपारिक शिक्षण कला, विज्ञान व वाणिज्य या शिक्षणाकडे हळूहळू पाठ फिरवून पालक व विद्यार्थी रोजगारभिमुख शिक्षणाकडे वळू लागला. १ ऑगस्ट २००४ रोजी भारतातील कदाचित एकमेव एका जिल्ह्यापुरते मर्यादित असणारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. शिक्षणाची गंगा आपल्या दारापर्यंत आली. शिक्षणासाठी दूरपर्यंत जाण्याची आवश्यकता भासली नाही. कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्रकुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या प्रयत्नातून विद्यापीठ इंडस्ट्री कनेक्टचा प्रयत्न करत आहे. समाजाचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अमुलाग्र पद्धतीने बदलल्यामुळे सरकारी अनुदानित पारंपारिक अशा संस्थेमध्ये शिक्षण घेण्याचे ऐवजी दर्जेदार, प्रगत, तंत्रज्ञानयुक्त, उत्तम भौतिक सुविधा असणाऱ्या खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधून व्यवसायभिमुख व रोजगार क्षमता निर्माण करणाऱ्या शिक्षण व्यवस्थेकडे कल वाढू लागला. अलीकडच्या काळात पारंपारिक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था, महाविद्यालय अस्तित्वात आली. विद्यार्थ्यांना स्वतःच्या गावापासून जवळपासच्या शहरांमध्ये अथवा गावामध्ये शिक्षण घेता येऊ लागले. विद्यार्थी आई-वडिलांच्या कामात, व्यवसायात, शेतीकामात सहाय्यभूत ठरू लागला. ही फायदेशीर बाब निश्चित आहेच. शिक्षणासाठी गावापासून दूर शहरात गेल्याने त्याचा वाढीव करावा लागणारा खर्च, हा गावापासून किंवा गावात राहूनच शिकू लागल्यामुळे कमी झाला. आर्थिक फायदा, आई-वडिलांना व घर कामात मदत, घरातील कामाची जबाबदारी घेण्याचा त्याचा दृष्टिकोन तयार झाला. परंतु महाविद्यालयात उपस्थित न राहणे, ग्रंथालयाचा वापर न करणे, खेळ, कला, संगीत अशा उपजत गुणांना आणखीन व्यावसायिक जोड देण्यासाठी तो कमी पडू लागला.

परिणामी व्यक्तिमत्व विकासावरती त्याचा नकारात्मक प्रभाव दिसून येऊ लागला. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित उपस्थित राहण्याच्याऐवजी परीक्षेपुरता अथवा इतर कामापुरता तो महाविद्यालयात येऊ लागला आणि पदवीधारक होऊ लागला याकडे नवीन शैक्षणिक संस्थांनी पालकांनी लक्ष देण्याची गरज भासू लागली.

**खाजगी विद्यापीठही सोलापुरात**

या स्पर्धेच्या युगात दर्जेदार शिक्षणाची कास धरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून एमआयटी प्रयागराज या खाजगी विद्यापीठाची स्थापना डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी करून सोलापूर मध्ये शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ करून दिली. यापुढील काळात परदेशी विद्यापीठे सोलापुरात आली तर आश्चर्य वाटण्याचे कारण असणार नाही. पारंपरिक शिक्षणाच्या बरोबरीने अभियांत्रिकी , वैद्यकीय, औषधनिमर्ाण, कायदा, व्यवस्थापन, डिझाईन अशा शिक्षणाकडे सोलापूर वाटचाल करत आहे. सध्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा ओढा हा अभियांत्रिकी, वैद्यकीय कायदा व इतर व्यावसायिक शिक्षणाकडे आहे. सोलापूरची ओळख ही मेडिकल हब म्हणून आहे. त्याचबरोबर येणाऱ्या काळात हे शैक्षणिक हब नक्की निर्माण होणार आहे. परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून शिक्षण घेता असताना ऑन जॉब ट्रेनिंगची सोय स्थानिक पातळीवर होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी उद्योगधंद्याची वाढ आणखीन होणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी, रोजगारासाठी अथवा व्यवसायासाठी स्थलांतर थांबवणे गरजेचे आहे . आयटी क्षेत्र वाढीसाठी सोलापूर हे भविष्यकालीन खूप उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठिकाण असणार आहे.

सोलापूरची ओळख फक्त धार्मिक पर्यटन अथवा चादर, भाकरी व चटणी यापुरती मर्यादित न ठेवता एक शैक्षणिक दृष्ट्या प्रगत, आधुनिक तंत्रज्ञान युक्त कुशल मनुष्यबळ पुरवणारे, औद्योगिक व प्रगत सर्व सोयींनी युक्त विद्येचे दालन म्हणून उदयास येण्यासाठी शिक्षणात अनेक क्रांतिकारक बदलाची आवश्यकता आहे. मागील काही वर्षात अनेक नामांकित संस्था माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण संस्था, खाजगी कोचिंग क्लासेस या ठिकाणी आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या स्पर्धेत सरकारी अनुदानित संस्थाचा निभाव लागण्यासाठी व टिकण्यासाठी संस्थानी बदल स्वीकारणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने काही महाविद्यालये यशस्वीपणे स्वायत्ततेकडे वाटचाल करत आहेत. शहरांमध्ये अनेक संस्था गुणवत्तापूर्ण, दर्जेदार ज्ञानदानाचे कार्य करत असल्या तरी विद्यार्थ्यां व पालकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता अवाढव्य फी देण्यात ते आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत का हे पाहणे आवश्यक आहे. याबाबतीत महाराष्ट्र शासनाने एक धाडसी पाऊल टाकत, महत्त्वपूर्ण असा क्रांतिकारी निर्णय घेऊन मुलींना पदव्युत्तर शिक्षणापर्यंत मोफत शिक्षण जाहीर केले आहे. विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठी शिष्यवृत्ती योजना आखली आहे.

संशोधनासाठी महाज्योती, सारथी यासारख्या शिष्यवृत्तीची सोय शासनस्तरावरून करण्यात आलेली आहे. शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेतून शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आलेले आहे, पण त्याचबरोबर जगाची भाषा, इतर देशातील नोकरीची संधी याचा विचार करता परदेशी भाषा आत्मसात करणे क्रमप्राप्त आहे. शहरांमध्ये शिक्षण तज्ञांनी , शिक्षणामध्ये फॉरेन लँग्वेजेस जसे जर्मन, कोरियन, जापनीज, चायनीज, इंग्रजी व इतर भाषाचा समावेश करून भाषा कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. कोणत्याही क्षेत्रामध्ये पदार्पण करण्यासाठी फक्त पदवी असून चालणार नाही तर कौशल्य असणे गरजेचे आहे. या साठी शासनस्तरावरती कौशल्य आधारित शिक्षणाची कास धरण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. हे सर्व करत असताना सर्वात मोठी सोलापूर शहर व जिल्ह्यासाठी अडचण असणार आहे ती म्हणजे दर्जेदार अनुभवी शिक्षक, कर्मचारी व इतर सुविधा. आंतरराष्ट्रीय दर्जाचे अनुभवी व तज्ञ शिक्षक उपलब्ध होणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळातील आव्हानाचा विचार करता भारत हा तरुणांचा देश आहे पण कार्यक्षमता उत्पादकता याचा संबंध लावत असताना इन्फोसिसचे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांनी भारताच्या कामाच्या उत्पादकतेबद्दल चिंता व्यक्त केली व देशाला उदयोन्मुख अर्थव्यवस्थांशी स्पर्धा करायची असेल तर भारतातील तरुणांनी दर आठवड्याला किमान ७० तास काम केले पाहिजे, असे म्हटले आहे. त्याच्या उलट बाजूने सुद्धा मतप्रवाह असू शकतात. या बाबीचा सकारात्मकपणे विचार करता शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना आवडीप्रमाणे शिक्षण, शिक्षण घेत अविरत कष्ट करण्याची प्रणाली निर्माण करणे गरजेचे आहे. सोलापूरमध्ये शैक्षणिक प्रगती मजबूत करण्याची, गती वाढवण्याची आणि त्यासाठी आपल्याला कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी लागेल. यासाठी शिक्षण प्रणालीत बदल करणे गरजेचे आहे. ते सकारात्मकपणे शासनाने, शिक्षण तज्ञांनी व शिक्षण संस्थांनी स्वीकारले पाहिजेत. आता हे स्पष्ट झाले आहे की शिक्षण कोठे व कोणत्या संस्थेत झाले, नोकरी कोठे केले जाते, तितके महत्त्वाचे नाही. महाविद्यालयाचे काम काज किंवा शिक्षण व्यवस्था येणाऱ्या काळात वेळापत्रकानुसार चालून चालणार नाही, त्यामध्ये लवचिकता आणावी लागेल. शिक्षण पूर्ण करण्यासाठी आधुनिक, डिजिटल व्यवस्थेचा भाग होण्यासाठी, स्पर्धात्मक राहण्यासाठी आणि जागतिक स्तरावर टिकाव लागण्यासाठी पूरक शिक्षण, सोयीनुसार शिक्षण, हवी तेव्हा परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमाचा कालावधी विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार स्वयं अध्ययन करून पूर्ण करण्याची व्यवस्था निर्माण करावी लागेल. मात्र मूल्यमापन पद्धती अधिक कठोरपणे राबवणे गरजेचे आहे.

तंत्रज्ञान आणि ऑटोमेशन, स्वीकारण्याची मानसिकता शिक्षणातून निर्माण करण्यासाठीपूरक सदरील अभ्यासक्रमाचा पारंपरिक शिक्षणामध्ये समावेश करणे गरजेचे आहे. याबद्दल अधिक लवचिकपणा अंगीकारणे गरजेचे आहे.

उच्च शिक्षणातील मुख्य समस्यांमध्ये अपुरा सार्वजनिक निधी आणि संसाधने, कालबाह्य अभ्यासक्रम, मर्यादित पायाभूत सुविधा, प्राध्यापकांची कमतरता, कमी संशोधन उत्पादन, प्रशासन समस्या आणि कमी जागतिक विद्यापीठ क्रमवारी यांचा समावेश आहे. यात बदल होणे गरजेचे आहे भारतातील शैक्षणिक भविष्य झपाट्याने प्रगती करत आहे, ते आव्हाने आणि विपुल संधी निर्माण करत आहेत. स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षणाच्या, कामाच्या गतीशीलतेतील परिवर्तन, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि बदलत्या आर्थिक परिदृश्यांमुळे, विद्यार्थ्यांनी स्वतःला विविध कौशल्याने अवगत करण्यासाठी त्याचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्न करावेत. पात्रतेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी भविष्यातील नियोक्ते कौशल्याकडे पाहतील. उमेदवारांच्या पदव्यांऐवजी त्यांच्या कौशल्याच्या आधारावर नियुक्त्या केल्या जातील. जरी ऑटोमेशन वैज्ञानिक भूमिकांची काळजी घेत असले तरी, व्यवसायांना हाताळण्यासाठी कौशल्य असलेल्या लोकांची आवश्यकता आहे. मायक्रोसॉफ्ट वर्क ट्रेंडच्या अहवालानुसार, कार्यालयीन कामकाज नऊ ते पाच या वेळेमध्ये करण्याची परंपरा येणाऱ्या काळात खंडित होऊन दूरस्थपणे आपल्या सोयीप्रमाणे वेळेप्रमाणे शिक्षण व काम करण्याचे कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये जो प्रामुख्याने उल्लेख करण्यात आलेला आहे. तो ऑनलाइन शिक्षण प्रणालीचा देखील आहे. ४०% शिक्षण हे टप्प्याटप्प्याने ऑनलाइन माध्यमातून देण्याचा मानस आहे. ही सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्यास अनेक फायदे होतील. सूक्ष्म-उद्योजकता ही विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाचा आणखी एक प्रवाह बनेल.



**ऑटोमेशनमुळे जगभरातील ८५ दशलक्ष नोकऱ्या कालबाह्य**

विद्यापीठ, शिक्षण संस्था व शिक्षण तज्ञांनी येणाऱ्या काळातील नोकऱ्यांमध्ये होणाऱ्या बदलांकडे लक्ष ठेवून शैक्षणिक आराखडे तयार करावे लागतील. आयबीएमच्या मते, येणाऱ्या काळात ऑटोमेशनमुळे जगभरातील सुमारे ८५ दशलक्ष नोकऱ्या कालबाह्य होण्याच्या जोखमीशी झुंजत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देत आहे जे बहुतेक मानवी काम हाताळू शकते. पारंपरिक काम करणाऱ्या वर्गाची गरज जसे डेटा एंट्री क्लर्क, टेलीमार्केटर आणि काही मॅन्युफॅक्चरिंग यासारख्या नियमित आणि पुनरावृत्ती होणाऱ्या नोकऱ्या, या स्वयंचलित होतील अथवा कमी होतील. वाहन चालकांच्या नोकऱ्या संपुष्टात येऊ शकतात. वाहने चालवण्यासाठी ड्रायव्हर्सची जागा ऑटोमेटेड, सेल्फ-ड्रायव्हिंग वाहनाने घेण्यास जास्त वेळ लागणार नाही. विमाने ऑटोपायलट होतील. काही नोकऱ्या गायब झाल्या तरी नवीन नोकऱ्या निर्माण होण्याचीही शक्यता आहे. नव्याने निर्माण होणाऱ्या नोकऱ्या ज्यामध्ये परस्परसंवाद आणि सहानुभूती आवश्यक असणारे थेरपिस्ट आणि समुपदेशक, सामाजिक कार्य आणि समुदायापर्यंत पोहोचण्याची भूमिका बजावणारे संगीतकार, उच्च-स्तरीय रणनीतिकार आणि विश्लेषक संशोधन शास्त्रज्ञ आणि अभियंते, परफॉर्मिंग आर्ट्स, न्यायाधीश, नेतृत्व आणि व्यवस्थापन भूमिका, मानव संसाधन आणि क्रीडापटू, भावनिक बुद्धिमत्ता, आणि गुंतागुंतीच्या मानवी परस्परसंवादाची आवश्यकता असते, जसे की आरोग्य सेवा प्रदाते, शिक्षक, रोबोटिक्सच्या वाढीसह, या रोबोट्सची देखभाल आणि दुरुस्ती करण्यासाठी कोणीतरी आवश्यक असेल. या नोकरीसाठी रोबोटिक्स तसेच यंत्रसामग्री दुरुस्तीचे ज्ञान आवश्यक आहे. डेटा विश्लेषक: जसजसे आपण डिजिटल युगात पुढे जात आहोत, तसतसे डेटाचे विश्लेषण करू शकणाऱ्या लोकांची अधिक गरज भासेल. या नोकरीसाठी गणित आणि सांख्यिकीमध्ये कुशल असलेल्या व्यक्तीची आवश्यकता असेल.



या झपाट्याने बदलणाऱ्या लँडस्केपमध्ये, व्यवसाय आणि स्टार्टअप नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत असल्याने, संबंधित राहण्यासाठी विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये शिकण्यासाठी प्रोत्साहित करणारे शिक्षण देणाऱ्या सोयी व पूरक अभ्यासक्रम निर्माण होणे गरजेचे आहे. नोकऱ्यांमध्ये क्षमता, ज्ञान, कौशल्ये आणि त्यांना चांगल्या प्रकारे पार पाडण्याची जबाबदारी संपूर्णपणे घेणारे शिक्षण देणारी व्यवस्था येथे निर्माण होण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.शिक्षणातील होणारे बदल हे अनेक संस्था एकत्र येऊन, इंडस्ट्री सहयोगातून व सामंजस्य करारातून तडीस नेऊ शकतात. भारतामधील सर्वाधिक साक्षरता असलेले केरळ राज्यामध्ये देशातील पहिली एआय टीचर-ईरीसचा वापर करण्यात आला. बोलण्याच्या आणि कठीण प्रश्नांना सामोरे जाण्याच्या क्षमतेसह, ईरीस प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक लक्ष देऊन शिक्षण देऊ शकते. या एआय टीचरला व्हॉईस असिस्टंट आहे, इंटरॲक्टिव्ह लर्निंग मॉड्युल्स आहेत. सोबतच मॅन्युपलेशन क्षमता असल्याने वर्गात तिचं असणं विद्यार्थ्यांना फायद्याचं ठरणार आहे. परंतु एआय टीचर सध्याच्या शिक्षकाची जागा घेऊ शकणार नाही. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी, विद्यापीठे, शिक्षण संस्था, शिक्षण तज्ञ, शिक्षणप्रेमी, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी याकडे डोळसपणे पाहून भविष्यातली आव्हाने समोर ठेवून स्वतःमध्ये प्रगती, साधने, कौशल्य विकसित करणे, तंत्रज्ञान स्वीकारणे आवश्यक आहे. निरंतर शिक्षण ही काळाची गरज असणार आहे. या सर्व शैक्षणिक विस्तारासाठी, वाढीसाठी सोलापूर हे नेहमीच तयार असणार आहे. सोलापूर हे जागतिक स्तरावरील आधुनिक व सांस्कृतिक शैक्षणिक केंद्र म्हणून पुढे येईल, परराज्यातील व परदेशातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतील, त्यांना आवश्यक असणारी राहण्याची, वाहतुकीची सोय व खाद्य संस्कृती येथे उपलब्ध करावी लागेल. यासाठी शासन व स्थानिक स्तरावरून योग्य दिशेने प्रयत्न होतील अशी अपेक्षा.





















जिल्हाधिकारी पदावर पहिल्यांदाच तब्बल ११ तालुक्यांचा मोठा सोलापूर जिल्हा मिळाला. तरीही न घाबरता जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे मायक्रोप्लॅनिंग केले आणि रात्रंदिन कामाचा ध्यास घेवून अवघ्या १ वर्षाच्या काळात सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेत या जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी विविध योजना राबविण्याचा प्रयत्न जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी केल्याने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, पालकमंत्री आणि चक्क मुख्यमंत्र्यांनीही त्यांचे कोडकौतुक केले. दैनिक तरूण भारतच्या वर्धापनदिनासाठी घेतलेल्या या विशेष मुलाखतीत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी चक्क आपले रिपोर्टकार्डच मांडले.

# विकासप्रिय जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

वयाची अवघी पस्तीस-छत्तीशी...मोठ्या पदाची नवीन पोस्टींग...विविध स्वभावाचे राजकीय लोकप्रतिनिधी...सोलापूर शहरासह प्रत्येक तालुक्याचे वेगवेगळे विषय असतानाही जिल्हाधिकाऱ्यांनी सुरूवातीला जिल्ह्यातील विकासाच्या विविध प्रश्नांचा बारकाईने अभ्यास केला. यानंतर एकेका प्रश्नांची त्यांनी यशस्वीपणे उकल चालू केली. येथील विमानतळाचा विषय त्यांनी सुरूवातीला लावून धरला...विमानतळावरील असणाऱ्या त्रुटी भरून काढल्या. गेल्या अनेक वर्षांपासून सोलापुरात विमान सेवा सुरु व्हावी अशी अनेक उद्योजक,



राजकारणी लोकांची मागणी होती. हे त्यांचे स्वप्न आता जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे लवकरच पूर्ण होणार आहे. कारण परवाच दि. ३ ऑगस्ट रोजी विमानतळावर विमानसेवा प्राधिकरणाने व्हिटी-सिएनएस या तांत्रिक विमानाद्वारे चाचणी घेतली. धावपट्टीचे काम योग्य पध्दतीने झाल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. ही चाचणी यशस्वी झाली असल्याने पुढच्या महिन्यात सोलापुरातून ७० आसनी विमानसेवा सुरू होईल आणि सोलापूरकरांची प्रतीक्षा संपणार आहे.

याच धर्तीवर आ. संजयमामा शिंदे यांच्याबरोबर चर्चा करून उजनी धरणाबाबतचा पर्यटन विकास आराखडा तयार करून त्यांनी थेट उपमुख्यमंत्री अजितदादांकडून १५० ते २०० कोटीपर्यंतच्या निधीची तरतूदही केली आहे. यामुळे सोलापूरच्या हजारो युवकांच्या हाताला काम मिळणार आहे. इतकेच नाहीतर हा प्रकल्प सिध्दीस गेल्यास सोलापूरच्या या पर्यटन स्थळाचा आपल्या देशासह जगभरात बोलबाला होणार आहे. गतवर्षीच्या कार्तिकी वारीत त्यांनी लाखो वारकऱ्यांच्या भावना जाणून घेत उत्तम प्लॅनिंग करून कार्तिकी वारी यशस्वी करुन दाखविली. इतकेच नव्हेतर याबाबत मंदिर समिती पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकारांशी संवाद साधून त्यांनी काही त्रुटीही नमूद केल्या आणि यंदाच्या आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांसाठी तब्बल आठवडाभर पंढरीत राहून उत्तम नियोजन केले आणि मागील त्रुटी भरुन काढल्या. यामुळे रेकॉर्डब्रेक आलेल्या भाविकांची स्वच्छ वारी, सुंदर वारी करून मुख्यमंत्र्यांकडून शाब्बासकीची थाप मिळविली. पंढरीतील वाळवंट, ६५ एकर आणि शहरातील स्वच्छता पाहून मोठ-मोठ्या दिंड्यातील प्रमुखांनीही जिल्हाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

यंदा पार पडलेल्या लोकसभा निवडणूक काळातही आदर्श आचारसंहितेचा सुक्ष्म अभ्यास करुन त्यांनी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना योग्य न्याय दिला. यामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता ही निवडणूक शांततेत पार पडली. उजनी धरणातून पाणी सोडताना विभागीय समिती आणि पालकमंत्र्यांचे आदेश पाळून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. कारण गतवर्षी जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने पाणी नियोजन करणे महत्वाचे होते. दुष्काळात शेतकऱ्यांसाठी चारा टंचाई होवू नये म्हणून कोट्यवधींचे चारा निर्मितीसाठीचे बियाणे जिल्हाभरात वाटप केले...इतर जिल्ह्यात चारा वाहतूक बंदी केली. २५० पर्यंत पाणीटँकरद्वारे गतवर्षी पाणीपुरवठा करून दुष्काळावरही त्यांनी मात केली. पिकविमा, अतिवृष्टीची नुकसानभरपाईही शेतकऱ्यांना मिळण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून आले. मध्यंतरी मनपा आयुक्त शीतल तेली या दीर्घ रजेवर गेल्याने या पदाचाही अतिरिक्त पदभार जिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकारला होता. या काळातही जिल्हाधिकाऱ्यांनी सोलापूर शहरातील वाढत चाललेली हद्दवाढ भागातील अतिक्रमणे, शहराच्या पाणीपुरवठ्याची उजनीवरून येत असलेली दुहेरी पाईपलाईन, प्रलंबित उड्डाणपुलांच्या प्रश्नांना गती देण्यासाठी प्रयत्न केला आहे. यामुळे शहरातील प्रलंबित विकासकामांना गती येणार आहे. जिल्हाधिकारी करीत असलेल्या या विकास कामात त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांची व महसूल टीमचेही मोठे योगदान मिळत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

### मतदार नोंदणीसाठी विशेष प्रयत्न

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध कॉलेजमध्ये आणि घरोघरी प्रतिनिधी पाठवून मतदार नोंदणी केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची प्रारूप मतदार यादी परवाच म्हणजे दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यानुसार जिल्ह्यात ३५ लाख ७८ हजार ७९२ इतकी मतदारांची संख्या आहे. ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा तरुणांनी व ज्यांचे मतदार यादीत अद्यापपर्यंत नाव नोंदवले नाही अशा नागरिकांनी त्वरित आपले नाव मतदार यादीत नोंदवून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असेही आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

### पाऊस जास्त झाला तरी उजनी धरणातील पाणी नियोजनावर देणार भर

आपल्या जिल्ह्याने गतवर्षी दुष्काळाच्या झळा सोसल्या आहेत. पाणीटंचाई निर्माण झाल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला. यंदा १०० टक्के धरण भरून ओसंडून वाहत असले तरी या पाण्यावर जिल्हाधिकाऱ्यांची करडी नजर आहे. आपण पाण्याचा किती विसर्ग खाली सोडतो...याचेही दररोज ते नियोजन करतात. कारण पाण्याचा मोठा विसर्ग झाला अन् पाणी उजनीत कमी आले तर? इतकेच नाहीतर ऊसक्षेत्रापेक्षा रेशम, डाळिंबाला कमी पाणी लागत असल्याने भविष्यात या पिकांचे नियोजन शेतकऱ्यांनी करावे, असेही ते सध्या आवाहन करताना दिसत आहेत. पाणीसाठा होण्यासाठी काही साठवण तलावातील ३२ लाख घनमीटर गाळही काढल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

### मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरही फोकस

राज्य सरकारकडून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सध्या राज्यभर राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे आजपर्यंत जिल्ह्यातून ५ लाख ४० हजाराच्यावर लाभार्थी महिला पात्र ठरल्या आहेत. अजून काहीजणांचे अर्ज ऑनलाईन करण्याचे काम सुरू आहे. या योजनेसाठीही आम्ही गती देत असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.



### अक्कलकोट एमआयडीसीसाठी विशेष निधी

अक्कलकोट एमआयडीसीतील अंतर्गत रस्ते, दिवे व इतर समस्या दूर करण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून २० कोटीची जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष तरतूद केली आहे. यामुळे स्मार्ट सिटीतील ही एमआयडीसी आता उजळणार आहे.




अविनाश गायकवाड
मो. ९४२१८७६३४०




मा.अनिता कोरे
सरपंच
मा.भगवान व्हनमाने
उपसरपंच
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
मा.सोमण्णा पुजारी
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत सदस्य : शिवुपत्र जोडमोटे, पार्वती काळे, चुंगाबाई ख्याडे, संजय कांबळे, सुनंदा मोघलाई, रियाना शेख, सुरेश टेळे, सुर्यकांत मेंडगुदले, संगिता, मेंडगुदले, सुधाकर कोरे, यासीन मकानदार, शांताबाई चव्हाण, बेबी लिगेवान, शिवानंद लोभे, अंकिता कुंभार, शंकुतला शिळ्ळे
ग्रामपंचायत मंद्रुप
समस्त ग्रामस्थ मंद्रुप




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
शांभवी कन्स्ट्रक्शन
सोलापूर




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
सिध्देश्वर कन्स्ट्रक्शन
नरोटेवाडी




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.आप्पासाहेब पाटील-वडकबाळकर
मा.संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर
शुभेच्छुक
मा.अप्पासाहेब पाटील मित्र परिवार
दक्षिण सोलापूर
सीना-भीमा पाणी संघर्ष समिती, दक्षिण सोलापूर




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
महेंद्र उंबरजे
निवृत्त उपअभियंता, औज (मं)




परिवर्तन विकास आघाडी दक्षिण सोलापूर
अध्यक्ष महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान
युवा नेता
अध्यक्ष सोनाई फाऊंडेशन
धनगर समाज युवक नेता
मा.श्रीशैलमामा हत्तुरे
मा.सचिन सोनटक्के
मा.युवराजभैय्या राठोड
मा.अमोलबापू कारंडे
शिवसेना जिल्हा उपप्रमुख
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
मा.आणप्पा सतुबर (सर)
शुभेच्छुक
सदगुरु सोशल फाऊंडेशन
सैफुल, सोलापूर




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
के.पी.इन्फ्रा, सोलापूर

# भारताचा शोध : मसाले, वास्को आणि व्हान लिंशोटेन

**ख्रिस्तोफर कोलंबस हा मूळचा जेनोवा शहराचा रहिवासी. जीनिव्हा आणि जेनोवा ही दोन वेगळी शहरे आहेत. जीनिव्हा हे स्वित्झर्लंड देशातले शहर आहे. तिथे सतत कुठली ना कुठली आंतरराष्ट्रीय परिषद सुरू असते. उलट जेनोवा हे इटली या देशाचे प्राचीन आणि प्रख्यात बंदर आहे. इटली देशातले असेच आणखी एक प्रख्यात बंदर म्हणजे व्हेनिस. पूर्वी इटली हा एकात्म देश नसताना जेनोवा आणि व्हेनिस ही दोन वेगळी नगरराज्ये होती नि दोन्ही व्यापारांसाठी जगभर प्रसिद्ध होती. तर, या जेनोवाचा दर्यावर्दी कोलंबस हा स्पेनचा राजा फर्डिनंड आणि राणी इझाबेला यांचे आर्थिक पाठबळ घेऊन बाहेर पडला. कशासाठी? तर, भारत शोधण्यासाठी. म्हणजे भारत कुठे हरवला नव्हता. तो आपला जागच्या जागी घट्ट होता. पण या युरोपीय लोकांना भारताकडे जाणारा नवा मार्ग हवा होता.**



कोलंबसाला अमेरिका सापडली, हे आपल्याला माहीतच आहे. युरोपात कोलंबसाच्या या शोधाने तसा आनंद झाला, पण तो पुरेसा नव्हता. मग पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को-द-गामा हा पोर्तुगालचा राजा मॅच्युएल याचा आर्थिक पाठिंबा मिळवून निघाला. यापूर्वी कुणाही दर्यावर्दीने न केलेले धाडस त्याने केले. आफ्रिका खंडाच्या दक्षिण टोकाला वळसा घालून तो अटलांटिक महासागरातून हिंदी महासागरात शिरला.

आफ्रिका खंडाच्या पूर्व किनाऱ्याने उत्तरेकडे जात त्याने आजचे मोझांबिक, दारे सलाम, झांजिबार इत्यादी भाग मागे टाकत, आजच्या केनिया देशातल्या मोंबासाजवळचे मालिंदी हे बंदर गाठले. तिथल्या राजाने त्याला हिंदी महासागर ओलांडून भारताच्या दक्षिणेकडचा मलबारचा किनारा गाठण्यासाठी एक माहीतगार तांडेल दिला. या तांडेलाच्या मदतीने वास्को-द-गामा अखेर कालिकत या बंदरात पोहोचला. तिथला हिंदू राजा झामोरिन याने त्याचे चांगले स्वागत केले. गामानेसुद्धा राजाला मौल्यवान नजराणे दिले. तेव्हापासून भारत आणि पोर्तुगाल यांच्यात उत्तम व्यापारी संबंध सुरू झाले आणि ते वाढत गेले. इत्यादी. आता नवीन संशोधनानुसार वरील परिच्छेदाचा उत्तरार्ध खोटा आहे. मालिंदीच्या राजाने गामाला जो वाटाड्या दिला, त्याचे नाव इब्ज माजिद. तो अरब मुसलमान किंवा अरब ख्रिश्चन असावा, असे आत्तापर्यंत समजले जात होते. नवीन संशोधनाचा निष्कर्ष असा की, तो वाटाड्या कच्छी गुजराती हिंदू असून त्याचे नाव कानजी मालम असे होते. गुजरातमधील कच्छची किनारपट्टी आणि आफ्रिकेची पूर्व किनारपट्टी यांचे गेली कित्येक शतके व्यापारी संबंध आहेत. पुढचा मुद्दा असा की, आजच्या केरळ राज्यातील कोळिकोड (कोझिकोड किंवा कालिकत हे दोन्ही शब्द भ्रष्ट उच्चार) येथील हिंदू राजा समुद्रिन (झामोरिन हा भ्रष्ट उच्चार) याने हिंदू परंपरेनुसार अतिथी म्हणून गामाचे योग्य ते स्वागत केले. गामाला विचारण्यात आले की, ''तुम्ही इथे कोणत्या हेतूने आला आहात?'' यावर गामाचे उत्तर होते, 'ख्रिश्चन लोक आणि मसाले यांच्या शोधात.' वास्को-द-गामा हा फक्त व्यापार करण्यासाठी आलेला एक महान शांतिदूत होता, अशा प्रकारची जी त्याची प्रतिमा आपल्याकडचे कॅथलिक इतिहासकार आणि त्यांचे लबाड किंवा भोळसट हिंदू चेले-चपाटेचमचे यांच्याद्वारे उभी केली जाते, ती कशी खोटी आहे, हे त्याच्याच वरील उत्तरावरून सिद्ध होते. गामाचे हे उत्तर नीट समजण्यासाठी आपल्याला तत्कालीन युरोपची स्थिती समजून घ्यावी लागेल. युरोप हा उत्तर गोलार्धातला भूप्रदेश असल्यामुळे तिथली हवा शीत ते अतिशीत प्रकारची आहे.

लोकांच्या दैनंदिन राहणीवर याचा होणारा परिणाम म्हणजे आहारात धान्य आणि भाज्यांपेक्षा मांस आणि मासे जास्त असतात तसेच रोज आंघोळ करणे आणि कपडे धुणे प्रॅक्टिकली शक्य नसते. जेवण झाल्यावर खुळखुळून चुळा भरणे तसेच मलविसर्जन करून झाल्यावर पार्श्वभाग पाण्याने नीट धुणे हेही अनेकदा शक्य नसते. आता आधुनिक विज्ञानामुळे हे सगळे शक्य आहे. पण शतकानुशतके कागद वापरण्याची सवय लागल्यामुळे मंडळी आजही टॉयलेट पेपर वापरतात.साहेबांचे अंधानुकरण करण्यात धन्यता मानणारी आमची मंडळ पण टॉयलेट पेपर वापरतात आणि बाहेर येऊन एअर फ्रेशनर मारतात. असो. तर, हवेच्या अशा स्थितीमुळे युरोपीय लोकांना मसाल्याचे पदार्थ हवेच असायचे. धने, जिरे, काळीमिरी, लवंग, वेलची, दालचिनी, हळद, सुखी लाल मिरची, जायफळ, मोहरी, हिंग हे रितसर मसाल्याचे पदार्थ, वेगवेगळे मांसाहारी पदार्थ अधिक चविष्ट करण्यासाठी वापरले जायचे. रेफ्रिजरेटरचा शोध लागलेला नव्हता. तेव्हा अतिशीत हिवाळ्यात मांस आणि मासे खारवून टिकविण्यासाठी हे मसाल्याचे पदार्थ हवे असायचे. शिवाय घरातले वातावरण सुगंधी ठेवण्यासाठी चंदन, कस्तुरी, धूप, विविध वृक्षांचे सुगंधी डिंक हेही हवे असायचे. अतिशीत हवेुळे आठवडाभर आंघोळच न केल्यास घरातले वातावरण कसे वाशेळे होत असेल, याच्या कल्पनेनेही आपणा पौर्वात्य लोकांच्या नाकातले केस जळतील. असो. तर हे सगळे मसाल्याचे पदार्थ येणार कुठून? तर, मुख्यत: दक्षिण भारतातून. सिंहल द्वीपातून आणि मग त्याच्याही पूर्वेला असणाऱ्या जावा-सुात्रा इत्यादी द्वीपांधून म्हणजेच आजच्या श्रीलंका, मलेशिया आणि इंडोनेशिया इत्यादी देशांधून. इसवी सनाच्या १० व्या शतकापर्यंत हा सगळा व्यापार भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरच्या हिंदू व्यापाऱ्यांच्या हातात होता. पण इसवी सनाच्या ७ व्या शतकात अरबस्तानने इस्लाम या नव्या संप्रदायाचा स्वीकार केला आणि परिस्थिती बदलत चालली. आत्तापर्यंत अरबांचा भारताशी नि पूर्वेकडच्या जावा-सुात्राशी व्यापार होताच. अरब उत्तम दर्यावर्दी होतेच. आपण नौकानयन, बीजगणित, खगोलशास्त्र, फलज्योतिषशास्त्र इत्यादी हिंदूकडूनच शिकलो, असे अरब विद्वान खुलेपणाने सांगत होते. पण आता अरब मुसलमान बनले. त्यांनी पद्धतशीरपणे सगळा नौकानयन व्यवसाय आपल्या ताब्यात घेतला. हे एकदम झाले नाही.

इसवी सनाच्या ८ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत हळूहळू होत गेले. नेक्या त्याच काळात अरब मुसलमानांचे गुलाम असणाऱ्या तुर्क-अफगाण मुसलमानांनी क्रमाक्रमाने भारतातल्या हिंदू राजवटींचा पराभव केला. त्यामुळे भारतातून युरोपला जाणारा हा अत्यंत किफायतशीर मसाल्याचा व्यापार पूर्णपणे अरब मुसलम ानांच्या हातात गेला. भारताकडून युरोपकडे जाणारा माल एकतर तांबड्या समुद्रातून अलेक्झांड्रिया बंदरामार्गे जाणार किंवा इराणच्या आखातातून कॉन्सन्टिनोपलमार्गे जाणार. पैकी अलेक्झांड्रिया बंदर अरबांनी ७ व्या शतकातच जिंकले आणि सन १४५३ या वर्षी तुर्क मुसलमानांनी ख्रिश्चन बायझंटाईन सम्राट कॉन्स्टन्टाईन तिसरा याचा पराभव करून कॉन्सन्टिनोपलही जिंकले. लगोलग त्याचे इस्तंबूल असे इस्लामी बारसे झाले. म्हणजेच ख्रिश्चन युरोपच्या व्यापाराच्या दोन्ही नाकपुड्याच दाबल्या गेल्या. म्हणजे व्यापार बंद झाला असे नव्हे, पण मुसलमानांच्या ओंजळीने पाणी प्यावे लागणार, हे ख्रिश्चन युरोपला सहन होईना. भारताकडे जाण्याचा नवा मार्ग शोधून काढण्याचा युरोपचा आटापिटा यासाठी होता. दुसरे म्हणजे आफ्रिका, आशिया किंवा भारतात कुठेतरी प्रेस्टर जॉन नावाचा ख्रिश्चन राजा राज्य करतो आहे. त्याची आपल्याला मदत होऊ शकते, अशी एक समजूत सगळ्याच युरोपीय व्यापाऱ्यांध्ये त्याकाळी पसरलेली होती. 'आम्ही ख्रिश्चन लोक आणि म साले यांच्या शोधात इथे आलो आहोत', असे जे गामाने समुद्रिन राजाला सांगितले, त्याची पृष्ठभूी एवढी मोठी आहे. आता पुढच्या घटना पाहू.

गामाने समुद्रिन राजाला जो नजराणा दिला होता, तो राजाच्या मते अगदीच सामान्य होता.
मसाल्यांच्या व्यापारासंबंधी गामा आणि समुद्रिन यांच्यातल्या वाटाघाटी असफल ठरल्या. त्यामुळे राजाने गामाला चक्क हाकलून दिले. पण त्या सफरीत आणि पुन्हा पुढच्या सफरीत गामाने म्हणजेच पोर्तुगीजांनी आपले पांढरे पाय भारतात पक्के रोवले. केरळापासून वर सरकत गुजरातपर्यंत पोर्तुगीजांनी मुलूखगिरी केली आणि अत्याचारण नि बाटवाबाटवीचा कहर करून सोडला. दक्षिणेकडे त्यांनी सिंदल द्वीपाला (श्रीलंका) वळसा मारून आजचा मलेशिया आणि इंडोनेशिया गाठलाच. पूर्व हिंदी महासागर, पश्चिम हिंदी महासागर ते पूर्व आफ्रिका ते युरोप या संपूर्ण समुद्री भागाचे त्यांनी उत्तम नकाशे बनवले. हे नकाशे हे त्यांचे अत्यंत मौल्यवान 'ट्रेड सीक्रेट' होते. या मार्गांनी मसाल्याचा व्यापार करून पोर्तुगीजांनी किती नफा मिळविला असेल? तत्कालीन अन्य युरोपीय व्यापाऱ्यांच्या अंदाजानुसार पोर्तुगीज व्यापारी प्रत्येक पदार्थावर १००० टक्के मार्जिन घेत असत.

या प्रचंड फायद्यामुळे इंग्रज, फ्रेंच, इटालियन, डच सगळ्यांचेच घारे डोळे एकदम पांढरे झाले. काहीतरी करून हे नकाशे मिळवायला हवेत आणि आपणही भारताशी व्यापार करायला हवा. आणि इथेच व्यापारी हेरगिरी सुरू झाली. लिओनार्दो-दकामासीर हा व्हेनेशियन (व्हेनिसचा) व्यापारी पोर्तुगीज राजधानी लिस्बनला पोहोचला. अनेक पोर्तुगीज दर्यावर्दींशी दारू पीत गप्पा मारून त्याने खूप मौल्यवान माहिती गोळा केली. पण खरी बाजी मारली व्हान लिंशोटेन या डच प्रवाशाने. हा पठ्ठ्या गोव्याचा पोर्तुगीज आर्चबिशप जोआओ व्हिन्सेंटी डा फोन्सेका याचा कार्यवाह म्हणून थेट पणजीतच दाखल झाला आणि खुद्द आर्चबिशपच्याच कागदपत्रांधून त्याने सागरी मार्गांच्या नकाशांसह भरपूर माहिती उतरवून त्याचे चक्क पुस्तक छापले. मूळ डच भाषेतल्या या पुस्तकाचे इंग्रजी नाव 'जॉन ह्यूसेन व्हान लिंशोटेन-हिज डिसकोर्स ऑफ व्हॉयेजेस इन टु द ईस्ट ॲन्ड वेस्ट इंडीज' हे पुस्तक सन १५९८ साली हॉलंडम ध्ये प्रकाशित झाले. मात्र, लबाड इंग्रजांनी सर्वप्रथम सन १६०० मध्ये 'ईस्ट इंडिया कंपनी' स्थापन करून भारताकडे प्रस्थान ठेवले. पुढे क्रमाक्रमाने डच, फ्रेंच स्पर्धेत उतरले. मसाल्याच्या व्यापारासंबंधी आजपर्यंत पुष्कळ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. पण १६ व्या शतकातल्या कामासीर आणि व्हान लिंशोटेन यांच्या व्यापारी हेरगिरीबद्दल 'स्पाईस' या आपल्या ताज्या पुस्तकात रॉजर क्रॉवली या अमेरिकन संशोधकाने प्रथमच विस्तृतपणे लिहिले आहे.

**- मल्हार कृष्ण गोखले**



**तरुण भारत परिवाराच्या ४०व्या वर्धापन दिनानिमित्त कोठारी ग्रूपचे व्यवस्थापकीय संचालक उज्ज्वल कोठारी यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, तरुण भारत परिवार आगामी काळातही आपल्या सचोटीच्या आणि वस्तुनिष्ठ पत्रकारितेच्या बळावर वाचकांमध्ये नवे विक्रम प्रस्थापित करावेत अशी माझी व संपूर्ण कोठारी ग्रुपच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!**

# कोठारी ग्रूपचे अतूट विश्वासाचे प्लम्बिंग पाईप्स



उज्ज्वल कोठारी यांनी त्यांच्या कोठारी ग्रुपच्या प्रवासाबद्दल बोलताना म्हणाले, १९९७ मध्ये मोहोळच्या चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीत पहिले युनिट सुरु केले व पुढे केवळ २७ वर्षात लाखो टन उत्पादन क्षमतेचा प्रवास सुरु झाला. ज्यामध्ये नव्याने यावली येथे कोठारी उद्यमनगर, या अत्याधुनिक यंत्रसामग्रीसह १०० एकर परिसरात सर्व प्रोडक्शन युनिट्स उभे करून उत्पादनास सुरुवातही केली. तसेच इतर राज्यात मेहसाणा, गुजरात येथेही प्रोडक्शन युनिट सुरु केले.

उज्ज्वल म्हणतात, कोठारी ग्रूप गेल्या २७ वर्षापासून शेती व शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे जल व्यवस्थापनाचे खडख व जागतिक नामांकाना प्रमाणे उत्पादने पुरवत आहे. ज्यामुळे आमच्या उत्पादनांनी ग्राहकांमध्ये एक विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. सध्या देशात ज्या वेगाने पायाभूत सुविधांचा विकास होत आहे, त्यामुळे शहरांप्रमाणे उपनगर आणि ग्रामीण भागातही पक्की घरे आणि इमारतींचे निर्माण वेगाने सुरु आहे. इमारत बांधकामाच्या गरजा लक्षात घेऊन कोठारी ग्रुपने प्लंबिंग आणि भूमिगत पाईप्स आणि फिटिंग्जचे उत्पादने सुरु केले आहे.

ते म्हणाले की, कोठारी ग्रूप ही भारतातील जल व्यवस्थानेत सर्व प्रकारचे दर्जेदार उत्पादनांचे उत्पादक कंपनी असून आमच्या आता प्लंबिंगच्या उत्पादनांना देशभरातील बिल्डर्स, प्लंबर्स, वास्तुविशारदांकडून मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. कंपनी सीपीवीसी, यूपीवीसी, एसडब्ल्यूआर आणि अंडरग्राउंड पाईप्स (यूडीएस) हि प्लंबिंग उत्पादने तयार करून देशातील विविध राज्यात यशस्वी पणे वितरीत करत आहे.

कोठारी ग्रूप इरिगेशन, पीवीसी आणि प्लंबिंग विभागांतर्गत उत्पादने उत्पादित करीत आहे. कोठारी ग्रुपचे उद्दिष्ठ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ग्राहकांना उत्कृष्ट दर्जाचे व वाजवी किंमतीत संपूर्ण जल व्यवस्थापनाचे उत्पादने प्रदान करणे आहे. पीवीसी पाईप आणि शेतीसाठी उपयुक्त फिटिंग्ज पासून सुरुवात करून, कंपनी सध्या एचडीपीई पाईप्स आणि फिटिंग्ज, कॉलम आणि केसिंग केसिंग पाईप्स, एमडीपीई पाईप्स आणि कॉम्प्रेसशन फिटिंग्ज, एल डी ले फ्लॅट ट्यूब्स, उच्च दाब स्प्रे पाईप्स, सक्शन पाईप्स, गार्डन ट्युबिंग पाईप्स, कॉम्प्रेशन एअर होसेस तयार करते. कन्स्ट्रक्शन होज पाईप्स सिंगल आणि डबल युनियन बॉल व्हाल्व्हल सोबत ते सिंचन क्षेत्रात ड्रिप लाईन सिस्टीम, स्प्रिंकलर सिस्टीम, सिंचन ऑटोमेशन सिस्टीम, मल्चिंग फिल्म्स आणि प्लम्बिंग उत्पादने तयार करत आहे.



कोठारी ब्रॅंडने आपल्या उत्पादनाची गुणवत्ता आणि ग्राहकाचा अतूट विश्वास याच्या बळावर विकासाचा प्रवास चालू ठेवला आहे. आमच्याकडे जागतिक दर्जाचे क्वालिटी कंट्रोल लॅब आहे आणि ISO-9001:2015 सुद्धा मानांकित आहे. याशिवाय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन आम्ही तांत्रिक दृष्ट्या आमची उत्पादने सतत अपडेट करत राहतो. कोठारी प्लम्बिंग उत्पादने १००% व्हर्जिन, लीड फ्री कच्च्या माला पासून बनवले जातात आणि ISI, NSF/NSI/CN61 (IMPO -I)/ MCGM$^2$, GRIH द्वारा प्रमाणित आहेत आणि आम्ही कटाक्षाने सर्व निकष पूर्ण करतो. कोठारी प्लम्बिंग पाईप्स आणि फिटिंग्सकडे देशातील, मुख्य बिल्डिंग निर्माण संस्था आणि महानगरपालिका यांच्याकडून मान्यता प्रमाण पत्रे प्राप्त आहेत. उत्कृष्ट दर्जा आणि डिजाईनमुळे कोठारी प्लम्बिंग पाईप्स आणि फिटिंग्सने अल्पवधीतच ग्राहक आणि विक्रत्यामध्ये एक विशेष स्थान निर्माण केले आहे.

कच्च्या मालाच्या प्रक्रियेपासून अंतिम उत्पादन निर्मिती पर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण देखरेखी व अत्याधुनिक यंत्रसामग्रीद्वारे करून ग्राहकांना उत्तम दर्जाची उत्पादने दिली जातात. त्यांनी सांगितले कि कपंनीची देशभरात १४ गोदामे, १६ राज्यात काम, ५००० हुन अधिक चॅनेल पार्टनर आणि २००० सहयोगी आहेत तसेच कंपनी आपली उत्पादने १० पेक्षा देशामध्ये निर्यात करत आहे.



# माळशिरस तालुक्यात उजाडली राजकारणाची नवी पहाट

**राजकारणात आता कोण कोणाचा शत्रू आणि मित्र राहिलेला नाही. बदलून गेलेल्या आजकालच्या राजकारणामध्ये माळशिरस तालुक्याने देखील बदलाचे सूर अवलंबलेले दिसत आहेत. या तालुक्यात लोकसभा निवडणुकीपासून राजकारणाचा नवा अध्याय सुरू झालेला दिसत आहे. माळशिरस तालुक्यावर आजपर्यंत मोहिते पाटील यांचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू देखील माळशिरस तालुका राहिलेला आहे. पण मागील काही वर्षात या तालुक्यातीलच काही विरोधकांना जवळ करून मोहिते पाटलांचे खच्चीकरण करण्याचा डाव आखण्यात आला. जिल्ह्यावर असणाऱ्या मोहिते पाटलांच्या वर्चस्वाला नेहमीच आव्हान देण्याचा व या माध्यमातून जिल्ह्यावर हुकूमत गाजवेल असे नवीन नेतृत्व निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.**



मोहिते पाटलांनी आपली राजकारण करण्याची दिशा कधीही बदलली नाही. राजकारणापुरते राजकारण आणि नंतर पूर्ण वेळ समाजकारण असे त्यांचे जीवनसूत्र राहिल्याने लोकांचा असणारा त्यांना पाठिंबा दिवसेंदिवस वाढत गेला. ते नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीवरून सिद्ध झाले आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी ऐतिहासिक क्रांती केली आणि त्यांच्यानंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी विकासाच्या सामाजिक चळवळीला गतिमान करत कळस चढवला. शरद पवारांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची स्थापना केल्यानंतर या पक्षात सामील होऊन तन-मन-धनाने या पक्षाची व्याप्ती वाढवण्यासाठी मोहिते पाटील यांनी जीवाचे रान केले हे सर्वश्रुत आहे. पण राष्ट्रवादीतीलच एका बड्या नेत्याने सोलापूर जिल्ह्यावरील मोहिते पाटलांच्या वर्चस्वाला धक्का देण्यासाठी जिल्ह्यामध्येच मोहिते पाटील विरोधक तयार केले त्यांना रसद पुरवली. यातून मग मोहिते पाटील यांनी भाजपाचा मार्ग अवलंबला तदनंतर कालच्या लोकसभा निवडणुकीत ते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करून स्वगृही परतले. पण पक्षात पुन्हा परतत असताना त्यांनी तालुक्यात नेहमी विरोधक म्हणून राहिलेले उत्तम जानकर यांना सोबतीला घेतले आणि लोकसभा निवडणूक सोपी केली.



डी. एस. गायकवाड
मो. ९८९०१५३३३०

उत्तम जानकर यांच्या आमदारकीचा मार्ग देखील त्यांनी सोपा केला. यामुळे माळशिरस तालुक्याचे राजकीय गणित पूर्णतः बदलून गेले आहे. कट्टर विरोधक एकत्रित आल्याने आता बोटावर मोजण्याइतपतच विरोधकांची संख्या राहिली आहे आणि त्यांचा म्हणावा तेवढा प्रभावही जाणवताना दिसत नाही. त्यामुळे भविष्यातील निवडणुका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासाठी अतिशय सोप्या झाल्या असून सहज या पक्षाला निवडणुका जिंकता येणार आहेत. या ठिकाणी भाजपाचे असणारे व मोहिते पाटील यांच्या कृपाशीर्वादाने आमदार झालेले राम सातपुते यांना पुन्हा आता आमदार होण्यासाठी पराकोटीचा संघर्ष करावा लागणार आहे. मोहिते पाटील राष्ट्रवादीत गेल्याने भाजपाला आता इथल्या निवडणुका जड जाणार आहेत. आमदार सातपुते यांना अगदी काही दिवसात आमदार करण्याची किमया मोहिते पाटलांनी साध्य करून दाखवली होती. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत देखील मोहिते पाटील यांच्यामुळेच भाजपाला माढ्याची खासदारकी सुद्धा जिंकता आली होती.

पण भाजपाला मोहिते पाटलांची किंमत कळाली नाही आणि ऐकीव माहितीच्या आधारे काही चांडाळ चौकडींनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कान भरले आणि चुकीचा उमेदवार देण्यास भाग पाडले. सर्व स्तरातून लोकसभा निवडणुकीमध्ये रणजीत निंबाळकर यांना विरोध होत असताना देखील पक्षाने उमेदवारी लादली. यामुळे मोहिते पाटील पुन्हा स्वगृही परतले आणि लोकसभेची उमेदवारी मिळवली व ती सव्वा लाखाच्या आघाडीने जिंकून दाखवली. मोहिते पाटलांचा माढा लोकसभेवर प्रभाव आहे हेच भाजपाला कळाले नाही.

चुकीच्या मिस गाईडमुळे भाजपाचे वर्चस्व असताना देखील त्यांनी ही जागा गमावली. पण या निमित्ताने माळशिरस तालुक्याचे जे खच्चीकरण सुरू आहे याची जाणीव या तालुक्याला होऊ लागली आणि यातून मग तालुका एकवटला आणि त्यांनी आपली किंमत दाखवून दिली. बाहेरचे उमेदवार लादून निवडून आणायचे आणि त्यानंतर खच्चीकरणाचे प्रयोग सुरू करायचे हा डाव नेत्यांनी ओळखला आणि यातून नवीन राजकीय प्रयोगाला सुरुवात झाली. यातूनच मोहिते पाटील, जानकर एकत्रित आले.शरद पवारांच्या पक्षाला देखील हुकमी एक्के मिळाले. हक्काच्या जागा निर्माण झाल्या. त्यामुळे माळशिरस तालुक्याच्या राजकारणात नवी पहाट उजाडल्याचे स्पष्ट दिसत आहे.

---





# मोहोळ तालुक्यात प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी असणारी मंदिरे

**मोहोळ तालुक्यात अनेक सुप्रसिद्ध प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी असणारी मंदिरे आहेत. त्यामध्ये श्री क्षेत्र मोहोळ येथील सद्गुरु नागनाथ महाराज हे एक मोठे मंदिर आहे. मोहोळ शहराचे आधी नाव चंद्रमौळी नगर होते. ही नगरी सद्गुरु नागनाथ महाराजांच्या वास्तव्याने पावन झाली असून सुमारे चौदाव्या शतकापासून असणारे हे नागनाथांचे प्राचीन आणि पुरातन मंदिर इतिहासाची साक्ष देते. या नगरीमध्ये वैशाख महिन्यात मोठी यात्रा भरते त्यात लाखो भाविकांची उपस्थिती असते.**

सद्गुरु नागनाथ महाराज हे प्रत्यक्ष भगवान शंकरच असल्याने

**''साक्षात शंकर जाणूनिया
संत लागती पाया
लीला विग्रही अवतरला
तो तेथे संशय नाही
ऐसे अपार संत वर्णिता
संशय सर्वही जातौ
आठवले ते ऐक्य व्हावे
उद्धव चिध्दन गातो''**

या उक्तीप्रमाणे सुमारे नऊशे वर्षांपूर्वी मोहोळ मध्ये एका सात्विक अशा ब्राम्हण घराण्यात हेग्रसांचा जन्म झाला. हेग्रसांना त्यांच्या मातेने मोहपाश टाकून देऊन मोक्ष प्राप्तीचा मार्ग दाखविला. १२व्या वर्ष हेग्रसांनी रानात राहून गाईची सेवा केली. तेथून हेग्रसांनी जीवनाचे खरे सार्थक घडवण्यासाठी अरण्यातून तपश्चर्या करीत माहूरगडावर जाऊन रेणुका मातेची १२ वर्षे तपश्चर्या केली.

रेणुकामाता प्रसन्न होऊन तिने हेग्रसांना वर दिला. त्यांना हस्तिनापुरापलीकडील मानस सरोवराकाठी योग मायेने नेऊन ठेवले. सद्गुरूच्या आगमनाची वेळ व खुणा सांगून ती अदृश्य झाली. त्यानुसार हेग्रसांसमोर लाकडी घोड्यावर सर्पाचा चाबूक घेऊन आलेले भगवान शंकर अवतीर्ण झाले. त्यावेळीं हेग्रसांनी ''श्री''चे चरण धरले. त्यावेळी रेणुका माता पांढरी घार होऊन ''श्रीं''च्या मस्तकावर फिरत होती .

त्यावेळी हेग्रसाने माझ्या मातेचा व ग्रामजनाचा उद्धार करण्यासाठी चंद्रमौळी गावी यावे असा आग्रह सद्गुरुंजवळ धरला. या आग्रहानुसार सद्गुरु नागनाथ महाराज केंदुर, पाबळ, कान्हूर मेसाई, निमगाव, मानूर, देगाव मार्गे मोहोळच्या बाहेर येऊन थांबले. त्यावेळी त्यांच्या अंगात फकीराचा वेश होता. परंतु हेग्रसांनी आपल्या योगमायेने व भक्तिभावाने सद्गुरुंना ओळखले आणि त्याच्या कटोरीतील अन्न खाण्यास सुरुवात केली. हे पाहून येथील ब्राह्मणानी त्यांना बहिष्कृत केले. तसेच अक्षय तृतीया दिवशी श्राद्ध कर्म करण्यास नकार दिला. ही बाब सद्गुरु नागनाथ महाराजांच्या लक्षात आली. त्यांनी हेग्रसांना श्राद्धाची तयारी करण्यास सांगितले व स्वर्गातून या सर्वांचे पितर बोलवले आणि हे सर्व येथील ब्राह्मणांनी पाहिले. तीन दिवस पितरांचा मुक्काम होता, हेच ते ठिकाण विमान टेकडी, उत्तरेश्वर मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.

भक्त हेग्रसांना ''यावत् चंद्र दिवाकरौ'' म्हणजे जोपर्यंत चंद्र सूर्य आहेत तोपर्यंत मी वायुरूपाने दरवर्षी तुझ्या वंशजांना भेट देईन असा वर देऊन ते वडवाळला निघून गेले. त्याप्रमाणे दरवर्षी मोहोळ आणि वडवळला मोठी यात्रा भरते. त्यावेळी श्री नागनाथ महाराज पुजाऱ्याच्या अंगामध्ये वायू रूपाने प्रवेश करतात. मोहोळ आणि वडवळ येथे दोन वेळा हेग्रस वंशजांची व नागनाथ महाराजांची प्रत्यक्ष भेट खर्गतीर्थात होते. हा गुरु शिष्य सोहळा पाहण्यासाठी लाखो भाविक मोहोळला अक्षय तृतीया दिवशी पहाटे आणि सप्तमीस दुपारी येतात. महान आणि जिवंत आख्यायिका झालेल्या नागनाथ महाराजाच्या मंदिरात दररोज पूजाअर्चा व दर सोमवारी रात्री छबिना निघतो. त्यावेळी शेकडो भक्त उपस्थित असतात. अभंगाच्या गजरामध्ये हा छबिना देवाच्या पालखीसह निघतो. या मंदिराच्या परिसरात विठ्ठल मंदिर, जगदंबा मंदिर, महादेव मंदिर, समाधीचा मळा (श्री भिकलिंग समाधी), मुंगीचा धोंडा, श्रीराम मंदिर अशी मंदिरे असून तेथे नित्यनेमाने धार्मिक कार्यक्रम होत असतात.

**(२)श्री क्षेत्र वडवळ :** सोलापूर-पुणे महामार्गावर श्री क्षेत्र वडवळ हे गाव नागनाथाच्या मंदिरामुळे महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी असल्यामुळे तेथे अनेक संप्रदाय होऊन गेले. त्यामध्ये भगवान शंकराचा अवतार असलेले श्रीनागनाथ महाराजांनी नागेश सांप्रदायाची निर्मिती केली.

नागेश संप्रदायातील एक अढळ भक्तिस्थान म्हणजे वडवळ होय. येथील बाराव्या शतकातील प्राचीन व भव्य मंदिर पाहण्यास राज्यातून दर अमावस्येस हजारो भाविक नियमितपणे येत असतात. गुरु शिष्याच्या प्रेमावर आधारित हा संप्रदाय असल्याने अनेक शिष्यानी संजीवन



दिलीप देशपांडे
मो. ९९२२०८७८५१

समाधी घेतलेली आहे. मंदिर परिसरात त्यांची गणना होते. तसेच मंदिर परिसरात खर्गतीर्थ, गोपाळ कृष्ण मंदिर, वरद बसवराज मंदिर आदी भक्ती स्थळे आहेत. दर अमावस्यास लाखो रुपयांची उलाढाल होते. प्रवास, पेढे, नारळ, सौंदर्य प्रसाधने, हॉटेल्स, खेळणीच्या माध्यमातून ही उलाढाल होते. श्री नागनाथ देवस्थान वडवळ पंच कमिटीच्या माध्यमातून भव्य भक्त निवासाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच देवस्थानच्या वेबसाईट पण निर्मिती केली आहे. सर्व धार्मिक व देवस्थानाची देखभाल व व्यवस्था पंच कमिटीचे चेअरमन श्रीकांत शिवपुजे हे त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने करत असतात. त्यांनी या माध्यमातून भक्त निवासाची निर्मिती करण्यासाठी पुढाकार घेऊन काम पूर्ण केले आहे.

तसेच शाहू धनवे यांनी भाविकांना महाप्रसाद मिळावा म्हणून अन्नछत्राची स्थापना करून शेकडो भाविकांना अन्नदान करण्यात येते.

मोहोळ तालुक्यात सुद्धा शेकडो ऐतिहासिक मंदिरे आहेत. त्यामध्ये खरकटणे येथील मारुती मंदिर प्रसिद्ध आहे. इसवी सन १७०४ याकाळात नानासाहेब पेशवे यांनी केलेल्या राज्यकारभारानंतर निजाम संस्थानाने खरकटणे गावावर हल्ला केला आणि ते गाव बेचिराख केले. गावाबाहेर मारुती मंदिर पूर्व पश्चिम भूमिका असणारे महाराष्ट्रातील एकमेव आहे. तसेच अक्षांश रेखांश रेषा या मंदिरावरून जात आहेत. त्यामुळे त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या मंदिराशेजारून भोयरे गावापर्यंत भुयारी मार्ग आहे. हा भुयारी मार्ग ऐतिहासिक दृष्टीने साक्ष देतो. निजामाने खरकटणे गावावर हल्ला करून दहशत माजवली. त्यामुळे हे गाव बेचिराख झाले. मंदिराची पूजा अर्चा करण्याचे काम एक दलित मातंग समाजातील लक्ष्मीबाई कसबे ह्या करत होत्या. ही बाब मुघल साम्राज्याच्या बादशहाला कळल्यानंतर तिला गाव सोडून जाण्याचा आदेश दिला. परंतु पूजा करत असताना निजामाने तिला ओव्या गात असताना तिचा वध केला. आजही या मारुती मंदिराच्या समोर तिची समाधी साक्ष देते. तेथेच मांगिर माता मंदिर दर्शन घेऊन प्रदक्षिणा पूर्ण होते. तसेच तेथे प्राचीन पुरातन महादेव मंदिर पण आहे आजही दर्शन वारी व अमावस्या हजारो भाविक नित्यनेमाने येत असतात.

**मोहोळ शहरातील १५० वर्षांपूर्वीचे श्रीराम मंदिर**

नागनाथ महाराजाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या चंद्रमौळी नगरी म्हणजे सध्याचे मोहोळच्या परिसरात अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये श्रीराम मंदिराचा समावेश होतो. नागनाथ ओढ्याच्या काठी १०० फूट उंचीच्या चौथऱ्यावर देशपांडे गल्लीतील १८ व्या शतकातील १५० वर्षांपूर्वीचे श्रीराम मंदिर इतिहासाची साक्ष देते. या मंदिराखाली श्री स्वामी समर्थ महाराज व गवई स्वामी ध्यानस्थ बसत होते. तेथे मोठे अंबार आहे.

कै . दत्तोबा देशपांडे यानी लाकडी इमल्यावर हे मंदिर बांधले होते. त्याचा जीर्णोद्धार पत्रकार संघाचे संस्थापक व माजी अध्यक्ष दिलीप देशपांडे, रमाकांत देशपांडे, कै. लक्ष्मीकांत देशपांडे, डॉ. प्रभाकर देशपांडे आदींनी केला. सुबक अशा श्रीराम पंचायतन म्हणजे श्रीराम सीतामाई, लक्ष्मण, हनुमंत, यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. या मंदिराची देखभाल करणारी तिसरी पिढी असून त्याचे व्यवस्था व पूजा पत्रकार दिलीपकाका देशपांडे करत आहेत. मंदिराच्या शेजारील घाटावर कै. राम जोशी सोलापूर यांच्या चित्रपटाचे चित्रीकरण पण झाले होते. तसेच अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज मंदिरात येऊन गेल्याने व तेथे ध्यानधारणा करत असल्याने त्या स्थानाला महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच मंदिराशेजारील ओढ्याच्या कपारीमध्ये गवई स्वामी व स्वामी महाराज यांची भेट झाल्याची पण माहिती आहे. दरवर्षी रामनवमी उत्सव केला जातो

आजची प्राचीन चंद्रमौळी नगरीमध्ये ओळखणारा मोहोळ शहरात प्राचीन वास्तू कलेचा नमुना असणाऱ्या नीळकंठेश्वर मंदिर व एका रात्रीत बांधल्या गेलेल्या हेमाडपंती मंदिरामध्ये श्री भानेश्वर मंदिर व चंद्रमौळी गणेश मंदिराचा समावेश होतो. तसेच नागनाथ भक्ताच्या संजीवनी समाधी पण आहेत. तसेच प्राचीन खंडोबा मंदिर, चाटी गल्लीतील जैन मंदिराचा पण समावेश होतो. तसेच भद्रता, वीरता आणि ऐश्वर्या भक्ती असणाऱ्या वीरभद्राचे मंदिर पण ७०० वर्षांपासूनचे जुने आहे. देशात फक्त दोन ठिकाणी असणारे तसेच चौमुखी मारुती मंदिर जिल्ह्यात एकमेव असणारे चारही दिशेला मुखातून त्या मूर्ती आहेत. तसेच तिथेच शेजारी व्यंकटेश मंदिर, पंढरपूर रोड वरील असणारे दत्त मंदिर पण मोहोळ शहरात प्रसिद्ध आहे. तर मोहोळ तालुक्यात बिटले येथील यमाई देवीचे मंदिर, भोयरे येथील जगदंबा मंदिर, नरखेड येथील व शेटफळ आणि यावली येथील सिद्धेश्वर मंदिर, सावळेश्वरचे ब्रम्हनाथ मंदिर, पोफळी येथील पांडवाचे मंदिर, पाटकुल येथील खंडोबा मंदिर, पापरीचे स्वयंभू शंभू महादेव मंदिर, पोखरापूर येथील जगदंबा व विठ्ठल बिरूदेव मंदिर मोठ्या दिमाखाने इतिहासाची साक्ष देत आहेत. धार्मिक परंपरा सालाबाद प्रमाणे तेथेही पार पाडत असतात.

---

**देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि वारसा असणाऱ्या मोहोळ तालुक्याने गेल्या ७५ वर्षात सर्वच क्षेत्रात कात टाकत आपला ठसा जिल्ह्यासह राज्याच्या नकाशावर ठळकपणे उमटविला आहे. चार महामार्ग आणि राज्यातील सर्वच प्रसिद्ध तिर्थक्षेत्राना जोडणारा जिल्ह्यातील मध्यवर्ती तालुका असणाऱ्या मोहोळची सामाजिक समतेचा आणि पुरोगामीत्वाचा पुरस्कार करणारा तालुका म्हणून राज्यात ओळख आहे. विविध क्षेत्राने दिलेल्या योगदानामुळे तालुक्याची वाटचाल विकासाकडे सुरू आहे. म्हणूनच विकासाच्या वाटेवरील तालुका म्हणून मोहोळची ओळख नव्याने होत आहे.**

# मोहोळ तालुक्याची वाटचाल विकासाकडे सुरू

सन १९५०च्या राज्य पुनर्रचनेत हैदराबाद संस्थानातील ६४ गावे मिरज संस्थानातील सहा गावे व माढा तालुक्यातील २० गावे असा पूर्वी ९० गावे असणारा मोहोळ तालुका पुन्हा १०४ गावांचा बनला. समुद्रसपाटीपासून ४७५ मीटर उंचीवर १७.७५ रेखांशामध्ये वसलेल्या मोहोळ तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र एक लाख ५६ हजार ४०० हेक्टर आहे. त्यातील लागवडीचे क्षेत्र १ लाख २४ हजार ७७५ इतके असून पडीक क्षेत्र ३१ हजार २०५ हेक्टर इतके आहे.

भीमा, सीना, भोगावती, आणि नागझरी अशा चार नद्यांचा वारसा लाभलेला, दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, तुळजापूरची आई भवानी, मोहोळचे नागनाथ महाराज, सोलापूरचे सिद्धेश्वर देवस्थान, कोल्हापूरच्या अंबाबाई आदि तीर्थक्षेत्राच्या मार्गावरील मध्यवर्ती असलेला, मुंबई- हैदराबाद, मुंबई -विजापूर, नागपूर-रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्गार असणारा, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, कला, शाहिरी परंपरेबरोबरच ऐतिहासिक अधिष्ठान लाभलेला म्हणून या तालुक्याची ओळख आहे. शेती आणि उद्योगासाठी लागणाऱ्या पाण्याची काटेकोर नियोजन केल्यामुळे मोहोळ तालुक्यात शेतकऱ्यांच्या हक्काचे चार कारखाने आहेत. भीमा, लोकनेते बाबुराव पाटील, आष्टी व जकराया या चार साखर कारखान्यांनी तालुक्याच्या औद्योगिक क्षेत्रात क्रांती केली आहे. या चार कारखान्यांनी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यात महत्वपूर्ण भूमिका तर बजावलीच आहे शिवाय तरुणांच्या हाताला काम देऊन काही अंशी बेरोजगारी कमी करण्यास हातभार लावला आहे. तालुक्यात उसाचे क्षेत्र जरी वाढले असले तरी पारंपारिक शेती पद्धतीत क्रांतिकारक बदल घडवून कमी पाण्यावर भरघोस उत्पन्न देणाऱ्या डाळिंब, द्राक्ष, केळी यासारख्या पिकाबरोबरच आता प्रायोगिक तत्त्वावर स्ट्रॉबेरी, सफरचंद यासारख्या पिकांच्या माध्यमातून तालुक्यातील नवोदित शेतकरी आणि आणि युवा उद्योजकांनी हरितक्रांती घडवून आणली आहे. पूर्वी केवळ मालदांडी ज्वारीसाठी प्रसिद्ध असणारा तालुका आता ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा तालुका म्हणून ओळखला जातो.


राजकीय परिघाबाहेरची मैत्री जपणारा तालुका म्हणून मोहोळची ओळख. राजकीय विरोधकाला वैयक्तिक शत्रू समजण्याचा अलीकडच्या काळात प्रघात पडत असला तरी लोकनेते बाबुराव पाटील, माजी मंत्री शहाजीराव पाटील, देशभक्त संभाजीराव गरड (महाराज) यांनी राजकारण करताना आपल्या वैयक्तिक मैत्रीत राजकारणाला कधीच थारा दिला नाही. सामाजिक समतेचा आणि पुरोगामीत्वाचा विचार जपणाऱ्या मोहोळ तालुक्यातील राजकारण अलीकडच्या काळात कूस बदलताना दिसत आहे. राजकीय टीका करताना सर्वच पक्षातील नेते व्यक्तिगत पातळीवर घसरू लागले आहेत. हे भविष्यातील राजकारणासाठी आणि नव्या दमाच्या राजकारण्यांसाठी घातक ठरणार आहे. मुद्द्याची चर्चा गुद्यावर येऊ लागली आहे. असे असले तरी माजी मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे,माजी आमदार राजन पाटील, रमेश कदम, विद्यमान आमदार यशवंत माने, जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती विजयराज डोंगरे, माजी जि.प.सदस्य उमेश पाटील, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, प्रदेश सदस्य संतोष पाटील (नरखेडकर), तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, सुशील भैय्या क्षीरसागर, यांनी तालुक्यातील विविध विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देत तालुक्याच्या विकासाला हातभार लावला आहे. उजनी धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यामुळे तालुक्यातील बागायत क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. मात्र तालुक्याच्या सिंचन क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या आष्टी आणि शिरापूर या योजना अद्यापही अपूर्णावस्थेतच आहेत. आष्टी सिंचन योजनेच्या माध्यमातून तालुक्यातील मोठ्याप्रमाणात क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. ही योजना पूर्णत्वास जावी यासाठी आमदार यशवंत माने, माजी सभापती विजयराज डोंगरे यांचा शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे. या पाठपुराव्याच्या जोरावरच वर्षभरापूर्वीच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी ८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तालुक्यात उद्योग, कृषी क्षेत्रात चांगले बदल होत असले तरी नेतृत्वाच्या अनास्थेमुळे शैक्षणीक आणि आरोग्य क्षेत्रात फारशी क्रांती झाली नाही. सद्या विकासाच्या वाटेवर असला तरी राज्यासह जिल्ह्यात मध्यवर्ती तालुका म्हणून ओळख असणाऱ्या मोहोळचा म्हणावा तसा विकास झाला नाही हे सर्वमान्य आणि निर्विवाद सत्य आहे. यात यापुढे तरी सुधारणा व्हावी हीच रोजच्या जगण्याच्या धावपळीत अडकलेल्या आणि लेकरांच्या उज्ज्वल भवितव्याच्या प्रयत्नात असलेल्या सर्वसामान्य जनतेचीअपेक्षा आहे.

- महेश सोवनी
मोहोळ







अंबादास दानवे

विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

## शुभ संदेश

सोलापूर तरुण भारत' राष्ट्रीय विचारांचा आणि विकासाभिमुख पत्रकारितेचा मानबिंदू आहे. निर्भीडपणे मत मांडणे हे वैशिष्ट्य जपत तरुण भारत ४० वर्षे यशस्वी वाटचाल करीत आहे.

दर रविवारी 'आसमंत', बुधवारी संदाफुली' आणि आठवड्याला कृषी, आरोग्य, विश्वरंग या वाचकप्रिय पुरवण्या, राष्ट्रीय स्तरावरील विविध प्रासंगिक विषयांवर मासिक स्वरूपात प्रकाशित होणारे विशेषांक आम्हा वाचकांसाठी अनोखी पर्वणीच आहे.

यशाचे कौतुक, समस्यांचे सखोल विश्लेषण, सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नेतृत्वशील कर्तृत्ववान मान्यवरांच्या कार्याची दखल तसेच सोलापूर शहर व जिल्ह्याच्या विकासाला चालना देत दि. १ ऑगस्ट, २०२४ रोजी ४१ व्या वर्षात पदार्पण केले आहे.

सोलापूर तरुण भारतच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण तरुण भारत परिवारास, त्यांच्या वाचकांना मनापासून शुभेच्छा!

आपला

(अंबादास दानवे)

कार्यालय : ३०, तळ मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२, फोन नं. : २२०४ १७०२/२२०२ ४२६२
बंगला : "अजिंक्यतारा" (क-५), मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, फोन नं. : २२८२ ०३९९/२२८२ ०४८८
ई-मेल : lopambadasdanve@gmail.com





